**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२७५

निर्णय दिनांक : ०१.०७.२००८

१ श्री. गौतम तोताराम वाघ, : अपीलार्थी
रा. सिल्लोड जि.औरंगाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तथा सहायक अभियंता,
महाराष्ट्र राज्य वीज नियामक मंडळ कार्यालय,
सिल्लोड. ता.सिल्लोड,जि.औरंगाबाद.

२ जन अपिलीय अधिकारी,
तथा कार्यकारी अभियंता,
महावितरण विभागीय कार्यालय, कन्नड,
जि.औरंगाबाद.

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः सहायक अभियंता,
उपविभाग, महाराष्ट्र राज्य
विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
सिल्लोड, जि.औरंगाबाद

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.०७.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. गौतम तोताराम वाघ, (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. दिपक जगन्नाथ माने, जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता,सिल्लोड उपविभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. एकनाथ नामदेव

सिरसाठ,विभागीय लेखापाल, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महावितरण विभागीय कार्यालय, कन्नड जि.औरंगाबाद यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि.०७.४.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ०१.०४.१९९७ ते ०७.०४.२००७ या कालावधीतील त्यांच्या वीज बिलासंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> "वीज बिलाची सविस्तर माहिती जसे आतापर्यंत भरलेल्या बिलाची दिनांक, रक्कम, त्यावेळचे रिडींग, खंडीत करण्याची तारीख, खंडीत करतेवेळी मीटरची असलेली रिडींग"

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २३.०४.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचा तपशील त्यांना पुरविला. या तपशीलामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या माहितीतील अपिलार्थीने भरलेल्या बिलाचा दिनांक, रक्कम, विद्युत पुरवठा खंडीत करण्याची तारीख व त्यावेळचे रिडींग हे दिल्याचे आढळून येत. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि.०२.०६.२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १६.०६.२००७ रोजी सुनावणी घेऊन दि. २२.६.२००७ च्या पत्राद्वारे या संदर्भातील आपला निर्णय पारित केला. या निर्णयामध्ये त्यांनी अपिलार्थीस माहिती दिल्याचे नमूद करुन अपिलार्थीचे अपील निकाली काढले आहे.

तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या वरील निर्णयाने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.०८.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती खोटी व चुकीची आहे. प्रत्यक्षात त्यांचा विद्युत पुरवठा दि. ३१.३.२००५ रोजी खंडीत केला गेला. त्यांच्या या म्हणण्यापृष्ठ्यर्थ त्यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या वीज आकार देयकाची पावती दाखवली. त्यांचा वीज पुरवठा प्रत्यक्षात दि. ३१.३.२००५ रोजी खंडीत झाला. याबाबतचा अहवाल जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या उपविभागीय कार्यालयाकडे दि. ४.४.२००५ रोजी पाठविला, तथापि जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. २३.४.२००७ रोजीच्या पत्रान्वये, दि. १५.११.२००५ रोजी त्यांचा विद्युत पुरवठा खंडीत करण्यात आला, अशी चुकीची माहिती कळविली.त्यांनी आपल्या मूळ माहितीच्या अर्जामध्ये विद्युत पुरवठा खंडीत करतेवेळी मीटरचे रिडींग व संबंधित दिनांकाची माहिती मागितली होती, तथापि ही माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही. तसेच जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील त्यांच्या प्रथम अपिलावरील निर्णयही त्यांना अद्यापही प्राप्त झाला नाही. मात्र सुनावणीच्या वेळी ते उपस्थित असल्याबद्दल संबंधित रजिस्टरवर/निकालपत्रावर जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत त्यांची सही करुन घेण्यात आली.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा विद्युत पुरवठा दि. ३१.३.२००५ रोजी कायमस्वरुपी खंडीत करण्यात आला. तथापि संबंधित संगणकास ही माहिती ऑक्टोबर २००५ मध्ये पुरवली गेल्याने (Data feeding) त्यांचे C.P.L. (कन्स्युमर्स पर्सनल लेजर) मध्ये दि. १५.११.२००५ रोजी विद्युत पुरवठा खंडीत

झाल्याची नोंद संगणकाच्या सॉफ्टवेअरद्वारे झाली व याचआधारे त्यांनी ही माहिती अपिलार्थीस कळविली आहे. अपिलार्थीचा विद्युत पुरवठा दि. ३१.३.२००५ रोजी खंडीत झाल्याचे त्यांनी आज सुनावणीमध्ये मान्य केले आहे. वीज पुरवठा प्रत्यक्ष खंडीत होण्याची तारीख व ग्राहकाची सदर विद्युत पुरवठा खंडीत झाल्याबाबतची माहिती संगणकास (Data feeding)फीड करणे,यामध्ये बराच कालावधी गेला असल्याने, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून या कालावधीचे आकारण्यात आलेल्या बिलाची रक्कम रु.१८८६/- चे समायोजन करुन ही वजावट अपिलार्थीच्या माहे नोव्हेंबर २००५ च्या बिलामधून करण्यात आली आहे. अपिलार्थीस त्यांनी प्रत्यक्षात वीज पुरविली नसून देखील अपीलार्थीस बील कसे पाठवले याची विचारणा केली असता, त्यांनी असे सांगितले की, त्या वेळी तात्पुरता वीज पुरवठा खंडीत केल्याप्रकरणी पुरवठा खंडीत केलेल्या महिन्याच्या मागील सहा महिन्याच्या वीजवापराची सरासरी काढून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.कडून ग्राहकास वीज आकारणी करण्यात येते. जर ग्राहकाने वीज वापरली नसेल तर त्या कालावधीची देखील ग्राहकाला विद्युत आकारणी करण्याची वीज मंडळाची ही पध्दत सर्वथैव चुकीची व अन्यायकारक असल्याचे आयोगाचे मत आहे. वीज मंडळ व्यवस्थापनाने याची नोंद घेऊन वीज आकारणी पध्दतीमध्ये आवश्यक तो बदल करण्यात यावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीने मागितलेली माहिती सन १९९७ पासूनची आहे तथापि संगणकामध्ये सन १९९९ पासूनची माहिती उपलब्ध आहे. सन १९९७ ते १९९९ या कालावधीतील माहिती ते अपिलार्थीस आता ३० दिवसांचे आत विनामूल्य देण्यास तयार आहेत. अपिलार्थीचा वीज पुरवठा खंडीत करतेवेळी मीटर रिडींग ४११८ युनिटस् इतके होते तथापि त्यावेळी वीज आकारणी करण्याच्या पध्दतीनुसार जर एखाद्या ग्राहकाचे मीटर वापरात नसेल/बंद असेल तर मागील सहा महिन्याच्या सरासरीवरुन मीटरचे रिडींग गृहित धरण्यात येत होते व त्याप्रमाणे संगणकात Data feeding करण्यात येत होते. म्हणून अपिलार्थीच्या मीटर संदर्भात ४२७५ युनिटस् इतकी मीटर रिडींगची नोंद करण्यात

आली.अपिलार्थीस चुकीच्या केलेल्या विद्युत आकारणीच्या या रु.१८८६/- इतक्या जास्तीच्या रकमेचे त्यांनी अपिलार्थीच्या पुढील बिलात समायोजन केले आले. अपिलार्थीस त्यांनी दिलेली माहिती त्यांच्या कार्यालयाच्या लेजरवरुन दिली होती. सदर लेजर संगणकामार्फत भरले होते. यामुळे अवास्तव अथवा जादा आकारणीबाबतची अपिलार्थीची तक्रार अयोग्य आहे. आज रोजी अपिलार्थीकडे रु. १२३५५/-इतकी थकबाकी आहे. अपिलार्थीने शेवटचे बील दि. १५.७.२००४ रोजी भरले असून त्यानंतरच्या कोणत्याही बिलाचा भरणा केलेला नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की,त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या निर्णयाची प्रत दिलेली आहे. मात्र या संदर्भात आयोगाने याबाबत त्यांना पुरावा सादर करण्याचे सूचित केले असता, ते आयोगासमोर या संदर्भातील कोणताही पुरावा सादर करु शकले नाहीत. यावरुन अपिलार्थी यांचे, त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रथम अपील निर्णयाची प्रत प्राप्त झाली नाही, हे म्हणणे सिध्द होत आहे.जन अपिलीय अधिकारी यांनी अपील ठरविताना अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांना एकत्र बोलावून, त्यांचे म्हणणे ऐकून, ते नोंदवून घेऊन त्यावर आपला स्वतंत्र निर्णय लिखित स्वरुपात पारित करणे व या निर्णयाची प्रत सर्व संबंधितांना देणे हे 'अपील ठरविणे' या प्रक्रियेमध्ये अभिप्रेत आहे. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर घेतलेला निर्णय त्यांच्या कार्यालयीन रजिस्टरमध्ये लिहिला असून त्यावर अपिलार्थी यांची स्वाक्षरी घेतली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अशाप्रकारच्या त्यांच्या पध्दतीमध्ये, येथून पुढे माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत त्यांच्याकडे प्राप्त प्रथम अपील ठरवितांना वर सूचविल्याप्रमाणे बदल करावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. ७.४.२००७ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २३.४.२००७

रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. तथापि या पत्राचे अवलोकन केले असता त्यामध्ये त्यांनी, अपिलार्थीस, त्यांनी भरलेल्या बिलाच्या तारखा व त्यावेळचे मीटर रिडींग याबाबतची माहिती कळविल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीस त्यांनी वीज खंडीत करण्याची तारीख व वीज खंडीत करतेवेळी मीटरचे असलेले रिडींग या दोन मुद्यांवरील माहिती दिलेली आहे तथापि ती चुकीची असल्याचे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, या दोन मुद्यांवरील माहितीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी संगणकास Data feeding करण्यासाठी घेतलेला कालावधी व तत्कालीन वीज आकारणी करण्याची पध्दत, यामुळे हा फरक पडल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती त्यांच्याकडील कन्झ्युमर्स पर्सनल लेजरवरुन दिलेली आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही असद्‌हेतूने अपिलार्थीस ही माहिती चुकीची दिल्याचे आयोगास निःसंशयपणे आढळून येत नाही. मात्र आता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती तीस दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे कबूल केले आहे.उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस चुकीची माहिती मिळण्यासाठी म्हणजेच, कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयात ज्या कर्मचाऱ्यांकडून संगणकास उशीरा (Data feeding) करण्यात आली, त्यांच्यावर कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, कन्नड यांनी प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी. असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. केवळ कर्मचारी व अधिकारी यांच्या या चुकीमुळे, सामान्य ग्राहकाला कशाप्रकारे चुकीची माहिती मिळू शकते, याचे हे प्रकरण मुर्तीमंत उदाहरण ठरेल, असे म्हटल्यास वावगे होणार नाही. या संदर्भात व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी निर्णयामध्ये वर उल्लेखिल्याप्रमाणे वीज आकारणी पध्दतीत वीज ग्राहकांना न्याय मिळेल, असे योग्य ते बदल करावेत. सदर सूचना त्यांना अधिनियमाच्या कलम १९ (८)(क)(चार) नुसार देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ०१.०७.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. गौतम तोताराम वाघ, शिक्षक कॉलनी,म्हसोबानगर, सिल्लोड ता.सिल्लोड जि.औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, सिल्लोड उपविभाग महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, सिल्लोड, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,महावितरण विभागीय कार्यालय, कन्नड, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, पाचवा मजला, प्रकाशगड, वांद्रे, पूर्व, मुंबई-५१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२७६

निर्णय दिनांक : ०१.०७.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. दिनकर गोविंदराव मस्के,<br>रा. गवळेवाडी, पो. पालवन ता.जि.बीड. | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>तथा प्राचार्य,<br>बंकटस्वामी महाविद्यालय,<br>बीड जि.बीड | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी,<br>तथा प्राचार्य,<br>बंकटस्वामी महाविद्यालय,<br>जालनारोड, बीड जि.बीड | | |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.०७.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. गोविंदराव बाजीराव माने, जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, बंकटस्वामी महाविद्यालय, बीड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), श्री. रघुनाथ श्रीरंग कदम,सहायक जन माहिती अधिकारी,बंकटस्वामी महाविद्यालय,बीड, तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, बंकटस्वामी महाविद्यालय, बीड यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व त्रयस्थ पक्ष श्री. अशोक शिवाजी धुमाळ (यापुढे त्यांना त्रयस्थ पक्ष असे

संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर अपिलार्थी श्री. दिनकर गोविंदराव मस्के, (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि.०५.४.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. अशोक शिवाजी धूमाळ, वाणिज्य विभाग (कनिष्ठ) यांच्या नियुक्तीसंदर्भात सन २००७-०८ या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"प्रा.डी.डी.शिंदे यांच्या सेवानिवृत्ती नंतर प्रा.अशोक शिवाजी धुमाळ यांची प्राध्यापक (शिक्षक) पदी नियुक्ती केलेली आहे. त्यासंबंधी खालील कागदपत्रांच्या प्रती देण्यात याव्यात.

१) मा. शिक्षण उपसंचालक यांच्याकडून नियुक्ती करण्यासाठी घेतलेल्या ना हरकत प्रमाणपत्राची प्रत.

२) वर्तमानपत्रात दिलेल्या जाहिरीतील कात्रण.

३) सेवायोजन कार्यालयातुन मागवलेली उमेदवारांची यादी.

४) कनिष्ठ महाविद्यालयाच्या रोष्टरची प्रमाणित प्रत.

५) सदरील जागा मागासवर्गीयासाठी राखीव होती काय? असल्यास मागासवर्गीय उमेदवार मिळविण्यासाठी केलेल्या प्रयत्नाची कागदपत्र

६) मुलाखतीस आलेल्या उमेदवारांची यादी.

७) मुलाखत निवड समितीने घेतलेल्या निर्णयाची प्रत.

८) संस्थेने घेतलेल्या ठरावाची प्रत.

९) प्रा. धुमाळ यांना दिलेल्या नियुक्ती आदेशाची प्रत.

१०) मुलाखतीचा दिनांक व मुलाखतीस उपस्थित असलेल्या निवड समितीच्या सदस्याची यादी."

अपिलार्थीने सदर माहिती शीघ्र टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील विहित मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि.२८.०५.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २०.०७.२००७ रोजी सुनावणी घेतली. या सुनावणी संदर्भात जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी या सुनावणीचे इतिवृत्त आजच्या सुनावणीच्या वेळी आयोगाकडे सादर केले आहे. हे इतिवृत्त वाचनीय हस्ताक्षरात लिहिलेले नसल्याने या इतिवृत्ताचे वाचन जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केले. यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दि. २०.७.२००७ रोजी उपलब्ध करुन दिली होती. तथापि ही माहिती स्वीकारण्यास अपिलार्थीने नाकारले. सुनावणीच्या इतिवृत्तामध्ये असेही नमूद करण्यात आले आहे की, अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला त्यावेळेस जन माहिती अधिकारी व सहायक जन माहिती अधिकारी हे शैक्षणिक वर्षातील नियमित सुटीवर गेले होते. अपिलार्थीने केलेला माहितीचा अर्ज हा शैक्षणिक सुटीच्या कालावधीमधील असल्याने व सदर माहिती संस्थेच्या कार्यालयात उपलब्ध असल्याने त्यांना अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती पुरवता आली नाही. आता अपिलार्थीस ही माहिती जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील प्रथम अपीलाच्या सुनावणीचे दिवशी, दि. २०.७.२००७ रोजी देऊ केली होती, तथापि अपिलार्थीने ती स्वीकारली नाही. उपरोक्त सुनावणीनंतर अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २१.७.२००७ व २५.७.२००७ रोजीच्या पत्रान्वये, दि. २०.७.२००७ रोजीच्या अपील सुनावणीच्या रोजनाम्याची प्रत मिळाल्याचे कळवून त्यांचे अपील रद्द करण्याची विनंती जन अपिलीय अधिकारी यांना केली होती. खुद्द अपिलार्थीने सुनावणी झाल्यानंतर अपील रद्द करण्याची मागणी केल्यानंतर संबंधित जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणातील अपिलार्थीची नस्ती बंद केली.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील रद्द करण्याची मागणी करुनही अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.०८.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे. या अर्जामध्ये त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना अपूर्ण माहिती दिल्याने त्यांनी माहिती स्वीकृत केली नसल्याचे नमूद करुन, त्यांनी आपल्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्याची तसेच त्यांच्यावर कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत, त्यांनी आपला युक्तीवाद दि. २३.६.२००८ रोजीच्या (सदर पत्र आयोगाचे कार्यालयात दि. ३०.६.२००८ रोजी प्राप्त झाले आहे.) पत्रान्वये आपले म्हणणे सादर केले आहे. त्यामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विनामूल्य माहिती देण्याचे मान्य करुनही त्यांनी माहिती दिली नाही, अद्यापपर्यंत त्यांना माहिती प्राप्त झाली नसल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची त्यांनी आयोगास या पत्राच्या अखेरीस विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, ते या पदावर दोन महिन्यापूर्वीच रुजू झाले असून अपिलार्थीस माहिती देण्यापृष्ठ्यर्थ झालेल्या विलंबाबाबतची अधिक माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही. अपिलार्थीस त्यांनी विलंबाने माहिती देऊ केली होती, तथापि अपिलार्थी यांनी ती स्वीकारली नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीकडून असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या प्रथम अपील सुनावणीमध्ये त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न दिल्याबद्दल तोंडी खेद व्यक्त केला होता व तसेच अपिलार्थीस विनामूल्य माहिती देऊ केली होती. तथापि सदर माहितीचे कोणत्याही प्रकारे अवलोकन न करता अपिलार्थीने ती माहिती स्वीकारण्याचे नाकारले आहे. अपिलार्थीस त्यांनी अपूर्ण स्वरुपात माहिती देऊ केली नव्हती.

अपिलार्थीने सदर माहितीचे अवलोकन न करता ती माहिती अपूर्ण असल्याचा निष्कर्ष काढून आयोगास त्यांचे म्हणणे कळविले आहे. अपिलार्थी हे त्यांच्या संस्थेकडील जुने कर्मचारी असून त्यांची नेमणूक न्यायालयाच्या आदेशास अधीन राहून गेली केली होती. न्यायालयाचे आदेश प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या सेवा संपुष्टीत करण्यात आल्या. त्यानंतर अपिलार्थी अशाप्रकारचे अर्ज त्यांच्या महाविद्यालयाकडे वारंवार करीत असतात.

त्रयस्थ पक्षातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांच्यासंबंधीची माहिती अपिलार्थीस देण्यास त्यांची कोणतीही हरकत नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, या प्रकरणी मूळात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणत्याही प्रकारे प्रतिसाद दिलेला नाही. या विलंबाचे कारण जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या सुनावणीशी संबंधित लेख्यात दिसून येत आहे. यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने ही माहिती शैक्षणिक सुटीच्या काळात मागितली होती. त्यावेळी जन माहिती अधिकारी अथवा सहायक जन माहिती अधिकारी हे कोणीही महाविद्यालयात कार्यरत नसल्याने, अपिलार्थीस ही माहिती विहित मुदतीत प्राप्त होऊ शकली नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कोणत्याही अर्जदाराने अधिनियमातील कलम (६) प्रमाणे माहितीची मागणी केल्यास अधिनियमातील कलम ७ प्रमाणे अर्जदारास विहित मुदतीत माहिती पुरवणे जन माहिती अधिकारी यांना भाग आहे. सदर तरतुद ही कायमस्वरुपी असून अशाप्रकारच्या कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणास जरी दीर्घ कालावधीकरिता सुटी असेल तरी, या कालावधीमध्ये अर्जदारास माहिती देण्याचे काम संबंधित प्राधिकरणाने अखंडीतपणे करणे या अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. अपिलार्थीस माहिती देण्याच्या अनुज्ञेय कालावधीमध्ये सर्व प्रकारच्या सुटयांचा समावेश आहे. कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे अमुक एका ठिकाणी किंवा ठराविक कालावधीत माहिती मागता येणार नाही अथवा माहिती

देता येणार नाही, अशा प्रकारची कोणतीही बाब या अधिनियमामध्ये संभवत नाही. जर संबंधित जन माहिती अधिकारी काही कारणामुळे रजेवर असतील तर संबंधित संस्थेने/सार्वजनिक प्राधिकरणाने या कालावधीकरिता बदली जन माहिती अधिकारी यांची नेमणूक करणे गरजेचे होते. तथापि या संस्थेच्या प्रशासनाने अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही केल्याचे या प्रकरणी दिसून येत नाही. कोणत्याही क्षणी एखाद्या सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचेबाबत ते उपलब्ध नाहीत,अशी परिस्थिती निर्माण होणे हे मूळातच अधिनियमामधील तरतुदीमध्ये अभिप्रेत नसल्याने, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी लावलेल्या विलंबाचे त्यांनी पुढे केलेले वरील कारण आयोग मान्य करीत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती दि. २०.७.२००७ रोजी म्हणजेच प्रथम अपील सुनावणीचे दिवशी तयार ठेवली होती, असे जरी गृहीत धरले तरीही या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी एकूण ७६ दिवसांचा असमर्थनीय विलंब लावल्याचे या प्रकरणी दिसून येते. अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यापासून ७६ दिवस इतक्या कालावधीकरिता वंचित ठेवण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असलेले त्यांचे सर्व सहाय्यक, हे सर्वजण जबाबदार ठरत आहेत, असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी जन माहिती अधिकारी व त्यांचे सहायक व इतर अधिकारी यांना देखिल जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५(५) अन्वये तरतुद आहे. हे पाहता, या प्रकरणी जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती पुरविण्याप्रित्यर्थ एकूण ७६ दिवसांसाठी लावलेल्या असमर्थनीय विलंबाबद्दल त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २०(१) च्या तरतुदीअन्वये विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/-प्रमाणे (७६ दिवसांसाठी) एकूण रु.१९०००/- (अक्षरी रुपये एकोणावीस हजार)

इतकी शास्ती लावण्यात येत आहे. संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित असलेले सहायक अधिकारी/कर्मचारी यांनी सदर शास्तीची रक्कम शासकीय कोषागारात पुढील लेखाशीर्षाखाली जास्तीत जास्त पाच हप्त्यात भरावी. लेखाशीर्ष- "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) "

सदर शास्तीची अधिकारी/कर्मचारी निहाय विभागणी अध्यक्ष, एस.बी.एज्युकेशन सोसायटी, श्री. बंकटस्वामी महाविद्यालय, बीड यांनी हे आदेश निर्गमित होताच यथायोग्यरित्या सात दिवसांचे आत करावी व यासंबंधीचा आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. सदर शास्तीची रक्कम संबंधित अधिकारी/कर्मचारी हे नियमितपणे शासकीय कोषागारात भरतील, असे अध्यक्ष, एस.बी.एज्युकेशन सोसायटी, श्री. बंकटस्वामी महाविद्यालय, बीड यांनी पहावे व या संदर्भातील आपला अनुपालन अहवाल ऑगस्ट, २००८ पासून दरमहा, शास्तीची संपूर्ण रक्कम शासकीय कोषागारात जमा होईपर्यंत आयोगास सादर करावा. त्याचप्रमाणे सदर शास्तीचा भरणा संस्थेतील संबंधित जन माहिती अधिकारी/कर्मचारी यांनी विहित मुदतीत न केल्यास विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद यांनी सदर शास्तीची रक्कम संबंधित संस्थेच्या अनुदानातून वसूल करावी व आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी असे दिसून आले आहे की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. २०.०७.२००७ रोजी त्यांना देऊ केलेली माहिती त्यांनी न वाचताच, ती अपूर्ण असल्याच्या कारणावरुन स्वीकारण्याचे नाकारले आहे.अपिलार्थीची सदर कृती अविवेकी आहे. प्रथम

अपीलावर निर्णय घेतल्यानंतर जन अपिलीय अधिकारी यांचेकडे अपील रद्द करण्याची विनंती करणे, जन माहिती अधिकारी यांनी देऊ केलेली माहिती वाचल्याशिवाय ती अपूर्ण आहे, असे समजून अस्वीकृत करणे या त्यांच्या वर्तनातील विसंगतीबाबत त्यांना आयोगातर्फे समज देण्यात येत असून त्यांनी इत:पर अशा गोष्टी टाळाव्यात, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात, त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी, यांनी अपिलार्थीस मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती पुरविण्याप्रित्यर्थ एकूण ७६ दिवसांसाठी लावलेल्या असमर्थनीय विलंबाबद्दल त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २०(१) च्या तरतुदीअन्वये विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/-प्रमाणे (७६ दिवसांसाठी) एकूण रु.१९०००/- (अक्षरी रुपये एकोणावीस हजार) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे करावा.

४. संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी हे वरील अ.क्र.३ मधील शास्तीची रक्कम नियमितपणे शासकीय कोषागारात भरतील याची अध्यक्ष, एस.बी.एज्युकेशन सोसायटी, श्री. बंकटस्वामी महाविद्यालय, जालनारोड,

बीड यांनी खात्री करावी व आपला अनुपालन अहवाल ऑगस्ट २००८ पासून दरमहा शास्तीच्या रकमेचा शासकीय कोषागारात पूर्णपणे भरणा होईपर्यंत आयोगास पाठवावा.

५. अपिलार्थीस समज देण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ०१.०७.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. दिनकर गोविंदराव मस्के,रा. गवळेवाडी, पो. पालवन ता.जि.बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, बंकटस्वामी महाविद्यालय, जालनारोड, बीड जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य,बंकटस्वामी महाविद्यालय, जालनारोड, बीड जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२७७

निर्णय दिनांक : ०१.०७.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. खादरी महंमद इरफान पि.महंमद सोहेल, नांदेड. | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नौनिहाल उर्दू प्राथमिक शाळा, नांदेड | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, नौनिहाल एज्युकेशन सोसायटी नांदेड | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.०७.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. खादरी महंमद इरफान पि.महंमद सोहेल (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नौनिहाल उर्दू प्राथमिक शाळा, नांदेड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, नौनिहाल एज्युकेशन सोसायटी, नांदेड (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि.११.४.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या ऊर्दू (प्राथमिक) शाळेसंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"आपल्या उर्दु प्राथमिक शाळेअंतर्गत कार्यरत असलेले एकूण शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या नावांची यादी तसेच त्यांनी नेमणुक दिनांक व कार्यरत असलेले सर्व कर्मचाऱ्यांच्या शैक्षणिक पात्रतेच्या सत्यप्रती तसेच त्यांच्या जातीच्या प्रमाणपत्राच्या सत्यप्रती तसेच त्यांची कायमस्वरुपी नियुक्ती करण्यासाठी सदरील शिक्षण संस्थेच्या ठरावाची सत्यप्रत. मुलाखती करीता आलेल्या उमेदवारांच्या नावाच्या यादीच्या सत्यप्रती, मुलाखत घेणाऱ्या संचालक मंडळाच्या शेऱ्याच्या सत्यप्रती मिळणेबाबत. तसेच कायम स्वरुपी नियुक्तीसाठी वृत्तपत्रात दिलेल्या जाहिरातीच्या सत्यप्रती मिळणेबाबत."

अपिलार्थीने सदर माहिती सर्वसाधारण टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. त्यामुळे अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि.०८.०६.२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. तथापि या अपील अर्जावर देखील जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली असल्याचे किंवा या संदर्भात अपिलार्थीबरोबर कोणताही पत्रव्यवहार केला असल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.०८.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत, त्यामुळे अपिलार्थीने आयोगास सादर केलेल्या द्वितीय अपील अर्जातील त्यांचे लेखी निवेदन हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत. सदर सुनावणीस हजर राहण्यासाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना आयोगातर्फे दि. २८.०५.२००८ रोजी लेखी स्वरुपात नोटीस पाठविण्यात आलेली आहे. त्याचबरोबर आयोगाचे कार्यालयातर्फे दूरध्वनीद्वारे दिनांक १६.६.२००८ रोजी त्यांच्या शाळेतील शिक्षक, श्री. अनिस यांना त्यांच्या भ्रमणध्वनी (क्र. ९८९०२३२२९८) वर याबाबत कळविले असता, त्यांनी सदरचा निरोप संबंधितांना देण्यास नकार दिला आहे. संबंधित जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या अनधिकृत गैरहजरेची आयोगातर्फे सखेद नोंद घेण्यात येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, सदर शैक्षणिक संस्थेस राज्य शासनातर्फे अनुदान प्राप्त होत असल्याने ही संस्था शासकीय/सार्वजनिक प्राधिकरण ठरत आहे. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या दि. ११.४.२००७ च्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप असे मोठे नव्हते की, जी देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयातील साधनसामग्री या कामासाठी प्रमाणाबाहेर वळवावी लागत होती. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ३ च्या तरतुदीनुसार अपिलार्थीस ही माहिती अधिनियमातील कलम ६ प्रमाणे मागण्याचा हक्क आहे. त्याप्रमाणे अपिलार्थीने ती अधिनियमातील कलम ६ चा वापर करुन जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली आहे. अधिनियमातील कलम ७ मधील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस सदर माहिती संदर्भात विहीत मुदतीत कार्यवाही करणे अनिवार्य आहे. त्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी  व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणत्याही प्रकारे माहिती न

देऊन व त्यांच्याकडील अपील अर्जावर सुनावणी न घेऊन अधिनियमातील अनुक्रमे कलम ७ व कलम १९(६) चा भंग केल्याचे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारे अधिनियमातील कलमांचा भंग करुन स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे.सबब जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन घेण्याप्रित्यर्थ कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अधिनियमातील विहित कालावधीपेक्षा जास्त कालावधीसाठी वंचित ठेवल्याबद्दल त्यांच्यावर प्रतिदिनी रु.२५०/- याप्रमाणे एकूण रुपये २५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, त्यांचे या प्रकरणी काहीही म्हणणे नाही, असे समजून हेच आदेश अंतीम करण्यात येतील.

जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप पाहता व वर दिलेल्या अभिप्रायानुसार ही माहिती अपिलार्थीस देणे जन माहिती अधिकारी यांना फारसे अवघड अथवा क्लिष्ट काम होते, अशातील बाब येथे संभवत नाही. अधिनियमाद्वारे विहित केलेला कालावधी आता व्यपगत झालेला असल्याने अधिनियमातील कलम ७(६) नुसार अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य देणे जन माहिती अधिकारी यांना भाग आहे. सबब अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. ११.४.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३.जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन घेण्याप्रित्यर्थ कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अधिनियमातील विहित कालावधीपेक्षा जास्त कालावधीसाठी वंचित ठेवल्याबद्दल त्यांच्यावर विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- याप्रमाणे एकूण रुपये २५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ०१.०७.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. खादरी महंमद इरफान पि.महंमद सोहेल,रा. उमर कॉलनी देगलूर नाका ता.जि.नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,नौनिहाल उर्दू प्राथमिक शाळा,दुलेशा रहेमाननगर नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष,नौनिहाल एज्युकेशन सोसायटी, सेवा बेड,कुशन व गादीघर, राजकॉर्नरसमोर, चैतन्यनगररोड, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२७८

निर्णय दिनांक : ०१.०७.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. पुरुषोत्तम पद्माकर देशपांडे,<br>उस्मानाबाद | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा सहा.अधीक्षक अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम मंडळ,<br>उस्मानाबाद. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा अधीक्षक अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम मंडळ,<br>उस्मानाबाद. | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.०७.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. चंद्रशेखर प्र.जोशी, जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा सहा.अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,उस्मानाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व अपिलार्थी श्री. पुरुषोत्तम पद्माकर देशपांडे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि.१२.१२.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन १९९२ ते २००६ या कालावधीमध्ये त्यांच्या

मंडळाअंतर्गत काम करणाऱ्या कार्यकारी अभियंत्यांच्याविषयी खालीलप्रमाणे माहितीची मागणी केली होती.

" मंडळाअंतर्गत काम करणाऱ्या सर्व कार्यकारी अभियंता यांचे मत्ता व दायित्त्व बाबतचे विवरणपत्राच्या प्रमाणित झेरॉक्स प्रती देण्यात याव्यात. (सोबत मत्ता व दायित्त्वे याच्या शासन आदेशाच्या प्रती सोबत जोडत आहे.)"
अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ३.१.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस सदर माहिती अधिनियमातील कलम ८(ङ) व ८(ञ) मधील तरतुदीनुसार ती अपिलार्थीस देण्याचे नाकारले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि.१०.०१.२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २५.१.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. ३.२.२००७ रोजी पारित केले. या आदेशान्वये त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.०५.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत, त्यामुळे त्यांनी आपल्या द्वितीय अपील अर्जाद्वारे सादर केलेले लेखी निवेदन, हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या वतीने व अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही वैयक्तिक व गोपनीय स्वरुपाची

आहे. सदर माहिती अपिलार्थीस दिल्याने अधिनियमातील कलम ८(ङ) व ८(ञ) चा भंग होणार आहे, त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस देणे योग्य होणार नाही.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने उस्मानाबाद सार्वजनिक बांधकाम मंडळामधील सन १९९२ ते २००६ या कालावधीमध्ये कार्यरत असलेल्या कार्यकारी अभियंत्यांच्या मत्ता व दायित्त्वाच्या विवरणपत्राच्या प्रती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितल्या आहेत. सर्वसाधारणपणे वर्ग-एक व त्यावरील दर्जाच्या अधिकाऱ्यांची मत्ता व दायित्त्वाची विवरणपत्रे शासनाकडे उपलब्ध असतात. त्यामुळे मूळातच अपिलार्थीने मागितलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नव्हती. त्यामुळे या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीचा माहितीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर तो मंत्रालयीन विभागाकडे पाठवून देणे, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६(३)(एक) प्रमाणे भाग होते, तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कृती न करता त्यांच्याकडे उपलब्ध नसलेल्या माहितीबाबत अपिलार्थीस त्यांचा निर्णय कळविला. तसेच अपिलार्थीच्या या मागणीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ११ अन्वये करावयाच्या कार्यवाहीप्रमाणे देखील त्यांनी कोणतीही कृती केल्याचे दिसून येत नाही. मूळातच जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती उपलब्ध नसतांना व अपिलार्थीने विचारलेल्या माहितीसदृश्य माहितीचे ते विश्वस्त नसल्याने, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या अर्जावर केलेली कार्यवाही चुकीची ठरते. या प्रकरणात दुसरे असेही दिसून येते की, जन अपिलीय अधिकारी म्हणून अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देताना संबंधित अधीक्षक अभियंता तथा जन अपिलीय अधिकारी यांनी स्वतःचा स्वतंत्रपणे निर्णय न देता तो जन माहिती अधिकारी यांच्या स्वाक्षरीने पारित केला आहे. कोणत्याही अपीलावरील निर्णय जन अपिलीय अधिकारी यांच्या स्वतःच्या स्वाक्षरीने पारित करणे अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. तेव्हा या परिस्थितीत जन अपिलीय अधिकारी

यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपीलावर दिलेला दि. ३.२.२००७ रोजीचा निर्णय या मुद्यावर अवैध ठरत आहे.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहितीचे स्वरुप पाहता ही माहिती निश्चितपणे संबंधित अधिकाऱ्यांची वैयक्तिक स्वरुपाची असल्याचे दिसून येते. या माहितीमध्ये संबंधित अधिकाऱ्यांनी अर्जित केलेल्या स्थावर व जंगम मालमत्तेच्या तपशील असतो. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील करतांना त्यासोबत एक निवेदन सादर केले आहे. त्यामध्ये संबंधित अधिकारी हे सार्वजनिक व्यवस्थेतील एक घटक असल्याने त्यांची मालमत्ता ही वैयक्तिक राहत नाही, असे विधान केले आहे. तथापि या विधानाशी आयोग असहमत आहे, कारण शासनाकडून त्यांना प्राप्त होणारे 'वेतन' हे माहिती अधिकार अधिनियमान्वये जनसामान्यांना माहिती असणे, इथपर्यंत पारदर्शकता संबंधित विभाग ही माहिती सार्वजनिक स्वरुपाची असल्याने, पाळत असतात. कारण त्यांना मिळणारे वेतन हे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४(ख), ४(क) व १० प्रमाणे प्रसिध्द केलेले असते, मात्र त्यांना प्राप्त झालेल्या वेतनातील किती भागाची ते बचत करतात किंवा त्यांना त्यांच्या इतर स्त्रोतापासून प्राप्त होणाऱ्या रकमेचा ते कशाप्रकारे विनियोग करतात, ही निश्चितपणे त्यांची वैयक्तिक व खाजगी बाब आहे, असे आयोग मानते. संबंधित अधिकारी हे सरकारी कर्मचारी आहेत व त्याचबरोबर भारतीय नागरिक आहेत व त्यामुळे त्यांना भारताचे नागरिक या नात्याने स्वतंत्र अस्तित्त्व असून इतर नागरिकांप्रमाणेच त्यांची खाजगी व वैयक्तिक स्वरुपाची माहिती उघड करण्याचे अथवा गोपनीय ठेवण्याचे त्यांना अधिकार आहेत. सदर माहिती अपिलार्थीस देतांना संबंधित अधिकाऱ्याच्या खाजगी बाबीत निश्चितपणे आगंतुक हस्तक्षेप होण्याची शक्यता असल्याने अशा व्यक्तिगत तपशीलातील माहिती देणे अधिनियमातील कलम ८(ञ) नुसार अपेक्षित नाही. तसेच ही माहिती प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थी कोणते व्यापक लोकहित साध्य करणार आहे. याचा तपशील अपिलार्थीने त्यांच्या अर्जामध्ये किंवा त्यांच्या जन अपिलीय अधिकारी

यांच्याकडे केलेल्या अपील अर्जामध्ये स्पष्ट केलेला नाही. शासनव्यवस्थेमध्ये प्रत्येक शासकीय अधिकाऱ्यास त्यांच्या खात्याकडे त्यांचे मत्ता व दायित्त्वाची विवरणपत्रे एका ठराविक कालावधीनंतर शासनास सीलबंद स्वरुपात सादर करावी लागतात. संबंधित अधिकारी, ही माहिती शासनास, शासनाशी त्यांच्या स्थापित झालेल्या विश्वासाश्रित संबंधामुळे देत असतात व आवश्यकतेनुसार ती उघडली जाते. अपिलार्थीस जर संबंधित कार्यकारी अभियंता यांच्या मत्ता व दायित्त्वाच्या विवरणपत्रांच्या तपशीलाची आवश्यकता असेल तर, त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांच्या वरिष्ठतम प्राधिकरणाकडे अर्ज करुन त्यांना अपेक्षित असलेली माहिती मिळवावी. उपरोक्त परिस्थितीत अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती देणे, वर विवेचन केल्याप्रमाणे योग्य ठरत नसल्याने व त्याने कोणतेही व्यापक जनहित साध्य होणार असल्याचे सिध्द होत नसल्याने, अपिलार्थीचे द्वितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ०१.०७.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पुरुषोत्तम पद्माकर देशपांडे,मायभाटे निवास,भानुनगर,उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मनाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२७९

निर्णय दिनांक : ०१.०७.२००८

१ श्री. मिलींद शिवाजीराव धावारे, : अपीलार्थी
मु.पो.चिखली बू. ता.किनवट
जि.नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तथा सहायक प्रकल्प अधिकारी,
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,
किनवट, जि.नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी,
तथा प्रकल्प अधिकारी,
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,
किनवट, जि.नांदेड

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.०७.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. रामदास नामदेवराव घरडे, जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, किनवट जि.नांदेड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. शामराव गुणाजी वागतकर, जन अपिलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, किनवट (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर अपिलार्थी श्री. मिलींद शिवाजीराव धावारे, (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि.१९.०५.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००३ ते २००७ या कालावधीतील त्यांच्या कार्यक्षेत्रामधील संस्थेअंतर्गत अनुदानित आश्रम शाळांची गावनिहाय माहिती खालीलप्रमाणे मागणी केली होती.

" १)आपल्या कार्यक्षेत्रामधिल संस्थेंतर्गतच्या अनुदानित आश्रम शाळांची गावनिहाय, शाळानिहाय एकुण विद्यार्थी संख्या व एकुण प्राप्त अनुदान आणि प्रति विद्यार्थ्यांवरिल खर्चाचा तपशिल (२) शाळानिहाय करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्याबदलची जाहीरातीसह (सुरुवातीपासुन) वस्तुनिष्ठ माहिती (३) शाळानिहाय इमारतीच्या (वर्गखोलीसह) प्रकार व माहितीबदल (नमुना ८ व ९ च्याउताऱ्यासह) व अकारण्यात येणाऱ्या भाडयाबदल (किराया) ची तपशिलवार माहिती (४) उपरोक्त शाळांबदलची करण्यात आलेल्या "चौकशी अहवाल" ची अद्यावत माहिती."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तीशः अपेक्षिली असून ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे या अर्जामध्ये म्हटले आहे.याचा पुरावा म्हणून या अर्जासोबत त्यांनी संबंधित गावाच्या ग्रामसेवकाच्या सहीच्या प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत जन माहिती अधिकारी यांना सादर केली आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २१.५.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या प्राधिकरणाकडे उपलब्ध आहे, ते प्राधिकरण म्हणजेच संबंधित आश्रम शाळांचे मुख्याध्यापक, यांच्याकडे अपिलार्थीच्या प्रत माहिती पाठवून त्याची एक प्रत अपिलार्थीस दिल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्या या पत्रास उद्देशून त्यांचे अधिपत्त्याखालील एकूण २९ शाळांपैकी तीन शाळांच्या मुख्याध्यापकांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती पुरविली आहे. पूर्णतः माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये

जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि.१६.०६.२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही प्रकारची सुनावणी घेतल्याचे अथवा अपिलार्थीबरोबर या संदर्भात कोणत्याही पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. वरील सर्व प्रकाराने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.०८.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत, त्यामुळे त्यांनी आपल्या द्वितीय अपील अर्जाद्वारे सादर केलेले लेखी निवेदन, हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांच्या कार्यालयांतर्गत एकूण २९ अनुदानित आश्रमशाळा असून यापैकी ३ शाळांनी (चिखली, लोहगावफाटा व महादापूर) अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये अपिलार्थीस माहिती पुरविली आहे. उर्वरित २६ शाळांपैकी ४ शाळांनी अधिनियमातील विहित मुदतीनंतर अपिलार्थीस माहिती दिली, २० शाळांची संपूर्ण माहिती जन अपिलीय अधिकारी यांनी संबंधित शाळांच्या मुख्याध्यापकाना त्यांचे कार्यालयात बोलावून घेऊन दि. ३०.६.२००८ रोजी रजिस्टर्ड पोस्टाने अपिलार्थीस पाठविली आहे, तर अद्यापही दोन्ही आश्रमशाळांच्या संबंधित माहिती त्यांच्याकडे (खानापूर व साखरतळा) अप्राप्त आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती व संबंधित आश्रमशाळांनी अपिलार्थीस आतापर्यंत दिलेली माहिती त्यांनी तपासली असून त्यामध्ये अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या माहितीशी सुसंगत माहिती त्यांना पुरविली गेली असल्याचे त्यांना आढळून आले आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील विहित

तरतुदीनुसार वेळेतच कार्यवाही केली असल्याने, अपिलार्थीच्या अपील अर्जावर त्यांनी सुनावणी घेतली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहितीची व्याप्ती व्यापक प्रमाणात होती. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या चार मुद्यांवरील माहितीपैकी मुद्दा क्र.१ शी संबंधित माहिती प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध होती व उर्वरित तीन मुद्यावरील माहिती संबंधित शाळांच्या मुख्याध्यापकाकडे उपलब्ध होती. त्यामुळे त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ शी संबंधित माहिती अपिलार्थीस विहित मुदतीत कळविणे अधिनियमातील तरतुदीप्रमाणे भाग होते. तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कृती केल्याचे आयोगास आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती ज्या प्राधिकरणाकडे उपलब्ध आहे, त्या प्राधिकरणाकडे अपिलार्थीचा मूळ अर्ज पाठवून अधिनियमातील कलम ६(३)(एक) चा वापर करुन विहित कार्यवाही वेळेत केली आहे. अपिलार्थीने मागितलेली माहिती अपिलार्थीस देण्यासाठी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना सकारात्मक प्रतिसाद दिला आहे, तथापि ते अधिनियमातील विहित मुदतीपेक्षा विलंबाने दिला आहे. कोणत्याही अर्जदारास त्यांनी सार्वजनिक प्राधिकरणाकडे अधिनियमातील तरतुदीनुसार मागितलेली माहिती त्यांना एका विशिष्ट मुदतीमध्ये, देणे हे माहिती अधिकार अधिनियम २००५ चे खरे वैशिष्ट्य आहे, किंबहुना अधिनियमाचा पाया या निश्चित केलेल्या अनुज्ञेय मुदतीवरच आधारित आहे, असे म्हटल्यास वावगे होणार नाही. आज सुनावणीच्या दिवसापर्यंत देखील अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी संपूर्ण माहिती पुरविलेली नाही. अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी जन माहिती अधिकारी व त्यांचे सहायक व इतर अधिकारी यांना देखिल जन माहिती

अधिकारी म्हणून समजावे, अशी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५(५) अन्वये तरतुद आहे. हे पाहता, या प्रकरणी जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात त्यांना सहाय्य करणारे उर्वरित २६ आश्रमशाळांचे मुख्याध्यापक हे जबाबदार ठरत आहेत. अपिलार्थीच्या मूळ अर्जास विलंबाने प्रतिसाद देऊन त्यातील बव्हंशी शाळांच्या मुख्याध्यापकांनी व जन माहिती अधिकारी यांनी स्वतःला कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता ही माहिती अपिलार्थीस देणे हे फारसे क्लिष्ट अथवा अवघड काम होते, असे दिसून येत नाही. संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यातील इच्छाशक्तीचा अभाव हेच कारण अपिलार्थी, त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहण्यामागे दिसून येत आहे. अर्थात संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या मनातील इच्छाशक्तीचा अभाव हे कारण अपिलार्थीस विलंबाने माहिती पुरविण्याच्या त्यांच्या कृतीचे समर्थन ठरु शकत नाही व ते आयोग कदापिही मान्य करणार नाही. सबब असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना सहाय्य करणारे त्यांचे, इतर सर्व सहायक (या प्रकरणी एकूण २६ आश्रमशाळांचे मुख्याध्यापक) या सर्वांनी मिळून अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती पुरविण्याप्रित्यर्थ लावलेल्या असमर्थनीय विलंबाबद्दल त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २०(१) च्या तरतुदीअन्वये विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/-प्रमाणे एकूण रु.२५०००/- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित असलेले सहायक म्हणजे या शाळांचे मुख्याध्यापक यांनी सदर शास्तीची रक्कम शासकीय कोषागारात पुढील लेखाशीर्षाखाली जास्तीत जास्त पाच हप्त्यात भरावी.

लेखाशीर्ष-**"००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) "**

सदर शास्तीची विभागणी जन माहिती अधिकारी व संबंधित आश्रमशाळांचे मुख्याध्यापक यांच्यामध्ये प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प किनवट जि.नांदेड यांनी हे आदेश निर्गमित होताच यथायोग्यरित्या सात दिवसांचे आत करावी व यासंबंधीचा आपला अनुपालन अहवाल आयोगास तात्काळ सादर करावा. सदर शास्तीची रक्कम संबंधित जन माहिती अधिकारी व मुख्याध्यापक हे नियमितपणे शासकीय कोषागारात भरतील, असे प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प किनवट जि.नांदेड यांनी पहावे व या संदर्भातील आपला अनुपालन अहवाल ऑगस्ट, २००८ पासून दरमहा शास्तीची संपूर्ण रक्कम शासकीय कोषागारात पूर्णपणे जमा होईपर्यंत आयोगास सादर करावा.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे आश्वासित केले की, उर्वरित दोन आश्रमशाळांची माहिती ते या सुनावणी नंतर १५ दिवसाच्या आत अपिलार्थीस देण्यास तयार आहेत, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली उर्वरित सर्व माहिती हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात, त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक मुख्याध्यापक, यांनी अपिलार्थीस मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती पुरविण्याप्रित्यर्थ लावलेल्या असमर्थनीय विलंबाबद्दल त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २०(१) च्या तरतुदीअन्वये विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/-प्रमाणे एकूण रु.२५०००/- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती लावण्यात येत आहे.सदर शास्तीचा भरणा त्यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे करावा.

४. शास्तीची यथायोग्य विभागणी, जन माहिती अधिकारी व संबंधित आश्रमशाळांचे मुख्याध्यापक यांच्यामध्ये प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प किनवट जि.नांदेड यांनी हे आदेश निर्गमित होताच, सात दिवसांचे आत करावी व यासंबंधीचा अनुपालन अहवाल तात्काळ आयोगास सादर करावा व संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी हे शास्तीची रक्कम नियमितपणे कोषागारात भरतील याची प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प विभाग जि.नांदेड यांनी खात्री करावी व आपला अनुपालन अहवाल ऑगस्ट

५. २००८ पासून पुढे दरमहा शास्तीच्या रकमेचा शासकीय कोषागारात पूर्णपणे भरणा होईपर्यंत आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ०१.०७.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मिलींद शिवाजीराव धावारे, मु. पो.चिखली बू. ता.किनवट जि.नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प विभाग जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प विभाग जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२८०

निर्णय दिनांक : ०१.०७.२००८

१ श्रीमती चंचला मोहनदास वैष्णव, : अपीलार्थी
रा.अजिंठा ता.सिल्लोड जि.औरंगाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
आरोग्यसेवा संचालनालय, पुणे

२ जन अपिलीय अधिकारी,
तथा सहसंचालक,
आरोग्य सेवा, संचालनालय,
पुणे.

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद.

जन अपिलीय अधिकारीः अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.०७.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्रीमती चंचला मोहनदास वैष्णव (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. देविदास त्र्यंबक खेडकर, जन माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत. तर जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि.२६.०३.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००५-२००७ या कालावधीतील त्यांच्या नेमणूकीसंदर्भात खालीलप्रमाणे माहितीची मागणी केली होती.

" आरोग्य सेवा संचालनालय पुणे कार्यालय,पुणे ४११ ००१ जा.क्र.ससंआसे/शुश्रुषा/सेवानियमित/१५६४०-४१/कक्ष-९/०५ दिनांक ९/१७.५.२००५ चे नियूक्तीपत्र देउन सुध्दा मला आजपर्यंत आरोग्य सेवेत A.N.M.या पदावर नियूक्ती दिलेली नाही. माझ्या नंतरच्या सर्व नविन मुलींना सेवेत घेतलेले आहे. मी N.T.(B.) भटक्या जमाती या प्रवर्गात मोडत असून माझ्या जागेवर कोणाची A.N.M. म्हणून नियुक्ती केलेली आहे का? व कशी ? याचा पूर्ण तपशिलसह खुलासा व्हावा. सोबतचे नियूक्ती पत्र जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना मिळूनसुध्दा यांनी मला आतांपर्यंत A.N.M. या पदावर रुजू करुन घेतलेले नाही का? व कशावरुन सेवेत घेतले नाही याची सखोल तपशीलासह माहिती मिळावी."

अपिलार्थीने सदर माहिती शीघ्र टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणत्याही प्रकारे प्रतिसाद दिल्याचे आढळून येत नाही. अपिलार्थीने सदर अर्ज आरोग्य सेवा संचालनालय,पुणे यांच्या कार्यालयाकडे केल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या या अर्जावर आरोग्य सेवा संचालनालयाने त्यांच्याकडील दि. २.४.२००७ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद औरंगाबाद यांना असे कळविले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयाशी (संचालनालयाशी) संबंधित असल्याने सदर माहिती त्यांना जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यामार्फत तात्काळ देण्यात यावी व या संदर्भात केलेली कार्यवाही त्यांना अवगत करावी. जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारे माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि.१६.०५.२००७

रोजी प्रथम अपील केले आहे. या अपीला संदर्भात देखील जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपील त्यांच्या कार्यालयाशी संबंधित नसल्याने व ए.एन.एम. या पदाचे नियंत्रण जिल्हा परिषदेकडे असल्याने अपिलार्थीचा अपील अर्ज त्यांनी परत जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे पाठविला. आरोग्य सेवा संचालनालयाने जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषदे यांच्याकडे केलेला पत्रव्यवहार पाहता, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.औरंगाबाद यांच्याकडे पाठविल्याचे दिसून येत नाही. आरोग्य सेवा संचालनालय व त्यांचे जिल्हा परिषदेकडे कार्यरत असलेले क्षेत्रीय कार्यालय यांच्यामध्ये आवश्यक तो समन्वय नसल्याने, अपिलार्थी त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिल्या आहेत. या सर्व प्रकारामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.०८.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. त्यांना दि. ९.५.२००५ रोजी नियुक्तीपत्र देऊनसुध्दा आजपर्यंत त्यांची आरोग्य सेवेमध्ये ए.एन.एम. या पदावर नेमणूक केलेली नाही. मात्र त्यांच्या नंतरच्या महिलांची या पदावर नियुक्ती झालेली आहे. त्यांना अद्यापपर्यंत सेवेत का नियुक्त केले नाही, याची कारणे त्यांना हवी आहेत. त्या एन.टी. प्रवर्गातील असूनही त्यांना अद्यापपर्यंत कामावर न घेतल्याने त्यांच्यावर अन्याय झाला आहे, त्यामुळे त्यांना या प्रकरणी न्याय मिळावा.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मूळ माहितीचा अर्ज व त्यावर अपिलार्थीने केलेला प्रथम अपील अर्ज यांच्या प्रती त्यांना अद्यापपावेतो आरोग्य सेवा संचालनालय, पुणे यांच्याकडून प्राप्त झालेल्या नाहीत. अपिलार्थीने त्यांच्याकडील पात्रता प्रमाणपत्र जसे, परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र, त्यांचे

नियुक्तीपत्र व तत्सम आवश्यक ती कागदपत्रे सादर केल्यानंतर त्याची आवश्यक तपासणी केल्यानंतर त्वरित नेमणूक करण्यास ते तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमाअंतर्गत त्यांची आरोग्यसेवेमध्ये ए.एन.एम. या पदावर नेमणूक का करण्यात आली नाही, त्यांच्या जागेवर कुणाची नेमणूक केली आहे का? कशी?-मला सेवेत रुजू करुन घेतले नाही का? व कशावरुन सेवेत घेतले नाही अशाप्रकारची माहिती जन माहिती अधिकारी यांना विचारली आहे. या माहितीचे स्वरुप पाहता त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासा व त्यांच्या कृतीबाबतची कारणे अपेक्षित करणारी माहिती विचारली आहे. माहिती अधिकार अधिनियमामध्ये 'माहिती' या शब्दाची व्याख्या कलम २(च) मध्ये स्पष्ट करण्यात आली आहे.अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही या व्याख्येशी सुसंगत नाही. जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी घेतलेल्या कोणत्याही प्रशासकीय निर्णयाबाबत खुलासा करणे अथवा त्यांच्या निर्णयाची कारणे, माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये अपिलार्थीस देणे, हे या अधिनियमामध्ये अभिप्रेत नाही. सबब अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. अपिलार्थीच्या त्यांच्या ए.एन.एम. या पदावरील नेमणूकीबाबत काही शंका असल्यास, त्याबाबत खुलासा आवश्यक असल्यास, त्यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्या वरिष्ठांकडे वेगळा अर्ज करुन आपल्या गाऱ्हाण्याची तड लावावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

प्रसंगावशात्, येथे असेही दिसून येते की, अपिलार्थीचा दि. २६.३.२००७ रोजीचा प्रथम अर्ज आरोग्य सेवा संचालनालय, पुणे यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर सदर अर्ज ज्या प्राधिकरणाशी संबंधित असेल त्यांच्याकडे अधिनियमातील कलम ६(३)(एक) अन्वये पाठवून त्या पत्राची प्रत अपिलार्थीस देणे आवश्यक होते. तथापि अशा प्रकारची कार्यवाही

आरोग्य सेवा संचालनालयातील संबंधित कर्मचारी/अधिकारी यांनी केल्याचे दिसून येत नाही. त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. सबब संचालक, आरोब्य सेवा, पुणे यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी संबंधित कर्मचारी/अधिकारी यांचेवर त्यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांचेवर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याचे आत प्रशासकीय कारवाई करुन आपला अनुपालन अहवाल तद्नंतर एक महिन्याच्या आत आयोगास सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.
२. संचालक, आरोग्य सेवा, पुणे यांनी संबंधित जबाबदार कर्मचारी/अधिकारी यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबाबत त्यांचेवर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याचे आत करुन आपला अनुपालन अहवाल तदनंतर महिन्याचे आत आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ०१.०७.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्रीमती चंचला मोहनदास वैष्णव,रा.अजिंठा ता.सिल्लोड जि.औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ संचालक, आरोग्य सेवा संचालनालय,नवीन मध्यवर्ती इमारत, पहिला मजला, पुणे-४११ ००१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२८१

निर्णय दिनांक ०२-०७-२००८

श्री. प्रकाश गणपतराव चवडे, : अपिलार्थी
लालमंडी, बेगमपुरा,
व्दारा- कृष्णा मेडीकल स्टोअर्स,
जयसिंगपुरा, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा सह दुय्यम निबंधक, वर्ग-२,
औरंगाबाद क्रमांक ५, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सह जिल्हा निबंधक, वर्ग-१,
तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०७-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. प्रकाश गणपतराव चवडे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. साहेबखान बिसमिल्ला खान, जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक, वर्ग-२, औरंगाबाद क्रमांक ५, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), व श्री. लिंबाजी कोंडीबा

मुंढे, जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक, वर्ग-१, तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर त्रयस्थ पक्ष श्री. लक्ष्मण मारोती पडघन हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २०-०४-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-१०-१९९० व १०-०९-१९९८ या दिवसाशी संबंधीत खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> " विश्वशांती गृहनिर्माण संस्था मर्यादीत म. न. पा. औ,बाद हद्दीतील मौजे भावसींगपुरा येथील सर्वे नंबर ४७/१ ची रजिस्ट्री कोणत्या कागदपत्राच्या आधारे झालेली आहे त्या कागदपत्राची नक्कल मिळणेबाबत श्री. लक्ष्मण मारोती पडघन व इतर यांच्या रजिस्ट्रीमध्ये न.भु.क्र. यांची नोंद आहे किंवा कसे यांची माहिती मिळणे बाबत आणि रिपोर्ट मिळणेबाबत. "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास, जन माहिती अधिकारी यांनी, त्यांच्याकडील दिनांक २८-०५-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस त्यांनी विचारलेल्या विषयावर माहिती देण्याचा प्रयत्न केला.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०६-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी, दिनांक २३-०७-२००७ रोजी सुनावणी घेऊन, यासंदर्भातील आपले आदेश दिनांक २४-०७-२००७ रोजी पारीत केले. या आदेशान्वये त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती

आयोगाकडे दिनांक १६-०८-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. अपिलार्थीने या अपील अर्जामध्ये, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी, अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती त्यांना अद्यापही प्राप्त झाली नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना कोणतीही कागदपत्रे प्राप्त झाली नाहीत.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, सर्वे नंबर ४७/१ ची रजिस्ट्री कोणत्या कागदपत्राच्या आधारे झाली आहे, त्याची माहिती अपिलार्थीस हवी होती, तथापि सदर सर्वे नंबरची रजिस्ट्री होतांना, संबंधितांनी कोणतीही कागदपत्रे त्यांच्याकडे दाखल केली नसल्यामुळे, ती त्यांच्याकडे उपलब्ध नाहीत व म्हणून ते ती अपिलार्थीस देऊ शकत नाहीत.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती १९९८ साली जमीन खरेदी केलेल्या प्रकरणाशी संबंधीत आहे, त्यावेळी जमीन विकणारे व जमीन खरेदी करणारे यांच्यातील झालेल्या कराराप्रमाणे खरेदीखताच्या नोंदी घेण्यात येत होत्या. अशा प्रकारच्या खरेदीखताची नोंदणी करतांना कोणत्याही कागदपत्रे त्यासोबत जोडण्याची आवश्यकता नव्हती. सन २००२ मध्ये त्यांच्या विभागाचे संगणकीकरण करण्यात आल्यापासून विक्री व खरेदी करतांना करण्यात येणा-या खरेदीखताची काही संलग्न कागदपत्रे जोडणे प्रथम अनिवार्य करण्यात आले आहे. अपिलार्थीने मूळात त्यांच्या अर्जात सर्वे नंबर ४७/१ ची रजिस्ट्री कोणत्या कागदपत्राच्या आधारे झाली आहे, ही माहिती विचारली आहे. सदर रजिस्ट्री करतांना कोणत्याही कागदपत्रांचा आधार घेतला गेला नव्हता. सदर रजिस्ट्री जमीन विकणारे व खरेदी करणारे या दोन्ही पक्षामध्ये झालेल्या लिखीत खरेदीखतानुसार झाली आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये असा मुद्दा उपस्थित केला आहे की, या रजिस्ट्रीमध्ये नगर भूमापन क्रमांकाची नोंद आहे किंवा कसे याची माहिती त्यांना

मिळावी, याबाबत त्यांनी असा खुलासा केला की, सर्वे नंबर ४७/१ च्या खरेदीखतामध्ये सर्व्हे नंबरची नोंद असून, त्यामध्ये नगर भूमापन क्रमांकाची नोंद नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे २ मुद्दयावर माहिती मागविली होती, त्यापैकी पहिल्या मुद्यावर त्यांनी सर्वे नंबर ४७/१ ची रजिस्ट्री ज्या कागदपत्राच्या आधारे झाली होती, त्या कागदपत्राच्या नकला देण्याची जन माहिती अधिकारी यांना विनंती केली होती, तर दुस-या मुद्दयाव्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे, सदर रजिस्ट्री मध्ये नगर भूमापन क्रमांकाची नोंद आहे किंवा कसे याची माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या दोन्ही प्रश्नांची उत्तरे जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या वरील युक्तिवादामध्ये दिली आहेत. तथापि जन माहिती अधिकारी यांनी, त्यांच्या दिनांक २०-०४-२००७ रोजीच्या प्रथम अर्जास उद्देशून लिहिलेल्या दिनांक २८-०५-२००७ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता असे दिसून येते की, त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस एकाच मुद्दयावर माहिती दिली आहे. त्यांनी या पत्रासोबत संबंधीत सर्वे नंबरच्या खरेदीखताची सत्यप्रत अपिलार्थीस पुरविली असती तर, त्यामध्ये नगर भूमापन क्रमांकाची नोंद नाही, याची माहिती अपिलार्थीस मिळू शकली असती, याबाबत त्यांनी त्यांच्या दिनांक २८-०५-२००७ रोजीच्या पत्रासोबत या खरेदीखताची प्रत जोडली नसल्याचे दिसून येत आहे. आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस सदर प्रत ३ दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे मान्य केले आहे.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी, त्यांनी अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीप्रमाणे दिनांक २०-०४-२००७ रोजीच्या त्यांच्या प्रथम माहितीच्या अर्जासंदर्भात त्यांचा निर्णय कळविणे आवश्यक होते, तथापि त्यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जास, अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही

प्रतिसाद न देऊन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग केला असल्यामुळे, आता त्यांना कलम ७ (६) नुसार अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य द्यावी लागेल.

सबब जन माहिती अधिकारी यांना, असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. येथे असेही दिसून येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना अनुज्ञेय कालावधीपेक्षा ८ दिवसाच्या अधिक विलंबाने प्रतिसाद दिल्याने त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून, येथून पुढे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या अर्जावर, त्यांनी अधिनियमातील विहित मुदतीमध्ये कार्यवाही करावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद
दिनांक ०२-०७-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. प्रकाश गणपतराव चवडे, लालमंडी, बेगमपुरा, व्दारा- कृष्णा मेडीकल स्टोअर्स, जयसिंगपुरा, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक, वर्ग-२, औरंगाबाद

क्रमांक ५, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक, वर्ग-१, तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२८२

निर्णय दिनांक ०२-०७-२००८

श्री. गजानन विठ्ठल पाटील, : अपिलार्थी
सोनहिरा, मोंढा रोड, गंगापूर,
तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी
अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०७-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. अरुण ल. डुबे, जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. मनोहर रामराव कराड, विशेष अधीक्षक, जन माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. गजानन विठ्ठल पाटील हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने, सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २०-०९-२००६ रोजीच्या अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधीत खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"औरंगाबाद जिल्ह्यात असणा-या प्राथमिक आरोग्य केंद्रात काम करणा-या वैद्यकीय अधिका-यांची नांवे / त्यांची मुख्यालये त्यांच्या मदतीसाठी असणा-या सहाय्यक कर्मचा-यांची नांवे त्यांची मुख्यालये, जिल्हाकरीता मिळालेली आवश्यक औषधी, केंद्रानुसार वितरण व शिल्लक ३१-३-२००६ अखेर आवश्यक औषधाची स्थिती २००५-२००६ मध्ये प्राथमिक आरोग्य केंद्रास भेट दिली असल्यास तपासणी."

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास, जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून, अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत, कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर, जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १६-०४-२००७ व २३-०४-२००७ रोजी सुनावणी ठेवली होती, तथापि अपिलार्थी या सुनावणीस हजर राहिल्याचे दिसून येत नाहीत. अपिलार्थीच्या २ वेळेस सुनावणीस गैरहजर राहिल्यामुळे व त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस माहिती दिल्याचे अवगत केले गेले असल्याने त्यांच्याकडील आदेश दिनांक ०५-०५-२००७ अन्वये त्यांनी सदर प्रकरण बंद करण्याचा निर्णय घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत आहे. सदर आदेश प्राप्त झाल्यानंतर, अपिलार्थीने

मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे, दिनांक १४-०५-२००७ रोजी त्यांना सुनावणीसाठीचे पत्र प्राप्त झाले नसल्याचे पत्राने कळविले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या वरील निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०५-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाली नाही, व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून सुनावणीचे पत्र त्यांना मिळाले नसल्याचे नमूद केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांना, संधी देऊनही त्यांच्यातर्फे कोणताही युक्तिवाद करण्यात आला नाही, त्यांनी त्यांना या प्रकरणाशी संबंधीत कोणतीही माहिती नाही असे सांगितले.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या अपील अर्जावर त्यांनी, त्यांच्याकडील दिनांक ०५-०५-२००७ अन्वये निर्णय दिला आहे, सदर सुनावणीसाठी अपिलार्थीस हजर राहण्यासाठी दिनांक १६-०४-२००७ व २३-०४-२००७ च्या पत्रांव्दारे कळविले होते, तथापि अपिलार्थी हे सुनावणीस हजर राहिले नाहीत व या सुनावणीच्या वेळी जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या वतीने, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना देण्यात आल्याचे सांगितल्याने त्यांनी अपिलार्थीचे अपील प्रकरण बंद केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी

असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील कर्मचा-यांची नांवे, प्राथमिक आरोग्य केंद्रातील औषध पुरवठ्याची स्थिती व केंद्रास भेट दिली असल्यास तपासणी अहवाल, या मुद्दयावर माहिती मागितली असल्याचे दिसून येते. सदर माहिती अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये देणे हे, जन माहिती अधिकारी यांना फार अवघड किंवा क्लिष्ट असल्याचे वाटावे अशा प्रकारची कोणतीही बाब येथे संभवत नाही. केवळ जन माहिती अधिकारी यांच्या मनातील इच्छाशक्तीचा अभाव, याच कारणामुळे, अपिलार्थी त्यांना अपेक्षित माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित राहिल्याचे दिसून येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०५-०५-२००७ रोजीच्या दिलेल्या निर्णयामध्ये, सुनावणीच्या वेळीही जिल्हा आरोग्य अधिका-याने जन अपिलीय अधिका-यास अपिलार्थीस माहिती दिल्याचे तोंडी सांगितले व यावरुन त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील प्रकरण बंद केल्याचे दिसून येत आहे. या टप्प्यावर, जन अपिलीय अधिकारी यांनी, जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी, अपिलार्थीस खरोखरच माहिती दिली आहे किंवा कसे व दिली असल्यास ती माहिती अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहितीशी सुसंगत आहे किंवा कसे याची पाहणी करणे आवश्यक होते, तथापि या संदर्भातील कोणतेही अभिप्राय त्यांनी त्यांच्या अपील निर्णयात नोंदविलेले नसल्याने, अपिलार्थीस ही माहिती प्राप्त झाली नसल्याचे समजण्यात येत आहे. अपिलार्थीने देखील आयोगाकडे व्दितीय अपील अर्ज करतांना, त्यांना माहिती मिळाली नसल्याचे व प्रथम अपील अर्जावरील सुनावणीसाठी उपस्थित राहण्यासाठीचे पत्र प्राप्त झाले नसल्याचे, त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे. थोडक्यात, उपरोक्त प्रकरणी जिल्हा परिषद प्रशासना-कडून अपिलार्थीच्या, माहिती अधिकार अधिनियमाखाली केलेल्या माहितीच्या अर्जाची अक्षम्य हेळसांड केली गेली असल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती दिली नाही, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलावर निर्णय देतांना, अपिलार्थीस त्यांच्या प्रथम

अर्जानुसार खरोखरच माहिती प्राप्त झाली आहे किंवा कसे, झाली असल्यास ती पूर्ण आहे किंवा अपूर्ण आहे याची कोणतीही शहानिशा न करता केवळ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या सांगण्यावर विश्वास ठेऊन अपिलार्थीचे प्रकरण बंद केले. अपिलार्थीच्या अपिलावर कोणताही विशिष्ट निर्णय दिला नाही, ही त्यांची कृती सर्वस्वी चुकीची आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणा-या अपील अर्जावर त्यांनी, अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात ठोस निर्णय देणे अभिप्रेत आहे, याची त्यांनी नोंद घ्यावी. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, ४ दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे आज सुनावणीमध्ये मान्य केले आहे. अपिलार्थीस अधिनियमाव्दारे माहिती देण्याची विहित मुदत आता व्यपगत झाली असल्याने अधिनियमातील कलम ७ (६) च्या तरतुदीनुसार, त्यांना ही संपूर्ण माहिती, अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल.

सबब, असे आदेशित करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ४ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ माहितीच्या अर्जाची, जन माहिती अधिकारी यांनी कशा प्रकारे अक्षम्य हेळसांड केली याचे विवेचन वरील परिच्छेदात केले आहे. जन माहिती अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या कृतीमुळे ते, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस निःसंशयपणे पात्र ठरत आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार, अर्जदारास माहिती देण्यासाठी, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे जे संबंधीत सहाय्यक / कर्मचारी जबाबदार आहेत, त्यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे. हे पाहता असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती

देण्यासाठी त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहाय्यक / कर्मचारी यांना, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय माहिती मिळण्यापासून दीर्घकाळ वंचित ठेवल्याबद्दल, त्यांचेवर प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, त्यांचे या प्रकरणी काहीही म्हणणे नाही, असे गृहीत समजून हेच आदेश अंतीम करण्यात येतील याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ४ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना सहाय्य करणारे, त्यांचे सर्व सहाय्यक / कर्मचारी यांना उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय माहिती मिळण्यापासून दीर्घकाळ वंचित ठेवल्याबद्दल, त्यांचेवर प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत सरळ

आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक ०२-०७-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गजानन विठ्ठल पाटील, सोनहिरा, मोंढा रोड, गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२८३

निर्णय दिनांक ०२-०७-२००८

श्री. सतीश अंकुशराव देशमुख, : अपिलार्थी
इन्कम टॅक्स कॉलनी, रेल्वे स्टेशन
जवळ, जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा तालुका कृषि अधिकारी,
जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपविभागीय कृषि अधिकारी,
जालना

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०७-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. चंद्रसेन कचरुसिंग बहुरे, जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जालना (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. नंदकुमार अनंतराव टाक, तंत्र अधिकारी, जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, जालना यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. सतीश अंकुशराव देशमुख हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने, सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०९-०५-२००७ रोजीच्या अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांच्याकडे, दिनांक ०१-०१-२००६ ते १५-०५-२००७ या कालावधीतील त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधीत शेततळे, सिमेंट बंधारे, वळणाची व सपाटीकरणाची कामे, त्यावरील मजूरांची नांवे, त्यांना देण्यात आलेला रोज, त्यांच्या हजेरीपटाच्या झेरॉक्स प्रती, गांडूळ खत प्रकल्प, मंडळ अधिका-यांची नांवे, लाभार्थ्यांची नांवे व अनुदानाची रक्कम इत्यादी संदर्भात, व्यापक स्वरुपाच्या माहितीची जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केली होती.

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः / शीघ्र टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व मोठे स्वरुप पाहता, जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या दिनांक ०९-०५-२००७ रोजीच्या अर्जास त्यांच्याकडील दिनांक १८-०५-२००७ रोजीच्या पत्राने प्रथम प्रतिसाद दिला. या पत्रामध्ये त्यांनी, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही मोठ्या स्वरुपाची असल्याने, त्यांना माहिती देण्यासाठी अडचण येत आहे, त्यामुळे, अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयात येऊन उपलब्ध अभिलेख्यांची पाहणी करण्याची सूचना अपिलार्थीस केली.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या पत्राव्दारे सुचविल्याप्रमाणे, अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहिले व त्यांना आवश्यक असलेली माहिती त्यांनी पाहिली व त्यांची तक्रार दिनांक ०६-०६-२००७ रोजी मागे घेतली. अपिलार्थीने सदर तक्रार (मूळ माहितीचा अर्ज) मागे घेतला असल्याबाबतचे, त्यांचे लेखी निवेदन जन माहिती अधिका-यास लिहून दिले आहे, तथापि यानंतरही परत अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-०६-२००७ रोजी प्रथम अपील केले.

तथापि, अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी, कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही, मात्र, त्यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जासंदर्भात,

त्यांच्याकडील दिनांक २१-०२-२००८ रोजीच्या पत्रान्वये, अपिलार्थीने तालुका कृषि अधिकारी, जालना यांच्या कार्यालयातील माहिती पाहून, ती वाचून, खात्री करुन घेतल्याने व त्यांचे पूर्ण समाधान झाल्याने, त्यांचे अपील निकाली काढल्याचे अपिलार्थीस कळविले. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (६) च्या तरतुदीनुसार, सदर अपील त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून ३० ते ४५ दिवसात, या अपिलावर निर्णय देणे भाग होते, तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती न करुन, या कलमाचा भंग केल्याचे येथे दिसून येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०८-२००७ रोजी व्दितीय अपील केले असून, यामध्येही त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक ०९-०५-२००७ रोजीच्या मूळ अर्जावर, त्यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद देऊन, सर्व प्रथम अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती त्यांनी त्यांच्या लक्षात आणून दिली, तदनंतर त्यांनी केलेल्या विनंतीप्रमाणे अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात उपस्थित झाले असता, त्यांनी दिनांक ०६-०६-२००७ व ३१-१२-२००७ रोजी अपिलार्थीस संपूर्ण माहिती दाखविली. संपूर्ण माहिती अपिलार्थीने पाहिल्याप्रीत्यर्थ व त्यामुळे त्यांचे समाधान होऊन, त्यांनी सदरची तक्रार व प्रकरण निकाली काढण्याचे, अपिलार्थीने त्यांना लेखी स्वरुपात लिहून दिले आहे. त्यांनी

अपिलार्थीस प्रत्यक्षतः ज्या शेतामध्ये त्यांनी कामे केली आहेत, ती सर्व कामे, सपाटीकरण, गांडूळ खत प्रकल्प इत्यादी कामे अपिलार्थीस प्रत्यक्षतः नेऊन दाखविली.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या अपील अर्जावर त्यांनी, अपिलार्थीस दिनांक २१-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे आपला निर्णय कळविला आहे. सदर निर्णय त्यांनी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-०६-२००७ व ३१-१२-२००७ रोजी दिलेल्या लेखी पत्राचा आधार घेऊन दिलेला आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व राज्य माहिती आयोगाकडे एकच माहिती तीन वेळा मागितली आहे, तर जन माहिती अधिकारी यांना, त्यांच्याकडील दिनांक ०६-०६-२००७ व ३१-१२-२००७ रोजीच्या पत्रामध्ये, त्यांनी संपूर्ण माहिती पाहिली असून ती वाचून, खात्री करुन घेऊन समाधान झाल्याचे त्यांची कोणतीही तक्रार नसल्याचे नमूद केले आहे. अपिलार्थीस, प्रथमतः जन माहिती अधिकारी यांनी, दिनांक ०६-०६-२००७ रोजी माहिती दाखवून व ती माहिती वाचून अपिलार्थीचे समाधान झाल्यानंतरही, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-०६-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे व त्यानंतर त्यांनी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांना, त्यांच्याकडील दिनांक ३१-१२-२००७ रोजीच्या पत्रान्वये, परत त्यांनी माहिती पाहून ती वाचून, माहिती दिल्याची खात्री करुन त्यांची तक्रार नसल्याचे लेखी दिले आहे. अशा प्रकारे त्यांना सर्व माहिती प्राप्त झाली आहे, असे त्यांचे म्हणणे असून, त्यांनी ते लेखी स्वरुपात तालुका कृषि अधिकारी व जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांच्याकडे वेळोवेळी कबूल केले आहे. एवढे असूनही, त्यांनी परत राज्य माहिती आयोगाकडे, त्याच माहितीकरिता व्दितीय अपील केले आहे. या संपूर्ण घटनाक्रमामध्ये, अपिलार्थीच्या प्रत्येक टप्प्यावरील भूमिका या विसंगत व परस्परविरोधी

असल्याचे येथे दिसून येत आहे. याहीपेक्षा महत्त्वाचे असे की, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या त्यांच्या दिनांक २४-०८-२००७ रोजीच्या (आयोगाकडे नोंदणी केलेला दिनांक २४-०८-२००७) व्दितीय अपिलावर, त्यांची सही केल्याचे दिसून येत नाही, ही सर्व वस्तुस्थिती पाहता, अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ०२-०७-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सतीश अंकुशराव देशमुख, इन्कम टॅक्स कॉलनी, रेल्वे स्टेशन जवळ, जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२८४

निर्णय दिनांक ०२-०७-२००८

श्री. शेषराव एकनाथ टेकाळे, : अपिलार्थी
रा. पो. कुपटी (मा.), तालुका माहूर,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तालुका कृषि अधिकारी कार्यालय,
माहूर, तालुका माहूर, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तालुका कृषि अधिकारी, माहूर,
तालुका माहूर, जिल्हा नांदेड

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, माहूर, जिल्हा नांदेड

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०७-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. शेषराव एकनाथ टेकाळे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. बापूराव नामदेवराव बेंबडे, जन माहिती अधिकारी

तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, माहूर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. दिगांबर माधवराव तपासकर, जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, माहूर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी, अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक ०८-०२-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत दिनांक ०४-०८-२००६ ते ०६-०८-२००६ आणि ऑगस्ट २००५-०६ या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

“ १. दि. ४-८-२००६ ते दि. ६-८-२००६ च्या अतिवृष्टी व महापुरामुळे खरीप शेती पिकांची व ओलीत बागायती पिकांची (उस केळी, हळद) मौजे कुपटी (अनंतवाडी) झालेल्या नुकसानीची नांव निहाय शेतक-यांच्या शे. स. नं. शेतक-यांना प्राप्त अनुदानित रक्कमेची नांवनिहाय व शे. स. नं. निहाय पारीत स्थळ पाहणी नुकसान अहवालीच्या कागदपत्रकांची छायांकीत प्रत देण्यात येवुन

२. वर्षे २००५-०६ चे ऑगस्ट महिण्यात पैनगंगा नदीच्या महापुराने व अतिवृष्टीने झालेल्या शेतक-यांच्या शेतीपिक नुकसानीची अनुदानित यादीची प्रमाणित छायांकीत प्रत मिळणे. ”

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिश: अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास उद्देशून, जन माहिती अधिकारी यांनी, त्यांच्याकडील दिनांक ०७-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ५० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले, तथापि सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नसल्याचे अपिलार्थीने आज सुनावणीमध्ये सांगितले. अपिलार्थीस पत्र पाठविल्याप्रीत्यर्थ जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सादर केलेल्या जावक

नोंदवहीच्या गोषवा-याची सत्यप्रत पाहिली असता, त्यामध्ये पत्र क्रमांक व अपिलार्थीचे नाव लिहिल्याचे आढळून येत आहे.  अपिलार्थीला पाठविलेल्या पत्रावर किती रुपयाची पोस्टाची तिकिटे चिकटविली याचा यामध्ये उल्लेख नसल्याने, जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे सादर केलेल्या त्यांच्या जावक नोंदवहीची झेरॉक्स प्रत आयोगातर्फे अवैध ठरविण्यात येत आहे.  अपिलार्थीने व्यक्तिशः माहिती मागवून ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात किती वेळा उपस्थित राहिले, याची विचारणा जन माहिती अधिकारी यांना केली असता, अपिलार्थी हे फक्त त्यांचा प्रथम अर्ज सादर करण्याच्या वेळी त्यांच्या कार्यालयात हजर झाले होते, तथापि त्यानंतर ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी ते कधीही त्यांच्या कार्यालयात हजर राहिले नाहीत, असे त्यांनी सांगितले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले.  या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ११-०४-२००७ रोजी सुनावणी ठेवली होती, तथापि सुनावणीस अपिलार्थी गैरहजर राहिल्याने त्यांनी, त्यांच्या कार्यालयाकडील दिनांक ११-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांच्या अनुपस्थितीबाबत कळवून, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिल्याचे कळविले. अपिलार्थीस त्यांनी पाठविलेले हे पत्र म्हणजे, कोणत्याही अपिलावर कसा निर्णय घेण्यात येऊ नये व सार्वजनिक प्राधिकरण माहिती अधिकार अधिनियमाव्दारे त्यांच्याकडे दाखल होणा-या अपील अर्जाची कशा प्रकारे थट्टा करते याचे हे मुर्तीमंत उदाहरण आहे, असे म्हटल्यास वावगे होणार नाही.  अपिलार्थीस, जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ११-०४-२००७ रोजी लिहिलेल्या कथित पत्रामध्ये (सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नाही) जे त्यांनी अपिलार्थीस उद्देशून लिहिले आहे त्यामध्ये अपिलकर्त्याला सदर प्रकरणी माहिती कार्यालयात उपस्थित

होताच देण्यात यावी अशा प्रकारचे उत्तर दिले आहे. थोडक्यात अपिलार्थीला स्वतःच्या स्वतःलाच माहिती देण्याचे त्यांनी या पत्रामध्ये नमूद केले आहे. अशा प्रकारचा चमत्कारिक निर्णय जन अपिलीय अधिकारी यांनी देऊन, ते जास्तीत जास्त किती बेपर्वाईने त्यांची कामे करु शकतात याची प्रचिती त्यांनी आयोगास आणून दिली आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या चमत्कारिक व पूर्णतः नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०५-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जव्दारे मागणी केलेल्या संपूर्ण माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. त्यांनी केलेल्या प्रथम अर्जास व अपिलास अनुक्रमे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांना कोणतेही उत्तर प्राप्त झाले नाही. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ते शुल्क भरण्याचे कथित दिनांक १६-०३-२००७ चे पत्र व जन अपिलीय अधिकारी यांचे दिनांक ३०-०३-२००७ चे पत्र प्राप्त झालेले नाही.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून, अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुन अपिलार्थी कधीही त्यांच्याकडे उपस्थित झाले नाहीत. त्यांच्याकडे अपिलार्थीस देण्यासाठी तयार असलेली माहिती त्यांनी आयोगास दाखविली. सदर माहिती ते अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ३०-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये त्यांच्या कार्यालयात सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत कळविले होते, तथापि अपिलार्थी सदर सुनावणीस उपस्थित राहिले

नाहीत. अपिलार्थीस दिनांक ३०-०३-२००७ रोजीचे पत्र पाठविल्याप्रीत्यर्थ त्यांच्या कार्यालयाच्या जावक नोंदवहीची झेरॉक्स प्रत त्यांनी दाखविली. सदर जावक नोंदवहीच्या झेरॉक्स प्रतीचे अवलोकन करता, ही जावक नोंदवही अपूर्ण असल्याचे आढळून येते व नोंदवहीमध्ये पोस्टाच्या स्टॅम्पचा हिशोब लिहिलेला नसल्यामुळे, जन अपिलीय अधिकारी यांचे हे म्हणणे आयोगास ग्राह्य धरता येत नाही. अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती ते आता ३ दिवसात त्यांना देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित मुदतीमध्ये जन माहिती अधिकारी यांना देण्यास कोणतीही अडचण नव्हती, या माहितीचे स्वरुप अत्यंत सरळ व सोपे होते. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे, त्यांच्या अर्जाबाबत जन माहिती अधिकारी यांनी काय कार्यवाही केली, हे जाणून घेण्यासाठी मुख्यत्वेकरुन अपिलार्थी हे जबाबदार आहेत, तथापि अपिलार्थी यांनीही जन माहिती अधिकारी यांच्याशी संपर्क साधून माहिती मिळविण्याचा कोणताही प्रयत्न केल्याचा पुरावा, कागदपत्र उपलब्ध नाहीत. जन माहिती अधिकारी यांच्या म्हणण्यानुसार अपिलार्थी हे त्यांचा मूळ अर्ज दाखल करतांना फक्त एकाच वेळेस त्यांच्या कार्यालयात गेले होते, तर अपिलार्थी त्यांचे म्हणणे असे आहे की, ते माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी ब-याच वेळा गेले होते, तथापि जन माहिती अधिकारी हे भेटण्यासाठी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध होऊ शकले नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देण्यासाठी तयार केलेली माहिती आज आयोगास दाखविली. सदर माहितीच्या झेरॉक्स प्रती वाचनीय नसल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी प्रत्येक शेतक-याला नुकसानभरपाईची रक्कम किती मिळाली, या मुद्दयावरील माहितीचा उल्लेख या माहितीमध्ये नाही. थोडक्यात, सदर माहिती अस्पष्ट, अवाचनीय व अपूर्ण आहे. जन अपिलीय

अधिकारी यांनी आयोगास, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली वाचनीय स्वरुपातील माहिती अपिलार्थीस ३ दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे आश्वासित केले आहे, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती वाचनीय व स्पष्ट स्वरुपात त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयाचे अभिलेखे व्यवस्थित ठेवल्याचे आढळून येत नाहीत. जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी अभिलेखे व्यवस्थित ठेवावेत. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर निर्णय देतांना आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केल्याचे दिसून येत आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या कार्यशैलीची यथायोग्यरित्या नोंद आयुक्त (कृषि), पुणे यांनी घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती स्पष्टपणे वाचनीय स्वरुपात त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाचे आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद
दिनांक ०२-०७-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शेषराव एकनाथ टेकाळे, रा. पो. कुपटी (मा.), तालुका माहूर, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, माहूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, माहूर, तालुका माहूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त, (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे – ०५ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२८५

निर्णय दिनांक ०२-०७-२००८

श्री. चौकटे प्रकाश प्रल्हादराव, : अपिलार्थी
जाधव निवास, विकास कम्युनिकेशन,
कोर्टाच्या मागे, भाग्यनगर, अहमदपूर,
जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा प्राचार्य, महात्मा फुले महाविद्यालय,
अहमदपूर, जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सचिव, किसान शिक्षण प्रसारक
मंडळ, व्दारा विद्यावर्धनी हायस्कूल,
उदगीर, जिल्हा लातूर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०७-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. चौकटे प्रकाश प्रल्हादराव (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. कदम नरसिंग आप्पासाहेब, जन माहिती अधिकारी

तथा प्रभारी प्राचार्य, महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. जनार्दन रामराव बिरादार, कार्यालयीन व्यवस्थापक, जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, किसान शिक्षण प्रसारक मंडळ, उदगीर यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी, अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक २४-०३-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या महाविद्यालयाशी संबंधीत सन २००० ते दिनांक २४-०३-२००७ या कालावधीतील, खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"१. इ. स. २००० पासून आजपर्यंतचे महाविद्यालयातील तासिकांचे वेळापत्रक साक्षाकींत करुन.

२. इ. स. २००० ते अद्यापर्यंतच्या सर्व अधिव्याख्यात्यांच्या हाजेरी पत्रकाच्या सत्यप्रती.

३. शैक्षेणिक वर्ष २००६-२००७ च्या प्राध्यापक महाविद्यालयात आल्याचे व महाविद्यालयातून गेल्याचे नोंद वहीची सत्यप्रत.

४. दै. लोकमत सोमवार दि. ०३-११-२००३ च्या जाहिरीतीनुसार तसेच दै. लोकमत ०२-०७-२००५ च्या जाहिरीतीनुसार राज्य शास्त्र या पदासाठी केलेल्या अर्जाची सत्यप्रत.

५. दै. लोकमत सोमवार दि. ०३-११-२००३ च्या जाहिरीतीनुसार तसेच ०२-०७-२००५ च्या जाहिरीतीनुसार राज्य शास्त्र या पदासाठी आलेल्या अर्जांचा स्क्रुटीनी रीपोर्ट साक्षांकित करुन द्यावा.

६. दि. ०६-०८-२००० च्या अधिव्याख्यात्यांच्या मुलाखती कोणत्या जाहिरातीनुसार झाल्या होत्या त्या जाहिरातीची सत्यप्रत.

७. इ. स. २००० पासून आजपर्यंतच्या माहिती पुस्तीकांची सत्यप्रत.

८. मा. प्राचार्य वेळोवेळी प्राध्यापकांना मार्गदर्शनपर सुचना देतात त्या सुचना वह्यांची सत्यप्रत इ. स. २००० पासून आजपर्यंत. ''

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १८-०४-२००७ रोजीच्या पत्राने प्रथम प्रतिसाद दिला. या पत्रामध्ये, त्यांनी अपिलार्थीस त्यांचे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे आवश्यक असलेली माहिती त्यांना मिळू शकत नसल्याचे कळविले.

जन माहिती अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०५-२००७ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे किंवा यासंदर्भात अपिलार्थीशी कोठलाही पत्रव्यवहार केल्याचे, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०७-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे पत्र स्विकारले नसल्याचे व जन माहिती अधिकारी यांनी त्यांना आवश्यक असलेली माहिती दिली नसल्याचे नमूद केले आहे.

मध्यंतरीच्या काळात, अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांच्यामध्ये पत्रव्यवहार होऊन, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीची एकूण रक्कम रुपये १२२० इतकी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे त्यांनी अपिलार्थीस दिनांक १७-०५-

२००७ व १५-०६-२००७ च्या दोन वेगवेगळ्या पत्राव्दारे कळविले आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या सुचनेनुसार, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक २२-०५-२००७ रोजी ७५० रुपये व दिनांक २२-०६-२००७ रोजी ४७० रुपये इतके शुल्क भरले. अपिलार्थीने दिनांक २२-०५-२००७ रोजी रुपये ७५० इतक्या रक्कमेचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात केल्यानंतर, त्यांनी अपिलार्थीस दिनांक १५-०६-२००७ रोजी काही माहिती पुरविली व उर्वरित माहितीकरिता परत रुपये ४७० इतक्या रक्कमेचा भरणा करण्याच्या त्यांनी अपिलार्थीस सूचना दिल्या व त्या सुचनांस अनुसरुन अपिलार्थीने वर उल्लेख केल्याप्रमाणे दिनांक २२-०६-२००७ रोजी ४७० रुपये इतक्या रक्कमेचा भरणा केला. तथापि ही रक्कम भरल्यानंतरही अपिलार्थीस कोणतीही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही असे त्यांनी आयोगास सांगितले.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक १५-०६-२००७ रोजी प्राप्त झालेली माहिती अपूर्ण असून, त्यांनी मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १, २, ६ व ७ शी संबधीत त्यांना प्राप्त झालेली माहिती अपूर्ण आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना शुल्काची मागणी करतांना, या शुल्काचा सविस्तर तपशील उपलब्ध करुन दिला नव्हता, तो आता त्यांनी द्यावा.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक १५-०६-२००७ रोजी पुरविलेल्या माहितीतील जी माहिती अपुरी आहे, ती अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत पूर्णतः देण्यास तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या अपील अर्जावर निश्चितपणे कशा प्रकारची कार्यवाही करावयाची याची त्यांना कल्पना नसल्याने, त्यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर आपले निर्णय पारीत केले नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ७ वर्षाच्या कालावधीशी संबंधीत एकूण ८ मुद्दयावर माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती जरी काहीशी मोठी असली तरी, जर संबंधीत प्राधिकरणाने त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीशी संबंधीत अभिलेखे व्यवस्थीत ठेवले असते तर, केवळ त्यातील कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती काढणे एवढेच काम जन माहिती अधिकारी यांना होते. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या दिनांक २४-०३-२००७ च्या मूळ अर्जावर, त्यांनी त्यांच्या दिनांक १८-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथमत: नकारात्मक प्रतिसाद दिला आहे. अपिलार्थीस माहिती नाकारतांना, त्यांनी त्यांचे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने माहिती देता येत नाही, असे म्हटले आहे. **माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदी अंतर्गत जरी प्रकरण न्यायप्रविष्ट असले तरी, अर्जदारास आवश्यक ती माहिती देण्याने, अधिनियमातील कलम ८ च्या तरतुदीस बाधा पोहोचत नसेल तर अशी माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे अनिवार्य आहे.** उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १८-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रथम प्रतिसाद अशा प्रकारे चुकीचा ठरत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडे एकूण दोन वेळा आवश्यक त्या शुल्काची मागणी केली आहे. सदर पत्रांचे अवलोकन केले असता, त्यांनी अपिलार्थीस या पत्रामध्ये, त्यांना देण्यासाठी प्रस्तावित माहितीच्या पृष्ठांची संख्या व माहितीचा प्रति पृष्ठ दर कळविला नाही, जो अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे कळविणे आवश्यक आहे. अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीचे शुल्क कळवितांना त्यांनी फक्त एकूण शुल्काचा उल्लेख केला असल्याने, त्यांच्याकडून अधिनियमातील कलम ७ (३) (क) चा येथे भंग झाल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १७-०५-२००७ रोजीच्या पत्रान्वये व नंतर दिनांक १५-०६-२००७ रोजीच्या पत्रान्वये

अनुक्रमे रुपये ७५० व रुपये ४७० भरण्याचे सुचविले. अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविण्याची प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा दिनांक २४-०३-२००७ रोजीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाच्या आत करावयास हवी होती, तथापि त्यांनी मुळात अपिलार्थीस माहितीचे शुल्क अंदाजे एक महिना इतक्या उशिराने कळविले. अधिनियमाव्दारे विहित केलेला कालावधी यामध्ये व्यपगत झाला असल्याने, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती विनामूल्य पुरविणे भाग होते, मात्र जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती न करता, उशिराने अपिलार्थीस कोणताही तपशील न देता, दोन वेगवेगळ्या पत्राव्दारे प्रथम रुपये ७५० व त्यानंतर रुपये ४७० असे एकूण रुपये १२२० इतकी रक्कम त्यांच्या कार्यालयात जमा करण्याचे सूचित केले. त्यांच्या सदर कृतीने, माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ (१), ७ (३) (क) व कलम ७ (६) चा भंग झाला आहे, व परिणामी, जन माहिती अधिकारी यांची ही कृती अवैध ठरत आहे. आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १, २, ६ व ७ शी संबंधीत उर्वरित माहिती १५ दिवसाच्या आत देण्याचे कबूल केले आहे. माहिती देण्यासाठीचा अनुज्ञेय कालावधी आता व्यपगत झाला असल्याने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती विलंबाने द्यावी लागेल.

सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली मुद्दा क्रमांक १, २, ६ व ७ शी संबंधीत उर्वरित माहिती, त्यांना हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी, तसेच अपिलार्थीकडून त्यांना माहिती देण्यापोटी घेतलेले शुल्क रुपये १२२० त्यांना हे आदेश निर्गमीत होताच २४ तासाच्या आत परत करावे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणत्याही प्रकारे सकारात्मक प्रतिसाद न देऊन, अपिलार्थीस विनामूल्य माहिती देणे देय असूनही, त्यांच्याकडून रुपये १२२० इतक्या शुल्काची आकारणी करुन व अपिलार्थीस अपूर्ण माहिती देऊन संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव सिध्द केला आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब अध्यक्ष, किसान शिक्षण प्रसारक मंडळ, उदगीर यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी, त्यांच्या कार्यशैलीतील वरीलप्रमाणे दर्शविलेल्या कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत करुन, आपला अनुपालन अहवाल आयोगास तदनंतर १ महिन्याच्या आत सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली मुद्दा क्रमांक १, २, ६ व ७ शी संबंधीत उर्वरित माहिती, त्यांना हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीकडून त्यांना माहिती देण्यापोटी घेतलेले शुल्क रुपये १२२० त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच २४ तासाच्या आत परत करावे.

४. अध्यक्ष, किसान शिक्षण प्रसारक मंडळ, उदगीर यांनी, उपरोक्त प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी वरीलप्रमाणे दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल, त्यांच्यावर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य

प्रशासकीय कारवाई, हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन आपला अनुपालन अहवाल आयोगास तदनंतर १ महिन्याच्या आत सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक ०२-०७-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. चौकटे प्रकाश प्रल्हादराव, जाधव निवास, विकास कम्युनिकेशन, कोर्टाच्या मागे, भाग्यनगर, अहमदपूर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रभारी प्राचार्य, महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, किसान शिक्षण प्रसारक मंडळ, व्दारा विद्यावर्धनी हायस्कूल, उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ अध्यक्ष, किसान शिक्षण प्रसारक मंडळ, व्दारा विद्यावर्धनी हायस्कूल, उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२८६

निर्णय दिनांक ०२-०७-२००८

श्री. गोल्हार अशोक सयाजीराव, : अपिलार्थी
मोतीलाल कोठारी विद्यालय, मु. पो.
कडा, तालुका आष्टी, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा मुख्याध्यापक, मोतीलाल कोठारी
विद्यालय, मु. पो. कडा, तालुका
आष्टी, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सचिव, श्री अमोलक जैन विद्या
प्रसारक मंडळ, मु. पो. कडा, तालुका
आष्टी, जिल्हा बीड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०७-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. गोल्हार अशोक सयाजीराव (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. बडे नानाभाऊ बाबुराव, जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मोतीलाल कोठारी विद्यालय, मु. पो. कडा (यापुढे त्यांना

जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. श्रीमाळ उत्तमचंद जुगराज, जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ, मु. पो. कडा (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी, अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक ०५-०१-२००७ रोजीच्या अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या सेवेशी संबंधीत कागदपत्रांची खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> " आपण दि. ३०-१२-२००६ रोजी जा. क्र. ७६६/२००६-०७ अन्वये कार्यालयाचे आदेश न पाळणेबाबत या विषयाला अनुसरुन रजीस्टर पोस्टाने पाठविलेली नोटीस मला दि. ०३-०१-२००७ रोजी मिळाली. त्यामधून अशी माहिती पूढे आली आहे की, यापूर्वि आपण मला " अभ्यासक्रम वार्षिक नियोजनप्रमाणे पूर्ण केलेला नाही याबाबत दि. २७-१२-२००६ रोजी नोटीस दिलेली आहे. तरी दि. २७-१२-०६ रोजी आपण मला सदर नोटीसची बजावणी केल्याची माहिती पुराव्यासहीत द्यावी. "

अपिलार्थीने सदर माहिती शीघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी, त्यांच्याकडील दिनांक ०७-०३-२००७ रोजीच्या पत्राने प्रथम प्रतिसाद दिला. या पत्रामध्ये, अपिलार्थीस त्यांनी दिनांक २७-१२-२००६ ची नोटीस साध्या पोस्टाने पाठविली होती, परंतू सदर नोटीस त्यांना न मिळाल्यामुळे, परत ती नोटीस रजिस्टर्ड पोस्टाने दिनांक १०-०१-२००७ रोजी पाठविल्याचे व त्यानंतर ही माहिती अपिलार्थीस दिनांक १३-०२-२००७ रोजी पाठविल्याचे अपिलार्थीस कळविले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी, कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा-वरुन दिसून येत नाही, मात्र, त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ०३-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये, जन माहिती अधिकारी यांना, अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून सूचना प्राप्त झाल्यानंतर, वर उल्लेख केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस दिनांक ०७-०३-२००७ रोजी कथित माहिती दिली.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०६-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये, त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०१-२००७ रोजी माहितीची मागणी केली असता, अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोठल्याही प्रकारचा प्रतिसाद त्यांना मिळाला नाही, मात्र, त्यांनी दिनांक ०१-०३-२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असतांना, दिनांक ०३-०३-२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०७-०३-२००७ रोजीच्या पत्राने प्रतिसाद दिला. सदर माहिती त्यांना पोस्टाने, दिनांक १३-०३-२००७ रोजी प्राप्त झाली असून, या माहितीने त्यांचे समाधान झालेले नाही. सदर माहिती विलंबाने प्राप्त झाल्यामुळे, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करुन त्यांना माहिती मिळावी अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, वेळोवेळी सूचना देऊन सुध्दा कार्यालयीन कामामध्ये निष्काळजीपणा केल्याबाबत, अपिलार्थीस त्यांनी दिनांक २७-१२-२००६ रोजी बुकपोस्टाने पत्र पाठविले होते हे पत्र पाठविण्याकरिता त्या पाकिटावर ८ रुपये इतक्या किंमतीचे पोस्टाचे स्टॅम्प चिकटविले होते. सदर पत्राचा जावक क्रमांक ७५८ ते ७६० असा आहे. अपिलार्थीस, त्यांच्या दिनांक ०५-०१-२००७ रोजीच्या अर्जास त्यांनी त्यांच्याकडील १०१० व १०११ या जावक क्रमांकाच्या दिनांक ०७-०३-२००७ च्या पत्रान्वये नोटिशीची माहिती पाठविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी करतांना, त्यांना दिनांक २७-१२-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांनी सदर नोटीसची बजावणी केल्याची माहिती पुराव्यासह मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या ''माहिती'' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये कलम २ (च) मध्ये माहिती या शब्दाची व्याख्या खालीलप्रमाणे स्पष्ट केलेली आहे.

**<u>कलम २ (च)</u>**

'' ''माहिती'' याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दिपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो. ''

यावरुन, “ नोटीसची बजावणी केल्याची माहिती ” म्हणजे काय, हे समजून येत नाही. अपिलार्थीस देण्यात आलेल्या दिनांक २७-१२-२००६ रोजीच्या नोटिशीच्या संदर्भात, जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना त्यांच्याकडील दिनांक ०७-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये खुलासा केल्याचे दिसून येते, तथापि सदर माहिती जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस दिनांक ०४-०२-२००७ रोजी अगर तत्पूर्वी पाठविणे भाग होते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती न करुन, अधिनियमातील विहित मुदतीत अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद न देता, त्यांच्या मूळ अर्जासंदर्भातील निर्णय त्यांना कळविण्यास जन माहिती अधिकारी यांनी ३० दिवस इतका विलंब लावल्याचे, या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात त्यांनी लावलेल्या विलंबाबाबत जन माहिती अधिकारी यांनी आयोगास कोणतेही समर्थनीय कारण न सांगितल्याबद्दल संबंधीत जन माहिती अधिकारी यांना, विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये ७५०० /- (अक्षरी- रुपये सात हजार पाचशे) इतकी शास्ती लावण्यात येत आहे.

सदर शास्तीचा भरणा जन माहिती अधिकारी यांनी, शासकीय कोषागारात लेखा शिर्ष संकेतांक - ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) - या लेखाशीर्षाखाली जास्तीत जास्त पाच हप्त्यात करावा.

सदर शास्तीचा भरणा संबंधीत जन माहिती अधिकारी हे नियमीतपणे ऑगस्ट २००८ पासून शासकीय कोषागारात करतील असे, सचिव, श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ, मु. पो. कडा, तालुका आष्टी, जिल्हा बीड यांनी पहावे व आपला यासंदर्भातील अनुपालन अहवाल ऑगस्ट २००८ पासून पुढे दरमहा, सदर शास्तीची रक्कम शासकीय कोषागारात पूर्णपणे भरुन होईपर्यत आयोगास सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन

खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधीत जन माहिती अधिकारी यांना, विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये ७५०० /- (अक्षरी- रुपये सात हजार पाचशे) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे करावा.

३. संबंधित जन माहिती अधिकारी हे शास्तीची रक्कम नियमितपणे शासकीय कोषागारात भरतील याची सचिव, श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ, मु. पो. कडा, तालुका आष्टी, जिल्हा बीड यांनी खात्री करावी व आपला अनुपालन अहवाल यापुढे दरमहा शास्तीची रक्कम पूर्णपणे कोषागारात भरणा होईपर्यत आयोगास सादर करावा.

औरंगाबाद<br>
दिनांक ०२-०७-२००८

( वि. बा. बोरगे )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गोल्हार अशोक सयाजीराव, मोतीलाल कोठारी विद्यालय, मु. पो. कडा, तालुका आष्टी, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मोतीलाल कोठारी विद्यालय, मु. पो. कडा, तालुका आष्टी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ, मु. पो. कडा, तालुका आष्टी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हा कोषागार अधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२८७

निर्णय दिनांक : ०३.०७.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. बाळासाहेब द्वारकादास तिडके,<br>रा.जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा तालुका कृषी अधिकारी,<br>बदनापूर जि.जालना | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपविभागीय कृषी अधिकारी,<br>जालना, जि.जालना | | |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.०७.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. प्रकाश बाबूराव अव्हाळे, जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, बदनापूर,जिल्हा जालना (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. नंदकुमार अनंतराव टाक,तंत्र अधिकारी, जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषी अधिकारी, जालना यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर अपिलार्थी श्री. बाळासाहेब द्वारकादास तिडके (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.०९.०५.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ०१.०१.२००६ ते ३१.०३.२००७ या कालावधीतील त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"१) बदनापूर तालुक्यात पाडळी, नानेगाव व धोपटेश्वर या गावात जलसंधारण अंतर्गत रोजगार हमी योजनेची कोणती कामे झालेली आहेत. ती कोणत्या प्रकारची कामे आहेत.त्या कामांवर किती मजूर काम करीत होते? त्यांना काय मजूरी देण्यात आलेली आहे ? काम चालू असतांना गावामध्ये ग्रामपंचायत कार्यालयासमोर रोजगार हमी योजनेच्या कामावर किती मजूर उपस्थित होते ? अशा प्रकारचे माहिती आपल्या ग्रामपंचायतसमोर फलक बोर्डावर लावण्यात आली होती का ? मजूरांची मजूरी वाटतांना संबंधीत गावातील सरपंचाच्या साक्षीने व त्यांच्या सहीने मजूरी वाटण्यात आली का? आली असल्यास त्याच्या साक्षांकित प्रती देण्यात याव्यात व वरील तिन्ही गावातील १ जानेवारी २००६ ते ३१ मार्च २००७ या कालावधीत किती मजूरांनी काम केले. एकूण झालेला खर्च त्यांना मजुरी देण्यात आलेल्या मस्टरची साक्षांकित प्रत देण्यात यावी."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०५.०६.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस हव्या असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.५००/- इतके शासकीय कोषागारात भरण्याचे त्यांना सूचित केले. या पत्रामध्ये अपिलार्थीस देण्यात येणाऱ्या संभाव्य माहितीच्या पृष्ठांची संख्या व माहिती पुरविण्याचा प्रति पृष्ठ दर हा तपशील या पत्रान्वये त्यांना कळविलेला नाही. अधिनियमाद्वारे विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि.१२.०६.२००७ रोजी

प्रथम अपील केले आहे. सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांना प्रत्यक्ष दि.२१.६.२००७ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही, मात्र त्यांनी त्यांच्याकडील दि. २६.०६.२००७ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस आवश्यक ती माहिती देण्याचे सूचित करुन त्याबरोबर या संदर्भातील अनुपालन अहवाल त्यांना "अतितात्काळ शक्य तितक्या शीघ्रतेने" त्यांच्या कार्यालयात सादर करण्याच्या सूचना दिल्या. या पत्रानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ३०.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात स्मरणपत्र दिलेले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून सूचना प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क शासकीय कोषागारात भरण्याच्या दि. ५.६.२००७ रोजीच्या पत्राद्वारे सूचना देऊनही, त्यांनी सदर शुल्क भरले नसल्याचे त्यांच्याकडील दि. २३.७.२००७ रोजीच्या पत्रान्वये जन अपिलीय अधिकारी यांना कळविले.

या काळामध्ये जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.०८.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेला अपील अर्ज विहित नमुन्यात केला नसून या अपील अर्जावर अपिलार्थीची सही नाही, मात्र या अर्जाच्या शेवटी त्यांनी अर्जामध्ये नमूद केलेली माहिती व मजकुर सत्य व अचूक असल्याबाबतचे एक प्रतिज्ञापत्र दिले आहे, जे शासन, सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्र.आर.टीआय.२००५/सी.आर.३१५/०५/५, दिनांक ११.१०.२००५ मध्ये विहित केलेल्या अपील अर्जाच्या नमुन्यात समाविष्ट नाही. त्यामुळे अपिलार्थीचा आयोगाकडे केलेल्या

द्वितीय अपील अर्ज हा विनासहीचा आहे, असे मानण्यात येत आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या त्यांच्या अर्जामध्ये आपल्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीमध्ये बदल करुन तिची व्याप्ती वाढवली आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या अर्जामधील वाढीव व्याप्तीच्या माहितीमध्ये बदनापूर येथील सुपरवायझर श्री. पंडीत यांचे कार्यक्षेत्रातील रोजगार हमी योजने अंतर्गत कोणत्या प्रकारची कामे झाली, कामे व मजूरी अदा करण्यात आलेल्या कार्यवाहीची साक्षांकित प्रत, मजूरांची नावे, व त्यांना किती मजूरी मिळाली, त्यांना मिळालेले धान्य इत्यादी तपशील मागितला आहे, जो मूळ अर्जात नसल्यामुळे तो आता विचारात घेता येणार नाही.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत, त्यामुळे त्यांनी आयोगाकडे सादर केलेल्या द्वितीय अपील अर्जातील त्यांनी केलेली माहितीची मागणी हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती, तथापि अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात सदर माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी किंवा सदर माहिती त्यांना पुरविण्यासाठी किती शुल्क लागणार याची विचारणा करण्यासाठी त्यांच्या कार्यालयात कधीही गेले नाहीत. अपिलार्थीची वाट पाहून त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. ५.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी रु.५००/- इतके शुल्क भरण्याचे सूचित केले. तथापि सदर शुल्क अपिलार्थीने कधीही भरले नाही किंवा त्यांना मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कधीही हजर झाले नाहीत. त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती आज रोजी त्यांच्याकडे तयार असल्याने अपिलार्थीने शुल्क भरल्यास ते अपिलार्थीस ती व्यक्तीशः हस्तांतरित करण्यास तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या अपील अर्जावर सुनावणी घेऊन कशा प्रकारे निर्णय द्यावयाचा आहे याची पध्दत त्यांना माहिती नसल्याने त्यांनी सुनावणी घेतली नाही. तथापि अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी जन माहिती अधिकारी यांना दि.२६.६.२००७, ३०.०६.२००७ रोजीच्या पत्रान्वये सूचित केले होते.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळ अर्जाद्वारे व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपीलाद्वारे माहितीची मागणी केली आहे. माहितीची मूलतः व्यक्तीशः मागणी करुनही अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित राहिले नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी या संदर्भात केलेल्या युक्तीवादाचे खंडण करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचा, अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कधीही उपस्थित राहिले नाहीत, हे विधान सत्य असल्याचे आयोग मानते. कोणत्याही अर्जदाराने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार 'व्यक्तीशः माहिती मागणे' याचा अर्थ अर्जदाराला आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहून ती स्वतः प्राप्त करुन घेणे, असा होतो. व्यक्तीशः माहितीच्या मागणीमध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात त्यांचा प्रतिनिधी पाठविणे हे माहिती प्राप्त करुन घेण्याच्या या प्रकारामध्ये अभिप्रेत नाही.अर्जदार ज्या-ज्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी उपस्थित राहिले, त्या-त्या वेळी त्यांना त्यांच्या उपस्थितीची नोंद जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात करुन त्याची एक प्रत स्वतःकडे ठेवणे, हा सर्वसाधारण परिस्थितीत त्यांच्या उपस्थितीसंदर्भातील

पुरावा म्हणून ग्राहय धरता येईल. तथापि अशाप्रकारचा कोणताही पुरावा अपिलार्थीने आज रोजी आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. अपिलार्थीने व्यक्तीशः माहितीची मागणी केली असल्याने या प्रकरणामध्ये माहिती प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी ही प्रामुख्याने अपिलार्थीची आहे. ती त्यांनी पार पाडल्याचे दिसून येत नाही. ज्याप्रमाणे माहिती मागणे अर्जदाराचा हक्क आहे व ती देण्याचे जन माहिती अधिकारी यांचे माहितीचा अधिकार अधिनियमानुसार कर्तव्य आहे, त्याप्रमाणे व्यक्तीशः माहितीची मागणी केल्यास, माहिती समक्ष प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी देखिल अपिलार्थीची आहे, हे येथे विशेषकरुन नमूद करण्यात येत आहे. या ठिकाणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती प्राप्त करुन घेण्यासंदर्भात उपस्थित न राहून आपली जबाबादारी व्यवस्थित पार पाडली नसल्याने त्यांना माहिती न मिळण्यास ते स्वतः जबाबदार आहेत, असे आयोगाचे मत आहे.

अपिलार्थी यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये आपल्या मूळ अर्जातील माहितीची व्याप्ती वाढविल्याचे दिसून येते. राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल करतांना सदर अपील निश्चितपणे त्यांनी मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या मुद्यांविषयीच असले पाहिजे, याची काळजी घेण्याची जबाबदारी अपिलार्थीची असते. ही जबाबदारी देखील येथे अपिलार्थीने पार पाडलेली नाही. आयोगाकडे द्वितीय अपील, अर्ज करताना त्यांनी शासन, सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्र. आर.टीआय.२००५/सी.आर.३१५/०५/५, दिनांक ११.१०.२००५ द्वारे विहित केलेल्या अर्जाच्या नमुन्यात अपील केलेले नाही. जरी त्यांनी विहित नमुन्यात अपील केलेले नसेल तरी ते विचारात घेण्यास आयोगाची हरकत नाही. तथापि त्यांनी या अर्जावर स्वतःची स्वाक्षरी केली नाही व त्याद्वारे त्यांनी या मुद्यावरही आपली जबाबादारी आवश्यक त्या रितीने पार पाडल्याचे दिसून येत नाही.

उपरोक्त विवेचनावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तीशः माहितीची मागणी करुन माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांनी स्वतः

आवश्यक ती जबाबदारी पार पाडलेली नाही. या विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. आता जर त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती हवी असेल तर त्यांना जन माहिती अधिकारी हे सदर माहिती सशुल्क देण्यास तयार आहेत. हे पाहता, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचे आवश्यक ते शुल्क भरुन त्यांना आवश्यक असलेली माहिती हस्तगत करुन घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

सबब खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१.अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ०३.०७.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बाळासाहेब द्वारकादास तिडके,शिषटेकडी, कसबा, जुना जालना ता.जि.जालना

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, बदनापूर जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषी अधिकारी, जालना जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२८८

निर्णय दिनांक : ०३.०७.२००८

१ श्री. सतिशकुमार रतनलाल वर्मा, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन),
पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद
२ जन अपिलीय अधिकारी
तथा पोलीस उपायुक्त (मुख्यालय),
पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.०७.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. सतिशकुमार रतनलाल वर्मा (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन), पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त (मुख्यालय), पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

या अपिलाची सुनावणी आज दिनांक ०३.०७.२००८ रोजी ठेवण्यात आली होती. सुनावणीचे पत्र संबंधित अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना आयोगाच्या दि. २८.०५.२००८ रोजीच्या पत्रान्वये पाठविण्यात आले होते. तसेच आजच्या

सुनावणीसंदर्भात हजर राहण्याबाबत आयोगाच्या कार्यालयातून दूरध्वनीद्वारे सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे विभाग) श्री. मोहसिनखान यांचेशी पोलीस आयुक्तालयातील दूरध्वनीवर संपर्क साधून कळविण्यात आले होते.

वरीलप्रमाणे लेखी व दूरध्वनीद्वारे कळवूनही जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कुणीही आज सुनावणीसाठी उपस्थित नाही, याची आयोगातर्फे सखेद नोंद घेण्यात येत आहे. आयोगाकडील सुनावणीची पुढील तारीख दिनांक २०.०८.२००८ रोजी सकाळी ठीक १०.३० वाजता आयोगाच्या औरंगाबाद स्थित कार्यालयात निश्चित करण्यात आली आहे.

जन माहिती अधिकारी यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सदर अपीलाच्या दिनांक २०.०८.२००८ रोजी आयोजित केलेल्या सुनावणीच्या वेळी या प्रकरणातील अपिलार्थीस त्यांच्या भ्रमणध्वनी क्र. ९८२३२९१४२७ वर पोलीस शिपाई श्री. पठाण यांनी संपर्क साधल्याचा पुरावा आयोगास सादर करावा.

सदर सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही गैरहजर राहिले तर त्यांच्या गैरहजेरीत सदर प्रकरणी निर्णय घेण्यात येईल व तो दोन्ही पक्षास बंधनकारक राहील.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ०३.०७.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सतिशकुमार रतनलाल वर्मा, विश्वासनगर, लेबर कॉलनी, प्लॉट नं. एस.आर.टी.-१९, हनुमान मंदीराजवळ, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन), पोलीस आयुक्तालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त (मुख्यालय), पोलीस आयुक्तालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२८९

निर्णय दिनांक : ०३.०७.२००८

१ श्री. हेमंत मनोहरराव महाले, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी
तथा अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ,
औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.०७.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. हेमंत मनोहरराव महाले (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. मधुकर भुजंगराव देशपांडे,उपकार्यकारी अभियंता,सा.बां.(पश्चिम), जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.२६.०३.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील कामांसंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"१) साखरवेल-करंजखेडा रस्त्यावरील खांडीचे काम कोणकोणत्या हेडखाली (लेखाशीर्ष अंतर्गत) झाली त्याची तपशीलवार यादी
२) कोणकोणत्या हेडखाली मंजुरी दिली किंवा मंजुरी मिळाली व किती खर्च झाला ?
३) सदरील कामे कोणकोणत्या एजन्सीला दिलीत त्यांची नावे व वर्क ऑर्डरच्या छायांकित प्रती.
४) सदरील कामांचे मोजमाप ज्या मोजमाप पुस्तिकेत लिहिली त्यांची छायांकित प्रत.
५) सदरील कामांच्या अंदाजपत्रकांच्या छायांकित प्रती.
६) आमच्या माहितीप्रमाणे १) वैधानिक विकास महामंडळ २) एस.आर.हेडअंतर्गत ३) अ आणि ब गटात एस.ई.(सुपरिटेंडेंट इंजिनिअर) यांनी दिलेले जॉबवर्क अंतर्गत सदरील काम झालेले आहे, हे बरोबर असल्यास त्याची यादी देण्यात यावी."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. जन माहिती यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि.०३.०५.२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ४.६.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. १२.०६.२००७ रोजी पारित केले आहेत. निर्णयामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस १५ दिवसांच्या आत माहिती उपलब्ध करुन देण्याचे सूचित केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून

आदेश प्राप्त होऊनही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.०७.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे. या अपील अर्जात त्यांनी आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून, त्यांना माहिती उपलब्ध करुन न दिल्याबद्दल संबंधितांवर अधिनियमानुसार योग्य ती कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की,त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये तीन-चार वेळेस जाऊनही त्यांना ही माहिती प्राप्त झाली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही त्यांना आजपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही व तसेच त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे व त्यांना माहिती न दिल्यामुळे संबंधितांवर अधिनियमाप्रमाणे योग्य ती कारवाई करण्यात यावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने ज्या कामासंदर्भात त्यांच्याकडे माहितीची मागणी केली आहे ते काम सार्वजनिक बांधकाम, कन्नड (पूर्व) उपविभाग यांच्या कार्यक्षेत्रात येत असल्याने त्यांच्याकडील दि. ३०.३.२००७ च्या पत्रान्वये अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात सादर करण्याच्या त्यांना सूचना दिल्या. यानंतर त्यांनी पुन्हा दि. १७.४.२००७ व १०.०५.२००७ रोजी यासंदर्भात स्मरणपत्रही पाठविले आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपिलासंदर्भात सुनावणी झाल्यानंतरही त्यांनी संबंधित उपअभियंत्यांना एकूण अकरा स्मरणपत्रे पाठविली, तथापि एवढा पाठपुरावा करुनही संबंधित उपअभियंत्यांकडून माहिती प्राप्त न झाल्याने ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत. आता ते, ती किती दिवसांत अपिलार्थीस पुरवू

शकतील, यासंबंधी विचारणा केली असता, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ते पंधरा दिवसांच्या आत पुरवू शकतील, असे त्यांनी आयोगास सांगितले.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे कोणताही प्रतिनिधी आज सुनावणीस हजर नसल्याने त्यांचा युक्तीवाद नोंदवून घेता आला नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने औरंगाबाद जिल्हयातील साखरवेल ते करंजखेडा रस्त्यावरील काम कोणत्या लेखाशीर्षाखाली झाले, या कामास कोणत्या लेखाशीर्षाखाली मंजूरी दिली गेली, या कामावर किती खर्च झाला, काम करणाऱ्या एजन्सीची नावे व कार्यारंभ आदेशाच्या झेरॉक्स प्रती इत्यादी तपशीलवार माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. अपिलार्थीने मागितलेली माहिती सरळ व सोपी असल्याने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस अधिनियमातील विहित केलेल्या मुदतीमध्ये माहिती देण्यासाठी कोणतीही अडचण नव्हती. अपिलार्थीच्या प्रथम माहितीच्या अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकारे प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे केल्या गेलेल्या युक्तीवादावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती देण्यासाठी, त्यांच्याकडे क्षेत्रिय कार्यालयाकडून ही माहिती प्राप्त होणे जरुरीचे होते.तथापि त्यांनी पाठपुरावा करुनही संबंधित क्षेत्रिय कार्यालयाने त्यांना माहिती न दिल्याने ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत, असे त्यांचे म्हणणे असल्याचे दिसून येते. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सर्वसाधारण कामकाजाची पध्दत पाहता अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १,२,३ व ५ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडेच उपलब्ध होणे अभिप्रेत आहे. संबंधित जन माहिती अधिकारी यांना ही माहिती देखील त्यांच्या क्षेत्रिय कार्यालयाकडून मागण्याचे कारण

आयोगास त्यांनी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन कळून येत नाही किंबहुना त्यांची अशाप्रकारची कृती ही अपिलार्थीस माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली हेच सप्रमाण सिध्द करत आहे. थोडक्यात, जन माहिती अधिकारी व त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणाऱ्या त्यांच्या इतर सहायक अधिकारी/कर्मचारी यांनी अपिलार्थीस त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय दीर्घकाळासाठी वंचित ठेवल्याचे येथे निःसंशयपणे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांना अर्जदारास माहिती पुरविण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५(५) मध्ये तरतुद आहे, हे पाहता, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवण्यासाठी जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी हे जबाबदार ठरत आहेत. त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीने त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस निःसंशयपणे पात्र ठरविले आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की, संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना सहाय्य करणारे त्यांचे इतर सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी या सर्वांवर त्यांनी अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- या प्रमाणे एकूण रु.२५०००/-(अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित असलेले त्यांचे सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी यांनी सदर शास्तीची रक्कम शासकीय कोषागारात पुढील लेखाशीर्षाखाली जास्तीत जास्त पाच हप्त्यात भरावी.

लेखाशीर्ष-**“००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) ”**

सदर शास्तीची विभागणी जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी यांच्यामध्ये अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांनी हे आदेश निर्गमित होताच यथायोग्यरित्या सात दिवसांचे आत करावी व यासंबंधीचा आपला अनुपालन अहवाल आयोगास तात्काळ सादर करावा. सदर शास्तीची रक्कम संबंधित सर्व जन माहिती अधिकारी हे नियमितपणे शासकीय कोषागारात भरतील, असे अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांनी पहावे व या संदर्भातील आपला अनुपालन अहवाल ऑगस्ट, २००८ पासून दरमहा शास्तीची संपूर्ण रक्कम शासकीय कोषागारात पूर्णपणे भरुन होईपर्यंत आयोगास सादर करावा.

अपिलार्थीस माहिती देण्याच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात, त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी यांनी, अपिलार्थीस मूळ

अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती पुरविण्याप्रित्यर्थ लावलेल्या असमर्थनीय विलंबाबद्दल त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २०(१) च्या तरतुदीअन्वये विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/-प्रमाणे एकूण रु.२५०००/- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती लावण्यात येत आहे.सदर शास्तीचा भरणा त्यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे करावा.

४. शास्तीची यथायोग्य विभागणी, जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व सहाय्यक अधिकारी/कर्मचारी यांच्यामध्ये अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांनी हे आदेश निर्गमित होताच, सात दिवसांचे आत करावी व यासंबंधीचा अनुपालन अहवाल तात्काळ आयोगास सादर करावा व संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी हे शास्तीची रक्कम नियमितपणे कोषागारात भरतील याची अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांनी खात्री करावी व आपला अनुपालन अहवाल ऑगस्ट २००८ पासून पुढे दरमहा शास्तीच्या रकमेचा शासकीय कोषागारात पूर्णपणे

५. भरणा होईपर्यंत आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ०३.०७.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. हेमंत मनोहरराव महाले, द्वारा दै. शिवनातीर, वदर गणेश मंदिरामागे, समर्थनगर, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हा कोषागार अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२९०

निर्णय दिनांक : ०३.०७.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. साहेबराव यादवराव ताटे<br>रा. परभणी. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग,<br>परभणी. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा अधीक्षक अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम मंडळ,<br>नांदेड. | | |

## <u>निर्णय</u>

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.०७.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. रेणुकादास माधवराव चौधरी, जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. सुनिल अण्णासाहेब वांढेकर, जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तरअपिलार्थी श्री. साहेबराव यादवराव ताटे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.२४.०४.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १.३.२००७ ते ३१.०३.२००७ या कालावधीची त्यांच्या कार्यालयाशी संबंधित खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"१) सा.बां. उपविभाग सेलू अंतर्गत दि. १.३.२००७ ते दि. ३१.३.२००७ पर्यंत दिलेल्या देयकाचे (बिलाचे) तपशिल कामाचे नाव आणि दिलेल्या बिलाची रक्कम याचा तपशिल देणे.

२) सा.बां.उप विभाग जिंतूर अंर्तगत दि.१.३.२००७ ते दि.३१.३.२००७ पर्यंत फक्त J.E. सिरसाट यांनी दिलेल्या देयकाचे (बिलाचे) तपशिल कामाचे नाव आणि दिलेल्या  बिलाची रक्कम याचा तपशिल

३) J.E. सिरसाट याचे सा.बां.विभाग हिंगोली येथे कार्यरत असताना M.B. (मोजमाप) पूस्तक लिहण्याचे अधिकार कोणत्या कारणाने काढण्यात आले होते ? किती कालावधीकरिता काढण्यात आले होते. शक्य झाल्यास त्या पत्राची छायांकित प्रत देण्यात यावी."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ११.७.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती त्यांच्या कार्यालयातून घेऊन जाण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून दि. १६.७.२००७ रोजी आवश्यक ती माहिती प्राप्त करुन घेतली व सदर माहिती प्राप्त झाल्याप्रित्यर्थ जन माहिती अधिकारी यांच्या दि. ११.७.२००७ रोजीच्या पत्रावर आपली दि. १६.७.२००७ रोजीची पोचसही केलेली आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ६.६.२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती न दिल्याचे म्हटले आहे. अपिलार्थीच्या सदर अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १६.७.२००७

रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले निर्णय त्याच दिवशी पारित केले आहेत. सदर अपील निर्णयामध्ये, उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, जिंतूर व सेलू यांनी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांना वेळेत माहिती उपलब्ध न करुन दिल्यामुळे, झालेल्या विलंबाबाबत त्यांच्यावर प्रशासकीय कारवाई प्रस्तावित करण्याचे उपविभागीय अभियंता यांना उद्देशून आदेश दिले असून, अपिलार्थीचे अपील निकाली काढले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या अपील निर्णयामध्ये अपिलार्थीस माहिती पुरविण्यासंदर्भात कोणतेही स्पष्ट निर्देश दिलेले नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.०८.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना प्राप्त झालेली माहिती अपूर्ण आहे, सदर माहितीतील पृष्ठावर कार्यकारी अभियंता यांची स्वाक्षरी नाही, एकाच पानाच्या दोन झेरॉक्स प्रती काढून त्यांची दिशाभूल करण्यात आली असल्याचे व मुद्दा क्र. ३ ची माहिती त्यांना अद्यापही न दिल्याचे नमूद केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्याने त्यांनी आयोगाकडे सादर केलेल्या द्वितीय अपील अर्जातील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या दि. २४.४.२००७ रोजीच्या मूळ माहितीच्या अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती मोठया प्रमाणात असल्याचे त्यांनी प्रथमतः त्यांच्याकडील दि. ३१.५.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस कळविले. त्यानंतर त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ व २ शी संबंधित माहिती दि. ११.७.२००७ रोजी दिली व मुद्दा क्र. ३ शी संबंधित माहिती कार्यकारी अभियंता,सा.बां.विभाग, हिंगोली यांच्याकडून

प्राप्त करुन घेऊन अंतिमतः दि. ८.८.२००७ रोजी अपिलार्थीस पुरविली. तथापि सदर माहितीने अपिलार्थीचे समाधान झाले नसल्याने, त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २४.८.२००७ रोजी द्वितीय अपील केले होते. आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर, अपिलार्थीने त्यांच्या दि. ५.६.२००८ रोजीच्या पत्रान्वये, त्यांनी त्यांच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना पूर्णतः प्राप्त झाली असल्याचे व माहितीबाबत त्यांचे समाधान झाले असल्याने राज्य माहिती आयोगाकडील द्वितीय अपीलाचा विचार करण्यात येऊ नये व प्रकरण निकाली काढण्यात यावे, अशी विनंती करणारे त्यांचे दि. ५.६.२००८ रोजीचे पत्र त्यांना प्राप्त झाले. सद्यःस्थितीत अपिलार्थीस पूर्णतः माहिती प्राप्त झाली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करतांना उपस्थित केलेले मुद्दे त्यांच्याकडे दि. १६.७.२००७ रोजी झालेल्या प्रथम अपील सुनावणीचे वेळी उपस्थित केले नव्हते. सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील तीन मुद्यांपैकी मुद्दा क्र. १ व २ शी संबंधित माहिती प्राप्त झाली होती व मुद्दा क्र. ३ ची माहिती अपिलार्थीस अपिलार्थीस देणे बाकी होते. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ८.८.२००७ रोजी मुद्दा क्र.३ ची संपूर्ण माहिती अपिलार्थीस दिली. अपिलार्थीस प्राप्त झालेल्या माहितीवर ते समाधानी असल्याचे पत्र त्यांनी जन माहिती अधिकारी यांना दि. ५.६.२००८ रोजी लिहिलेले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्याकडील दि. २४.४.२००७ रोजीच्या प्रथम अर्जाद्वारे एकूण ३ मुद्यांवर माहिती मागितली आहे. यापैकी मुद्दा क्र. ३ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नव्हती. माहिती अधिकार अधिनियम

२००५ मधील कलम ६(३)(एक) प्रमाणे त्यांनी अपिलार्थीच्या अर्जातील सदर भागासंबंधीची माहिती ज्या प्राधिकरणाकडे उपलब्ध आहे, त्यांच्याकडे अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत पाठवून त्या पत्राची एक प्रत अपिलार्थीस पाठवून देणे भाग होते. तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कृती न करता, ते मुद्दा क्र. ३ शी संबंधित माहिती अपिलार्थीस देण्याकरिता संबंधित प्राधिकरणाशी पत्रव्यवहार करत राहिले. संबंधित प्राधिकरणाकडून त्यांना ही माहिती दि. ३०.७.२००७ रोजी प्राप्त झाली, त्यानंतर त्यांनी ही उर्वरित माहिती अपिलार्थीस दि. ८.८.२००७ रोजी पुरवली. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीबाबत त्यांच्या काही शंका होत्या, त्या त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये व्यक्त केल्या आहेत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सुरुवातीला तीन पैकी दोन मुद्यांवर माहिती दिली होती व नंतर तिसऱ्या मुद्यावरील माहिती त्यांनी दि. ८.८.२००७ रोजी अपिलार्थीस पुरविली आहे. या माहितीवर कार्यकारी अभियंता यांच्या स्वाक्षऱ्या असल्याचे दिसून येते, अपिलार्थीचे म्हणणे की, त्यांना पुरविलेल्या माहितीमध्ये एकाच पृष्ठाच्या दोन-दोन झेरॉक्स प्रती देण्यात येऊन त्यांची दिशाभूल करण्यात आली, तथापि अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या माहितीचे अवलोकन करता, असा प्रकार झाल्याचे आयोगास आढळून येत नाही. या मुद्यावर देखील अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांना उद्देशून लिहिलेल्या दि. ५.६.२००८ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थी यांचे सर्व मुद्यांवर शंकांचे निरसन होऊन अपिलार्थीस अंतिमतः दि. ८.८.२००७ रोजी पूर्ण माहिती मिळाली आहे. अपिलार्थीस आता जरी पूर्ण माहिती मिळून त्यांचे समाधान झाले असले तरी या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये प्रतिसाद दिला नसल्याचे प्रकर्षाने आढळून येत आहे. अपिलार्थीस, सर्वसाधारण परिस्थितीत त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना अधिनियमातील तरतुदीप्रमाणे दि. २८.५.२००७ रोजी अथवा तत्पूर्वी मिळणे भाग होते. तथापि ही माहिती त्यांना अंशतः दि. ११.७.२००७ रोजी व उर्वरित दिनांक

८.८.२००७ रोजी मिळाली आहे. या प्रकरणी अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी अनुज्ञेय कालावधीमध्ये एकूण ४८ दिवसांचा विलंब लावल्याचे दिसून येत आहे. आपल्या या कृतीद्वारे त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट करुन स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की, मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांनी, जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल, त्यांच्यावर प्रचलित सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याच्या आत करुन आपला अनुपालन अहवाल तद्नंतर एक महिन्याच्या आत आयोगास सादर करावा.

अपिलार्थीस आता माहिती मिळाली असल्याने त्यांना माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांनी, जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल, त्यांच्यावर प्रचलित सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याच्या आत करुन आपला अनुपालन अहवाल तद्नंतर एक

३. महिन्याच्या आत आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ०३.०७.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. साहेबराव यादवराव ताटे, रा. लहुजीनगर, परभणी

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२९१

निर्णय दिनांक : ०३.०७.२००८

१ श्री. संतोष यल्हाजी बांगर : अपिलार्थी
रा. हिंगोली.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी,
उपसंचालक, आरोग्य सेवा, औरंगाबाद.
२ जन अपिलीय अधिकारी
तथा उपसंचालक,
आरोग्य सेवा,
औरंगाबाद.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.०७.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. विनायक नरहर जाधव, जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, उपसंचालक, आरोग्य सेवा,औरंगाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. काझी महंमद इकबाल जिलानी, जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, आरोग्य सेवा, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर अपिलार्थी श्री. संतोष यल्हाजी बांगर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.१४.०३.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित नोकर भरती

प्रकरणात कर्मचारी व अधिकारी यांच्यावर झालेल्या कारवाईबाबत खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> " वरील प्रकरणी जिल्हा सामान्य रुग्णालय हिंगोली येथिल जे पाच पदे रद्द करण्यात आली पण ज्या अधिकारी व कर्मचारी यांनी हे प्रकरण केले. त्यांच्यावर कोणती कार्यवाही केली त्यांची माहिती संपूर्ण झेरॉक्स प्रति मिळणे. पुढील काही कार्यवाही केली असल्यास त्या संदर्भातील सर्व कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रति मिळणे."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ३.४.२००७ रोजीच्या पत्रान्वये त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ४५/- त्यांच्या कार्यालयात जमा करण्याची त्यांना सूचना केली. तथापि सदर पत्र अपिलार्थीस तामिल न होता, ते विनातामिली जन माहिती अधिकारी यांना परत प्राप्त झाले. सदर पत्र ज्या पाकीटामध्ये पाठविले असल्याचा जन माहिती अधिकारी यांचा दावा आहे, त्या पाकीटावर पोस्टमनने "दिलेल्या पत्त्यावर राहत नाहीत......" असे अभिप्राय दिले आहेत. उपरोक्त प्रकरणी माहितीचा मूळ अर्ज श्री. प्रदिप सखाराम वानरे व श्री. संतोष यल्हाजी बांगर या दोन अर्जदारांनी केलेला आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या प्रथम अर्जावर श्री. वानरे यांची सही आहे व त्याखालील ओळीत श्री. बांगर यांची सही आहे. जन माहिती यांच्याकडून अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने या दोन्ही अपिलार्थींनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १७.४.२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे अथवा या संदर्भात अपिलार्थीस कोणताही पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने दोन अपिलार्थीपैकी श्री. संतोष यल्हाजी बांगर यांनी माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य

माहिती आयोगाकडे दि.२७.०६.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे. या अपील अर्जामध्ये "माहिती अप्राप्त" एवढेच त्यांचे अभिप्राय त्यांनी नमूद केले असून सोबत त्यांचा मूळ माहितीचा अर्ज जोडला आहे, यावरुन त्यांना त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अपेक्षित असल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यांचे दि. ३०.६.२००८ रोजीचे पत्र आयोगास प्राप्त झाले असून सदर पत्रावर त्यांची सही नाही. या पत्रामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, हिंगोली येथील सामान्य रुग्णालयात अपंग अनुशेष व प्रकल्पग्रस्त व स्वातंत्र्यसैनिकांची अनुशेष भरती ठेवण्यात आली होती. सदर भरती प्रकरणी जिल्हा शल्य चिकीत्सक, श्री. माशाळकर व संबंधित लिपीक हे दोषी आढळून आले होते. त्यांच्यावर काय कारवाई केली, याची माहिती त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागितली होती. परंतु त्यांना कोणतीही माहिती दिली नाही. त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १७.४.२००७ रोजी प्रथम अपील केले असून या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतली नाही. त्यामुळे त्यांना राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करणे भाग पडले. त्यांनी मागणी केलेल्या माहिती संदर्भात त्यांना उपसंचालक, आरोग्यसेवा यांच्याकडून दि. १९.६.२००८ रोजीचे पत्र प्राप्त झाले. त्या पत्रासोबत त्यांनी दि. ११.५.२००७ व १७.५.२००७ अन्वये त्यांच्याशी केलेल्या सदर पत्रांच्या झेरॉक्स प्रती त्यांना दिल्या आहेत. वास्तविक पाहता त्यांना ३० दिवसांपेक्षा विलंबाने माहिती मिळाली असताना जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचा अर्ज शुल्क न भरल्याच्या कारणास्तव निकाली काढला. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना पाठविलेल्या पत्रांवर त्यांचा पत्ता अपूर्णपणे नमूद केला असल्याने त्यांना आवश्यक ती माहिती मिळाली नाही, याचा अर्थ जन माहिती अधिकारी यांचा त्यांना माहितीपासून वंचित ठेवण्याचा इरादा होता, त्यामुळे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी संगनमताने त्यांच्यापासून माहिती लपवून ठेवली आहे. सबब जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी या दोघांनाही दोषी ठरवून अधिनियमातील कलम

२० नुसार रु.२५०००/- इतकी शास्ती लावण्यात यावी व त्यांना विनामूल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी. आज रोजी सुनावणीचे वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत व त्यामुळे त्यांनी आयोगाकडे पाठविलेल्या वरील पत्रातील मजकुर हाच त्याचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, ते या पदावर दि. २१.८.२००७ पासून कार्यरत आहेत. अपिलार्थीने अर्ज करते वेळी जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी या पदावर श्री. एन.एम.ठाकरे या नावाचे अधिकारी कार्यरत होते. अपिलार्थीने, त्यांना, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तीशः माहितीची मागणी केली होती. तथापि ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थी यांनी त्यांच्याकडे कधीही संपर्क साधला नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे दि. ३.४.२००७ रोजी तयार होती, तथापि अपिलार्थी त्यांच्याकडे न आल्याने त्यांनी अपिलार्थीस दि. ३.४.२००७ रोजीच्या पत्रान्वये माहितीपोटीचे रु. ४५/- इतके शुल्क भरण्याचे सूचित केले. अपिलार्थीने या रकमेचा भरणा त्यांच्या कार्यालयाकडे कधीही केला नाही. सदर पत्र अपिलार्थीस पाठविले असता, अपिलार्थी मूळ अर्जावर लिहिलेल्या पत्त्यावर उपलब्ध न झाल्याने सदर पाकीट त्यांना विनातामिली परत प्राप्त झाले. यानंतरही अपिलार्थीने त्यांच्याशी कधीही वैयक्तिक संपर्क साधला नाही. अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीचे शुल्क त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरले नसल्याने अपिलार्थीस माहिती पुरविण्यात आली नाही, असे स्पष्ट करणारे पत्र उपसंचालक, आरोग्य सेवा यांनी अपिलार्थीस दि. ७.५.२००७ रोजी पाठविले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने व्यक्तीशः माहितीची मागणी करुनही ते माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कधीही जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित झाले नाहीत. तसेच माहितीपोटीचे आवश्यक शुल्क त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरले नाही, ही वस्तुस्थिती स्पष्ट

करुन अपिलार्थीस माहिती न पुरविण्याची कारणे त्यांनी त्यांच्याकडील दि. ७.५.२००७ रोजीच्या पत्रान्वये कळविली आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, येथे माहितीचा मूळ अर्ज श्री. वानरे व श्री. बांगर या दोन अर्जदारांनी एकत्र केलेला आहे. तसेच या संदर्भातील प्रथम अपील देखील या दोघांनी एकत्रच केलेले आहे. मात्र आयोगाकडे दाखल करण्यात आलेले दिनांक २७.६.२००७ रोजीचे द्वितीय अपील हे श्री. बांगर यांनी एकटयाने करुन त्यांना अद्याप माहिती अप्राप्त आहे, असे त्यामध्ये म्हटले आहे. आयोगाकडे त्यांनी पाठविलेल्या दि. ३०.६.२००८ रोजीच्या पत्रावर श्री. बांगर यांची सही नाही. तरी देखील माहितीचा अधिकार अधिनियमाचा मूळ उद्देश सफल होण्याच्या दृष्टीने त्यांचे या अर्जातील म्हणणे विचारात घेण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक त्या माहितीसाठी रु.४५/- इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याची सूचना त्यांच्याकडील दि.३.४.२००७ रोजीच्या पत्राने दिली होती. तथापि सदरचे पत्र ज्या पाकीटाद्वारे अपिलार्थीस पाठविण्यात आले होते, त्या पाकीटावर अपिलार्थीचा पूर्ण पत्ता लिहिला नसल्याने अपिलार्थीस ते पत्र प्राप्त होऊ शकले नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या या पत्रावर अपिलार्थीच्या नावाखाली फक्त 'मंगळवारा' अशा शब्दाचा उल्लेख केला आहे, तर वास्तवात अपिलार्थीचा पत्ता 'मंगळवारा बाजार' असा आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अर्जावर त्यांनी त्यांचा संपूर्ण पत्ता लिहिला आहे, मात्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या दि. ३.४.२००७ रोजीच्या पत्राच्या पाकीटावर त्यांचा अचूक पत्ता लिहिलेला नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती पाहता ती अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. अधिनियमातील विहित तरतुदीमध्ये जरी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रतिसाद

दिला असला तरी अपिलार्थीस पाठविण्याच्या पाकीटावर पत्ता मात्र अपूर्ण लिहिलेला असल्याचे दिसून येते.असे जरी असले तरी येथे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहिती मागितल्याचा मुद्दा देखील तितकाच महत्त्वाचा आहे. कोणत्याही अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तीशः माहिती मागितल्यास ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी ही अर्जदाराची असते. व्यक्तीशः माहिती मागविण्याच्या प्रक्रियेमध्ये अर्जदाराने आपला प्रतिनिधी जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठवणे व त्याच्याद्वारे माहिती प्राप्त करुन घेणे अशाप्रकारची प्रक्रिया येथे अभिप्रेत नाही. मूळात जन माहिती अधिकारी यांनी जरी अपिलार्थीस त्यांचे दि. ३.४.२००७ रोजीचे पत्र पाठविले आले नसते तरीही ते चालू शकले असते. कारण माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी आवश्यक त्या शुल्कासंदर्भात येथे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना विचारणा करणे अथवा प्रत्यक्ष भेट घेऊन विचारणे असे येथे अभिप्रेत आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी आपल्या युक्तीवादामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थी हे फक्त प्रथम अर्ज सादर करण्याचे वेळी त्यांच्या कार्यालयात उपस्थित झाले, तथापि सदर अर्जासंदर्भातील पुढील घडामोडी ज्ञात करुन घेण्यासाठी ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कधीही गेले नाहीत अथवा दूरध्वनीद्वारे त्यांचेशी कधीही संपर्क साधला नाही. जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तीवादाचे खंडण करण्यासाठी आज अपिलार्थी उपस्थित नाहीत. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचा हा युक्तीवाद सत्य समजण्यात येत आहे.

या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी मुख्यत्त्वे जबाबदार असल्याने त्यांनी स्वतः होऊन या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याशी माहिती प्राप्त करुन घेण्यासंदर्भात संपर्क साधणे जरुरीचे होते. त्यांना तो तसा साधला नाही. त्यामुळे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती मागण्याचा कोणताही हक्क राहिलेला नाही. या संपूर्ण

घटनाक्रमाच्या प्रथम टप्प्यावर अपिलार्थीने जी कार्यवाही स्वतः होऊन करणे अपेक्षित होते, ती त्यांनी न केल्याने अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले द्वितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली संपूर्ण माहिती आज रोजी त्यांच्याकडे तयार असून त्यांनी ती आयोगास दाखविली. सदर माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे दिसून येते. सबब अपिलार्थीस ही माहिती अद्यापही आवश्यक असेल तर त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून ती सशुल्क प्राप्त करुन घेण्यात यावी, असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ०३.०७.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. संतोष येल्हाजी बांगर, मंगळवारा बाजार, हिंगोली, जि.हिंगोली.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, उपसंचालक, आरोग्य सेवा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, आरोग्य सेवा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२९२

निर्णय दिनांक : ०३.०७.२००८

१ श्री. शेषराव दिगंबरराव नळगीरकर : अपिलार्थी
रा. निबेडन, ता.उदगीर, जि. लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्याध्यापक,
शांतीनिकेतन विद्यालय, कोदळी,
ता.उदगीर, जि.लातूर
२ जन अपिलीय अधिकारी
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, लातूर.

१ श्री. शिंदे बी.डी. : त्रयस्थ पक्ष

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.०७.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. शेषराव दिगंबरराव नळगीरकर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. निळकंठ भाऊराव मोरतळे, जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, शांतीनिकेतन विद्यालय, कोदळी, ता.उदगीर जि. लातूर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. जयवंत ज्ञानू साळुंखे, जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, लातूर (यापुढे त्यांना

जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर त्रयस्थ पक्ष श्री. बी.डी.शिंदे (यापुढे त्यांना त्रयस्थ पक्ष असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.१५.१२.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे शैक्षणिक वर्ष १९८८-८९ ते १९९९-२००० या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" १) दिनांक १४.०३.१९९६ ची तडजोडची साक्षांकित प्रत.

२) जा.क्र.९६/रो.ह.यो./९७५,दि. २५.०९.९६. तहसील कार्यालय उदगीर यांनी मुख्याध्यापक शांतीनिकेतन विद्यालय कोदळी यांना दिलेल्या लेखी उत्तराची झेरॉक्स प्रत साक्षांकित करुन देणे.

३) श्री. नळगीरकर एस.डी. यांचे शै.वर्ष १९८८-८९, ८९-९०,९०-९१,९१-९२,९२-९३,९३-९४,९४-९५,९५-९६,९६-९७ पर्यंतचे नेमणुक आदेशाच्या साक्षांकित प्रती.

४) शै.वर्ष १९९६-९७ साली झालेल्या संस्था हस्तांतरण संदर्भातील लेखी बंधपत्र, कर्मचाऱ्यांच्या सेवेची हमी, कर्मचाऱ्यांच्या संस्था हस्तांतरणास असलेली संम्मती व इतर या संबंधातील कागदपत्रे यांच्या साक्षांकित झेरॉक्स प्रती याबाबतचे शि.अ.लातूर यांचे दि. २९.७.०६ चे पत्र पहा.

५) दिनांक १३.०३.१९९६ रोजीच्या विषय शैक्षणिक वर्ष १९९५-९६ ची वैयक्तिक मान्यता घेणेसाठी मुळ कागदपत्रं घेतला असलेबाबतचे सचिव/अध्यक्ष विना अनुदानित कृती समिती महाराष्ट्र राज्य व श्री. शिंदे बी.डी. यांना देण्यात आलेल्या मुळ प्रतीची झेरॉक्स साक्षांकित करुन देणे.

६) शै. वर्ष १९९९-२००० पर्यंत कोणतेही कारण नसताना माझी वेतनवाढ का रोखवण्यात आली-याबाबत कोणतीही नोटीस दिली नसतांना आपण कितीही काळासाठी वेतनवाढ रोखू शकता का? याच्या उत्तराची साक्षांकित प्रत देणे.

७) माझे शै.वर्ष १९९६-९७ ला हायकोर्टात व शाळा न्यायाधिकरणात प्रकरण चालू असताना संस्थेचे हस्तांतरण करता येते का ?

८) मुख्याध्यापक पदाची मान्यता घेण्यासाठी शै.वर्ष २०००-२००१ साली देण्यात आलेल्या प्रस्तावातील सर्व कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती साक्षांकित

करुन देणे. ( मा. शिक्षण अधिकारी (मा) लातूर यांचेकडे पाठविलेल्या)
"

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९.१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. अपिलार्थीने सदर अपील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प.लातूर यांना उद्देशून केले होते. तथापि त्या वेळी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) हे जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमले गेले नसल्याने त्यांनी अपिलार्थीस सदर अपील त्यांच्या शाळेच्या संस्थेचे अध्यक्ष/सचिव यांच्याकडे करण्याचे त्यांच्याकडील दि. १२.२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे कळविले आहे. व या पत्राची प्रत त्यांनी संस्कार शिक्षण संस्था, उदगीर यांचे अध्यक्ष/सचिव यांना पाठविली आहे. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी दिलेल्या या सूचनेप्रमाणे अपिलार्थीने कार्यवाही केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. मात्र यानंतर अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये थेट राज्य माहिती आयोगाकडे दि. ७.६.२००७ रोजी द्वितीय अपील सादर केले आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला नाही, असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे, तर अपिलार्थी यांचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठविल्याबाबत व सदर अर्ज

जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाल्याप्रित्यर्थ त्याची पोच असलेली पावती अपिलार्थीने आयोगास सादर केली, यावरुन अपिलार्थीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्याचे दिसून येते.

अपिलार्थीच्या विचाराधीन द्वितीय अपीलावर निर्णय घेण्यापूर्वी या टप्प्यावर त्यांच्या प्रथम अपिलासंदर्भात निर्णय होणे आयोगास गरजेचे वाटत असल्याने शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, लातूर तथा पदसिध्द जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या दिनांक १९.१.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत निर्णय घ्यावा. तत्पूर्वी अपिलार्थीस त्यांच्याकडे प्रथम अपील अर्ज सादर करण्यासाठी होणारा संभाव्य विलंब क्षमापित करण्यात यावा. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १९.१.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन त्यावर आपला यथायोग्य निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ०३.०७.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शेषराव दिगंबरराव नळगीरकर, ३०१, श्रीकृष्ण, क्रांतीनगर, निडेबन, ता.उदगीर, जि.लातूर

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, शांतीनिकेतन विद्यालय, कोदळी, ता.उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८२

निर्णय दिनांक ०४-०७-२००८

श्री. दिनेश रतन बच्छाव, : अपिलार्थी
व्दारा- सी-५२, न्यू विशालनगर, गारखेडा
परिसर, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा शिक्षण उपसंचालक, विभागीय
उपसंचालक कार्यालय, औरंगाबाद
विभाग, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षण उपसंचालक, विभागीय
उपसंचालक कार्यालय, औरंगाबाद
विभाग, औरंगाबाद

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : सहाय्यक शिक्षण संचालक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : विभागीय शिक्षण उपसंचालक, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०७-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. महंमद अब्दुल खालीक, जन माहिती अधिकारी तथा

सहाय्यक शिक्षण संचालक, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्रीमती सुमन देशमाने, जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. दिनेश रतन बच्छाव हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक ०९-०१-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००३-२००४ व २००४-२००५ या कालावधीत दिलेल्या वैयक्तीक मान्यतेविषयी व शैक्षणिक वर्ष एप्रिल २००३ ते मार्च २००४ व एप्रिल २००४ ते ३१ मार्च २००५ या कालावधीतील त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"१. मा. शिक्षणाधिकारी (प्राथ.) व मा. शिक्षणाधिकारी (माध्य.) जि. प. औरंगाबाद यांनी वरील कालावधीत किती शिक्षक – शिक्षकेत्तरांना वैयक्तीक मान्यता दिल्या.

२. या मान्यतापैकी किती मान्यतांची आपल्या कार्यालयाने तपासणी केली.

३. यात काही नियमबाह्य मान्यता आढल्या का ? असल्यास किती ? कोणत्या संस्थेच्या/शाळेच्या.

४. आपल्या कार्यालयाच्या तपासणी अधिका-यांच्या अभिप्रायासह, तपासणी अहवाल व सविस्तर माहिती आणि सत्यप्रती."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिश: अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर संबंधीत अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात व्यक्तिश: उपस्थित न झाल्याने ते अपिलार्थीस प्रतिसाद देऊ शकले नाहीत.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याचे समजून अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-०२-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. तथापि या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी न घेता अपिलार्थीच्या अपील अर्जावर त्यांनी दिनांक १४-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांचे अपील, त्यांना अपेक्षित माहिती दिल्याने निकाली काढले असल्याचे कळविले आहे.

तथापि अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेतल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-०५-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी, आयोगास त्यांचे व्दितीय अपील मान्य करण्याची, जन अपिलीय अधिकारी यांना अपिलार्थीच्या अपील अर्जावर निर्णय देण्याचे आदेशित करण्याची, जन अपिलीय अधिकारी यांना विहित मुदतीत त्यांच्या अपिलावर निर्णय न दिल्याने त्यांच्यावर शास्ती लावण्याची व व्दितीय अपील करण्याप्रकरणी त्यांना झालेल्या खर्चाच्या भरपाईची विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या एकूण ४ मुद्दयावरील माहितीपैकी मुद्दा क्रमांक १ शी संबंधीत माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नव्हती, मात्र उर्वरित ३ मुद्दयांशी संबधीत माहिती त्यांच्या कार्यालयाकडे

उपलब्ध आहे.  अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने त्यांनी अपिलार्थीची सदर माहिती त्यांना हस्तांतरीत करण्याकरिता वाट पाहिली.  अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते त्यांच्या कार्यालयाकडे कधीही उपस्थित न राहिल्याने अपिलार्थीस अपेक्षित माहिती त्यांच्याकडून प्राप्त होऊ शकली नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक १४-०२-२००६ रोजीच्या अपील अर्जावर त्यांनी त्यांच्याकडील दिनांक १४-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये आपला निर्णय कळविला असून अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना दिनांक १०-०२-२००६ रोजीच्या पत्रान्वये दिली असल्याने त्यांनी अपिलार्थीचे हे अपील निकाली काढल्याचे कळविले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेतल्याने त्यांना सुनावणी घेण्यासाठी आदेश देण्यात यावेत, त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर विहित कालावधीमध्ये निर्णय न घेतल्यामुळे त्यांच्यावर शास्तीची कारवाई करण्याची व या प्रकरणी त्यांना नुकसानभरपाई मान्य करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीचा अपील अर्ज दिनांक १४-०२-२००६ रोजी प्राप्त झाला होता.  या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १४-०३-२००६ रोजी, अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १०-०२-२००६ रोजीच्या पत्रान्वये माहिती दिली असल्याने, अपिलार्थीचे अपील निकाली काढल्याचे अपिलार्थीस कळविले आहे.  अपिलार्थीस हे पत्र

त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अर्जावर दिलेल्या पत्यावर पाठविले होते. सदर पत्ता अपिलार्थीचा नसून अपिलार्थी ज्या पत्यावरुन पत्रव्यवहार करतात त्या स्थानाचा असल्याचे दिसून येईल. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांचा दिनांक १४-०३-२००६ रोजीचा निर्णय पाठविल्याचे त्यांच्याकडील जावक नोंदवहीवरुन आयोगास सिध्द करुन दिले आहे. यावरुन जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपिलावर निर्णय घेऊन तो अपिलार्थीस पोस्टाने पाठविल्याचे सिध्द होत आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (६) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांना अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर ३० ते ४५ दिवसात निर्णय घेणे अभिप्रेत आहे. याचबरोबर या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये दिलेला आहे, त्यामुळे अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपील अर्जातील परिच्छेद ''एच'' मध्ये उपस्थित केलेला मुद्दा आयोग फेटाळून लावत आहे तर जन अपिलीय अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची कोणतीही तरतूद माहिती अधिकार अधिनियमामध्ये नसल्यामुळे अपिलार्थीचा मुद्दा क्रमांक ''आय'' हा देखील फेटाळून लावण्यात येत आहे. अपिलार्थीच्या मुद्दा क्रमांक ''डी'' व्दारे व्दितीय अपील दाखल करणे प्रकरणी त्यांना झालेल्या नुकसानीची भरपाई करुन देण्याची आयोगास विनंती केली आहे. तथापि त्याचा तपशील या अर्जामध्ये नसल्याने व अपिलार्थीस या घटनेच्या कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्याचे आयोगास आढळून न आल्याने व्दितीय अपील अर्जातील मुद्दा क्रमांक ''डी'' हा फेटाळून लावण्यात येत आहे.

अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या पत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील पत्ता व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या अपील अर्जातील पत्ता यामध्ये फरक आहे, तसेच अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित न राहिल्याने, त्यांना माहिती न मिळण्यास तेच

जबाबदार आहेत असे आयोगाचे मत आहे. कारण माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार ''व्यक्तिश:'' माहिती मागणे याचा अर्थ, अपिलार्थीने स्वत: होऊन जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात जाऊन माहिती उपलब्ध करुन घेणे असा होतो. या प्रकरणी अशा प्रकारे अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहिल्याचा कोणताही पुरावा त्यांनी आयोगासमोर सादर केला नाही.

वरीलप्रमाणे अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जातील मुद्दा क्रमांक ''एच'', ''आय'', व ''डी'' हे वरील परिच्छेदात स्पष्ट केल्याप्रमाणे फेटाळले असल्यामुळे व वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त होण्यासाठी अपिलार्थी हेच जबाबदार असल्याचे सिध्द होत असल्याने अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळून खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद<br>दिनांक ०४-०७-२००८

( वि. बा. बोरगे )<br>राज्य माहिती आयुक्त,<br>खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दिनेश रतन बच्छाव, व्दारा- सी-५२, न्यू विशालनगर, गारखेडा परिसर, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक शिक्षण संचालक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२४७

निर्णय दिनांक ०४-०७-२००८

श्री. सुधीर प्रभाकरराव चौधरी, : अपिलार्थी
६९, स्नेहवर्धिनी कॉलनी,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
औरंगाबाद

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : प्रशासकीय अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : प्राध्यापक व विभाग प्रमुख, न्यायवैद्यक-शास्त्र विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०७-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. सुधीर प्रभाकरराव चौधरी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. महमद अब्दुल जावेदखान, जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. रामकृष्ण गोविंदराव भुसाळे, जन अपिलीय अधिकारी तथा प्राध्यापक व विभाग प्रमुख, न्यायवैद्यकशास्त्र विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर त्रयस्थ पक्ष श्री. ए. के. मलिक हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०२-०६-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. ए. के. प्राध्यापक व शल्यचिकित्साशास्त्र विभाग प्रमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद यांच्याविषयी सन १९९० ते २००७ या कालावधीतील एकूण ७ मुद्दयांवरील खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

“ १. डॉ. मलिक ए. के., प्राध्यापक व प्रमुख, शल्यचिकित्साशास्त्र विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद हे तृतीय वर्ष एमबीबीएस विद्यार्थ्यांसाठी शल्यचिकित्साशास्त्र विषयाच्या अध्यापनाचे त्यांचे कर्तव्ये व जबाबदा-यात नमुद केलेले कामकाज नियमितपणे पार पाडतात काय ?

२. डॉ. ए. के. मलिक यांची सन १-४-२००३ ते ३१-३-२००७ पर्यंतच्या कालावधीतील शल्यचिकित्साशास्त्र विषयातील प्रकाशित झालेल्या संशोधनात्मक कामाची यादी योग्य त्या पुराव्यासह द्यावी.

३. डॉ. ए. के. मलिक यांनी तृतीय वर्ष एमबीबीएस विद्यार्थ्यांसाठी शल्यचिकित्साशास्त्र विषयातील किती थेअरी लेक्चर्स (टॉपिक व तारखेसह नमुद करावी) घेतली. (कालावधी सन २००३ ते २००७)

४. डॉ. मलिक यांनी तृतीय वर्ष एमबीबीएस विद्यार्थ्यांना दिलेल्या थेअरी लेक्चरसाठी उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांच्या हजेरीपटाची डॉ. मलिक यांचे स्वाक्षरी असलेले टॉपिकचे नाव नमुद केलेले हजेरीपटाच्या छायांकित साक्षांकित प्रती खात्री करुन देण्यात यावी. (कालावधी सन २००३ ते २००७)

५. डॉ. ए. के. मलिक यांनी प्रत्यक्ष स्वत: २००३ ते २००७ या कालावधीत किती रुग्णांवर शस्त्रक्रिया केल्या आहेत. अशा रुग्णांची नावाची यादी द्यावी, तसेच त्यांनी रुग्णाच्या रुग्णपत्रिकेवर त्यांच्या स्वहस्तक्षरात टाकलेल्या नोटस् द्याव्यात (कालावधी सन २००३ ते २००७)

६. शल्यचिकित्साशास्त्र विभागातील अध्यापकांच्या स्वाक्षरीसाठी ठेवण्यात आलेले हजेरीपत्रकाची साक्षांकीत छायाप्रती उपलब्ध करुन द्याव्यात (कालावधी सन २००० ते २००७)

७. माहे १-९-२००६ ते आजतागायत अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद यांचे राजप-आस्थपना विभाग/स्वीय सहाय्यक यांचेकडून दि. ०१-४-०७ नंतर माझे विषयी संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई व प्राध्यापक व विभाग प्रमुख, शरीरक्रियाशास्त्र विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद यांच्याशी केलेल्या व त्यांचेकडून परत अधिष्ठाता कार्यालयास प्राप्त झालेल्या पत्र व्यवहाराच्या त्या सोबत जोडलेल्या सहपत्रासह छायांकित साक्षांकित प्रती देणे. ”

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिश: अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही, मात्र त्यांनी त्यांच्याकडील दिनांक १२-०६-२००७, ०५-०७-२००७ व १८-०७-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीने मागणी केलेली माहिती पुरविण्याबाबत संबंधीत त्रयस्थ पक्षास त्यांनी माहिती देण्याबाबत कळविण्यात आल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी, त्यांच्याकडे वेळोवेळी बैठका आयोजित केल्या होत्या, त्याचे इतिवृत्त दिनांक ०४-०८-२००७ व २२-०८-२००७ रोजी पारित केले आहे व अपिलार्थीच्या अपील अर्जसंदर्भातील निर्णय त्यांच्या कडील दिनांक ३१-०८-२००७ रोजीच्या पत्रान्वये पारित केला. या निर्णयामध्ये अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणताही निश्चित असा निर्णय न घेता अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील प्रत्येक मुद्यांचा परामर्श घेऊन अपिलार्थीस मोघम स्वरुपात उत्तर दिले आहे. यामध्ये मुद्दा क्रमांक ७ वगळता उर्वरित सर्व मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस प्राप्त कशी होऊ शकत नाही अशा प्रकारचे विवेचन त्यांनी या पत्रामध्ये केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०८-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नसल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी ज्या त्रयस्थ पक्षाविषयी माहिती विचारली आहे, श्री. ए. के. मलिक यांनी गेल्या दहा वर्षात एकाही रुग्णावर शस्त्रक्रिया केली नाही. एम. बी. बी. एस. च्या तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांना व्याख्याने दिली नाहीत तसेच तृतीय वर्ष एम. बी. बी. एस. च्या विद्यार्थ्यांना शल्यचिकित्साशास्त्राची कोणतीही माहिती दिली नाही. सदर त्रयस्थ पक्ष यांना शासनामार्फत वेतन अदा करण्यात येत असून या वेतनाचा आवश्यक तो मोबदला ते शासनास देत नसल्याच्या कारणाने, शासनाचा त्यांच्या पगारावर होणारा खर्च निरर्थक असल्याचे त्यांना वाटल्याने, त्यांच्या विषयीची ही माहिती जनतेसमोर आणून त्यांना व्यापक जनहित साध्य करावयाचे आहे, व त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे असे त्यांनी या युक्तिवादामध्ये स्पष्ट केले.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या त्रयस्थ पक्षाशी संबधीत होती त्या त्रयस्थ पक्षाकडे त्यांनी त्यांच्याकडील दिनांक १२-०६-२००७, ०५-०७-२००७ व १८-०७-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस माहिती देण्यासाठी माहिती मागविली होती, कारण अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही विभाग प्रमुखाशी संबंधीत असून ही माहिती त्रयस्थ विभाग प्रमुख असल्याने त्यांच्याकडेच ठेवण्यात येत होती, तथापि त्यांनी सदर माहिती अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत न दिल्याने ते अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विहित मुदतीत पुरवू शकले नाहीत. त्यांनी अपिलार्थीच्या मुद्दा क्रमांक ६ व ७ ची संदर्भीय माहिती अपिलार्थीस दिनांक ३०-०८-२००७ रोजी देऊ केली होती, तथापि अपिलार्थीने ती माहिती स्वीकृत केली नाही. श्री. मलीक यांच्याकडून अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांनी हरत-हेने प्रयत्न करुनही श्री. मलीक यांनी त्यांना माहिती पुरविली नाही व अपिलार्थीच्या मूळ अर्जातील फक्त मुद्दा क्रमांक ६ ची माहिती त्यांनी अपिलार्थीस पुरविली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक १३-०७-२००७ रोजीच्या अर्जावर त्यांना दिनांक ३१-०८-२००७ रोजी आपले आदेश पारित केले आहेत. त्यांनी देखील श्री. मलिक यांच्याकडून माहिती घेण्यासाठी पुरपूर प्रयत्न केले, तथापि त्यांनी आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांना पुरविली नाही. संबंधीत त्रयस्थ पक्षाला माहिती देण्यासाठी त्यांनी दिनांक २१-७-२००७, २५-७-२००७ रोजी पत्र पाठवून देखील त्रयस्थ पक्षाने त्यांना आवश्यक ती माहिती विहित मुदतीत पुरविली नसल्याने ते देखील अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतीही कार्यवाही करु शकले नाहीत.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी श्री. मलिक हे विभाग प्रमुख असल्याने व अपिलार्थीने मागणी केलेली सर्व माहिती त्यांच्या ताब्यात असल्याने व ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी त्यांनी वेगवेगळ्या कारणाव्दारे नाकार त्यांच्या दिनांक २१-०७-२००७ च्या पत्रान्वये व्यक्त केल्याने त्यांना ती अंतिमतः अपिलार्थीस पुरविता आली नाही, असे त्यांनी आपल्या युक्तिवादात स्पष्ट केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक ०२-०६-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ७ मुद्दयांवर त्रयस्थ पक्ष श्री. मलिक ए. के., प्राध्यापक व विभाग प्रमुख यांच्या संदर्भात माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जातील मुद्दा क्रमांक १ मध्ये त्यांनी त्यांचे अध्यापनाची कर्तव्ये व जबाबदा-या, नमूद केलेले कामकाज नियमीतपणे पार पाडतात काय अशी माहिती विचारली होती. या मुद्दाव्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कडून त्यांचे स्पष्टीकरण विचारल्याचे दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये "माहिती" या शब्दाची व्याख्या खालीलप्रमाणे स्पष्ट करण्यात आली आहे.

<u>कलम २ (च)</u>

" "माहिती" याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख्र, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दिपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो. "

वरील व्याख्येचे अवलोकन करता, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कोणतीही माहिती मागताना अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांचे वैयक्तीक अभिप्राय अथवा स्पष्टीकरण देय होत नाही. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांची भूमिका ही एका विश्वस्ताची असून त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती मागणीनुसार संबंधितांना पुरविणे हे त्यांचे कर्तव्य आहे. त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीवर त्यांनी अभिप्राय व्यक्त करणे किंवा त्यांच्या कोणत्याही निर्णयाबद्दल त्यांनी अपिलार्थीस कारणे देणे, खुलासा करणे हे अधिनियमामध्ये अभिप्रेत नाही, त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधीत माहिती देय होत नाही. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक २ मध्ये त्यांनी श्री. मलिक यांनी दिनांक ०१-०४-२००३ ते ३१-०३-२००७ या कालावधीत शल्यचिकित्साशास्त्र विभागातील प्रकाशित झालेल्या त्यांच्या संशोधानात्मक कामाची यादी योग्य त्या पुराव्यासह जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे, ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी श्री. मलिक यांना मागितली असता, त्यांनी ती दिनांक २१-०७-२००७ रोजी पत्रान्वये ही वैयक्तीक स्वरुपाची असल्याने ते ही माहिती देऊ शकत नाहीत असे उत्तर दिले आहे. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीच्या अर्जातील सर्व मुद्दयांचा परामर्श घेतला असून सर्व मुद्दयावर माहिती देण्यास टाळाटाळ केल्याचे दिसून येत आहे. श्री. मलिक यांनी शल्यचिकित्साशास्त्र विभागासाठी संशोधन केलेल्या कार्यासाठी शासनाच्या मालकीच्या सर्व

पायाभूत सोयीचा वापर करुन त्यांचे संशोधानात्मक काम केले आहे. या कामाकरिता त्यांनी वैद्यकीय महाविद्यालयाच्या स्टेशनरीचा, उपकरणाचा, ईमारतीचा व तदअनुषंगिक सामुग्रीचा वापर केला आहे. एवढेच नव्हे तर त्यांनी ज्या रुग्णांवर हे संशोधन केले आहे त्या रुग्णाच्या उपचारास देखील शासनाने नेमलेले डॉक्टर जबाबदार असल्यामुळे श्री. मलिक यांनी केलेले संशोधनात्मक काम ही त्यांची वैयक्तीक व खाजगी अशी बाब होऊ शकत नाही. श्री. मलिक यांनी त्यांच्या संशोधनाच्या कामामध्ये वापर केलेल्या शासनाच्या साधनसामुग्रीचा विचार करता अपिलार्थीच्या मुद्दा क्रमांक २ शी संबंधीत माहिती ही खाजगी बाब ठरत नसून त्या माहितीस सार्वजनिक माहितीचे स्वरुप प्राप्त झाले आहे, त्यामुळे त्रयस्थ पक्षाने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस मुद्दा क्रमांक २ शी संबंधीत माहिती पुरविणे भाग होते. तथापि त्रयस्थ पक्षानेच जन माहिती अधिकारी यांना माहिती देण्याचे नाकारल्याने ते अंतिमत: अपिलार्थीस ही माहिती त्यांना देय असूनही पुरवू शकले नाहीत. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ३ मध्ये त्यांनी श्री. मलिक यांनी शल्यचिकित्साशास्त्रामध्ये किती थेअरी लेक्चर्स घेतले अशी माहिती विचारलेली आहे. या मुद्दयावर श्री. मलिक यांनी जन माहिती अधिकारी यांना तृतीय वर्ष एम. बी. बी. एस. च्या विद्यार्थ्यांचे अवश्यक तेवढे व गरजेनुसार लेक्चर्स घेतले अशा स्वरुपाचे मोघम माहिती आपल्या पत्रामध्ये दिले आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या या मुद्दयावरील माहिती पाहता, यामध्ये अपिलार्थीस श्री. मलिक यांनी घेतलेल्या लेक्चर्सची एकूण संख्या अपेक्षित आहे, तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडे मात्र श्री. मलीक यांनी मोघम स्वरुपात माहिती उपलब्ध करुन दिल्याचे आढळून येत आहे. आज रोजी सुनावणीमध्ये आयोगास असे ज्ञात करुन देण्यात आले की, प्रत्येक वर्षामध्ये प्रत्येक प्राध्यापकाने घेतलेल्या थेअरी लेक्चर्सचे विषय व तारीख यासह एका रजिस्टरमध्ये नोंद केलेली असते व हे रजिस्टर संबंधीत विभाग प्रमुखाकडे ठेवले जाते त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीच्या या मुद्दयावरील माहिती शल्यचिकित्साशास्त्र विभाग प्रमुख म्हणजेच या प्रकरणी त्रयस्थ पक्ष यांच्याकडे उपलब्ध असणे हे उघड आहे. अपिलार्थीने ज्या मुद्दयावरील माहितीची

मागणी केली, सदर माहिती सार्वजनिक स्वरुपाची असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना ती पुरवावी लागेल, हाच युक्तिवाद अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ४ लाही लागू होतो. या मुद्दयासंदर्भात श्री. मलिक यांनी जन माहिती अधिकारी यांना सद्य:स्थितीत रेकॉर्ड उपलब्ध नाही अशी माहिती दिली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी पाहता सदर रेकॉर्ड महाविद्यालयाकडे उपलब्ध असणे अनिवार्य आहे, जर हे रेकॉर्ड संबंधीत विभागाकडून गहाळ झाले असेल तर ते रेकॉर्ड शोधण्याकरिता व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी संबंधीत विभागाने काय प्रयत्न केले, सदर रजिस्टर गहाळ झाल्यासंदर्भात त्यांनी पोलीसात फिर्याद दिली किंवा कसे याबाबतची कोणतीही कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांच्याकडून आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली नाहीत. सर्वसाधारणपणे कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणामध्ये एखादी नस्ती / अभिलेखे गहाळ झाल्यास त्यासंबंधी एक परिपत्रक काढून गहाळ झालेल्या नस्ती / अभिलेखे यांचा शोध घेण्याकरिता म्हणून जी कार्यवाही संबंधित विभाग प्रमुखाने करणे अपेक्षित आहे अशी कार्यवाही संबंधीत विभाग प्रमुखाकडून केली गेली नसल्याचे दिसून येते. त्यामुळे उपरोक्त प्रकरणी श्री. मलिक यांनी सद्य:स्थितीत रेकॉर्ड उपलब्ध नाही ही जन माहिती अधिकारी यांना अशा स्वरुपात दिलेली माहिती बेजबाबदारपणाची व माहिती देण्याचे टाळण्याच्या उद्देशाने दिल्याचे प्रतीत होत असल्याने, ती आयोग अमान्य करत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या या मुद्दयावरील माहितीसंदर्भात गहाळ झालेल्या रेकॉर्डचा त्यांनी कसोशीने शोध घेऊन आवश्यकता वाटल्यास यासंदर्भात पोलीस यंत्रणेची मदत घ्यावी. अपिलार्थीने मुद्दा क्रमांक ५ च्या संदर्भात श्री. मलिक यांनी किती रुग्णांवर शस्त्रक्रिया केल्या आहेत अशा रुग्णांच्या नावांची यादी व त्यांनी रुग्णांच्या रुग्णपत्रिकेवर स्वहस्ताक्षरात टाकलेल्या नोटस्‌ची माहिती मागविली आहे. या मुद्दयासंदर्भात आयोगास जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असे अवगत करुन देण्यात आले की, प्रत्येक शासकीय रुग्णालयामध्ये होणा-या प्रत्येक शस्त्रक्रियेची नोंद एका विशिष्ट रजिस्टरमध्ये ठेवली जाते व

या नोंदीमध्ये रुग्ण व शस्त्रक्रिया करणा-या डॉक्टरचे नाव त्यांच्या स्वाक्षरीसह उपलब्ध असते तथापि याबाबतही श्री. मलिक यांनी जन माहिती अधिकारी यांना, त्यांच्याकडील दिनांक २१-०७-२००७ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता, अपिलार्थीने मागितलेली माहिती मोघम व व्यापक स्वरुपाची असल्यामुळे देणे आवश्यक नाही असे म्हटले आहे. श्री. मलिक यांच्या या विधानाशी अशा प्रकारचे अभिलेख्रे ठेवण्याचे वरील प्रमाणे प्रचलीत संकेत पाहता, आयोग सहमत नाही. अपिलार्थीने या मुद्दयावर मागणी केलेली माहिती व्यापक स्वरुपाची नव्हती त्यामुळे त्यांनी या मुद्दयामध्ये श्री. मलिक यांच्याचबाबत फक्त माहिती मागितली असल्यामुळे तर ही माहिती अपिलार्थीस देणे त्रयस्थ पक्षास फारसे अवघड अथवा क्लिष्ट स्वरुपाचे काम होते असे आयोग मानत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आता ही माहिती उपलब्ध करुन देणे भाग आहे. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ६ व ७ शी संबंधीत माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ३०-०८-२००७ रोजी देऊ केली होती तथापि ती त्यांनी स्वीकृत केली नाही असे त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केले आहे. अपिलार्थीने व्यक्तिश: माहितीची मागणी करताना त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून जसजशी माहिती प्राप्त होईल तसतशी त्यांनी ती स्विकृत करणे हे त्यांचे कर्तव्य ठरते. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून देऊ केलेली माहिती नाकारली आहे, याबद्दल त्यांना आयोगातर्फे समज देण्यात येत असून, ती माहिती अपूर्ण असल्याच्या कारणावरुन नाकारली असल्याचे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे. व्यक्तिश: माहितीची मागणी केल्यानंतर प्राप्त झालेली माहिती न स्वीकारता ती अपूर्ण आहे असे अनुमान काढून ती नाकारणे हे बरोबर नाही.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे वरील परिच्छेदामध्ये केलेले पृथ:क्करण व अपिलार्थीच्या प्रत्येक मुद्यास श्री. मलिक यांनी जन माहिती अधिकारी यांच्याव्दारे दिलेला प्रतिसाद पाहता अपिलार्थीस संबंधितांनी माहिती देण्याचे सर्वसाधारणपणे टाळले आहे असे या ठिकाणी स्पष्ट होते. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ वगळता उर्वरीत सर्व

माहिती वर विवेचन केल्याप्रमाणे त्यांना देय ठरत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती (मुद्दा क्रमांक १ वगळता) त्यांना ४५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात श्री. मलिक यांनी केलेल्या पूर्ण असहकार्याची आयोगाने सखेद नोंद घेतली असून उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस विहित मुदतीत का मिळू शकली नाही व ती उपलब्ध न होण्याची कारणे काय आहेत याबाबत सचिव (वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये) यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी सखोल चौकशी करुन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपासून वंचित ठेवणा-या अधिका-यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

या प्रकरणाचे वैशिष्ट्य असे आहे की, अपिलार्थीने ज्या त्रयस्थ पक्षाविषयी माहिती मागवली आहे सदर त्रयस्थ पक्ष (श्री. मलीक) हे या सार्वजनिक प्राधिकरणाचे सर्वोच्च अधिकारी आहेत. अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्याच ताब्यात आहे अथवा नाही हे कळण्यास मार्ग नाही अशा प्रकारची इतर विभाग प्रमुखांची माहिती त्यांच्याकडे उपलब्ध असतांना केवळ श्री. मलीक यांचेशी संबंधीत माहिती आता उपलब्ध नाही असे जर त्यांचे म्हणणे असेल तर एकूण दोन पर्याय उरतात त्यातील एक म्हणजे ही माहिती जाणीवपूर्वक संबंधितांकडून नष्ट केली असेल किंवा मूळात ही माहिती त्रयस्थ पक्षाने ठेवलीच नसेल, अशा प्रकारची माहिती ठेवण्यास त्यांनी स्वत:ला, ते या प्राधिकरणाचे सर्वोच्च अधिकारी म्हणून कदाचित अपवाद ठरविले असण्याची शक्यता नाकारता येत नाही. अर्थात कोणत्याही पर्यायाचा विचार केला तरी या प्रकरणी अपिलार्थीस जी माहिती अधिनियमातील तरतुदीनुसार देय आहे, जी सार्वजनिक स्वरुपाची आहे, ती प्राप्त होण्यापासून संबंधितांनी जाणीवपूर्वक वंचित ठेवले आहे. हे मात्र या प्रकरणी नि:संशयपणे सिध्द होत आहे. केवळ अशा

प्रकारच्या वैशिष्टपूर्ण परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर या प्रकरणी सचिव स्तरावरुन आयोग कार्यवाही व सखोल चौकशी करण्याचे सूचित करत आहे. आजच्या सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सदर त्रयस्थ पक्ष त्यांच्यापेक्षा वरीष्ठ स्तरीय अधिकारी असल्याने त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात या टप्प्यावरही साशंकता व्यक्त केली असल्याने संबंधित त्रयस्थ पक्षाकडून जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती आदेशित मुदतीत मिळेल याची दक्षता सचिव (वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये) यांनी घ्यावी असे त्यांना सुचविण्यात येत आहे. वास्तविक पाहता सार्वजनिक प्राधिकरणाचे सर्वोच्च अधिकारी म्हणून त्यांनी माहिती अधिकारी अधिनियमाच्या अंमलबजावणीस आपल्या प्रशासकीय व्यवस्थेमध्ये सर्वोच्च प्राधान्य देणे अपेक्षित असताना त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे टाळून त्यांच्या दिनांक २१-०७-२००७ च्या पत्रामध्ये अनपेक्षित व बेजबाबदार विधाने केली आहेत हे पाहता व अशा प्रकारच्या प्रवृत्तींचा वेळीच बिमोड करण्याच्या दृष्टीने सचिव (वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये) यांनी वेळीच पावले उचलून सर्व संबंधितांना असे प्रकार टाळण्याच्या दृष्टीने योग्य त्या सूचना एखाद्या परिपत्रकाव्दारे पारित केल्यास जनसामान्यांना अपेक्षित माहिती मिळणे सुलभ होऊन माहिती अधिकार अधिनियमातील मूळ उदीष्टे साध्य होण्यास मदत होईल याची आयोगास खात्री आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ४५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३.	सचिव (वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये) यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी सखोल चौकशी करुन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपासून वंचित ठेवणा-या अधिका-यांवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक	०४-०७-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१	श्री. सुधीर प्रभाकरराव चौधरी, ६९, स्नेहवर्धिनी कॉलनी, औरंगाबाद.

२	जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन अपिलीय अधिकारी तथा प्राध्यापक व विभाग प्रमुख, न्यायवैद्यकशास्त्र विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रा-तील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	सचिव (वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२९३

निर्णय दिनांक ०४-०७-२००८

श्री. दत्तु ईराप्पा दिंडे, : अपिलार्थी
सदस्य - भ्रष्टाचार निर्मुलन समिती,
पैठण तालुका, रा. आडूळ, तालुका
पैठण, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग,
पैठण, तालुका पैठण,
जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक
बांधकाम मंडळ, औरंगाबाद

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०७-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. दत्तु ईराप्पा दिंडे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. किसन मनोहर आडसूळ, उपविभागीय अभियंता,

सार्वजनिक बांधकाम उपविभाग, पैठण, जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), श्री. बलभीम रामभाऊ देवने, सहाय्यक अधीक्षक अभियंता, जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. एस. के. ताजी, तत्कालीन उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम मार्ग प्रकल्प इमारती उपविभाग जालना हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक ०७-०४-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २०००६-२००७ या कालावधीशी संबधीत, त्यांच्या कार्यक्षेत्रातील कामासंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> “ आपल्या विभागा अंतर्गत सन २००६ ते २००७ या वित्तीय वर्षात पैठण तालुक्यासाठी आपल्या कार्यालयात किती निधी उपलब्ध झाला व त्यानुसार आपल्या कार्यालयाने किती कामे केली व त्याची यादी. पुर्ण झालेली कामे व अपुर्ण राहीलेली कामे यांची वेगवेगळी यादी देण्यात यावी. तसेच त्यावर खर्च केलेला निधी देण्यात यावा. व उर्वरित राहिलेला निधी का बाकी राहीला याची कारणे देण्यात यावी. तसेच सदर काम करणा-या कंत्राटदारांची यादी देण्यात येवुन त्यांना वाटप करण्यात आलेली रक्कम यादी व शेड्युल बी च्या प्रती देण्यात याव्या. ”

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदीमध्ये कोणत्याही प्रकारे प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०५-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०४-०६-२००७ रोजी सुनावणी घेऊन, यासंदर्भातील आपले आदेश दिनांक १२-०६-२००७ रोजी पारीत केले. सदर आदेशामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांना, अपिलार्थीस ८ दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचित केले होते.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या आदेशानंतर, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्याकडील दिनांक १७-०७-२००७ रोजीच्या पत्रान्वये, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, त्यांच्या कार्यालयाकडे तयार असून ती व्यक्तिशः घेऊन जाण्याचे अपिलार्थीस सूचित केले. त्यानुसार अपिलार्थीने दिनांक ३०-०७-२००७ रोजी सदर माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून हस्तगत करुन घेतली, तथापि मध्यंतरीच्या काळात जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने, त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०७-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी, जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊनही व त्यांनी दिनांक २१-०६-२००७ रोजी स्मरणपत्र देऊनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती दिली नसल्याचे नमूद केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी, अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक ३०-०७-२००७ रोजी मिळालेली माहिती अपूर्ण असून, त्यांना प्राप्त झालेल्या माहितीमध्ये कंत्राटदाराचे नाव, कामाचे नांव एवढ्याच माहितीचा समावेश आहे. त्यांना अद्याप, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास किती निधी उपलब्ध झाला, पूर्ण व अपूर्ण कामाच्या वेगवेगळ्या याद्या, कामनिहाय झालेला खर्च, शेड्युल ‘‘बी’’ च्या प्रती जन माहिती

अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाल्या नाहीत, तसेच उर्वरित राहिलेला निधी का बाकी राहिला याची कारणे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिली नाहीत, सदर माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी काही माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध होती तर उर्वरित माहिती त्यांना, त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील उपविभागा-कडून प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस दयावयाची होती. आता अपिलार्थीस उर्वरित माहिती एक महिन्याच्या आत देण्यात येईल.

उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, पैठण यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थी हे एका मजूर सहकारी सोसायटीचे सदस्य असून, (यावर अपिलार्थीने सोसायटीचे सदस्य नसल्याचे आयोगास सांगितले.) अपिलार्थीने त्यांच्याकडे कामाची मागणी केली असता, त्यांनी अपिलार्थीस काम देण्याचे नाकारले त्यामुळे अपिलार्थीने माहितीची मागणी केली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या अपील अर्जावर त्यांनी दिनांक ०४-०६-२००७ रोजी सुनावणी घेऊन, यासंदर्भातील आदेश दिनांक १२-०६-२००७ रोजी पारीत करुन, त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ८ दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचित केले होते.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता व प्रथमतः अपिलार्थीच्या मूळ माहितीच्या अर्जाचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व तिची व्याप्ती मोठ्या प्रमाणात आहे. तसेच अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये कोणत्याही विशिष्ट कामाशी संबंधीत माहिती मागितली नसून, त्यांनी सर्वसाधारण स्वरुपाची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितल्याचे दिसून येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०७-०४-२००७ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जास उद्देशून त्यांनी जो दिनांक १७-०७-२००७ रोजी प्रथम प्रतिसाद दिला आहे, तो अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिल्यानंतर दिला आहे. अपिलार्थीस प्राप्त झालेल्या माहितीचे अवलोकन करता, आयोगास असे आढळून आले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ३०-०६-२००७ रोजी व्यक्तिशः हस्तांतरीत केलेल्या माहितीमध्ये, फक्त कंत्राटदारांची व कामांची नावे आणि इतर अनुषंगिक तपशील दिला आहे. या माहितीमध्ये पैठण उपविभागास किती निधी उपलब्ध झाला, पूर्ण व अपूर्ण कामांची यादी, व शेड्युल "बी" च्या प्रतीची माहिती अपिलार्थीस देण्यात आली नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये, उर्वरित राहिलेला निधी का बाकी राहिला याची कारणे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मधील माहिती या शब्दाची व्याख्या पाहता, या मुद्दयावरील माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे अभिप्रेत नाही. "माहिती" या शब्दाची व्याख्या लक्षात घेतल्यास असे दिसून येईल की, या अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती अधिकारी यांची भूमिका ही एका विश्वस्ताची असून, त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीचे जतन करुन ठेवणे व माहिती अधिकार अधिनियमाव्दारे त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या अर्जांसंदर्भात संबंधितांना, या माहितीतील आवश्यक ती माहिती पुरविणे हे त्यांचे कर्तव्य आहे. माहिती उपलब्ध करुन देणे या प्रक्रियेमध्ये, अर्जदाराने कारणे अथवा खुलासे जन माहिती अधिकारी यांना विचारणे व त्यांनी या माहितीतील निर्णयाबाबत, आदेशाबाबत त्याचे अर्जदारास स्पष्टीकरण देणे हे मुळात "माहिती" देणे या प्रक्रियेमध्ये अभिप्रेत नाही. त्यामुळे या मुद्दयांवरील माहिती अपिलार्थीस देय होत नाही, मात्र उर्वरित मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस देय आहे.

आज सुनावणीस उपस्थित जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीस ही माहिती ३० दिवसाच्या आत देण्याचे मान्य केले आहे. अधिनियमा-व्दारे विहित केलेला कालावधी आता व्यपगत झाला असल्याने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (६) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य द्यावी लागेल.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी, जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील संबंधीत उपविभागाच्या उप अभियंत्याचे सहाय्य घेणे भाग होते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार कोणत्याही अर्जदारास माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे जे संबंधीत सहाय्यक / कर्मचारी जबाबदार आहेत, त्यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे. हे पाहता, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांना आवश्यक असलेल्या माहितीपासून दीर्घकाळ वंचित ठेवण्यासाठी संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबधीत सहाय्यक / कर्मचारी जबाबदार ठरत आहेत. या सर्व जणांनी उपरोक्त प्रकरणी, अपिलार्थीस विलंबाने व अर्धवट माहिती दिल्याचे वरील परिच्छेदात उल्लेख केल्याप्रमाणे सिध्द झाले आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या वर्तनाने त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली आहे असे आयोगाचे मत आहे. आपल्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांनी स्वतःला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे.

सबब मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असलेले त्यांचे सर्व सहकारी / कर्मचारी यांच्यावर, प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश

निर्गमीत होताच दोन महिन्याच्या आत करुन तदनंतर आपला अनुपालन अहवाल आयोगास एक महिन्याच्या आत सादर करावा.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांनी, उपरोक्त प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असलेले त्यांचे सर्व सहकारी / कर्मचारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच दोन महिन्याच्या आत करुन तदनंतर आपला अनुपालन अहवाल आयोगास एक महिन्याच्या आत सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक ०४-०७-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दत्तु ईराप्पा दिंडे, सदस्य - भ्रष्टाचार निर्मुलन समिती, पैठण तालुका, रा. आडूळ, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२९४

निर्णय दिनांक ०४-०७-२००८

श्रीमती साठे स्वाती शामराव, : अपिलार्थी
रा. रामनगर, काकडे प्लॉट,
उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा प्रभारी मुख्याध्यापक, श्रीमती
सत्यभामा शिंदे विद्यालय, देवळाली,
तालुका, जिल्हा उस्मानाबाद
२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सचिव श्री. गुरुदेव शिक्षण
प्रसारक मंडळ, उस्मानाबाद, तालुका
जिल्हा उस्मानाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०७-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. बंडगर प्रभाकर निवृत्तीराव, संचालक, जन माहिती अधिकारी तथा प्रभारी मुख्याध्यापक, श्रीमती सत्यभामा शिंदे विद्यालय, देवळाली यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. सगरे अब्दुल जब्बार अब्दुल गफूर, जन अपिलीय अधिकारी तथा सचिव श्री. गुरुदेव

शिक्षण प्रसारक मंडळ, उस्मानाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्रीमती साठे स्वाती शामराव ह्या गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक २०-०६-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०५-२००७ रोजीशी संबंधीत खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> " १. श्रीमती सत्यभामा शिंदे विद्यालय, देवळाली, ता. जि. उस्मानाबाद या शाळेतील दि. ०३/०५/२००७ रोजी आपल्या कार्यालयाने प्रभारी मु. अ. म्हणून श्री. मोहिते यांना दिलेल्या वैयक्तिक मान्यता आदेशाची सत्यप्रत व दाखल केलेल्या प्रस्तावाची सत्यप्रत मिळावी. "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये त्यांना कोणत्याही प्रकारे लिखित स्वरुपात प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही, मात्र त्यांनी या अपिलासंदर्भात त्यांच्या दिनांक ०७-०९-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांना हव्या असलेल्या माहितीपोटी १०० रुपये इतक्या रकमेचे शुल्क त्यांच्या संस्थेकडे भरणा करण्याचे सूचित केले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या पत्रामध्ये अपिलार्थीस देण्यात येणा-या संभाव्य माहितीच्या पृष्ठांची संख्या व माहिती देण्यासाठी प्रति पृष्ठ दर याचा उल्लेख केलेला नाही.

मध्यंतरीच्या काळात जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही सकारात्मक प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०८-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी ह्या गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे त्यांना हवी असलेली माहिती त्यांनी व्यक्तिशः अपेक्षिली होती, तथापि सदर माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्या त्यांच्या कार्यालयात व्यक्तिशः उपस्थित राहिल्या नाहीत अथवा त्यांच्याशी दूरध्वनीव्दारे किंवा इतर माध्यमाव्दारे कोणताही संपर्क साधला नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार होती. अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केल्याने त्यांनी अपिलार्थीची वाट पाहिली, तथापि अपिलार्थीने त्यांच्याशी संपर्क साधण्याऐवजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील करणे पसंत केले. अपिलार्थीने मागितलेली माहिती आजही त्यांच्याकडे तयार असून, ते अपिलार्थीस ती विनामूल्य पुरविण्यास तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा दिनांक २१-०७-२००७ रोजीचा अपील अर्ज त्यांना दिनांक ०३-०८-२००७

रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्याकडे तयार होती, ती माहिती अपिलार्थी स्वतः घेऊन जातील या अपेक्षेने त्यांनी अपिलार्थीची माहिती घेऊन जाण्याची वाट पाहिली व शेवटी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०७-०९-२००७ रोजीच्या पत्रान्वये त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटी १०० रुपये इतके शुल्क भरण्याची विनंती केली.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची व्यक्तिशः स्वरुपात मागणी केलेली आहे. कोणत्याही अर्जदाराने व्यक्तिशः माहितीची मागणी केली असता, सदर माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर येऊन पडते. "व्यक्तिशः" माहिती मागणे याचा अर्थ, अपिलार्थीने स्वतः जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहणे व त्यांना आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हस्तांतरीत करुन घेणे असा होतो. या प्रक्रियेमध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचा प्रतिनिधी पाठवून प्रतिनिधीव्दारे ही माहिती प्राप्त करुन घेणे अभिप्रेत नाही. संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थी ज्यावेळी जाईल त्यावेळी माहिती उपलब्ध नसली तर संबंधित अर्जदारास आपल्या उपस्थितीची नोंद जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे व स्वतःकडे करुन ठेवणे गरजेचे असते. या प्रकरणामध्ये अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुन त्या जन माहिती अधिकारी वा जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित झाल्या नाहीत, असे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांच्या, " अपिलार्थी या त्यांच्या कार्यालयामध्ये माहिती घेण्यासाठी स्वतः कधीही उपस्थित राहिल्या नाहीत," या विधानाचे खंडण करण्यासाठी

आज अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत त्यामुळे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचा, अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी व्यक्तिशः कधीही उपस्थित झाल्या नाहीत, हा मुद्दा ग्राह्य धरण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास दाखविलेली माहिती पाहिली असता, ही माहिती अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे दिसून येते. येथे असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास प्रथम प्रतिसाद अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील अर्ज दाखल केल्यानंतर दिनांक ०७-०९-२००७ रोजी दिला आहे. आज सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य पुरविण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे, हे पाहता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी असे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद
दिनांक ०४-०७-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्रीमती साठे स्वाती शामराव, रा. रामनगर, काकडे प्लॉट, उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्रीमती सत्यभामा शिंदे विद्यालय, देवळाली, तालुका, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, श्री. गुरुदेव शिक्षण प्रसारक मंडळ, उस्मानाबाद, तालुका जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२९५

निर्णय दिनांक    ०४-०७-२००८

श्रीमती सुरैय्या बेगम महमदबीन अब्दुल्ला,   :   अपिलार्थी
व्दारा भारत मारुतीराव कोकाटे, जय
भवानी चौक, इंगळे गल्ली, उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी   :
तथा तहसीलदार, परंडा, तालुका परंडा,
जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी   :   प्रतिवादी
तथा उपविभागीय अधिकारी (महसूल),
भूम, जिल्हा उस्मानाबाद

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०७-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्रीमती सुरैय्या बेगम महमदबीन अब्दुल्ला (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्रीमती शोभा विद्यासागर जाधव, जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, परंडा (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. ज्योतिराम लक्ष्मण कोरे, अव्वल कारकून, जन अपिलीय अधिकारी

तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), भूम यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक २९-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन १९९० ते १२/२००२ या कालावधीशी संबंधीत खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> “ सन १९९० ते १९९८ या कालावधीतील महेमदबीन अब्दुला यांचा सर्व्हीसचा तपशील तसेच १९९८ ला महेमदबीन मयत झाल्यानंर सुरैय्या बेगम यांना कोणत्या आधारे पेन्शन दिली जाते त्याचा तपशील व २००२ नंतर पेन्शनातील बदलाचा तपशील दयावा. ”

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास, जन माहिती अधिकारी यांनी, त्यांच्याकडील दिनांक ०८-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात तयार करुन ठेवली असल्याचे व त्याची फीस नियमानुसार चलनाव्दारे भरणा करुन ती हस्तगत करण्याचे त्यांना सूचित केले. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस देण्यासाठी प्रस्तावित केलेल्या माहितीच्या पृष्ठांची संख्या व त्याचा प्रति पृष्ठ दर यांचा तपशील अपिलार्थीस कळविल्याचे दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या सुचनेनुसार अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयामध्ये दिनांक ३१-०१-२००७ रोजी आवश्यक ते शुल्क रुपये ४० इतक्या रकमेचा भरणा करुन, त्यापुर्वीच दिनांक २४-०१-२००७ रोजी त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हस्तगत करुन घेतली.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार,

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०६-२००७ रोजी प्रथम अपील करुन त्यांना प्राप्त झालेल्या माहितीमध्ये सेवापुस्तिकेचा तपशील त्यांना प्राप्त झाला नसल्याने त्यांना मिळालेली माहिती अपूर्ण असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी, दिनांक ०२-०७-२००७ रोजी सुनावणी घेऊन, यासंदर्भातील आपले आदेश दिनांक ०९-०७-२००७ रोजी पारीत केले. सदर अपिलाचा निर्णय जन अपिलीय अधिकारी यांनी खालीलप्रमाणे दिला आहे.

" १. अपीलार्थीचे अपील खालील अटीचे अधीन राहून मंजूर करण्यात येते.

२. तहसीलदार परंडा यांनी मागणी नक्कला देण्याकरीता पुनश्च सेवापुस्तीकेचा शोध घ्यावा. अन्यथा सेवापुस्तिका उपलब्ध नसल्याबद्दल अर्जदारास आठ दिवसात लेखी कळवावे. मागाहून सेवापुस्तिका मिळाल्यास विलंबाची जबाबदारी तहसीलदार यांचेवर राहील. "

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतर देखील अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०८-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी मयत महमदबीन अब्दुला यांच्या मूळ सेवापुस्तिकेची व प्रथमतः पाठविलेल्या सेवानिवृत्ती वेतनाच्या प्रस्तावाच्या झेरॉक्स प्रतीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी, अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांचे पती महमदबीन अब्दुला हे शिपाई या पदी तहसील कार्यालय, परंडा येथे कार्यरत होते. त्यांनी दिनांक २०-१२-१९९१ रोजी स्वेच्छा निवृत्ती घेतल्यानंतर त्यांचे १९९१-१९९८ या सालाचे निवृत्तीवेतन तहसील परंडा येथून येत होते. सन १९९८ साली त्यांच्या

पतीचा मृत्यू झाल्यानंतर पुढे चार वर्षे त्यांना पूर्ण कुटूंबनिवृत्ती वेतन मिळत होते, तथापि २००२ सालानंतर या सेवानिवृत्ती वेतनात फरक पडला म्हणून त्यांना सदर फरक कशामुळे पडला हे त्यांना जाणून घेण्यासाठी, आजही त्यांना मूळ अर्जाव्दारे त्यांनी मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता आहे. तहसील कार्यालय परंडा व महसूल खात्याच्या कर्मचा-यांनी त्यांच्या पतीच्या सेवानिवृत्तीविषयक कागदपत्रामध्ये भ्रष्टाचार करुन यामध्ये बदल केल्याचा त्यांचा दाट संशय आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थी यांचे पती महमदबीन अब्दुला हे त्यांच्या कार्यालयात शिपाई या पदावर कार्यरत होते, त्यांनी दिनांक २०-१२-१९९१ रोजी स्वेच्छा निवृत्ती घेतली. स्वेच्छा निवृत्ती घेतल्यापासून ते त्यांचा दिनांक ३०-०६-१९९८ रोजी मृत्यू होईपर्यत त्यांचे सेवानिवृत्ती वेतन महमदबीन अब्दुला यांना जात होते. तदनंतर दिनांक ०४-१२-२००० रोजी त्यांच्या व्दितीय पत्नीने सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, उस्मानाबाद यांच्याकडून श्रीमती जैबुनिसा व सुरैय्या या श्री. महमदबीन अब्दुला यांच्या दोन पत्नी असल्याच्या निर्णयाची प्रत तहसील कार्यालयास दिनांक ३०-११-२००० रोजी सादर केली. न्यायालयाच्या आदेशानुसार मयत शिपाई महमदबीन अब्दुला यांच्या दोन वारस पत्नी असल्याचे सिध्द झाल्याने महमदबीन अब्दुला यांचे कुटूंबनिवृत्ती वेतन हे त्यांच्या दोन पत्नीमध्ये विभागणी करण्यात आले. हा निर्णय होईपर्यंत अपिलार्थी यांना ९२३३३ रुपये इतकी रक्कम अदा करण्यात आली होती. सदर निर्णयाची अंमलबजावणी पूर्वलक्षी प्रभावाने केली गेल्याने श्रीमती सुरैय्या बेगम यांना जादा प्रदान करण्यात आलेल्या रकमेची वसूली तदनंतर महालेखापाल, नागपूर यांनी केली व परिणामी अपिलार्थीस चार वर्षे कोणतेही कुटूंब निवृत्ती वेतन प्राप्त झाले नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील, अपिलार्थीस कोणत्या कागदपत्राच्या आधारे पेन्शन दिली व २००२ नंतर त्यामध्ये झालेल्या बदलाबाबतचा तपशील त्यांनी अपिलार्थीस दिनांक २४-०१-२००७ रोजी दिलेला आहे. अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या त्यांच्या व्दितीय अपिलामध्ये

म्हटल्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस माहिती देतांना त्यावर कागद ठेऊन झेरॉक्स प्रती दिलेल्या नाहीत. महंमदबीन अब्दुला (मयत) यांची मूळ सेवापुस्तिका महालेखापाल, नागपूर यांना त्यांच्या सेवानिवृत्ती प्रकरणाच्या प्रस्तावासोबत दिनांक २४-०३-१९९२ रोजी सादर केली होती. महालेखापाल, नागपूर यांच्याकडून महमदबीन अब्दुला यांची सेवापुस्तिका १९९१-९२ मध्ये परत आली होती. परंतु आज रोजी सदर सेवापुस्तिका त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही. सदर सेवापुस्तिकेचा त्यांच्या अभिलेख्यामध्ये शोध घेण्याकरिता त्यांनी एकूण १२ लिपिकांच्या पथकाची नियुक्ती केली होती. सदर पथकाने त्यांच्या अभिलेख्यातील पूर्ण नस्त्यांचा शोध घेऊनही त्यामध्ये महमदबीन अब्दुला यांची सेवापुस्तिका त्यांना प्राप्त झाली नाही. त्यांच्या कार्यालयामध्ये सर्व कर्मचा-यांच्या सेवापुस्तिका संबंधीत आस्थापना लिपीक यांच्या ताब्यात ठेवलेल्या असतात. ज्या लिपिकाच्या ताब्यात तहसील कर्मचा-यांच्या सेवा पुस्तिका उपलब्ध असतात त्या सर्व कर्मचा-यांनी महमदबीन अब्दुला यांची सेवापुस्तिका शोध घेऊनही सापडत नसल्याचा त्यांना लेखी जबाब दिला आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक १२-०६-२००७ रोजीच्या अपील अर्जावर त्यांनी दिनांक ०२-०७-२००७ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश दिनांक ०९-०७-२००७ रोजी पारित केले आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २९-१२-२००६ रोजीच्या प्रथम अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे महमदबीन अब्दुला यांच्या सेवेचा तपशील, श्रीमती सुरैय्या बेगम यांना कोणत्या कागदपत्राच्या आधारे पेन्शन दिली जाते व २००२ नंतर पेन्शन बदलाबाबतशी संबंधीत कागदपत्राच्या प्रती अशा प्रकारची माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी जरी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला असला तरी त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०८-०१-२००७ रोजीच्या पत्रामध्ये नियमाप्रमाणे फी भरुन माहिती हस्तगत करण्याचे

सूचित केले आहे.  माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७ (१) व ७ (३) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी त्यांना पुरविण्यात येणा-या माहितीच्या पृष्ठांची संख्या व माहिती देण्यासाठी प्रतिपृष्ठ दर यांचा तपशील कळविणे भाग होते, तथापि अशा प्रकारची कोणतीही कृती जन माहिती अधिकारी यांनी न करता, अपिलार्थीस माहिती देण्यात येणा-या माहितीपोटी रुपये ४० इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरुन घेतले.  त्यामुळे त्यांना आता अपिलार्थीस अपिलार्थीकडून माहिती देण्यापोटी घेतलेले शुल्क रुपये ४० इतके त्यांना परत करावे लागेल.  अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहितीपैकी श्रीमती सुरैय्या बेगम यांना कोणत्या कागदपत्राच्या आधारे पेन्शन दिली जाते याचा तपशील त्यांनी मागितला असता, महालेखापाल यांच्याकडील निवृत्ती वेतनासंदर्भातील प्रथम आदेशाच्या प्रती व नंतर सुधारीत आदेशाच्या प्रती अशा दोन प्रती त्यांनी अपिलार्थीस पुरविल्या आहेत.  वास्तविक पाहता अपिलार्थीने त्यांना कोणत्या कागदपत्राच्या आधारे सेवानिवृत्ती वेतन दिले जाते याची माहिती मागितली होती त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी महमदबीन अब्दुला यांच्या सेवानिवृत्तीचा महालेखापाल नागपूर यांच्याकडे प्रथमतः पाठविलेला प्रस्ताव, व न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या सुस्पष्ट प्रती अपिलार्थीस देणे भाग होते.  तथापि त्यांनी अशा प्रकारची कृती केलेली नाही त्यामुळे अपिलार्थीस त्यांनी दिनांक २४-०१-२००७ रोजी पुरविलेली माहिती अशा त-हेने अर्धवट ठरते.  अपिलार्थीस २००२ नंतर मिळणा-या पेन्शनमध्ये झालेल्या बदलाबाबत त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली आहे व सदर बदलासंदर्भातील महालेखापाल यांच्या सुधारीत आदेशाच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस पुरविल्या आहेत.  यावरुन अपिलार्थीस या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना आवश्यक माहिती पुरविल्याचे दिसून येत आहे.  महमदबीन अब्दुला यांची सेवापुस्तिका अथक प्रयत्न करुनही जन माहिती अधिकारी यांना आढळून आली नसल्याचे त्यांनी आयोगासमोर शपथपत्राव्दारे कबूल केले आहे.  तसेच हा उल्लेख जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयामध्ये देखील आलेला आहे.  जन माहिती अधिकारी

यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २३-०७-२००७ रोजीच्या पत्रान्वये त्यांनी महमदबीन अब्दुला यांची सेवापुस्तिका शोधण्यासंदर्भात केलेल्या प्रयत्नांची माहिती अपिलार्थीस कळविली आहे. तिचे अवलोकन करता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस महमदबीन अब्दुला यांच्या सेवापुस्तिकेची प्रत प्राप्त करुन देण्यासाठी प्रयत्न केल्याचे दिसून येत आहे. सदर सेवापुस्तिका आता उपलब्ध होऊ शकत नसल्याबाबत त्यांनी आयोगासमोर एक शपथपत्र सादर केले आहे हे पाहता आता अपिलार्थीस महमदबीन अब्दुला यांच्या सेवापुस्तिकेची प्रत मिळणार नाही हे उघड आहे, मात्र महमदबीन अब्दुला यांची सेवापुस्तिका गहाळ होण्यासाठी तहसील कार्यालयाचे जे कर्मचारी जबाबदार आहेत त्यांच्यावर जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन आपला अनुपालन अहवाल आयोगास तदनंतर १ महिन्याच्या आत सादर करावा असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. प्रसंगी या प्रकरणी पोलीस यंत्रणेचे सहाय्य घेणे त्यांना आवश्यक वाटत असेल तर तसेही ते घेऊ शकतील. अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती (सेवापुस्तिका वगळून) देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ माहितीतील महमदबीन अब्दुला यांचे सेवानिवृत्ती वेतन प्रकरणी महालेखापाल, नागपूर यांना पाठविलेल्या सर्व कागदपत्रांच्या प्रती, न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या प्रती, श्रीमती जैबुनिसा यांना मंजूर झालेल्या सेवानिवृत्ती प्रकरणासंदर्भातील तहसीलदार यांच्या कार्यालयातील सर्व उपलब्ध कागदपत्रांच्या प्रती, अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवाव्यात.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती (सेवापुस्तिका वगळता) त्यांना हे आदेश निर्गमीत होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जिल्हाधिकारी, उसमानाबाद यांनी तहसील कार्यालय परंडा यांच्या कार्यालयातील संबंधीत कर्मचा-यावर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन आपला अनुपालन अहवाल आयोगास तदनंतर १ महिन्याच्या आत सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक ०४-०७-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्रीमती सुरैय्या बेगम महमदबीन अब्दुल्ला, व्दारा भारत मारुतीराव कोकाटे, जय भवानी चौक, इंगळे गल्ली, उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, परंडा, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), भूम, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२९६

निर्णय दिनांक    ०४-०७-२००८

श्री. बालाजी किशनराव गादगे,    :    अपिलार्थी

विकास नगर, देगलूर रोड, उदगीर, तालुका

उदगीर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी    :

तथा शिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा

परिषद, लातूर

२ जन अपिलीय अधिकारी    :    प्रतिवादी

तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा

परिषद, लातूर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०७-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. बालाजी किशनराव गादगे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व श्री. जयवंत ज्ञानू साळूंखे, जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद, लातूर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे

संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक १६-०४-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे पंडीत दीनदयाळ उपाध्याय प्राथमिक शाळेसंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" मथुरा ग्रामीण महिला विकास मंडळ उदगीर या नोंदणीकृत संस्थेव्दारा पंडीत दीनदयाळ उपाध्याय प्राथमिक शाळा ही शासन मान्यता असलेली शाळा उदगीर येथे चालते.

१. पंडीत दिनदयाळ उपाध्याय प्राथमिक विद्यालय अनुदानावर आलेले वर्षे नमुद करुन टप्पानिहाय अनुदानाची वर्षवारी प्रमाणे माहिती दयावी. चालू शैक्षणिक वर्षापर्यन्त किती रक्कमेचे वेतन अनुदान आणि वेतनेत्तर अनुदान शाळा व संस्थेने शासनाकडून मिळवलेले आहे त्याची माहिती.

२. सदरील शासन मान्य शाळेचे बाबत शैक्षणिक वर्ष १९९७-९८ ते २००६-२००७ पर्यन्त संच मान्यतेच्या सत्यप्रती.

३. सदरच्या शाळेचे जुन १९९७-९८ ते जुन २००६-०७ दरम्यान शिक्षण विभागाने संबधित अधिका-याकडून करण्यांत आलेल्या तपासणी अहवालाच्या सत्यप्रती.

४. संस्थेने वैयक्तिक मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव दाखल केला आहे तो व त्यातील प्रस्तावित सर्व शिक्षकांची बाबतीतील संच मान्यता, जेष्ठता सुची, शालेय समितीचे ठराव, शिक्षकांचे नेमणुकीचे आदेश, रुजू रिपोर्ट, शिक्षकांचे शैक्षणिक प्रमाणपत्र व एकत्रित सेवा जेष्ठता सुची याच्या सत्यप्रती. "

अपिलार्थीने सदर माहिती स्पीड पोस्टाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास, जन माहिती अधिकारी यांनी, त्यांच्याकडील दिनांक ३०-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ ते ३ शी संबंधीत माहिती संबंधीत शाळेच्या मुख्याध्यापका-कडून, त्यांची अशा प्रकरणी जन माहिती अधिकारी म्हणून नेमणूक झाली असल्याने, त्यांच्याकडून प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले, तर अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ४ च्या संबंधातील माहिती त्यांनी अपिलार्थीस ही माहिती त्यांच्या कार्यालयास भेट देऊन घेऊन जाण्याचे सूचित केले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०५-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी, दिनांक १६-०७-२००७ रोजी सुनावणी घेऊन, यासंदर्भातील आपले आदेश दिनांक १६-०७-२००७ रोजी पारित केले. या आदेशामध्ये त्यांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना अपिलार्थीस सर्व माहिती विनामूल्य देण्याचे व माहिती अधिकार अधिनियमातील प्रकरणात विहित मुदतीत कार्यवाही करण्याचे सूचित केले.

जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०८-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. अपिलार्थीने या अपील अर्जामध्ये, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना विहित मुदतीत व विहित नमुन्यात जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिली नसल्याने त्यांच्यावर पुढील आवश्यक ती दंडात्मक कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी, अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी त्यांच्या दिनांक १६-०४-२००७ रोजीच्या मूळ अर्जामध्ये मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिलेली नाही, मात्र त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ३०-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीने मागणी केलेली एकूण ४ मुद्दयावरील माहितीपैकी फक्त मुद्दा क्रमांक ४ ची माहिती त्यांच्याकडे उपलब्ध असल्याचे कळविले व उर्वरित तीनही मुद्दयावरील माहिती संबंधीत शाळेच्या मुख्याध्यापकाकडून प्राप्त करुन घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले. त्यांनी मागितलेली माहिती जर जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नव्हती तर त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत, त्यांनी मागितलेली माहिती ज्या प्राधिकरणाकडे उपलब्ध होती, त्यांच्याकडे मूळ माहितीचा अर्ज प्राप्त झाल्यापासून ५ दिवसाच्या आत पाठवून द्यावयास पाहिजे होती, तथापि या प्रकरणी त्यांनी सदर कृती करण्यास ९ दिवसांचा विलंब लावला आहे. जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे ते संबंधीत मुख्याध्यापकाच्या कार्यालयामध्ये हजर झाले असता संबंधीत मुख्याध्यापकाने त्यांना आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन दिली नाही. संबंधीत मुख्याध्यापकाकडे अपिलार्थीने केलेल्या यासंदर्भाबाबत त्यांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना कळविले आहे. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून मुद्दा क्रमांक ४ शी संबंधीत माहिती त्यांना विलंबाने प्राप्त झाली असून त्यांना त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ ते ३ शी संबंधीत संपूर्ण माहितीची त्यांना आता आवश्यकता आहे. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी लावलेल्या विलंबासाठी त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते या पदावर दिनांक ०१-०७-२००८ पासून कार्यरत आहेत. पूर्वी या पदावर श्री. लगड नावाचे अधिकारी काम करीत होते, ते आता नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत. अपिलार्थीने

मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ ते ३ शी संबंधीत माहिती ते अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य देऊ शकतील.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक १६-०४-२००७ रोजीच्या प्रथम अर्जाव्दारे एकूण ४ मुद्दयांवर माहिती मागितली होती. या मुद्यापैकी मुद्दा क्रमांक १, २ व ३ शी संबंधीत माहिती शिक्षणाधिकारी (प्राथमिक) तथा जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नव्हती. कोणत्याही अर्जदाराने सार्वजनिक प्राधिकरणाकडे त्या प्रकरणाशी संबंधीत मागितलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्यास कशा प्रकारे कार्यवाही करावयाची याचे सुस्पष्ट विवेचन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (३) (एक) मध्ये केलेले आहे. या कलमाच्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा अर्ज संबंधीत शाळेच्या मुख्याध्यापकाकडे सदर अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून ५ दिवसाच्या आत पाठवून त्याची एक प्रत अपिलार्थीस देणे या तरतुदीन्वये अभिप्रेत आहे. त्यांनी या कलमातील तरतुदीनुसार कार्यवाही करतांना ९ दिवसांचा विलंब प्रथम टप्प्यावर लावल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या सुचनेनुसार अपिलार्थी हे संबंधीत शाळेच्या मुख्याध्यापकाकडे जाऊन, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांना माहिती प्राप्त करुन देण्यासंदर्भात त्यांचे आदेश होऊनही, त्यांना अपेक्षित माहितीपासून प्रदीर्घ कालावधीकरिता वंचित राहावे लागले हे माहिती अधिकार अधिनियमाचे दुर्दैव आहे, असे येथे म्हटल्यास फारसे वावगे होणार नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील ४ मुद्दयावरील माहितीपैकी फक्त एकाच मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस दिनांक २१-०५-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असून उर्वरित तीनही मुद्दयावरील माहिती आजतागायत त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक १६-०७-२००७ रोजीच्या निर्णयाचे अवलोकन करता त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती

शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद यांच्याकडेही उपलब्ध आहे असा निष्कर्ष काढला आहे हे पाहता आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस सदर माहिती देणे भाग आहे व त्याप्रमाणे त्यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीस या अपिलासंदर्भातील सुनावणीत माहिती देण्याचे कबूल केले आहे. अधिनियमातील माहितीसाठीचा विहित कालावधी आता व्यपगत झाला असल्याने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस कलम ७ (६) च्या तरतुदीनुसार ही माहिती विनामूल्य द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहाय्यक व कर्मचारी या सर्वांनी या प्रकरणी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याचे येथे नि:संशयपणे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व सहाय्यक यांनी या प्रकरणामध्ये अपिलार्थीस अधिनियमातील विहित तरतुदीमध्ये सकारात्मक प्रतिसाद दिला नाही, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश पारित केल्यानंतरही अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती देण्यासंदर्भात त्यांनी कोणतीही कार्यवाही न करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली आहे, असे आयोगाचे मत आहे.

सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर / शिक्षण संचालक, पुणे यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे या प्रकरणातील संबंधीत सर्व सहाय्यक / कर्मचारी यांच्यावर, त्यांनी वरीलप्रमाणे दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय

कारवाई हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत करुन आपला अनुपालन अहवाल आयोगास तदनंतर १ महिन्याच्या आत सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर / शिक्षण संचालक, पुणे यांनी उपरोक्त प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे या प्रकरणातील संबंधीत सर्व सहाय्यक / कर्मचारी यांच्यावर, त्यांनी वरीलप्रमाणे दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत करावी व आपला अनुपालन अहवाल आयोगास तदनंतर १ महिन्याच्या आत सादर करावा.

औरंगाबाद<br>
दिनांक ०४-०७-२००८

( वि. बा. बोरगे )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बालाजी किशनराव गादगे, विकास नगर, देगलूर रोड, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, ससून हॉस्पिटल जवळ, पुणे – ०१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२९७

निर्णय दिनांक : ०५.०७.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. नारायण गुलाबचंद बन्सवाल, औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी,औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख औरंगाबाद. | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०७.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. नारायण गुलाबचंद बन्सवाल (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. बन्सी गणपतराव बांगर, जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. किशोर रामभाऊ तवरेज, जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांच्याकडील दि.२३.२.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन १९५८ ते २००७ या कालावधीची सर्व्हे नं. ३, पदमपूरा औरंगाबादशी संबंधित खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" १) पदमपूरा सर्वे नं.३ C.T.S.१८२३५ अवॉर्ड नं. (G.B.W S.1-A.R.23/291/57 दि. १७.७.५८ अन्वये सम्पादित जागेचा नकाशाची नक्कल मिळणे.

२) C.T.S.१८२३५/१ नकाशाची नक्कल मिळणे फेर कोणत्या आधारे केले आहे. आदेश नक्कल तसेच १८२३५,१८२३५/१ पि.आर. कार्डची नक्कल देण्यात यावी. स.नं.३ चे क्षेत्र.३-१९-०.०९=३.१० गुंठे भूसम्पादित मन्नालाल अग्रवाल ची सर्वे नं. ३ मधील, ९ गुंठे रस्त्याची जागा भूसंम्पादन केलेल्या ३ए.१० गुंठे क्षेत्रातून फेर करुन संम्पादन केलेल्या जागेतूनच देण्याचे कारण काय ? हे योग्य आहे काय ? माहिती द्यावी याबाबत आपले काय म्हणणे आहे.

३) पदमपूरा औरंगाबाद सर्व्हे नंबर दर्शविणारा गावाचा नकाशाची नक्कल देण्यात यावी.

४) सत्ता प्रकार "फ" व अ म्हणजे काय ? माहिती द्यावी.

५) भू संम्पादन करुन दिलेल्या जमीनी च्या नकाशाचा आकार व चतूरसिमा बदलण्याचे अधिकार आपल्या खात्यास कोणत्या नियमान्वे आहेत माहिती द्यावी. "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १६.३.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र. १ वगळता उर्वरित माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी आवश्यक ते शुल्क रु.११२/- इतके त्यांच्या कार्यालयात भरुन माहिती घेऊन जाण्याचे त्यांना सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविण्यात आलेल्या या पत्रानुसार अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दि. ११.५.२००७ रोजी व्यक्तिशः माहिती हस्तगत करण्यासाठी उपस्थित झाले व

त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे विनामूल्य माहितीची मागणी केली. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे नाकारले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १८.५.२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्याबाबत टाळाटाळ केल्याचे, माहिती न दिल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १८.६.२००७ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. २६.६.२००७ रोजी पारित केले आहेत. या अपील निर्णयामध्ये त्यांनी "नगर भूमापन अधिकारी, औरंगाबाद यांनी अर्जदार यांना मागणी केलेल्या नकला व माहिती नियमाप्रमाणे फीस आकारून १ महाच्या आत पुरवाव्या आणि त्यांच्या तक्रारीचे निरसन करुन तसा अहवाल इकडील कार्यालयास सादर करावा" ,असे जन माहिती अधिकारी यांना आदेश दिल्याचे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील करुनही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २९.६.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना अद्यापही जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नसल्याने, त्यांना सदर माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य प्राप्त व्हावी व त्यांना अपेक्षित माहिती जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत न पुरविल्याबद्दल त्यांच्यावर शास्ती लावण्यात यावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि. २३.२.२००७ रोजीच्या अर्जास त्यांनी त्यांच्याकडील दि. १६.३.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपैकी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती घेऊन जाण्यापोटी रु.११२/- इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. सदर माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात दि. ११.५.२००७ रोजी आले होते, तथापि अपिलार्थीने विनामूल्य माहितीची मागणी केल्याने, त्यांनी ती माहिती अपिलार्थीस पुरविली नाही.जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय देताना अपिलार्थीस माहिती सशुल्क द्यावी अशा अर्थाचा निर्णय दिलेला आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतर अपिलार्थीने त्यांना पुरवावयाच्या माहितीपोटीचे शुल्क रु.११२/- त्यांच्या कार्यालयात भरुन त्यांना आवश्यक ती माहिती दि. २८.०६.२००७ रोजी प्राप्त करुन घेतली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. २ शी संबंधित अपिलार्थीने ज्यातील माहिती मागितली, त्या माहितीतील नकाशा व त्यासंबंधीची माहिती त्यांच्याकडे त्यावेळी तयार नसल्याने अपिलार्थीस ती पुरविता आली नाही. अपिलार्थीने अर्ज केल्यानंतर सदर नकाशा नव्याने तयार करुन अपिलार्थीस त्यांनी दि. २५.७.२००७ रोजी या नकाशाची प्रत विनामूल्य देऊ करण्याची तयारी दर्शविली होती. तथापि अपिलार्थी सदर नकाशाची प्रत त्यांचेकडून घेऊन गेले नाहीत. (अपिलार्थी यांचे यावर म्हणणे असे आहे की, सदर नकाशाची प्रत संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी माहितीचा अर्ज केला त्यावेळी उपलब्ध असूनही त्यांनी या नकाशाची प्रत अपिलार्थीस त्यावेळी दिला नाही. मात्र, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्यानंतर त्यांना सदर नकाशाची प्रत जन माहिती अधिकारी यांनी विनामूल्य देऊ करण्याची तयारी दर्शविली. जन माहिती अधिकारी यांचे यावर असे म्हणणे आहे की, त्यांनी अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या नकाशाची प्रत दि. २४.७.२००७ रोजी तयार करुन ठेवली होती व लागलीच दि. २५.७.२००७ रोजी अपिलार्थीस ती प्रत विनामूल्य देण्याची तयारी दर्शविली होती.)

अपिलार्थीपासून माहिती लपविण्याचा किंवा अपिलार्थीस माहिती देण्यास टाळाटाळ करण्याचा त्यांचा उद्देश नव्हता.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी त्यांच्या दि. २६.६.२००७ रोजीच्या पारित केलेल्या आदेशामध्ये जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस एक महिन्याचे आत माहिती पुरविण्याचे आदेशित केले होते.त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस टोच नकाशाची प्रत त्यांच्याकडील दि. २५.७.२००७ च्या पत्राने देऊ केली होती. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर त्यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये सुनावणी घेऊन निर्णय दिलेला आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मुद्दा क्र. २ शी संबंधित अंशतः माहिती वगळता उर्वरित जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागितलेली माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये स्पष्ट करण्यात आलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत आहे. त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ मध्ये अपिलार्थी यांनी सि.टी.एस.क्र.१८२३५/१ च्या नकाशाची नक्कल मिळण्याबाबत विनंती केली आहे त्यासंबंधी जन माहिती अधिकारी यांनी सि.टी.एस.क्र १८२३५ टोच नकाशा तयार केला आहे, तथापि उर्वरित माहिती म्हणजे .......... मन्नालाल अग्रवाल ची सर्वे नं. ३ मधील, ९ गुंठे रस्त्याची जागा भूसंम्पादन केलेल्या ३ए.१० गुंठे क्षेत्रातून फेर करुन संम्पादन केलेल्या जागेतूनच देण्याचे कारण काय ? हे योग्य आहे काय ? माहिती द्यावी याबाबत आपले काय म्हणणे आहे? अशा अर्थाची प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती विचारली होती. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास अशाप्रकारच्या प्रश्नावर आपले अभिप्राय देणे अथवा अशा प्रकारच्या प्रश्नांना उत्तर देणे अभिप्रेत नाही, म्हणून मुद्दा क्र. २ ची अंशतः माहिती

अपिलार्थीस देय नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ मध्ये अपिलार्थीने पदमपूरा सर्व्हे.नं.३ च्या भूसंपादनाचे आदेश, दि. १७.७.१९५८ अन्वये संपादित जागेच्या नकाशाची नक्कल जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, नगर भूमापन यंत्रणा १९७१ सालापासून कार्यान्वित झाली असल्याने ॲवार्ड क्र. G.B.W.S.1-A.R.23/291/57 दि. १७.७.५८ नुसार संपादित जागेचा उपरोक्त नकाशा सन १९५७ सालचा असल्याने तो त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही. आज रोजी सुनावणीमध्ये, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या संपादित जागेचा नकाशा जिल्हाधिकारी कार्यालयातील संबंधित भूसंपादन अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध होण्याची शक्यता वर्तविली. सदर नकाशा त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याबाबत त्यांनी आज आयोगास शपथपत्र सादर केले. अपिलार्थीच्या मुद्दा क्र. २ ची संबंधित सि.स.नं. १८२३५/१ च्या पी.आर.कार्डाची नक्कल जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली आहे. त्यामुळे मुद्दा क्र. २ ची उर्वरित माहिती अपिलार्थीस प्राप्त झालेली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ३ शी संबंधित माहिती तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख यांच्याकडे उपलब्ध होईल, असे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी आयोगास सांगितले आहे तथापि तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख कार्यालय व जन माहिती अधिकारी यांचे कार्यालय हे एकाच प्राधिकरणाचे दोन वेगवेगळे भाग असल्याने अपिलार्थीने मागितलेली मुद्दा क्र.३ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने अर्ज करतेवेळी त्यांच्याकडे उपलब्ध नव्हती तर त्यांनी अधिनियमातील कलम ६(३)(एक) अन्वये अपिलार्थीच्या अर्जाचा हा भाग संबंधित प्राधिकरणाकडे पाच दिवसांच्या आत पाठवून देणे भाग होते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही न केल्याने, आता त्यांना अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ शी संबंधित असलेला माहितीचा हा भाग देखील अपिलार्थीस संबंधितांकडून प्राप्त करुन घेऊन विनामूल्य देणे भाग आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.४ शी संबंधित माहिती जरी प्रश्नार्थक

स्वरुपात विचारली असली तरी शक्यतोवर तिचे निराकरण करण्यास जन माहिती अधिकारी यांना शासकीय अधिकारी म्हणून प्रत्यवाय नसावा. त्याप्रमाणे या मुद्याशी संबंधित ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविली आहे.अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. ५ च्या संबंधित भूसंपादन करुन दिलेल्या जमिनीचा आकार व चतु:सिमा बदलण्याचे अधिकार स्थायी स्वरुपात जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाला नाहीत. मात्र न्यायालयाकडून किंवा यथोचित प्राधिकरणाकडून त्यांना आदेश पारित झाल्यास, त्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी बदल करतात, असे आज सुनावणीमध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे अपिलार्थीच्या मुद्दा क्र. ५ शी संबंधित जी माहिती अपिलार्थीस आता तोंडी स्वरुपात पुरविली आहे, ती त्यांनी अपिलार्थीस आता लेखी स्वरुपात कळवावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीच्या मूळ माहितीच्या अर्जाचे व त्यावर उपलब्ध असलेल्या माहितीचे वरील विश्लेषण पाहता, व अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना आता असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीचा मुद्दा क्र.२,३ व ५ शी संबंधित उर्वरित माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी व मुद्दा क्र. १ शी संबंधित माहितीची पुनर्बांधणी महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांच्या सहाय्याने कशी करता येईल, याचे प्रयत्न करावेत.संबंधित उपजिल्हाधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी नगर भूमापन अधिकारी, औरंगाबाद/अधीक्षक भूमी अभिलेख, औरंगाबाद यांना या प्रकरणी यथोचित सहकार्य करावे, जेणेकरुन अपिलार्थीने मागितलेल्या मुद्दा क्र. १ शी संबंधित माहिती अपिलार्थीस पुरविणे सुलभ होईल.

या संपूर्ण घटनाक्रमात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी असद्हेतूने टाळाटाळ केल्याचे अथवा ती मुद्दामहून दडविल्याचे आयोगास नि:संशयपणे न आढळल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कोणतीही कारवाई करण्याचे

आदेश नाहीत, मात्र येथून पुढे त्यांनी आपल्या कार्यालयातील अभिलेखे व्यवस्थित ठेवण्याबाबत सतर्क राहावे, असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ०५.०७.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. नारायण गुलाबचंद बन्सवाल,५-११-२०,पदमपूरा जि.औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ विशेष भूसंपादन अधिकारी (विशेष घटक), रेल्वेस्टेशनरोड, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२९८

निर्णय दिनांक : ०५.०७.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. बसवराज लिंगाप्पा जमादार,<br>मु.पो.निलेगाव ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा उपविभागीय अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम उपविभाग,<br>तुळजापूर जि.उस्मानाबाद | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग,<br>उस्मानाबाद | : | |

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०७.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. बसवराज लिंगाप्पा जमादार (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. शरद वैजनाथ काळे, जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग तुळजापूर,जि. उस्मानाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. विवेक चंद्रकांत नवले, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.१७.१.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००५ ते २००६ या कालावधीतील कसई ते कोरेवाडी व यमगरवाडी ते देवकुरुळी या रस्त्याच्या कामासंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" १) कसई ते कोरेवाडी

२) यमगरवाडी ते देवकुरळी दोन्ही कामाचे माती व खडीकरण कामाचे इस्टीमेट व अंदाजपत्रक देण्यात यावे.

३) या दोन्ही कामातील चालू केलेले माती काम व खडीकरण काम लेबर मस्टर १२.१.२००७ पर्यंत चालू असलेले कामाचे हजेरी मस्टर रजिस्टरचे प्रति देण्यात यावी.

४) त्या कामावरील रुलर दबाई केलेल्या कामाचे पावत्या देण्यात यावे.

५) या कामाचे फायनल M B रेकॉर्ड देण्यात यावी.हे काम इस्टीमेट प्रमाणे झाले आहे का. हया कामावरील पाहणी अहवाल देण्यात यावी

६) या कामावरील देखरेख अधिकारीचे नाव देण्यात यावी हे सर्व माहिती सत्य प्रतिमध्ये देण्यात यावी."

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १५.२.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.१८९०/- इतके त्यांच्या कार्यालयात रोखीने अथवा चलनाद्वारे भरण्याचे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविले होते. तथापि सदर पत्र जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून दि.२०.२.२००७ रोजी निर्गमित झाल्याचे दिसून

येते. तसेच सदर पत्र अपिलार्थीस पाठविल्यापृष्ठयर्थ, आयोगाने पूर्वसूचना देऊनही, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातील आवक-जावक नोंदवहीची प्रत सादर न केल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नसल्याचे मानण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि.२६.२.२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दि.२१.३.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. २६.३.२००७ रोजी पारित केले आहेत. या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित केले, तथापि त्यांनी या आदेशामध्ये अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना विहीत मुदत घालून दिली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.५.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना मूळ अर्जान्वये माहिती देण्यासाठी जाणूनबुजून टाळाटाळ केली व जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाचे पालन न केल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापही प्राप्त झाली नाही व जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्याचे जाणूनबुजून टाळले आहे. त्यामुळे त्यांना प्रतिदिनी रु.२५०/- याप्रमाणे एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती लावण्यात यावी व त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी

केलेली माहिती त्यांना विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांच्या कार्यालयाकडून दि. १५/२०.२.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे रु. १८९०/- इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याच्या सूचना केल्या होत्या. तथापि अपिलार्थीने सदर रकमेचा भरणा त्यांच्या कार्यालयात केला नाही. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी हे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याबाबत खात्री करुन अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित केले असल्याने, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दारिद्रयरेषेखालील प्रमाणपत्राची मागणी केली. तथापि अपिलार्थीने अद्यापही त्यांच्या कार्यालयात ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे प्रमाणपत्र सादर केले नाही तथापि अपिलार्थीस अंतिमतः त्यांना आवश्यक असलेली माहिती त्यांच्या कार्यालयाच्या दि. २६.६.२००८ रोजीच्या पत्रान्वये दिनांक ४.७.२००८ रोजी अपिलार्थी यांच्या घरी नेऊन दिली.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दि.२१.३.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. २६.३.२००७ रोजी पारित केले आहेत. या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित केले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य माहिती दिली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, प्रथमतः अपिलार्थीने त्यांचा मूळ माहितीचा दि. १७.१.२००७ रोजीचा अर्ज पूर्णतः भरलेला नाही. अपिलार्थी हे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती आहेत किंवा कसे याबाबतचा खुलासा त्यांनी या अर्जामध्ये केल्याचे दिसून येत नाही. मात्र अपिलार्थीच्या या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी

त्यांच्याकडील दि. १५.२.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद दिला. सदर पत्र त्यांनी त्यांच्या कार्यालयातून दि. २०.२.२००७ रोजी पाठविल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीप्रमाणे त्यांनी मागणी केलेली माहिती उशिरात उशिरा दि. १६.२.२००७ रोजी अथवा तत्पूर्वी मिळणे भाग होते. तथापि मूळातच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस शुल्क भरण्याचे पत्र त्यांच्या कार्यालयातून अधिनियमातील विहित मुदत टळून गेल्यानंतर म्हणजेच दि.२०.२.२००७ रोजी पाठविले असल्याने अपिलार्थीस ही माहिती याच टप्प्यावर विनामूल्य प्राप्त होणे हे अधिनियमातील तरतुदीनुसार अभिप्रेत होते. अधिनियमातील विहित मुदत टळून गेल्यानंतरही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय देताना अपिलार्थी हे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती आहेत किंवा कसे याची खात्री करण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयातील, अर्जदार २००२ च्या सर्वेक्षणानुसार दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याबाबत खात्री करण्याचे, जन माहिती अधिकारी यांना सूचित करण्याचे, भाग तथ्यहीन आहे. कारण मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस अधिनियमातील विहित केलेल्या कालावधीपेक्षा उशिराने प्रथम प्रतिसाद दिला गेला, ही बाब त्यांनी सदर अपिलावर निर्णय देताना लक्षात घेतली नसावी, असे दिसून येते. मूळात अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, त्यांनी प्रथम अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती सरळ व सोपी होती, ती अपिलार्थीस विहित मुदतीत देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयातील साधनसामुग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागत असल्याची शक्यता कोणत्याही प्रकारे येथे संभवत नव्हते. केवळ त्यांच्या मनातील इच्छाशक्तीचा अभाव व माहिती अधिकार अधिनियमाविषयी आवश्यक तेवढे ज्ञान नसणे, याच बाबीमुळे त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती पुरविली नसल्याचे दिसून येते. उपरोक्तप्रमाणे अपिलार्थीस एक वर्ष सहा महिने इतक्या विलंबाने माहिती देऊन त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य

परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली आहे.वास्तविक पाहता सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये कार्यकारी अभियंता हे जन माहिती अधिकारी व अधीक्षक अभियंता हे जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमले गेले आहेत. या प्रकरणी अधिनियमातील कलम ६(३)(एक) अन्वये संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर पाच दिवसांच्या आत त्यांनी कार्यकारी अभियंता यांच्याकडे पाठवून देणे अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अभिप्रेत आहे, तथापि अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही त्यांनी केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. या घटनेच्या वेगवेगळया टप्प्यावर जन माहिती अधिकारी यांनी आपल्या अशाप्रकारच्या वर्तनाने वर म्हटल्याप्रमाणे आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई निश्चितपणे स्पष्ट केली आहे. सबब मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर, त्यांनी उपरोक्तप्रमाणे दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल त्यांच्यावर हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याचे आत प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन तद्नंतर एक महिन्याचे आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणात दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल त्यांच्यावर हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याचे आत प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन तद्नंतर एक महिन्याचे आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ०५.०७.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बसवराज लिंगाप्पा जमादार, मु. पो.निलेगाव, ता. तुळजापूर, जि.उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, तुळजापूर जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२९९

निर्णय दिनांक : ०५.०७.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. वसंत निशिकांत मसलेकर,<br>रा.माजलगाव, जि.बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा उपविभागीय अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम उपविभाग,<br>माजलगाव, जि.बीड | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई,<br>जि.बीड | : | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०७.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. बब्रुवान दिगंबर साळवे, जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, माजलगाव, जि.बीड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. विलास लक्ष्मणराव कांबळे, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई जि.बीड (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर अपिलार्थी श्री. वसंत निशिकांत मसलेकर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांच्याकडील दि.२६.४.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील सन २००६ ते २००७ या कालावधीतील कामासंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> " गेवराई रोड (नितीन हॅटेल) ते जुन्या बसस्थानका पर्यंत होत असलेल्या सिमेट रोडचे बांधकाम बाबत त्या कामाचे अंदाजपत्रकाची प्रत सदर कामाबाबत निविदा कोणत्या वर्तमानपत्रात दिले होते. तसेच कामाची गुणनियंत्रकाकडून तपासणी केली ?"

अपिलार्थीने सदर माहिती शीघ्र टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०७.०६.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.६०/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२९.६.२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे अथवा अपिलार्थीशी यासंदर्भात कोणताही पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. याचे कारण जन अपिलीय अधिकारी यांना विचारले असता, त्यांनी अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्या कार्यालयात प्राप्त झाला नसल्याचे आयोगास सांगितले. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारे माहिती न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.८.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी विनामूल्य माहितीची मागणी करुन जन माहिती अधिकारी यांनी

अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती दिली नसल्याचे नमूद केले आहे. जन माहिती अधिकारी हे दोषी असल्याने त्यांच्यावर कलम २०(१) व कलम २०(२) प्रमाणे कारवाई करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे आयोगाकडे सादर केलेल्या त्यांच्या द्वितीय अपील अर्जातील त्यांचे लेखी म्हणणे, हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी दि. ३.७.२००८ रोजी रजिस्टर्ड पोस्टाने पाठविली आहे. (आयोगाकडील सुनावणीच्या दोन दिवस आधी) ही माहिती अपिलार्थीस व्यक्तीशः देण्याचा त्यांनी प्रयत्न केला, तथापि माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थी त्यांना उपलब्ध होऊ शकले नाहीत.

संबंधित जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना दि. ५.७.२००७ रोजी त्यांनी पाठविली आहे .

वरील घटनाक्रम, उपविभागीय अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीने माहितीचा केलेला मूळ अर्ज उपविभागीय अभियंता यांना उद्देशून केला होता, तथापि सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये कार्यकारी अभियंता हे जन माहिती अधिकारी म्हणून नेमले गेले आहेत, म्हणून उपविभागीय अभियंता यांनी अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीनुसार कार्यकारी अभियंता यांच्याकडे अपिलार्थीचा मूळ अर्ज, त्यांना प्राप्त झाल्यापासून पाच दिवसांच्या आत, पाठवून देणे अभिप्रेत होते. तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही न करता ते स्वतः अपिलार्थीशी यासंदर्भात पत्रव्यवहार करीत राहिले. त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास प्रथम प्रतिसाद दि. ७.६.२००७ रोजी दिला. सर्वसाधारण परिस्थितीमध्ये अपिलार्थीस त्यांच्या

मूळ अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणामध्ये दि. २५.५.२००७ रोजी अथवा तत्पूर्वी प्रतिसाद देणे अपेक्षित होते. तथापि संबंधित उपविभागीय अभियंता यांनी मूळात अपिलार्थीच्या मूळ अर्जास प्रथम प्रतिसाद अधिनियमातील विहित मुदत टळून गेल्यानंतर दिला आहे. त्यामुळे अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अधिनियमातील कलम ७(६) नुसार त्यांना विनामूल्य देय ठरत आहे. कार्यकारी अभियंता यांनी सुनावणीच्या सुरुवातीसच आयोगासमोर अपिलार्थीचा दि. २९.६.२००७ रोजीचा अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नाही, असे म्हटले आहे. तथापि त्यांनी अपिलार्थीस दि. ५.७.२००७ रोजी पाठविलेल्या पत्राचे अवलोकन करता असे दिसून येते की, त्यांनी सदर पत्र अपिलार्थीस त्यांच्या दि.२९.६.२००७ रोजीच्या अपील अर्जाच्या संदर्भात पाठविले आहे. यावरुन अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज कार्यकारी अभियंता यांच्याकडे प्राप्त झाला नाही, हे त्यांचे विधान पूर्णतः असत्य ठरत आहे. या ही ठिकाणी कार्यकारी अभियंता हे जन अपिलीय अधिकारी नसल्याने व संबंधित अधीक्षक अभियंता हे प्रत्यक्षात जन अपिलीय अधिकारी असल्याने त्यांनी अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज अधीक्षक अभियंता यांच्याकडे पाठवून देणे भाग होते, तथापि त्यांनीही अशाप्रकारची कोणतीही कृती केल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या कथित दि. ५.७.२००७ च्या पत्राचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीस त्यांनी या पत्राद्वारे त्यांच्या मूळ अर्जातील तीन मुद्यांपैकी दोन मुद्यांची माहिती दिली आहे. मात्र सदर माहिती अपिलार्थीस पोस्टाने पाठविल्याबाबत त्यांनी आज सुनावणीच्या दिवशी आयोगासमोर कोणताही ठोस पुरावा सादर केला नाही. आयोगाच्या कार्यालयातून सुनावणीस हजर राहण्याकरित पाठविण्यात आलेल्या नोटिशीमध्ये सुनावणीस येताना आवश्यक कागदपत्रे जसे आवक-जावक नोंदवहीची प्रत अथवा नोंदवही सोबत आणण्याबाबत स्पष्ट सूचना असूनही, त्यांनी त्यांच्या कार्यालयातील जावक नोंदवहीची प्रत अथवा तत्सम कागदपत्रे आयोगास सादर केली नाहीत. यावरुन त्यांच्या कार्यशैलीतील

बेपर्वाईची कल्पना येत आहे. तसेच अपिलार्थीस दिलेल्या दि. ५.७.२००७ रोजीच्या पत्रामध्ये अपिलार्थीने कामाचे गुणनियंत्रकाकडून तपासणी केली किंवा कसे याची विचारणा जन माहिती अधिकारी यांना केली होती, याही मुद्यावर कार्यकारी अभियंता यांनी त्यांच्याकडील दि. ५.७.२००७ रोजीच्या पत्रामध्ये कोणतेही भाष्य केल्याचे दिसून येत नाही. उपस्थित उपविभागीय अभियंता यांनी अपिलार्थीस जी माहिती दि. ३.७.२००८ रोजी दिली आहे, तिचे अवलोकन करता त्या माहितीमध्ये अपिलार्थीच्या मूळ अर्जामधील मुद्दा क्र.२ व ३ च्या संदर्भात कोणताही उल्लेख नाही. म्हणजेच अंदाजे पंधरा महिने इतका कालावधी लोटूनही अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती संबंधित उपविभागीय अभियंता व कार्यकारी अभियंता यांच्याकडून अद्यापही पुरविली गेली नाही, हे सिध्द होत आहे. अपिलार्थीच्या मूळ माहितीच्या अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांना मागितलेली संपूर्ण माहिती ही अपिलार्थीस अधिनियमातील विहित मुदतीमध्ये पुरविण्यास जन माहिती अधिकारी यांना कोणतीही अडचण नव्हती. सदर माहिती त्यांच्याकडे तयार स्वरुपात उपलब्ध होती, एवढे असूनही त्यांनी अपिलार्थीस दोन वेळा अपूर्ण माहिती दिल्याचे दिसून येत आहे.कार्यकारी अभियंता यांनी दि. ५.७.२००७ रोजी अपिलार्थीस अर्धवट माहिती पाठविली व हे पत्र पाठविल्याबाबतचा कोणताही पुरावा त्यांनी आयोगास सादर केला नाही. अशा प्रकारच्या आपल्या कार्यशैलीने त्यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याचे दिसून येत आहे. त्यांच्या या कार्यशैलीतील निष्क्रियता व बेपर्वाई हेच या विलंबाचे प्रामुख्याने कारण असल्याचे आयोगास आढळून येत आहे. अर्थात, त्यांची अशाप्रकारची निष्क्रीय कार्यशैली ही त्यांच्या कृतीचे समर्थन करत नाही, तर ती ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस पात्र असल्याचे सप्रमाण सिध्द करत आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की, संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी

त्यांना सहाय्य करणारे त्यांचे इतर सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी ज्यांना जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी अधिनियमातील कलम ५(५) मध्ये तरतुद आहे, त्या सर्वांवर त्यांनी अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवल्याबद्दल विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- या प्रमाणे एकूण रु.२५०००/-(अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित असलेले त्यांचे सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी यांनी सदर शास्तीची रक्कम शासकीय कोषागारात पुढील लेखाशीर्षाखाली जास्तीत जास्त पाच हप्त्यात भरावी.

लेखाशीर्ष-**"००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) "**

सदर शास्तीच्या रकमेची विभागणी जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी यांच्यामध्ये अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद यांनी हे आदेश निर्गमित होताच यथायोग्यरित्या सात दिवसांचे आत करावी व यासंबंधीचा आपला अनुपालन अहवाल आयोगास तात्काळ सादर करावा. सदर शास्तीची रक्कम जन माहिती अधिकारी व त्यांचे सहायक अधिकारी/कर्मचारी हे नियमितपणे शासकीय कोषागारात भरतील, असे अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद यांनी पहावे व या संदर्भातील आपला अनुपालन अहवाल ऑगस्ट, २००८ पासून दरमहा शास्तीची संपूर्ण रक्कम शासकीय कोषागारात पूर्णपणे भरुन होईपर्यंत आयोगास सादर करावा.

अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना सहाय्य करणारे त्यांचे इतर सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी या सर्वांवर त्यांनी अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांच्यावर विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- या प्रमाणे एकूण रु.२५०००/-(अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे करावा.

४. अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद यांनी उपरोक्त आदेश क्र.३ प्रमाणे शास्तीची विभागणी हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत करुन, आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. तसेच सदर शास्तीची रक्कम जन माहिती अधिकारी व त्यांचे सहायक अधिकारी/कर्मचारी हे नियमितपणे शासकीय कोषागारात भरतील असे पहावे व यासंबंधीचा आपला अनुपालन अहवाल ऑगस्ट २००८ पासून दरमहा सदर शास्तीची रक्कम

५. शासकीय कोषागारात पूर्णपणे भरुन होईपर्यंत नियमितपणे आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ०५.०७.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. वसंत निशिकांत मसलेकर,रा. पाटील गल्ली, माजलगाव, जि.बीड

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, माजलगाव जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हा कोषागार अधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३००

निर्णय दिनांक ०७-०७-२००८

श्री. शामराव सुंदरराव खरात, : अपिलार्थी
मु. पो. पाथरवाला बु. तालुका अंबड,
जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा कृषि विकास अधिकारी,
जिल्हा परिषद, जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी
अधिकारी, जिल्हा परिषद, जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-०७-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. शामराव सुंदरराव खरात (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. बबनराव भाऊराव धालगडे, जन माहिती अधिकारी तथा कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, जालना (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. हेमंत शरच्चंद्र वसेकर, जन अपिलीय अधिकारी तथा

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक ०१-०६-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०५-२००७ ते ३१-०५-२००७ या कालावधीतील त्यांच्या कायक्षेत्रातील राशी -२ बियाण्याच्या व खतांच्या संदर्भात खालीलप्रमाणे एकूण ८ मुद्दयावर माहिती मागितली होती.

“ १. जालना जिल्ह्यात कापसाच्या राशी-२ बीयाण्याचे किति वितरक आहेत व त्यांच्याकडे किति बियाणे वरिल कालावधीत प्राप्त झाले व किति शेतक-यांना बियाणे वितरण झाले. तालुका निहाय माहिती देणे.

२. राशी-२ कापसाच्या बियाण्याच्या व खताचा काळाबाजार व्यापा-यांनी करुन ज्यादा दराने विकतात. याबाबत किति तक्रारी आपणाकडे प्राप्त झाल्या.

३. कपाशीच्या बियाण्याच्या व खताच्या चढ्याभावाने विक्री करणा-या किति कृषी चालकाविरुध्द आपण कारवाई केली.

४. बालाजी सिड / जिंदल सिड/आर. के. बाबू व इतर परवानाधारकाकडे खते व बियाणे असतानाही स्टॉक शिल्लक नाही. याबाबत आपणाकडे तक्रारी प्राप्त झाल्या काय आपण आर. के. बाबू या दुकाणावर धाड टाकून किति खताचा साठा ताब्यात घेऊन कारवाई केली.

५. जिल्ह्यामध्ये बी-बियाणे व खताचा पुरवठा सर्व शेतक-यांना योग्य भावात व्हावा यासाठी आपण किति भरारी पथक नेमले, असल्यास त्यांची यादी व त्यांनी आतापर्यंत किति केंद्रावर देखरेख केली.

६. त्र्यंबक कृषी केंद्र जालना व इतर किति कृषी केंद्रावर राशी-२ बियाणे साठी शेतक-याकडून ॲडव्हान्स रक्कमा घेऊनही त्यांना बियाणे पुरवठा केल्याने नाही व

अशा प्रकारे अनामत रक्कमा घेता येतात का ? त्र्यंबक कृषी केंद्राने माझ्याकडून बील नं. ४९६५७ दि. २४-५-०७ रोजी राशी-२ बियाण्याच्या पोटी १५०० रु घेऊनही ज्यादा पैसे न दिल्यामुळे त्यांनी मला आजपावेतो बियाणे दिले नाही व मुळ पावति बियाणे देतो म्हणून घेतली. तीही परत केली नाही तरि आपण सदर केंद्रावर काय कारवाई करणार सदर बिलाची छायाप्रत सोबत दिली आहे.

७. प्रत्येक वर्षी जिल्ह्यामध्ये राशी-२ कपाशीचे बियाणे व खताचा काळाबाजार करित असून बियाणाचा व खताचा कृत्रीम तुटवडा करित असूनही आपण सदर गैरप्रकाराकडे जाणुन-बुजून दुर्लक्ष का करतात. विक्रेते साठा नाही या नावाखाली शेतक-यांना पावति न देता ज्यादा दराने माल विकून वितरक मालामाल होत असुनही या बाबीकडे आपण गांभीर्याने लक्ष का देत नाही.

८. शेतक-याची गरज ओळखुन योग्य बियाणे विक्री करणा-यांना ग्रामीण भागात हातपाय पसरुन शेतक-याची फसवणूक करित आहे त्यासाठी आता काय उपाय योजना केली. ”

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिश: अपेक्षिली होती.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०४-०६-२००७ रोजी तयार करुन ठेवली होती. तथापि सदर माहितीची अपिलार्थीने व्यक्तिश: मागणी केली असल्याने, अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी पोस्टाने पाठविली नाही, असे त्यांनी आज सुनावणीमध्ये सांगितले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी, दिनांक ०७-०८-२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि सदर सुनावणीस अपिलार्थी हे हजर राहिले नाहीत त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्या उपस्थितीत जन अपिलीय अधिकारी यांनी त्यासंदर्भातील आपले आदेश पारित केले. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज खारीज केला. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी करुन देखील अपिलार्थीने माहिती हस्तांतरीत करुन घेण्यास कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालयाशी संपर्क न साधल्याने त्यांनी हा निर्णय घेतल्याचे त्यांच्या दिनांक ०८-०८-२००७ रोजी निर्णयामध्ये म्हटले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या निर्णयाने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०८-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्विाद करण्यात आला की, त्यांनी त्यांच्या दिनांक ०१-०६-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील बियाणे वाटपासंदर्भात माहिती विचारली होती, तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना माहिती प्राप्त न झाल्याने त्यानी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सुनावणीस उपस्थित राहण्याच्या तारखेचे पत्र त्यांना सुनावणीच्या दुस-या दिवशी प्राप्त झाल्याने ते सुनावणीस हजर राहू शकले नाहीत व त्याचबरोबर त्यांनी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना दिनांक ०९-०८-२००७ रोजी तसे लेखी कळविले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर त्यांना दिनांक २७-०८-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली. सदर माहिती त्यांना ५६ दिवस इतक्या उशिराने प्राप्त झाली आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिलेली

ही माहिती अपूर्ण आहे, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना मुद्दा क्रमांक २, मुद्दा क्रमांक ३ व्दारे त्यांना अपेक्षित असलेली पंचनाम्याची प्रत त्यांना प्राप्त झाली नाही, मुद्दा क्रमांक ५ शी संबंधीत माहिती त्यांना प्राप्त झाली नाही, मुद्दा क्रमांक ६ शी संबंधीत माहिती त्यांना अद्यापही प्राप्त झाली नाही. मुद्दा क्रमांक ५, ६ व ८ शी संबंधीत, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अपूर्ण माहिती दिल्याबद्दल व ५६ दिवस इतक्या उशिराने माहिती दिल्याबद्दल त्यांच्यावर शास्तीची कारवाई करावी. जन माहिती अधिकारी यांना खते व बीयाणे वाटपासंदर्भात तक्रारी प्राप्त होऊनही अशा तक्रारी त्यांच्याकडे प्राप्त न झाल्याचे या पत्रामध्ये त्यांनी नमूद करुन, अपिलार्थीस खोटी माहिती पुरविली आहे त्यामुळे त्यांच्यावर शास्तीची कारवाई करावी व उर्वरित माहिती त्यांना विनामूल्य प्राप्त व्हावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे त्यांच्या दिनांक ०१-०६-२००७ रोजीच्या अर्जान्वये व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते सदर माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयात विहित केलेल्या मुदतीमध्ये एकदाही उपस्थित राहिले नाहीत. अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांनी दिनांक ०४-०६-२००७ रोजी तयार करुन ठेवली होती. सदर माहिती अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपिलच्या सुनावणीच्या वेळी त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या निदर्शनास आणली होती. तदनंतर अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात दिनांक २७-०८-२००७ रोजी उपस्थित झाले असता त्यांना दिनांक २७-०८-२००७ रोजी माहिती देण्यात आली. याउपरही अपिलार्थीस जादा माहिती हवी असेल तर ती ते अपिलार्थीस देण्यासाठी तयार आहेत. त्यांनी कोणतीही माहिती असद्हेतूने दडविली नाही. माहिती अधिकार अधिनियमातील त्यांचे कर्तव्य त्यांनी यथायोग्यरित्या पार पाडले आहे त्यामुळे त्यांच्यावर कोणतीही कारवाई होऊ नये.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थी यांच्या दिनांक ०२-०७-२००७ रोजीच्या अपील अर्जावर त्यांनी दिनांक ०७-०८-२००७ रोजी

सुनावणी घेऊन दिनांक ०८-०८-२००७ रोजी आपले आदेश पारित केले आहेत. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी हे गैरहजर होते. अपिलार्थीस सुनावणीसाठी दिनांक ०२-०८-२००७ रोजीच्या पत्रान्वये कळविले होते. अपिलार्थीस सदर पत्र स्पीड पोस्टाने पाठविले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिश: माहितीची मागणी केली होती, तथापि त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित झाले नाहीत. कोणत्याही अर्जदाराने त्यांना माहिती अधिकार अधिनियमाव्दारे केलेल्या अर्जावर व्यक्तिश: माहितीची आवश्यकता असेल तर अर्जदाराने स्वत: जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहून ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हस्तगत करुन घेणे अपेक्षित आहे. त्यावेळी अर्जदाराने त्यांच्या अर्जातील माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांचा प्रतिनिधी पाठविणे व मागणी केलेली माहिती प्राप्त करुन घेणे हे देखील या तरतुदीमध्ये अपेक्षित नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी तयार करुन ठेवल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये उपस्थित केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक २ अन्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे राशी-२ कपाशीच्या बियाण्याच्या व खताचा काळाबाजार करुन जादा दराने सदर बियाण्याची व खतांची विक्री केलेली आहे अशा तक्रारी प्राप्त आहेत का अशी माहिती विचारली आहे, तथापि यावर जन माहिती अधिकारी यांनी यासंदर्भात त्यांच्याकडे एकही तक्रार नाही असे अपिलार्थीस कळविले आहे. अपिलार्थी यांच्या मते ही माहिती चुकीची आहे. सदर माहिती चुकीची असल्याबाबत काही वृत्तपत्रातील कात्रणे त्यांनी आयोगासमोर सादर केली. जन माहिती अधिकारी यांचे आजही असे म्हणणे आहे की, त्यांच्याकडे एकही तक्रार प्राप्त झालेली नाही. अपिलार्थीस माहिती देण्याच्या तारखेपर्यत एकही तक्रार प्राप्त

झालेली नाही या मुद्दयावर जन माहिती अधिकारी ठाम आहेत त्यामुळे या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती व अपिलार्थीचे म्हणणे यातील सत्यासत्यतेची जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, जालना यांनी तपासणी करावी, असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.  मुद्दा क्रमांक ५ व्दारे अपिलार्थीने त्यांच्याकडे भरारी पथकाची माहिती मागितली होती, तथापि या मुद्दयाबाबत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ९ भरारी पथके स्थापन केल्याची माहिती दिली आहे, तथापि भरारी पथकाची यादी अपिलार्थीस दिलेली नाही.  मुद्दा क्रमांक ६ व्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून अशा प्रकारे अनियमित रकमा घेता येतात काय असे विचारले आहे.  अपिलार्थीच्या या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस खुलासा केल्याचे दिसून येत आहे.  मूळात अपिलार्थीने या मुद्दयाव्दारे मागितलेली माहिती ही माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्यामुळे व जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय अपेक्षित केले असल्याने ही माहिती अपिलार्थीस देय होत नाही.  मुद्दा क्रमांक ८ ची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली आहे, तथापि या माहितीमध्ये 'कडक कारवाई करण्यात येते', अशासारखी मोघम स्वरुपात त्यांनी अपिलार्थीस माहिती दिल्याचे दिसून येते.  ''कडक कारवाई'' म्हणजे काय व ''नियमानुसार कारवाई'' म्हणजे काय याची तपशीलवार माहिती जन माहिती अधिकारी यांनी, त्यांनी अपिलार्थीस दिलेल्या संदर्भिय माहितीमध्ये दिसून येत नाही.  खत व बियाणे वाटपासंदर्भात जी काही परिपत्रके अथवा यासंदर्भातील शासन अथवा जन माहिती अधिकारी यांच्या वरिष्ठांना काही आदेश निर्गमीत केले असतील तर त्यांच्या अशा प्रकारच्या आदेशाच्या, परिपत्रकाच्या, त्यांच्या मॅन्युअलच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस यासंदर्भात देणे अभिप्रेत आहे.  वरील प्रमाणे अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे पृथक्करण केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २७-०८-२००७ रोजी माहिती दिली

असली तरी ती त्यांनी मोघम स्वरुपात दिली आहे. त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०४-०६-२००७ च्या पत्रान्वये दिनांक २७-०८-२००७ रोजी दिलेली माहिती पाहता ती माहिती अशा त-हेने मोघम स्वरुपाची दिल्याचे दिसून येत आहे.

सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने मागणी केलेली व वर विवेचनामध्ये नमूद केलेल्या मुद्दयावरील स्पष्ट अशी माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत विनामूल्य द्यावी. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांची कार्यालयीन तपासणी करुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भात दिलेल्या माहितीबाबत शहानिशा करुन आवश्यकता वाटल्यास संबंधीतावर आवश्यक ती कारवाई करावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते सदर माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कधीही, स्वतः होऊन हजर झाल्याबाबत कोणताही पुरावा आयोगासमोर त्यांनी सादर केला नसल्याने उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश नाहीत, मात्र येथून पुढे माहिती अधिकार अधिनियमान्वये त्यांच्याकडे प्राप्त होणा-या प्रत्येक अर्जावर त्यांनी सतर्क राहून वस्तुनिष्ठ माहिती अर्जदारास द्यावी, असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली, मागणी केलेल्या मुद्दयावरील वस्तुनिष्ठ माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत विनामूल्य द्यावी.

३. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाची तपासणी करुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भात दिलेल्या माहितीबाबत शहानिशा करुन आवश्यकता वाटल्यास संबंधीतावर आवश्यक ती कारवाई करावी.

औरंगाबाद
दिनांक ०७-०७-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शामराव सुंदरराव खरात, मु. पो. पाथरवाला बु. तालुका अंबड, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३०१

निर्णय दिनांक ०७-०७-२००८

श्री. नारायण ग्यानबा बापमारे, : अपिलार्थी

मु. पो. मंगरुळ नं. १, तालुका माजलगाव,

जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तहसील कार्यालय, माजलगाव,

तालुका माजलगाव, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा तहसीलदार, माजलगाव,

तालुका माजलगाव, जिल्हा बीड

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (म.) तहसील कार्यालय, माजलगाव, जिल्हा बीड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-०७-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. किशन भानुदास जाधव, जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म.) तहसील कार्यालय, माजलगाव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी

असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. नारायण ग्यानबा बापमारे व जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, माजलगाव हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक ०२-०४-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील उप अभियंता जिल्हा परिषद बांधकाम, जिल्हा परिषद उपविभाग माजलगाव यांना लिहिलेल्या पत्राच्या नकला व दिनांक ०५-०७-२००४ च्या पंचनाम्याच्या नक्कलेबाबत सन २००४ ते ०२-०४-२००७ या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> " वर दर्शविल्याप्रमाणे आपण उप अभियंता जि. प. बांधकाम व उप अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग माजलगाव यांना (१) पत्रक क्र. २००४/जमाबंदी/ एक/कावी/ १२० तहसील कार्यालय माजलगाव दिनांक १५/७/०४ ला (२) पत्रक क्र. २००४/एलएनडी /२/डब्लूएस/ तहसील कार्यालय माजलगाव दिनांक ४/८/०४ ला (३) प. क्र. २००४/रोहयो/कावी/तहसील कार्यालय माजलगाव दिनांक १/११/०४ ला (४) प. क्र. २००४/रोहयो/कावी/ तहसील कार्यालय माजलगाव दिनांक ७/१२/०४ ला (५) प. क्र. २००४/रोहयो/ कावी/तहसील कार्यालय माजलगाव दिनांक २२/१२/०४ ला (६) प. क्र. २००५/ रोहयो/कावी/तहसील कार्यालय माजलगाव दिनांक १७/२/०५ ला पत्रक काढून स. नं. २२२/१ शिवार सावरगाव येथील रोडचे व नालीचे काम करुन अहवाल देण्यास आदेशीत केले होते. परंतु या पत्रकाचे अनुपालन अद्यापपर्यंत संबंधीताकडून झालेले नाही. तरी याबाबत आपण काय कार्यवाही करणार आहात ते कळवणे व वर दर्शविलेल्या पत्रकाच्या अधिकृत नकला देणे ही विनंती. याच संदर्भात दिनांक ५/७/०४ ला पंचनामा झालेला आहे त्या पंचनाम्याची अधिकृत नक्कल द्यावी ही विनंती. तसेच हे काम कधी करुन देणार तो दिनांक कळवणे हि विनंती. "

अपिलार्थीने सदर माहिती शीघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या अर्जावर अधिनियमातील विहित तरतुदी नुसार जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०५-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी, कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे अथवा यासंदर्भात अपिलार्थीशी कोणताही पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-०८-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांच्या कडून त्यांना कोणतीही माहिती दिली गेली नाही. आवश्यक ते शुल्क त्यांना लिहिलेल्या पत्रामध्ये नमूद केले नाही व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या अपिलावर अधिनियमाव्दारे कोणताही निर्णय दिला नसल्याने त्यांना अधिनियमातील कलम २० अन्वये विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० याप्रमाणे शास्ती लावण्याची व त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करण्याची आयोगास विनंती केली आहे. तसेच त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य प्राप्त व्हावी असेही त्यांनी या अपील अर्जामध्ये म्हटले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या शेतातून रस्ता बांधला गेल्याने त्यांच्या शेताच्या झालेल्या नुकसानीबद्दल तहसीलदार यांच्याकडे केलेल्या अर्जासंदर्भात जो तहसीलदाराने जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम विभाग, महसूल व जिल्हा परिषद माजलगाव यांच्याकडे पाठविला होता. त्यासंदर्भात माहिती मागवली आहे. सदर अर्ज त्यांनी सार्वजनिक बांधकाम व जिल्हा परिषदेच्या उपविभागाकडे पाठविल्याने अपिलार्थीच्या मूळ तक्रारी अर्जाची प्रत संबंधितांकडून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस त्यांना पुरविता आली नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये दिनांक ०५-०७-२००४ रोजी झालेल्या पंचनाम्याची अधिकृत नक्कल मागितली होती. तथापि सदर नक्कल त्यांच्याकडे उपलब्ध नाही.

त्यांनी केलेला खुलासा समाधानकारक नाही, तसेच अपिलार्थीस आता देण्यासाठी प्रस्तावित केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता अपिलार्थीच्या मूळ माहितीच्या मागणीशी सदर माहिती पूर्णतः विसंगत असल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास दाखविलेल्या अपिलार्थीस देऊ करण्यासाठी तयार केलेल्या कथित माहितीच्या तारखा व अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमधील तारखा या पूर्णपणे भिन्न आहेत. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेल्या तारखेचा कोणताही अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला नाही का अशी विचारणा केली असता त्यावर जन माहिती अधिकारी यांनी कोणतेही उत्तर दिले नाही. अशा त-हेने त्यांना पूर्ण संधी देऊनही ते आयोगापुढे आपल्या कृतीचे समर्थन समाधानकरक खुलासा करु शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये, जन माहिती अधिकारी यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद यांना दिलेल्या पत्राच्या प्रती त्यांनी केलेल्या अर्जावर जन माहिती अधिकारी हे काय कार्यवाही करणार आहेत व दिनांक ०५-०७-२००४ रोजी झालेल्या पंचनाम्याच्या प्रतीची व सदर काम

जन माहिती अधिकारी कधी करुन देणार आहेत याची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील जन माहिती अधिकारी काय कार्यवाही करणार व त्यांचे काम कधी करुन देणार आहेत या मुद्दयावरील माहिती, अधिनियमाव्दारे विहित केलेल्या कलम २ (च) व्दारे स्पष्ट केलेल्या ''माहिती'' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. अपिलार्थीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रत्यक्ष (वर्तमानकाळात) उपलब्ध असलेल्या वेगवेगळ्या स्वरुपातील अभिलेख अर्जदाराच्या विनंतीनुसार त्यांना दिले अशा प्रकारची कार्यवाही अभिप्रेत आहे. या प्रक्रियेमध्ये जन माहिती अधिकारी हे काय कार्यवाही करणार, अर्जदाराचे काम कधी करुन देणार अशा प्रकारे भविष्यातील प्रस्तावित माहिती अर्जदारास देणे अपेक्षित नाही त्यामुळे या दोन मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस देय ठरत नाही, मात्र जन माहिती अधिकारी यांनी वेगवेगळ्या यंत्रणांना लिहिलेली पत्रे आणि दिनांक ०५-०७-२००४ रोजीचा पंचनामा याच्या प्रती त्यांना अपिलार्थीस पुरवाव्या लागतील. माहिती अधिकार अधिनियम अंमलात येऊन आता अडीच वर्षाहून जास्त कालावधी लोटला असूनही उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाची व या अर्जास केलेल्या उपेक्षेची सखेद नोंद आयोग घेत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीनंतरही प्रतिसाद दिला नाही तर जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीनंतरही निर्णय न देऊन अधिनियमातील कलम १९ (६) चा भंग केला आहे. अपिलार्थीच्या अर्जाचे या प्रकरणामध्ये महसूल विभागाच्या अधिका-यांकडून करण्यात आलेल्या उपेक्षेचे कोणतेही समर्थन असू शकत नाही, असे आयोगाचे मत आहे. केवळ जन माहिती अधिकारी याच्या मनातील इच्छाशक्तीचा अभाव व कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव हीच दोन कारणे, अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवण्यासाठी येथे असल्याचे दिसून येत आहेत. आपल्या अशा प्रकारच्या कृतीमुळे जन

माहिती अधिकारी यांनी स्वत:ला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार कोणत्याही अर्जदारास माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे जे संबंधीत सहाय्यक / कर्मचारी जबाबदार आहेत त्यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे, हे पाहता या प्रकरणी अपेक्षित माहिती प्राप्त होण्यापासून प्रदीर्घ कालावधी करिता वंचित ठेवल्याबद्दल संबंधीत जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्याकरिता जबाबदार असलेले त्यांचे सर्व सहाय्यक अधिकारी / कर्मचारी एकत्रितपणे जबाबदार ठरत आहेत.

सबब असे आदेशित करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असलेले त्यांचे सर्व सहाय्यक अधिकारी / कर्मचारी यांना या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती लावण्यात येत आहे.

सदर शास्तीचा भरणा जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांनी शासकीय कोषागारात लेखा शिर्ष संकेतांक - ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) - या लेखाशीर्षाखाली जास्तीत जास्त पाच हप्त्यात करावा.

सदर शास्तीची अधिकारी / कर्मचारीनिहाय विभागणी उपविभागीय अधिकारी (महसूल), अंबाजोगाई, जिल्हा बीड यांनी हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत करावी व संबंधीत अधिकारी / कर्मचारी हे सदर शास्तीचा भरणा नियमीतपणे ऑगस्ट २००८ पासून शासकीय कोषागारात करतील असे पहावे व यासंदर्भातील आपला अनुपालन अहवाल ऑगस्ट २००८ पासून पुढे दरमहा सदर शास्तीची रक्कम शासकीय कोषागारात पूर्णपणे भरुन होईपर्यंत आयोगास सादर करावा. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन

माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहाय्यक / कर्मचारी यांना अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यापासून प्रदीर्घ काळाकरिता वंचित ठेवल्याबद्दल त्यांच्यावर रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदरील शास्तीचा भरणा त्यांनी वरील निर्णयामध्ये दिलेल्या सुचने प्रमाणे करावा.

४. उपविभागीय अधिकारी (महसूल) अंबाजोगाई, जिल्हा बीड यांनी वरील आदेश क्रमांक ३ च्या संदर्भातील आपला अनुपालन अहवाल ऑगस्ट २००८ पासून नियमीतपणे दरमहा आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक ०७-०७-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. नारायण ग्यानबा बापमारे, मु. पो. मंगरुळ नं. १, तालुका माजलगाव, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म.) तहसील कार्यालय, माजलगाव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, माजलगाव, तालुका माजलगाव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ उपविभागीय अधिकारी (महसूल), अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जिल्हा कोषागार अधिकारी, बीड, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३०२

निर्णय दिनांक ०७-०७-२००८

श्री. जनार्दन दत्तात्रय साळी, : अपिलार्थी
राखे वाडा, पोस्टासमोर कचेरी रोड,
जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा तालुका कृषि अधिकारी, भोकरदन,
जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपविभागीय कृषि अधिकारी,
जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-०७-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. भगवान नरसिंगू बोंदरवाड, जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, भोकरदन (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. अशोकराव रामराव काळे, जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, जालना (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. जनार्दन दत्तात्रय साळी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, दिनांक १०-०८-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील आज सुनावणीसाठी विचाराधीन आहे. या प्रकरणात आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १०-०५-२००७ रोजीच्या प्रथम अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे भोकरदन तालुक्यासाठी कृषि विभागाकडे असणा-या कृषि योजना, योजनांतर्गत प्राप्त झालेला व खर्च झालेला निधी, निधी वितरणासाठी लावण्यात आलेले निकष या मुद्दयावर माहिती विचारली होती. अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास, जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १०-०५-२००७ रोजी प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक त्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ४० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांना पुरविण्यात येणा-या माहितीच्या पृष्ठांची संख्या व प्रतिपृष्ठ दर कळविल्याचे दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०६-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी, कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही, मात्र त्यांनी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्याकडील दिनांक १९-०६-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस आवश्यक ती माहिती देण्याचे सूचित केले आहे. तथापि सदर माहिती तयार असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयात आवश्यक ते शुल्क भरले नसल्याने दिली नाही, परंतु तदनंतर उपविभागीय कृषि अधिकारी यांच्याकडून जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झालेल्या दूरध्वनी संदेशान्वये त्यांनी अपिलार्थीस ही माहिती दिनांक ११-०८-२००७ रोजी विनामूल्य उपलब्ध करुन दिली. सदर माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याच्या

पृष्टयर्थ अपिलार्थीची पोचसही असलेल्या त्यांच्या दिनांक ११-०८-२००७ रोजीच्या पत्राची झेरॉक्स प्रत त्यांनी आयोगास दाखविली. सदर पत्र त्यांनी आयोगासमोर साक्षांकीत करुन दिले आहे. यावरुन अपिलार्थीस दिनांक ११-०८-२००७ रोजी माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येते. याचवेळी अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०८-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये, त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे अपील केल्यानंतर दोन दिवसांनी अपेक्षित असलेली माहिती त्यांना प्राप्त झाली असल्याने, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या कथित माहितीचे अवलोकन करता ही माहिती अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीशी सुसंगत असल्याने, अपिलार्थीच्या व्दितीय अपील अर्जावर सुनावणी घेण्याचे कोणतेही कारण आयोगास दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडून अपेक्षित असलेली कार्यवाही अधिनियमातील विहित मुदतीत केली आहे तर अपिलार्थी हे व्यक्तिशः माहितीची मागणी करुन जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित झाले नाहीत असे त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये आज रोजी आयोगासमोर स्पष्ट केले आहे. त्यांच्या या विधानाचे खंडण करण्यासाठी आज सुनावणीसाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीस या प्रकरणी माहिती देण्यासाठी जो काही विलंब झाला आहे त्याला अपिलार्थी हेच स्वतः जबाबदार आहेत, कोणत्याही अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यास माहिती प्राप्त करुन घेण्याची संपूर्ण जबाबदारी ही अर्जदाराची असते. व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे कधीही उपस्थित न झाल्याने अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपिलातील त्यांना माहिती प्राप्त होण्यासाठी झालेल्या विलंबाबाबतचा हा मुद्दा येथे विचारात

घेणे योग्य ठरणार नाही असे आयोगाचे मत आहे. त्यामुळे अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे, अशा निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थी यांनी उपरोक्त प्रकरणी व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते त्यांच्या कार्यालयामध्ये आवश्यक ती माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कधीही उपस्थित झाले नाहीत तसेच अपिलार्थीचा अर्ज ज्या दिवशी त्यांच्याकडे प्राप्त झाला त्याच दिवशी त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ते शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे त्यांच्या दिनांक १०-०५-२००७ रोजीच्या पत्रान्वये सूचित केले आहे.

सबब खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ०७-०७-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. जनार्दन दत्तात्रय साळी, राखे वाडा, पोस्टासमोर कचेरी रोड, जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३४२

निर्णय दिनांक ०७-०७-२००८

श्री. इनामदार अय्युब अब्दुलशुकूर : अपिलार्थी
इनामदार, मु. पो. केसरजवळगा,
तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा अध्यक्ष, जलस्वराज्य प्रकल्प ग्राम
पाणीपुरवठा व स्वच्छता समिती,
केसरजवळगा, तालुका उमरगा, जिल्हा
नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी,
जलस्वराज्य प्रकल्प, जिल्हा परिषद,
उस्मानाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-०७-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. इनामदार अय्युब अब्दुलशुकूर इनामदार (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, जलस्वराज्य प्रकल्प ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती, केसरजवळगा व जन

अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जलस्वराज प्रकल्प, जिल्हा परिषद, उस्मानाबाद हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक १७-०५-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे केसरजवळगा गावातील राबविल्या गेलेल्या जलस्वराज्य प्रकल्पाअंतर्गत खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"१. जलस्वराज प्रकल्पाअंतर्गत करावयाच्या कामाचे स्वरुप.

२. जलस्वराज प्रकल्पाअंतर्गत जमा केलेला लोकवाटा व त्यांची नांवे.

३. जलस्वराज प्रकल्पाअंतर्गत आलेला शासकीय अनुदान झालेला खर्च, अंदाजपत्रक, किर्द उतारा, आणि आढावा.

४. जलस्वराज प्रकल्पाअंतर्गत झालेल्या ग्रामसभेचे प्रोसेडिंगची नक्कल.

५. महिला सक्षमीकरणासंबंधी आलेला निधी व झालेला खर्च. "

अपिलार्थीने सदर माहिती शीघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास, जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी, कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही, मात्र त्यांनी त्यांच्याकडील दिनांक १७-०७-२००७ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस तात्काळ माहिती देण्याचे सूचित केले.

जन अपिलीय अधिकारी यांनी सूचना देऊनही जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०९-

२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये, त्यांनी त्यांना माहिती न दिल्याचे नमूद करुन जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांनी प्रथम अपील करुनही जन माहिती अधिकारी यांच्यावर कोणतीही कारवाई केली नसल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी, अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, केसरजवळगा या गावी जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत प्राप्त झालेल्या निधीमध्ये गैरव्यवहार झाल्याची त्यांना शंका असल्याने त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे आपल्या दिनांक १७-०५-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे काही माहिती मागविली होती, तथापि सदर माहिती जन माहिती अधिकारी यांनी स्वतःहून दिली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित करुनही त्यांना ही माहिती त्यांच्याकडून प्राप्त होऊ शकली नाही. सदर प्रकरणी झालेल्या गैरव्यवहाराच्या तपासणीकरिता आजही या माहितीची त्यांना आवश्यकता आहे, तसेच त्यांना आजतागायत जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कोणतीही माहिती न दिल्याने त्यांच्यावर यथोचित प्रशासकीय कारवाई व्हावी अशी त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये शेवटी आयोगास विनंती केली आहे.

आज सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी गैरहजर असल्याने त्यांच्या युक्तिवादाची नोंद आयोगास घेता आली नाही.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीने मागितलेली माहिती ही ग्रामपंचायत स्तरावरील, संबंधीत ग्रामपंचायतीने नियुक्त केलेल्या अध्यक्षाशी ती संबंधीत आहे. सर्वसाधारणपणे जन माहिती अधिकारी म्हणून ग्रामपंचायत स्तरावर जिल्हा परिषदेमार्फत ग्रामसेवक या पदावरील कर्मचारी नियुक्त केलेले आहेत. जलस्वराज्य प्रकल्प योजनेअंतर्गत सदर ग्रामसेवक हे शासनाचे कर्मचारी असून, जलस्वराज्य प्रकल्प योजनेंतर्गत ग्रामपंचायत स्तरावर या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता

समिती या शिर्षकाखाली एक समिती नेमलेली असते. सदर समितीचे अध्यक्ष संबंधीत ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेने निवडून दिलेले त्याच गावातील एक लोकप्रतिनिधी असतात. सदर समिती ग्रामसेवकाच्या नियंत्रणाखाली काम करते. अध्यक्ष, ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती हे अशा त-हेने सरकारी सेवेतील नियमीत कर्मचारी नसतात. अपिलार्थीने मूळात माहिती अध्यक्ष / सचिव ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती केसरजवळगा यांचेकडे, जे नियमीत शासकीय कर्मचारी नाहीत यांच्याकडे माहिती मागितली आहे. वास्तविक पाहता अध्यक्ष, ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती यांनी या प्रकरणी अपिलार्थीचा प्राप्त झालेला अर्ज संबंधीत ग्रामपंचायतच्या ग्रामसेवकाकडे ५ दिवसाच्या आत पाठविणे भाग होते, तथापि त्यांनी अशा त-हेची कोणतीही कृती केली नाही. अपिलार्थीने उप मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्याकडे संबंधीतांकडून त्यांना आवश्यकता ती माहिती प्राप्त न झाल्याने दिनांक ०८-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले. जिल्हा परिषद उप मुख्य कार्यकारी अधिकारी, यासारख्या जबाबदार व्यक्तीने अपिलार्थीच्या अर्जाचे अवलोकन केल्यानंतर अपिलार्थीने मूळात चुकीच्या प्राधिकरणाकडे अर्ज केला आहे ही बाब त्यांच्या ध्यानात यावयास हवी होती, तथापि त्यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जाचे व प्रथम अर्जाचे लक्षपूर्वक वाचन केल्याचे आढळून येत नाही, अन्यथा त्यांनी समितीच्या अध्यक्षांना अपिलार्थीस माहिती देण्याची सूचना करणारे त्यांचे दिनांक १७-०७-२००७ रोजीचे चुकीचे पत्र पाठविले नसते. या पत्रामध्ये त्यांनी संबधीत जन माहिती अधिकारी यांना माहिती देण्यात काही अडचण असल्यास त्यांच्या कार्यालयाचे मार्गदर्शन घेण्यासाठी सूचना केली होती, तथापि अशा प्रकारचे मार्गदर्शन ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीच्या अध्यक्षांनी त्यांच्याकडे मागितल्याचे दिसून येत नाही. या सर्व चुकीच्या प्रक्रियामुळे जन अपिलीय अधिकारी यांच्या पुरेशा ज्ञानाअभावी अपिलार्थी मात्र त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून विनाकारण वंचित राहिल्याचे या प्रकरणी सिध्द होत आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर चुकीचा निर्णय देऊन संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य

परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेची नोंद मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना आता असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी ते जरी जन अपिलीय अधिकारी असले तरी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १७-०५-२००७ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी, तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी अध्यक्ष जलस्वराज्य प्रकल्प ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती केसरजवळगा यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या प्रकरणासंदर्भात दाखविलेल्या निष्काळजीपणा व बेपर्वाईबाबत त्यांच्यावर प्रचलीत नियमाप्रमाणे यथायोग्य कारवाई हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी उपरोक्त प्रकरणी अध्यक्ष ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती, केसरजवळगा यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल त्यांच्यावर प्रचलीत

नियमाप्रमाणे यथायोग्य कारवाई हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन आपला अनुपालन अहवाल आयोगास तदनंतर १ महिन्याच्या आत सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक 07-07-2008

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. इनामदार अय्युब अब्दुलशुकूर इनामदार, मु. पो. केसरजवळगा, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, जलस्वराज्य प्रकल्प ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती, केसरजवळगा, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जलस्वराज्य प्रकल्प, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३४३

निर्णय दिनांक ०७-०७-२००८

श्री. रमेशचंद्र श्रीरामजी रामावत, : अपिलार्थी
जेल कॉर्नर, साईबाबा मंदिरासमोर,
अंबाजोगाई, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद,
अंबाजोगाई, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप आयुक्त (साप्रवि), विभागीय
आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-०७-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. रमेशचंद्र श्रीरामजी रामावत (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. देविदास शिवाजीराव जाधव, जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, अंबाजोगाई (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. सोमनाथ गुंजाळ, जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (साप्रवि), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक २३-०३-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे बडा हनुमान तलाव विकास कामाच्या क्वॉलिटीसंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" बडा हनुमान तलाव विकास कामाची क्वॉलिटी तपासनी करण्याबाबत तपासणी करण्याचे मुद्दे :-

१. गाळ काढलेले प्रमाण व गाळ टाकलेली जागा.

२. तळ्याचे पिचिंग केलेले काम.

३. भर घातलेले ठिकाण व भर टाकलेली वस्तु तपासणी.

४. वॉल कम्पाऊंड करीता वापरलेले सिमेंटचा दर्जा, प्रमाण.

५. वॉल कम्पाऊंडसाठी वापरलेले दगड साईज.

६. वॉल कम्पाऊंडचे बेस.

७. जाळ्याची गुणवत्ता, प्रमाण नग.

वरील मुद्देनिहाय तपासणी करण्याकरीता त्वरित कळवावे ही विनंती. उपजिल्हाअधिकारी साहेबांनी न. प. मुख्याधि-यांना कळवून तपासनी करण्याच्या अधिकाराखाली त्वरित कळविण्याकरीता कळवावे हि विनंती. "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः हवी की टपालाव्दारे हवी आहे याचा या अर्जामध्ये काहीही उल्लेख केलेला नाही.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने ज्या कामाची माहिती मागवली होती त्या कामासंदर्भातील सर्व अभिलेख्यांची तपासणी त्यांनी केली असल्याने अपिलार्थीने परत तपासणी करण्याकरिता सदर अभिलेखे त्यांना पाहणीसाठी उपलब्ध करुन देण्याची

त्यांनी तयारी दर्शविली.  या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती पुरविल्याचे दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-०५-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे.  या अपील अर्जामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जाणुनबुजून माहिती देण्याचे टाळले, त्यांच्याकडून आधी रक्कम वसूल केली नाही, त्यांना अपील करण्यास भाग पाडले इत्यादी मुद्दे उपस्थित करुन जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्तीची, शिस्तभंगाची कारवाई करण्याची, शिफारस करण्याची आयोगास विनंती केली आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी, दिनांक १८-०७-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक २१-०७-२००७ रोजी पारित केले.  या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करुन, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या सुचनेनुसार जन माहिती अधिकारी यांनी परत अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०२-०८-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहितीसंदर्भात कळविल्याचे दिसून येत आहे.

तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या निर्णयाने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०९-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये त्यांना दिशाभूल करणारी, चुकीची माहिती दिली आहे, तसेच दिनांक ०२-०८-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांनी पाठविलेल्या त्यांच्या पत्रामधील माहिती चुकीची

असून, या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांना तपासणीचा दिवस व वेळ, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी करुनही कळविला नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी देखील जन माहिती अधिकारी यांना दोषी ठरविले आहे. त्यांनी मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे संदर्भीय कामाच्या तपासणीबाबत विचारणा केली होती, तथापि यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांना प्रत्यक्ष काम दाखविण्यासंदर्भात कोणतीही कार्यवाही केली नाही. अपिलार्थीने त्यांना काम दाखविण्यासंदर्भात विनंती केली होती हे जन माहिती अधिकारी यांनी आज सुनावणीमध्ये मान्य केले. सदर काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्यामुळे या कामाची सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दक्षता व गुणनियंत्रण मंडळामार्फत चौकशी केली जावी व या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना नाहक खर्चास भाग पाडल्याबद्दल अधिनियमाव्दारे विहित केलेल्या कलम १९ (८) (ब) प्रमाणे रुपये ३००० इतकी नुकसानभरपाई मिळावी व जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमाच्या कलम २० प्रमाणे कारवाई व्हावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दक्षता व गुणनियंत्रण मंडळामार्फत अपिलार्थी यांच्यासोबत या कामाची संख्या पाहणी करण्याची त्यांनी आयोजिले होते व त्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस चौकशीकामी तोंडी अवगत केले होते. तथापि अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून अशा प्रकारच्या तपासणीविषयी त्यांना काहीही अवगत केले नाही असे अपिलार्थीने यावेळी आयोगास सांगितले. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दक्षता व गुण- नियंत्रण मंडळातर्फे अद्यापही या कामाची तपासणी झालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनाक २०-०४-२००७ रोजीच्या पत्रामध्ये याच कामाविषयीची माहिती त्यांना कळविली असल्याचे नमूद केले होते व त्याचबरोबर या कामाशी संबंधीत सर्व अभिलेखे पाहण्यासाठी उपलब्ध करुन देण्याची तयारी दर्शविली होती.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, मूळात अपिलार्थीने हा अर्ज त्यांनी मागितलेली माहिती ज्या प्राधिकरणाकडे उपलब्ध आहे अशा प्राधिकरणाकडे न करता, तो उपविभागीय अधिकारी कार्यालय, अंबाजोगाई यांच्याकडे केला होता. उपविभागीय अधिकारी यांनी सदर अर्ज दिनांक २६-०३-२००७ रोजी या माहितीशी संबंधीत प्राधिकरणाकडे पाठवून दिला, त्यांनी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) अन्वये विहित मुदतीत कार्यवाही केली आहे. त्यांच्या अपील अर्जावर त्यांनी दिनाक १८-०७-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक २१-०७-२००७ रोजी पारित केले आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांना, " वरील मुद्देनिहाय तपासणीकरिता त्वरीत कळवावे" अशी तपासणीची मागणी केल्याचे दिसून येत आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (ञ) मधील तरतुदीनुसार अपिलार्थी यांना एखाद्या कामाच्या तपासणीची मागणी करण्याचा हक्क आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस संबंधीत कामाची तपासणी करण्यासाठी आवश्यक ते शुल्क आकारुन अपिलार्थीस कामाच्या तपासणीसंदर्भात व्यवस्था करणे अधिनियमातील तरतुदीप्रमाणे आवश्यक आहे, तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही न करता ते अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या मुद्दयावर माहिती देत राहिले. जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या अपील निर्णयामध्ये त्यांनी माहिती अधिका-यास ७ दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचित केले आहे. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली. अपिलार्थीच्या अर्जाची पाहणी केली असता, अपिलार्थीने तपासणीची मागणी करुनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक ०२-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे काही

माहिती दिल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने त्याच्या प्रथम अर्जामध्ये उपस्थित केलेले मुद्दे या तपासणीनंतर अपिलार्थीस सविस्तर स्वरुपात पुरविण्यात येणे शक्य आहे.

सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस सदर कामाची तपासणी करावयाच्या कामी ७ दिवसाच्या आत कळवावे, या तपासणीच्या वेळी अपिलार्थी यांच्या मूळ अर्जासंबंधीत सर्व माहिती अपिलार्थीस वस्तुनिष्ठ स्वरुपात उपलब्ध होईल याची दक्षता घ्यावी. अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये ज्या कामाची सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दक्षता व गुणनियंत्रण मंडळामार्फत तपासणी करुन घेण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे व त्याचबरोबर जन माहिती अधिकारी यांनी संबंधीत दक्षता व गुणनियंत्रण विभागाला कळविले असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी सुनावणीमध्ये सांगितले आहे, यासंदर्भातील निर्णय जन माहिती अधिकारी यांना तातडीने हवा असल्याने जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या नगरपरिषदेकडील प्रचलीत नियम संकेतांच्या आधीन राहून आवश्यक वाटल्यास दक्षता व गुणनियंत्रण मंडळाकडे यासंदर्भात आवश्यक तो पाठपुरावा करण्यासंदर्भात कार्यवाही करावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये एकूण रुपये ३००० इतक्या नुकसानभरपाईची मागणी केली आहे. अपिलार्थी हे अंबाजोगाई येथील रहिवासी असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने कामाची तपासणी करण्याची मागणी करुनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना तपासणीची तारीख व वेळ न कळविता ते माहिती देत राहिले ती देखील दिशाभूल करणारी व चुकीची. त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या अर्जातील माहिती संदर्भात आयोगाकडे विनाकारण उपस्थित राहावे लागले. अपिलार्थीचा हा मुद्दा मान्य करण्यात येऊन त्यांना अंबाजोगाई ते औरंगाबाद व परत असे या प्रकरणी रुपये ४०० इतकी नुकसानभरपाई, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (ख) च्या तरतुदीप्रमाणे मान्य करण्यात येत आहे. अपिलार्थीस सदर रक्कम जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत अदा करावी.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे नीट वाचन न करुन अपिलार्थीस आवश्यक तो प्रतिसाद अधिनियमातील विहित तरतुदीनुसार न देऊन आपल्य कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे असे आयोगाचे मत आहे. जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील अशा प्रकारच्या कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल उप आयुक्त (सा. प्र. वि.) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांनी त्यांच्यावर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत करुन आपला अनुपालन अहवाल आयोगास तदनंतर १ महिन्याच्या आत सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या कामाच्या तपासणीचा दिनांक व वेळ, हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत अपिलार्थीस कळवावी. तपासणीसाठी अपिलार्थी यांनी स्वखर्चाने या कामाच्या ठिकाणी जावे.

३. जन माहिती अधिकारी यांनी, या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल उप आयुक्त (सा. प्र. वि.) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांनी त्यांच्यावर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई

हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत करुन आपला अनुपालन अहवाल आयोगास तदनंतर १ महिन्याच्या आत सादर करावा.

४. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या प्रकरणी नुकसानभरपाई म्हणून रुपये ४०० इतकी रक्कम त्यांना तीन दिवसाचे आत अदा करावी.

औरंगाबाद
दिनांक ०७-०७-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रमेशचंद्र श्रीरामजी रामावत, जेल कॉर्नर, साईबाबा मंदिरासमोर, अंबाजोगाई, जिल्हा बीड .

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (साप्रवि), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३०३

निर्णय दिनांक : ०८.०७.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. व्यंकटेश लक्ष्मणराव पाटील<br>औरंगाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग,<br>बीड. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा अधीक्षक अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम मंडळ,<br>उस्मानाबाद. | : | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८.०७.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. वसंत खुशाल बावीस्कर, जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री.गोपाळ ग्यानोबा तावशीकर,प्रभारी सहा.अधीक्षक अभियंता,सा.बां.मंडळ,उस्मानाबाद, जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर अपिलार्थी श्री. व्यंकटेश लक्ष्मणराव पाटील (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांच्याकडील दि.२२.२.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००६-२००७ या कालावधीशी संबंधित त्यांच्या कार्यालयातर्फे केल्या जाणाऱ्या कामांची खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> " १) सन २००६-०७ या वर्षाचा ब व क अंतर्गत मंजुर कामाचे कार्यआरंभ आदेश (२) सन २००६-०७ संवर्ग 'अ' अंतर्गत मंजूर कामे, त्याचे कार्यारंभ आदेश पूर्ण झालेली कामे, लिहिलेली बीले व अदा केलेली देयके (३) मा.कार्यकारी अभियंता श्री. बावीस्कर यांनी पदभार स्विकारल्यानंतर आजपर्यंत विभागाअंतर्गत कामाची अदा केलेली देयके व कामाची नावे.
>
> कालावधी-मुद्दा १ व २ साठी २००६-०७. मुद्दा क्र.३ साठी विचारल्याप्रमाणे.
>
> मुद्दा क्र.१- सन २००६-०७ ,३०५४ रस्ते व पुल (योजनेतर /ब व क) अंतर्गत मंजूर कार्यक्रमासाठी ४६०.४७ लक्ष रुपए एवढी तरतुद उपलब्ध झाली आहे. या संवर्गाअंतर्गत मंजूर कामापैकी किती कामाचे कार्यारंभ आदेश देण्यात आले आहे. त्यापैकी किती कामांना प्रत्यक्ष सुरवात झाली, किती कामे पूर्ण झाली,किती कामाचे बील लिहीण्यात आले, कामे कोणत्या एजन्सी अथवा मजूर संस्थेस दिली गेली. मुददा क्र. २-सन २००६-०७ संवर्ग 'अ' मध्ये किती कामे मंजूर झाली. त्यासाठी किती तरतुद होती. कामे कोणती व कुठल्या ठिकाणची सविस्तर तपशील, तसेच यापैकी किती कामे सुरु झाली, किती पूर्ण झाली, कितींना कार्यारंभ आदेश देण्यात आले. कितीचे बील लिहिले व कितीचे देयके देण्यात आली. मुद्दा क्र.३ मा.कार्यकारी अभियंता श्री. बाविस्कर बीड येथे पदभार स्विकारल्यापासून किती कामाचे देयके अदा केली व ती कामे कोणती ?"

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १७.३.२००७ च्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती प्राप्त होण्यासाठी आवश्यक ते शुल्क रु. ५५०/- इतके जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या सूचनेनुसार अपिलार्थीने दि. २६.३.२००७ रोजी रु. ५५०/- इतक्या रकमेचा

भरणा त्यांच्या नियंत्रणाखालील सार्वजनिक बांधकाम उपविभाग, बीड यांच्या कार्यालयात करुन, त्याच दिवशी सदर माहिती हस्तगत करुन घेतली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१६.०४.२००७रोजी प्रथम अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडून आवश्यक ते शुल्क घेण्याचे नाकारले, त्यांनी अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे नमूद केले आहे. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ११.०५.२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दि. २३.५.२००७ रोजी पारित केले. सदर आदेश जन अपिलीय अधिकारी यांच्या वतीने त्यांच्या कार्यालयातील दुय्यम दर्जाच्या अधिकाऱ्याने दिल्याचे दिसून येते. कोणत्याही अपिलावर निर्णय देताना, निर्णय देणाऱ्या अधिकाऱ्याचीच या निर्णयासंदर्भातील आदेशावर सही असणे भाग आहे. तथापि या प्रकरणी संबंधित अधीक्षक अभियंता यांनी त्यांच्या कार्यालयातील दुय्यम दर्जाच्या अधिकाऱ्याच्या सहीने सदर आदेश निर्गमित केल्याचे दिसून येत आहेत. या आदेशाद्वारे जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना या माहितीतील अ.क्र. ४१ ते ५० या कामाची माहिती दुरुस्त करुन ती अपिलार्थीस विनामूल्य पुरविण्याचे सूचित केले आहे. तसेच उर्वरित माहिती संदर्भात,त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस दिलेल्या माहितीचे पुन्हा अवलोकन करुन, परिपूर्ण माहिती अपिलार्थीस देण्याचे आदेशित करुन अपील निकाली काढले आहे. जन माहिती अधिकारी यांनी दि. ३१.५.२००७ रोजीच्या पत्रान्वये कथित परिपूर्ण, अचूक माहिती अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाने पाठविली. तथापि या माहितीने अपिलार्थीचे समाधान न झाल्याने व त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याचे वाटल्यावरुन व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३)

अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.०८.२००७ रोजी द्वितीय अपील सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याचे नमूद करुन व जन माहिती अधिकारी यांनी दोन वेळा दिलेल्या माहितीमध्ये तफावत असल्याचे नमुद करुन त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्याची व जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) व २०(२) प्रमाणे कारवाई करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तीवादाचे वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेल्या द्वितीय अपिलातील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तीवाद समजून अपिलाची सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक २२.२.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीसाठीचे आवश्यक ते शुल्क दि. २६.३.२००७ रोजी त्यांनी भरल्यानंतर त्यांनी त्याच दिवशी ती माहिती व्यक्तीशः त्यांना हस्तांतरित केली. प्रथमतः अपिलार्थीस माहिती देण्यामध्ये नजरचुकीने काही चूक झाल्याचे आढळून आल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीपैकी प्रगतीपथावरील कामाच्या माहितीतील अ.क्र.४१ ते ५० ही कामे निविदास्तरावर दाखविण्यात आली होती व त्यासंबंधीची कंत्राटदारांची नावे या यादीमध्ये देण्यात आली होती, ती नजरचुकीने नमूद केली गेली होती. त्यानंतर या चुकीची दुरुस्ती करुन दि.३१.५.२००७ रोजी अपिलार्थीस दुरुस्त माहिती विनामूल्य पुरविण्यात आली. अपिलार्थीस त्यांनी आता पूर्ण माहिती दिली असल्याने अपिलार्थीचे अपील निकाली काढावे, अशी त्यांनी आपल्या युक्तीवादामध्ये शेवटी आयोगास विनंती केली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तीवाद केला की, अपिलार्थीच्या दि. १६.४.२००७ च्या अपील अर्जावर दिनांक २३.५.२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस

अचूक व परिपूर्ण माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सूचित केले होते. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी दि. ३१.५.२००७ रोजी चुकीची दुरुस्ती करुन अपिलार्थीस माहिती दिली आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पाठविलेली माहिती (दुरुस्त माहितीसह) ही दिशाभूल करणारी आहे, असे त्यांना वाटत नाही.

वरील घटनाक्रम,जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता,या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दि. २२.२.२००७ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीनुसार दि. १७.३.२००७ रोजी म्हणजेच, अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीचे शुल्क रु.५५०/- इतके भरण्याचे सूचित केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी जरी अधिनियमातील कलम ७(१) प्रमाणे कार्यवाही केली असली तरी अधिनियमातील कलम ७(३) चे अवलोकन करता, कलम ७(३)(क) मधील तरतुदीचे त्यांनी पालन केल्याचे दिसून येत नाही.अधिनियमातील कलम ७(३)(क) मध्ये जन माहिती अधिकारी यांनी माहितीचे शुल्क कशाच्या आधारे आकारले,त्या हिशोबासह त्यांना अपिलार्थीस माहिती द्यावयाची, अशाप्रकारची तरतुद आहे.अपिलार्थीकडे आवश्यक त्या शुल्काची मागणी करताना जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देण्यात येणाऱ्या माहितीच्या पृष्ठांची संभावित संख्या व माहिती पुरविण्याचा प्रतिपृष्ठ दर अधिक टपालखर्च (जर अपिलार्थीने टपालाने माहिती मागविली असेल तर) अपिलार्थीस कळविणे या तरतुदीमध्ये अभिप्रेत आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अशाप्रकारचा तपशील न कळविता अधिनियमातील कलम ७(३)(क) चा भंग केल्याचे दिसून येत आहे. त्यांनी अधिनियमातील या तदतुदीच्या केलेल्या भंगामुळे, त्यांना आता अपिलार्थीस माहितीपोटी त्यांनी भरलेल्या शुल्काची रक्कम परत करावी लागेल. अपिलार्थीस प्राप्त झालेल्या माहिती संदर्भात असे आढळून आले आहे की, सुरुवातीला जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या

प्रगतीतील कामासंदर्भातील माहितीमध्ये चूक झाली आहे, सदर चूक त्यांच्या हातून नजनचुकीने झाली असल्याचे त्यांनी आयोगासमोर कबूल केले आहे व त्यांची चूक दि. ३१.५.२००७ रोजीच्या पत्रान्वये दुरुस्त करुन माहिती अपिलार्थीस पाठविली असल्याचे दिसून येत आहे.अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांनी पाठविलेल्या माहितीमध्ये, अधीक्षक अभियंता यांनी आज आयोगाकडे त्यांच्याकडील दि. ७.७.२००८ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेल्या अहवालावरुन व त्यांच्या प्रतिनिधीने वर केलेल्या युक्तीवादावरुन, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती दिशाभूल करणारी आहे, असे त्यांना वाटत नाही, असे म्हटले आहे व जन माहिती अधिकारी यांच्या युक्तीवादाचे खंडण करण्यासाठी आज सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित नाहीत.

उपरोक्त सर्व घटनाक्रमामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी हेतुपूर्वक कोणतीही टाळाटाळ केल्याचे अथवा कोणत्याही असद्‌हेतूने त्यांना आवश्यक असलेली माहिती देण्याची टाळल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नाही. मात्र त्यांनी अपिलार्थीस पूर्णतः माहिती पाठविताना ती सतर्कतेने पाठवावयास हवी होती, असे आयोगास वाटते. त्यांच्या अशाप्रकारच्या कार्यपध्दतीबाबत त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून, त्यांनी इतःपर कोणत्याही अर्जदारास माहिती अधिकाराखालील तरतुदीनुसार माहिती देताना ती बिनचुक असेल याची खात्री करुन घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीस अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली नाही, या जन माहिती अधिकारी यांच्या विधानाचे खंडण करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर आज उपस्थित नाहीत. या संदर्भात अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद यांना असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या संपूर्ण माहितीचे पुनर्विलोकन करुन अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अचूकरित्या मिळेल, अशाप्रकारची त्यांनी कार्यवाही करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

**६. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**७. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात माहितीपोटीचे भरलेल्या शुल्काची रक्कम रु.५५०/- त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांनी परत करावी.**

**८. जन माहिती अधिकारी यांना सक्त ताकीद देण्यात येत आहे.**

**९. जन अपिलीय अधिकारी यांनी वरील निर्णयामध्ये दिलेल्या सूचनांचे अनुपालन करावे.**

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ०८.०७.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. व्यंकटेश लक्ष्मणराव पाटील, बी.एच.१-५४,प्रबोधनकार ठाकरेनगर, एन-२,सिडको, चिकलठाणा, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३०४

निर्णय दिनांक : ०८.०७.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. स. दे. राजपूत,<br>पो.ह.५७४<br>औरंगाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन),<br>पोलीस आयुक्त कार्यालय, औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा पोलीस उपआयुक्त,<br>मुख्यालय औरंगाबाद शहर | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८.०७.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. स. दे. राजपूत (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल),श्री. प्रकाश मगनलाल अग्रवाल, जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन),पोलीस आयुक्त कार्यालय,औरंगाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. प्रकाश मारुती वाघमारे, जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त (मुख्यालय), पोलीस आयुक्त कार्यालय, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांच्याकडील दि.०४.०६.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे एकूण ४ मुद्यांवर माहितीची मागणी केली होती.

" १) दि.२४.५.२००१ ते ३१.१२.२००६ पर्यंत किती पोलीस कर्मचाऱ्यांनी शासकीय निवासस्थान रिक्त केलेली आहेत व त्यापैकी किती कर्मचाऱ्यांना घरभाडे देण्यात येते व किती कर्मचाऱ्यांना घरभाडे का देण्यात येत नाही? त्याचे कारणासह, नावासह व दिनांकासह माहिती देण्यात यावी.

२)दि. २४.०७.०६ च्या अगोदर जा. क्र.कक्ष-३/शासकीय निवासस्थान/घरभाडे/२००६-९४२७ औरंगाबाद चे अगोदर हा आदेश किती कर्मचाऱ्यांना देण्यात आला? त्यांचे नावासह, दिनांकसह यादी देण्यात यावी.आणि हा आदेश दिला नसेल तर त्याचे कोणत्या कारणामुळे देण्यात आला नाही. त्याचीही माहिती दिनांकासह देण्यात यावी.

३) एकूण कर्मचाऱ्यांची संख्या किती आहे ? आस्थापनेवर किती आहे? बाहेर किती कर्मचारी राहतात, त्यापैकी किती कर्मचाऱ्यांना घरभाडे चालू आहे ? त्यांचे नावासह, दिनांकसह माहिती देण्यात यावी. व किती कर्मचाऱ्यांना घरभाडे बंद आहे त्याचीही दिनांकासह, नावासह, माहितीची सत्य प्रत देण्यात यावी.

४) २४.०५.२००१ नंतर किती कर्मचाऱ्यांनी शासकीय निवासस्थाने रिक्त केली आहे त्यापैकी किती कर्मचाऱ्यांना घरभाडे देण्यात येते त्यांचे नावासह व दिनांकासह माहिती देण्यात यावी. व किती कर्मचाऱ्यांना घरभाडे का देण्यात येत नाही त्याचे कारणासह व दिनांकसह व नावासह माहितीची सत्यप्रत देण्यात यावी."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २१.७.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना पाठविली. सदर माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याचे अपिलार्थीने आज

आयोगासमोर कबूल केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.०९.०७.२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. सदर अपील त्यांनी, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी पूर्णपणे माहिती दिली नसल्याच्या कारणावरुन केले असल्याचे दिसून येते. सदर अपील सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती मोठया प्रमाणावर व किचकट असल्याने आता ती तयार करुन अपिलार्थीस देण्याचे जन अपिलीय अधिकारी यांना माहिती अधिकाऱ्याने आश्वासित केल्याने त्यांच्या आश्वासनाची नोंद घेऊन जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे अपील संबंधित नस्तीवर निकाली काढले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानंतर प्राप्त झालेली माहिती, ही अपिलार्थीने मागणी केलेल्या मुद्याप्रमाणे व दिनांकासह देण्यात आली नसल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.०८.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना मुद्देनिहाय व दिनांकासह देण्यात आली नाही. ते औरंगाबाद येथे स्वतःच्या घरात राहत असूनही त्यांना आयुक्तालयातर्फे घरभाडे भत्ता अद्यापही मंजूर करण्यात आला नसल्याने त्यांना, त्यांनी विनंती केल्याप्रमाणे देय असलेला घरभाडे भत्ता त्यांना मंजूर करण्यात यावा व मूळ अर्जातील संपूर्ण माहिती विनामूल्य प्राप्त व्हावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, शासकीय निवासस्थान रिक्त ठेवून खाजगी घरात राहणाऱ्या कर्मचाऱ्यांना घरभाडे भत्ता देय नाही. अपिलार्थी हे त्यांना दिलेले शासकीय निवासस्थान सोडून स्वतःच्या खाजगी घरात

राहण्यासाठी गेले आहेत. शासन, वित्त विभागाच्या दि. २४.५.२००१ रोजीच्या परिपत्रकानुसार घरभाडे भत्ता प्राप्त होण्यासाठी शासकीय कर्मचारी हे, शासकीय निवासस्थान वाटपासाठी उपलब्ध नसेल तरच पात्र होतात.उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस वाटपासाठी शासकीय निवासस्थान उपलब्ध आहे, त्यामुळे अपिलार्थीस त्यांनी घरभाडे भत्ता अद्यापपर्यंत मंजूर केलेला नाही. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील 'दिनांक' या माहितीची पूर्तता करुन अपिलार्थीस दोन महिन्याचे आत माहिती देण्यात येईल.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती सर्वसाधारणपणे त्यांना देण्यास दोन महिने इतका कालावधी लागेल.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की,मूलतः अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप मोठया प्रमाणात आहे. औरंगाबाद शहर पोलीस विभागातील सर्व कर्मचाऱ्यांची माहिती अपिलार्थीने मागितली आहे. अशा कार्यरत कर्मचाऱ्यांची संख्या अंदाजे २६०० इतकी असल्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर सांगितले. हे पाहता अपिलार्थीने मागणी केलेली माहिती विस्तृत प्रमाणात असल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुद्देनिहाय माहिती दिलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीमध्ये दिनांकासह माहिती दिलेली नाही. तसेच अपिलार्थीस मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ मधील २४.५.२००१ नंतर किती कर्मचाऱ्यांनी शासकीय निवासस्थान रिक्त केले व त्यापैकी किती कर्मचाऱ्यांना घरभाडे भत्ता देण्यात येतो, याची दिनांकासह माहिती त्यांनी अपिलार्थीस पुरविली नाही. आज रोजी झालेल्या सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती विस्तृत प्रमाणात असल्याचे आयोगास स्पष्ट केले व त्याचबरोबर ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी एकूण

६० दिवसांचा कालावधी त्यांना लागेल, असेही त्यांनी पुढे आपल्या युक्तीवादामध्ये आयोगास सांगितले. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती,स्वरुप व ती तयार करण्यासाठी लागणारा कालावधी पाहता, जन माहिती अधिकारी यांनी विनंती केल्याप्रमाणे त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी ६० दिवस इतका कालावधी मंजूर करण्यात येत आहे. मात्र आता त्यांनी अपिलार्थीस माहिती देताना, ती मुद्देनिहाय व त्यांनी मागितलेल्या माहितीतील सर्व मुद्दे, उपमुद्दे यांचा समावेश असणारी असावी, याची त्यांनी पुरेपूर दक्षता घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या युक्तीवादामध्ये पोलीस आयुक्तालयातर्फे त्यांना ते स्वतःच्या खाजगी निवासस्थानात राहत असूनही त्यांना घरभाडे भत्ता मंजूर करण्यात आला नाही, मात्र त्यांच्या सारखेच जे इतर कर्मचारी शासकीय निवासस्थान त्यांना उपलब्ध असतांनाही ते रिक्त करुन स्वतःच्या खाजगी निवासस्थानात राहत आहेत, त्यांना मात्र घरभाडे भत्ता देण्यात येत असल्याचे आयोगासमोर प्रतिपादन केले. याबाबत पोलीस आयुक्त यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या या प्रकरणी वैयक्तिक लक्ष घालून अपिलार्थीच्या गाऱ्हाण्याचा त्वरित निपटारा करावा. अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ३ वगळता उर्वरित सर्व मुद्यांवर जन माहिती अधिकारी यांना कारणे विचारल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) द्वारे स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येमध्ये, जन माहिती अधिकारी यांचेकडील माहितीमधील विशिष्ट निर्णय का घेतला, यासारखे अभिप्राय अथवा कारणे अर्जदारांनी जन माहिती अधिकारी यांना विचारणे व अर्जदारास त्यांनी उत्तरे देणे अशाप्रकारची प्रक्रिया अभिप्रेत नाही. त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ३ वगळता उर्वरित मुद्यांमधील अपिलार्थीने मागितलेली कारणे या उपमुद्यांवरील माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि. ४.६.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ३ शी संबंधित व उर्वरित मुद्यांवरील कारणे हा उपमुद्दा वगळता संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच साठ दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ०८.०७.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. स.दे.राजपूत पो.ह. ५७४, नेमणूक पोलीस ठाणे, बेगमपूरा,औरंगाबाद शहर.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन), पोलीस आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त (मुख्यालय), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३०६

निर्णय दिनांक : ०८.०७.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. कांबळे संदीपान रघुनाथ<br>मु.एकुरका,पो.जवळा (खुर्द) ता.कळंब,<br>जि. उस्मानाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा कृषी अधिकारी,<br>तालुका कृषी अधिकारी कार्यालय,<br>उस्मानाबाद | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा तालुका कृषी अधिकारी,<br>उस्मानाबाद. | : | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८.०७.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. संदीपान रघुनाथ कांबळे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. विक्रम विश्वनाथराव बंडगर, जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय,उस्मानाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. हणमंत रामहरी गोरे, जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी उस्मानाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांच्याकडील दि.०५.०६.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील सन २००४ - २००६ या कालावधीतील त्यांच्या कार्यक्षेत्रातील रोजगार हमी योजनेअंतर्गत झालेल्या माती नाला बंडींग, कंपार्टमेंट बंडींग, शेततळे इत्यादी कामांबाबत खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" उस्मानाबाद तालूक्यातील रो.ह.यो.ने आंतरगत झालेल्या मा.ना.बां.कपंलामेट बंलडिंग शेत तळे इत्यादी कामाची संपूर्ण माहिती दयावी व फळबाग लाभआर्थी यादी मिळणेबाबत.

शासणाची मंजूरी रक्कम आंदारपत्रक गटनंबर सहीत व मजुरांची हाजेरीपत्रक व लाभआर्थी आनुदान यादी दयावी."

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती. अपिलार्थी हे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे त्यांनी या अर्जामध्ये नमूद केले आहे व पुराव्यादाखल सरपंच व ग्रामसेवक, ग्रामपंचायत एकूरगा, ता.कळंब जि.उस्मानाबाद यांच्या स्वाक्षरीच्या दि. २.६.२००७ च्या प्रमाणपत्राची झेरॉक्सप्रत अर्जासोबत जोडलेली आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ११.०६.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन त्यांनी मागणी केलेली माहिती विस्तारीत स्वरुपाची असल्याने ती अपिलार्थीस देणे शक्य होणार नाही, असे त्यांना कळविले. तसेच सदर पत्रामध्ये अपिलार्थीस नेमकी कोणत्या कामाची व कोणत्या कालावधीची माहिती हवी आहे, त्याबाबत जन माहिती अधिकारी यांना कळविल्यास त्यांना पुढील कार्यवाही करणे शक्य होईल, अशा अर्थाचा मजकूर समाविष्ट आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशाप्रकारच्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१३.०७.२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. जन

अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर त्यांच्या कार्यालयात दि. ३.८.२००७ रोजी सुनावणी ठेवली होती, तथापि सुनावणीस अपिलार्थी उपस्थित न राहिल्याने जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयाचे पत्र दि. ३.८.२००७ रोजी अपिलार्थीस सुनावणीसाठी सोयीची तारीख कळविण्याचे सूचित केले. परंतु अपिलार्थीकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने त्यांनी दि.२२.८.२००७ रोजी सुनावणी ठेवली, तथापि या सुनावणीस देखील अपिलार्थी गैरहजर राहिल्याने त्यांनी अपिलार्थीच्या गैरहजेरीत जन माहिती अधिकारी यांच्या उपस्थितीत सुनावणी संदर्भात निर्णय घेतला. या निर्णयामध्ये, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना देण्यासाठी एकूण १,१९,७३१ इतक्या पृष्ठांची माहिती असून त्यासाठी रक्कम रु. २,३९,४६२/- इतका खर्च येणार असल्याचे नमूद केलेले आहे. अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या माहितीच्या व्याप्तीची पुरेपूर कल्पना जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत त्यांना दिली होती. तथापि अपिलार्थीने त्यांच्या पत्रास प्रतिसाद न दिल्याने, अपिलार्थीने माहितीची मागणी केल्यास, त्याप्रमाणे माहिती द्यावी, असे जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश दिले. अपिलार्थीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २२.८.२००७ रोजी आपले आदेश पारित केले आहेत. सदर आदेशाची प्रत त्यांनी अपिलार्थीस अग्रेषित केली आहे. तथापि सदर निर्णय अपिलार्थीस प्राप्त झाला नसल्याचे अपिलार्थीने सुनावणीमध्ये आज आयोगासमोर सांगितले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.०८.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती दिली नसल्याचे नमूद करुन आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात ते सुनावणीच्या दिवशी हजर झाले

होते, तथापि तेथे उपस्थित असलेले जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस नंतर येण्याच्या सूचना दिल्या. त्याप्रमाणे अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात दुपारी ३.३० वा. गेले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस सकाळी ११.०० वा बोलाविले असता, ते दुपारी ३.३० वाजता आल्याने सुनावणी घेण्याचे नाकारले. त्यामुळे व्यथित होवून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रथम अपिलावरील आदेश त्यांना प्राप्त झालेले नाहीत. तसेच मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने विशिष्ट माहितीची मागणी केल्यास ते अपिलार्थीस माहिती देण्यास तयार आहेत. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीच्या पृष्ठांची संख्या १,१९,७३१ इतकी आहे, याचा तपशील त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील सुनावणीच्या वेळी त्यांना सादर केला होता व जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयामध्ये सदर तपशील उपलब्ध आहे. ही माहिती अपिलार्थीस पुरविण्यासाठी आवश्यक असलेले अनुदान त्यांच्याकडे उपलब्ध नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांच्याकडे ज्या-ज्यावेळी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी ठेवली होती, त्या-त्यावेळी अपिलार्थी गैरहजर राहिले, अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये संदर्भित केलेल्या घटनेचा त्यांनी इन्कार केला. अपिलार्थीच्या अपील अर्जावर त्यांनी दि. २२.८.२००७ रोजी अंतीमतः सुनावणी ठेवली होती. सदर सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर राहिल्याने जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांच्या आधारे त्यांनी या अपील अर्जासंदर्भात निर्णय दिलेला आहे.

जन अपिलीय अधिकारी त्यांच्याकडील प्रथम अपील निर्णयाची प्रत अपिलार्थीस पाठविल्यापृष्ठयर्थ कोणताही ठोस पुरावा आयोगासमोर सादर करु शकले नाहीत. अशा

प्रकारच्या त्यांच्या कार्यशैलीची नोंद जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी उस्मानाबाद यांनी घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व अपिलार्थीच्या मूळ माहितीच्या अर्जाचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जाद्वारे एखाद्या विशिष्ट स्वरुपात माहिती न मागता, अत्यंत मोघम स्वरुपात माहिती मागितल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती प्रचंड आहे.अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची पृष्ठसंख्या १,१९,७३१ इतकी आहे. सदर माहितीचा तपशील जन अपिलीय अधिकारी यांनी पारित केलेल्या प्रथम अपील निर्णयामध्ये त्यांनी दिलेला आहे, त्यामध्ये प्रत्येक वर्षी, प्रत्येक बाबीवर, उपलब्ध असलेल्या माहितीच्या पृष्ठांची संख्या व सदर पृष्ठांच्या झेरॉक्स प्रती करण्यासाठी लागणारा खर्च याचा सविस्तर तपशील दिल्याचे दिसून येते. माहितीच्या पृष्ठांच्या संख्येवरुन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती सहजपणे लक्षात येते. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झेरॉक्स प्रतीसाठी अनुदान उपलब्ध नाही. असे त्यांनी आयोगास आज सुनावणीमध्ये सांगितले आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची प्रचंड व्याप्ती लक्षात घेता, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील साधनसामुग्री, अपीलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना प्रमाणाबाहेर वळवावी लागत असल्याचे सिध्द होत आहे. तसेच अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सदर माहितीचे झेरॉक्स काढण्यासाठी आवश्यक ते अनुदान जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नाही, ही वस्तुस्थिती लक्षात घेता अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात जाऊन पहावी व त्यातील त्यांना आवश्यक वाटेल, अशी विशिष्ट माहिती त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून विनामूल्य प्राप्त करुन घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

१.अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ०८.०७.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. संदीपान रघुनाथ कांबळे, मु.एकुरका पो.जवळा (खुर्द) ता.कळंब जि.उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, उस्मानाबाद जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, जुनी जिल्हा परिषद इमारत उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३०७

निर्णय दिनांक : ०८.०७.२००८

१ श्री. अंकुश मोतीराम पवार : अपिलार्थी
औरंगाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा तालुका कृषी अधिकारी,अहमदपूर जि. लातूर

२ जन अपिलीय अधिकारी :
तथा उपविभागीय कृषी अधिकारी,लातूर

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः कृषी अधिकारी,
तालुका कृषी अधिकारी कार्यालय,
अहमदपूर जि.लातूर

जन अपिलीय अधिकारीः तालुका कृषी अधिकारी,अहमदपूर
जि.लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८.०७.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. अंकुश एम.पवार (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व श्री. चंद्रशेखर नागनाथप्पा खानापुरे,जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी कार्यालय,अहमदपूर जि. लातूर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा (प्र) तालुका कृषी अधिकारी अहमदपूर जि.लातूर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांच्याकडील दि.०३.०४.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १.१.२००७ ते १५.३.२००७ या कालावधीतील त्यांच्या कार्यालयाअंतर्गत रोजगार हमी योजनेखाली झालेल्या एकूण ४०

कामाच्या विषयी व्यक्तीशः माहिती मागितली होती. या माहितीमध्ये त्यांनी कामावर वरिष्ठांनी पाया पाहणी केलेल्या अहवालाच्या तसेच मजुरांची नांवे लिहिलेली हजेरीपट, आणि मोजमाप पुस्तिका या सर्व मुद्‌दयांच्या छायांकित प्रती मागितल्या होत्या.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ३०.४.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ७०८५/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. सदर पत्र अपिलार्थीस दि. ३०.४.२००७ रोजी अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगने पाठविल्याचा पुरावा त्यांनी आयोगासमोर सादर केला आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२३.०५.२००७रोजी प्रथम अपील केले आहे. सदर अपील त्यांनी उपविभागीय कृषी अधिकारी, उदगीर, जिल्हा लातूर यांना उद्देशून केले आहे, तथापि उपविभागीय कृषी अधिकारी, उदगीर हे या प्रकरणात अपिलीय अधिकारी नसल्याने, त्यांनी अपिलार्थीस त्यांचे अपील तालुका कृषी अधिकारी, अहमदपूर यांच्याकडे करण्यासाठी सूचित केले. त्यानंतर अपिलार्थीने त्यांच्याकडील दि. ७.८.२००७ रोजीच्या साध्या अर्जाद्वारे त्यांच्या प्रथम अपीलावर सुनावणी घेण्यासाठी तालुका कृषी अधिकारी,अहमदपूर यांना कळविले. या अर्जावर त्यांनी विहित शुल्क रु.२०/- किंमतीचा कोर्ट-फी-स्टॅम्प डकविल्याचे आढळून येत नाही. अपिलार्थीच्या या अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३.९.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपला निर्णय अपिलार्थीस दि. १६.६.२००८ रोजी पाठविला. तथापि अपिलार्थी यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने व्यथित होऊन त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.०८.२००७ रोजी

द्वितीय अपील दाखल केले आहे. या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना आवश्यक ते शुल्क भरण्याचे पाठविलेले त्यांचे कथित दि. ३०.४.२००७ चे पत्र त्यांना मिळाले नाही. तसेच त्यांनी या संदर्भात प्रथम अपील केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलावर कोणत्याही प्रकारचा निर्णय न दिल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय त्यांना आयोगाकडे होणाऱ्या द्वितीय अपिलावरील सुनावणीचे वेळी प्राप्त झाला आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या मूळ माहितीच्या अर्जावर त्यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत पत्रव्यवहार करुन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ७०८५/- इतके भरण्याचे त्यांच्याकडील दि. ३०.४.२००७ रोजीच्या पत्राद्वारे कळविले आहे. सदर पत्र त्यांनी अपिलार्थीस अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगने पाठविले होते या त्यांच्या विधानापृष्ठयर्थ त्यांनी पोस्टाची रु.४/- किंमतीचे स्टॅम्प असलेली पावती त्यांनी आयोगासमोर सादर केली, त्याचबरोबर अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावरील सुनावणीसाठी देखील त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. २२.८.२००७ रोजीचे पत्र दि. २८.८.२००७ रोजी पाठविल्याबाबतचा पुरावा त्यांनी आयोगासमोर सादर केला आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून अपिलार्थीने आवश्यक असलेल्या माहितीसाठीचे शुल्क भरल्यास ते अपिलार्थीस माहिती देण्यासाठी तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ३.४.२००७ रोजीच्या पत्रास दि. ३०.४.२००७ रोजी म्हणजेच

अधिनियमातील विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद देऊन अधिनियमातील कलम ७(१) मधील तरतुदीची पूर्तता केली आहे. अपिलार्थीस त्यांनी दि. ३०.४.२००७ रोजी दिलेल्या पत्रामध्ये अपिलार्थीस द्यावयाच्या माहितीतील प्रस्तावित पृष्ठांची संख्या, प्रतिपृष्ठ दर व टपालखर्च याचा तपशील त्यांनी दिला आहे. त्यामुळे अधिनियमातील कलम ७(३) ची देखील पूर्तता जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील या पत्रामध्ये केल्याचे दिसून येते. अपिलार्थीस त्यांनी सदर पत्र पाठविल्याचा पुरावा म्हणून पोस्टाची दि. ३०.४.२००७ रोजीचे अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगची पावती सादर केली आहे, यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे पत्र पाठविल्याचे सिध्द होत आहे. तथापि अपिलार्थीस हे पत्र प्राप्त झाले नाही, असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे. याचा पुरावा विचारला असता, अपिलार्थी यांनी "पुरावा परमेश्वराकडेच आहे", असे आयोगास उत्तर दिले. माहिती अधिकार अधिनियमाद्वारे मागणी केलेली माहिती प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीने शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने अधिसूचना,क्र.आर.टीआय.२००५/सी.आर.३१५/०५/५, दिनांक ११.१०.२००५ अन्वये सविस्तर सूचना प्रसिध्द केल्या आहेत. सदर अधिसूचनेच्या कलम ४(१) मध्ये सूचित केल्याप्रमाणे अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटी जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रतिपृष्ठ रु.२/- या दराने शुल्काची रक्कम भरणे भाग आहे. या प्रकरणामध्ये अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क भरणा केला नसल्याने ही माहिती त्यांना आवश्यक असल्यास त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात या शुल्काचा भरणा करुन सदर माहिती प्राप्त करुन घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांचा त्यांना अपिलार्थीस विहित मुदतीत शुल्काची रक्कम कळविल्याचा पुरावा ग्राहय धरण्यात येऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्रसंगावशात्, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर ३०/४५ दिवसांचे आत सुनावणी न घेऊन आपले कर्तव्य पुरेशा जबाबदारीने पाडले नसल्याचे दिसून येत आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या कार्यशैलीची जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी, लातूर यांनी यथायोग्य नोंद घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत सशुल्क पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ०८.०७.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अंकुश मोतीराव पवार, प्लॉट नं.एफ.४१/१२, सिडको,एन-७,अयोध्यानगर, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, अहमदपूर जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषी अधिकारी, उदगीर जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, तिसरा मजला, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,लातूर

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३०८

निर्णय दिनांक : ०८.०७.२००८

१ श्री. सुनिल पंढरी शिरसाट : अपिलार्थी
मु.पो.घोडेगाव,ता.गंगापूर जि.औरंगाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा गट शिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, गंगापूर
जि.औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी :
तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, गंगापूर
जिल्हा औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८.०७.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. भगवानसिंग रामचंद्र राजपूत, वरिष्ठ सहायक, जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती, गंगापूर जि.औरंगाबाद यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. संतोष अंबादासराव कुलकर्णी, वरिष्ठ सहायक, जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पं.स.गंगापूर यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर अपिलार्थी श्री. सुनिल पंढरी शिरसाट (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

आज सुनावणीच्या वेळी आयोगासमोर अपिलार्थीने दि. २७.८.२००७ रोजी आयोगाकडे केलेले द्वितीय अपील विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विलंबाने माहिती दिल्यामुळे, अधिनियमातील कलम २० (१) नुसार त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची व विहित केलेल्या मुदतीमध्ये त्यांना माहिती न पुरविल्याने कलम ७(१) नुसार शिस्तभंगाची कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे. या प्रकरणात असे दिसून येते की, प्रथमतः अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचेकडील दि.३.५.२००७ रोजीच्या अर्जान्वये त्यांनी दि. १७.६.२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या अर्जावर कोणती कार्यवाही केली व दि. ३०.४.२००५ ते १८.१०.२००५ या कालावधीतील वेतन त्यांना कधी मिळणार, याची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. १६.५.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या सेवेतील दि. ३०.४.२००५ ते १९.१०.२००५ हा कालावधी अकार्यदिन म्हणून घोषित केला गेला असल्याने, या कालावधीचे वेतन त्यांना अदा करता येणार नाही, असे कळविले. सदर पत्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस श्री. एस.पी.जाधव नावाच्या एका केंद्रीय मुख्याध्यापकामार्फत पाठविले असल्याचे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. सदर मुख्याध्यापक हे अपिलार्थी ज्या शाळेमध्ये 'शिक्षक' या पदावर कार्यरत आहेत, तेथेच 'मुख्याध्यापक' या पदावर कार्यरत आहेत. जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.०६.०६.२००७ रोजी प्रथम अपील केले आहे.या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,गंगापूर यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतली नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येते. त्यावेळी जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर असे सांगितले की, अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नाही,

त्यामुळे त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेतली नाही, त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.०८.२००७ रोजी विचाराधीन अपील दाखल केल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १७.६.२००६ रोजीच्या त्यांच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी कोणती कार्यवाही केली व त्यांना दि. ३०.४.२००५ ते १८.१०.२००५ या कालावधीतील वेतन कधी मिळेल, याबाबतची माहिती जन माहिती अधिकारी अधिकारी यांना मागितली होती. या दोन पैकी १ ला मुद्दा म्हणजे, अपिलार्थीच्या दि. १७.६.२००६ रोजीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही, ही माहिती, माहितीचा अधिकार अधिनियमातील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत आहे. त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस देय आहे व सदर माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. १६.५.२००७ रोजी पुरविली आहे. सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाल्यामुळे या पत्राची प्रत त्यांनी आयोगास सादर केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडली आहे. अर्थात ही माहिती त्यांना उशिरा प्राप्त झाल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद देऊन आवश्यक ती देय माहिती देण्याकरिता पोस्टाचा अथवा इतर वैध साधनांचा वापर न करता, त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील केंद्रीय शाळेच्या मुख्याध्यापकामार्फत अपिलार्थीस ही माहिती दिली. अपिलार्थीस निश्चितपणे ही माहिती कधी प्राप्त झाली हे जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी आज आयोगासमोर सांगू शकले नाहीत, कारण त्यांनी अपिलार्थीस माहिती मिळाल्यापृष्ठयर्थ त्यांची पोच संबंधित मुख्याध्यापकामार्फत घेतल्याचे आढळून येत नाही. अपिलार्थीस जरी त्यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये माहिती दिली असली तरीही अपिलार्थीस ही माहिती विहित मुदतीमध्ये प्राप्त होण्यासाठी त्यांनी या प्रकरणी वर उल्लेखिल्याप्रमाणे आवश्यक ती सतर्कता न बाळगल्याने, त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद

देण्यात येत असून, येथून पुढे त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक माहितीच्या अर्जावर सतर्कतेने कार्यवाही करावी, असे त्यांना आयोगातर्फे सूचविण्यात येत आहे. अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. २ शी संबंधित माहिती भविष्यकाळाशी संबंधित असल्याने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) मधील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी विसंगत असल्याने ती अपिलार्थीस देय होत नाही.

हा संपूर्ण घटनाक्रम पाहिला असता अपिलार्थीस माहिती देण्यास जन माहिती अधिकारी यांनी हेतुपूर्वक टाळाटाळ केल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नाही. मात्र अपिलार्थीस विहित मुदतीमध्ये माहिती पोहोचेल व त्याची पोच जन माहिती अधिकारी यांना प्राप्त होईल, याची दक्षता त्यांनी घेतली नसल्याने त्यांना वर संदर्भित केल्याप्रमाणे आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ०८.०७.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुनिल पंढरी शिरसाट, मु.पो.घोडेगाव, ता.गंगापूर जिल्हा औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, गंगापूर जि. औरंगाबाद

यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३०९

निर्णय दिनांक ०९-०७-२००८

श्री. रामचंद्र विश्वनाथ कंटोले, : अपिलार्थी
रा. कुंभार पिंपळगाव, तालुका घनसावंगी,
जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा तालुका निरिक्षक भूमी अभिलेख,
घनसावंगी, जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक, भूमी अभिलेख,
जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०७-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. रामचंद्र विश्वनाथ कंटोले (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व श्री. केशव नारायणराव परळीकर, जन माहिती अधिकारी तथा तालुका निरिक्षक भूमी अभिलेख, घनसावंगी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमी

अभिलेख, जालना यांचे प्रतिनिधी म्हणून श्री. केशव नारायणराव परळीकर, जन माहिती अधिकारी तथा तालुका निरिक्षक भूमी अभिलेख, घनसावंगी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक ०२-०४-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे एकूण ४ मुद्दयावर माहिती मागितली होती.

"१. मा. तहसिलदार घनसावंगी यांचा दि. ८/५/२००३ रोजीच्या ८५/२ च्या आदेशाची नक्कल मिळणेबाबत.

२. दि. ८/५/२००३ रोजी दिलेल्या मोजणी अर्जासोबत स्टेटमेंट उता-याची नक्कल मिळणेबाबत.

३. दि. २३/७२२००३ रोजी केलेल्या मोजणीच्या पंचनाम्याची नक्कल मिळणेबाबत.

४. दि. ०३/०२/२००४ रोजी दिलेल्या 'क' प्रतची माझ्या स्वाक्षरीतली पोहोचची नक्कल मिळणेबाबत. "

अपिलार्थीने सदर माहिती पोस्टाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अधिनियमातील विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८-०६-२००७ रोजी सुनावणी घेऊन या अपील अर्जासंदर्भातील आपले आदेश त्याच दिवशी पारीत केले आहेत. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस दिनांक २६-०६-२००७ अखेरपर्यंत माहिती उपलब्ध करुन देण्याचे सूचित केले. सदर माहिती अपिलार्थीस सशुल्क द्यावयाची किंवा कसे याबाबत जन अपिलीय अधिकारी यांनी या आदेशामध्ये कोणताही उल्लेख केलेला नाही.

अपिलीय अधिकारी यांच्या या आदेशानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून त्यांना माहिती देण्यापोटीचे आवश्यक ते शुल्क रुपये ३३ त्यांच्याकडून कार्यालयात जमा करुन घेऊन अपिलार्थीस दिनांक २६-०६-२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली. तथापि सदर माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी असल्याचे वाटल्यावरुन व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१-०८-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये, त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी, अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक २३-०७-२००३ च्या पंचनाम्याची प्रत दिली, तथापि सदर पंचनामा दिनांक २२-०१-२००४ रोजी झालेला आहे त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना मुद्दा क्रमांक ३ व्दारे पुरविलेली माहिती चुकीची आहे तर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना मुद्दा क्रमांक ४ च्या संदर्भात कोणतीही माहिती पुरविली नसल्याने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २६-०६-२००७ रोजी पुरवलेली माहिती अपूर्ण आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या जमिनीची केलेली मोजणी चुकीची असून त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अपूर्ण व चुकीच्या माहितीमुळे आपल्या गा-ह्याण्याची तड न्यायालयाकडून करुन घेण्यास अडचणी येत

आहे. त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये शेवटी आयोगास अशीही विनंती केली की, त्यांनी प्रथम व व्दितीय अपिलासाठी जालना येथून केलेला जाण्यायेण्याचा खर्च संबंधीत कार्यालयाकडून मिळावा.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते या पदावर दिनांक ०५-०७-२००८ पासून कार्यरत आहेत. अपिलार्थीने माहितीच्या केलेल्या प्रथम अर्जावर संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ३० दिवसाच्या मुदतीच्या आत कोणताही प्रतिसाद दिला नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून दिनांक १८-०६-२००७ रोजी आदेश प्राप्त झाल्यानंतर दिनांक २६-०६-२००७ रोजी त्यांनी अपिलार्थीस पूर्ण माहिती दिलेली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ४ मुद्दयावर माहिती मागविली होती. ही माहिती अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी सर्वसाधारण परिस्थितीध्ये अधिनियमातील ७ (१) च्या तरतुदीनुसार ३० दिवसाच्या आत प्रथम प्रतिसाद देणे भाग होते, तथापि या प्रकरणी अशा प्रकारची कारवाई जन माहिती अधिकारी यांनी केल्याचे आढळून येत नाही. अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०२-०४-२००७ रोजीच्या प्रथम अर्जानुसार मागितलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना दिनांक १८-०६-२००७ रोजी आदेशित केल्यानंतर दिनांक २६-०६-२००७ रोजी पुरविली आहे. अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपिलार्थीने एकूण ४ मुद्दयावर माहिती मागविली असतांना अपिलार्थीस फक्त ३ मुद्दयावर माहिती देण्यात आलेली आहे. अपिलार्थीच्या मुद्दा क्रमांक ४ शी संबंधीत माहितीबाबत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस लिहिलेल्या दिनांक २६-०६-२००७

रोजीच्या पत्रावर कोणतेही भाष्य केलेले नाही. तसेच अपिलार्थीचे म्हणणे की, दिनांक २३-०७-२००३ रोजी केलेला पंचनामा जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २२-०१-२००४ रोजी करुन सदर पंचनामा दिनांक २३-०७-२००३ रोजी केल्याची कागदपत्रे पुरविली त्यामुळे सदर माहिती दिशाभूल करणारी, अपुरी आहे तर मुद्दा क्रमांक ४ ची माहिती त्यांना अद्यापही प्राप्त झाली नाही हे अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये उपस्थित केलेल्या मुद्दावरुन सिध्द होत आहे. या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदीचे पालन न करता अपिलार्थीकडून रुपये ३३ इतके शुल्क अपिलार्थीस अकारण आकारले आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासाठीचा विहित कालावधी आता व्यपगत झाला असल्याने अधिनियमातील कलम ७ (६) प्रमाणे ही माहिती आता अपिलार्थीस विनामूल्य देय ठरत आहे. वास्तविक पाहता जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील निर्णयामध्ये त्याचा उल्लेख करणे भाग होते, तथापि त्यांनी अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्यासंदर्भात कोणतेही भाष्य केल्याचे आढळून येत नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना आता असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पोटी रुपये अपिलार्थीकडून प्राप्त करुन घेतलेले शुल्क रुपये ३३ इतके हे त्यांना हे आदेश निर्गमीत होताच २४ तासाच्या आत परत करावे.

वरील परिच्छेदात वर्णन केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे सिध्द झाल्याने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व ४ शी संबंधीत सत्य माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०२-०४-२००७ रोजीच्या अर्जास संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन,

अपिलार्थीस विनामूल्य माहिती देय असूनही अपिलार्थीकडून शुल्काची आकारणी करुन, त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायण्तेचा अभाव स्पष्ट केला आहे असे आयोगाचे मत आहे. सबब सचिव (महसूल) यांना सूचित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच ३ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये त्यांना जालना येथे प्रथम अपील व औरंगाबाद येथे व्दितीय अपील सुनावणीसाठी जाण्यायेण्याचा त्यांनी केलेला खर्च नुकसानभरपाई म्हणून आयोगाकडे मागितली आहे. यासंदर्भात असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या प्रथम अपिलाकरिता जालना येथे हजर राहण्यासाठी व आयोगाच्या औरंगाबाद येथील सुनावणीस हजर राहण्यासाठी जाण्याचा येण्याचे एसटी भाडे, घनसावंगी येथून जालना रुपये ८४ आणि जालना येथून औरगाबाद येथे हजर राहण्यासाठी ८४ असे एकूण १७० रुपये इतके भाडे त्यांना जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत चुकते करावे. सदर आदेश जन माहिती अधिकारी यांना अधिनियमातील तरतुद क्रमांक १९ (८) (ख) प्रमाणे देण्यात येत आहेत.

उपरोक्त प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या निर्णयाची प्रत अपिलार्थीस देतांना एकूण ११ रुपये इतके शुल्क त्यांना आकारले. माहिती अधिकार अधिनियमानुसार जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर निर्णयाकरिता कोणतेही शुल्क आकारण्याची तरतूद नसल्याने त्यांनी अपिलार्थीनेकडून घेतलेले शुल्क हे आदेश निर्गमीत होताच त्यांना २४ तासाच्या आत परत करावेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालील

प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व ४ शी संबंधीत माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (महसूल) यांनी, जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमा-प्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच ३ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

४ जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्यापोटी घेतलेले शुल्क रुपये ३३ रुपये + ११ हे अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच २४ तासाच्या आत परत करावे.

५. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थी यांना या प्रकरणी झालेल्या त्यांच्या नुकसानीप्रीत्यर्थ त्यांना रुपये १७० इतकी नुकसानभरपाई हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत त्यांना अदा करावी.

औरंगाबाद
दिनांक ०९-०७-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रामचंद्र विश्वनाथ कंटोले, रा. कुंभार पिंपळगाव, तालुका घनसावंगी,

जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका निरिक्षक भूमी अभिलेख, घनसावंगी, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (महसूल), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३१०

निर्णय दिनांक ०९-०७-२००८

श्री. सोमेश्वर जनार्धन आहेर, : अपिलार्थी
मु. पो. स्वयंभू निवास, जैनपुरा पैठण,
तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, पैठण,
जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन),
विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०७-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. सोमेश्वर जनार्धन आहेर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. व्यंकटी राजाराम पापुलवार, वरिष्ठ लिपीक जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, पैठण यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. सोमनाथ गुंजाळ, जन अपिलीय अधिकारी

तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले दिनांक ३०-०८-२००७ रोजीचे व्दितीय अपील आज सुनावणीसाठी विचाराधीन आहे. या प्रकरणामध्ये अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १०-०५-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००६ ते २००८ या कालावधीतील, त्यांच्या कार्यालयातर्फे मराठवाडा पॅकेज मध्ये झालेल्या कामासंदर्भात एकूण ५ मुद्दयावर माहिती मागविली होती. या माहितीमध्ये टेंडर निविदा ज्या दैनिकात प्रसिध्द झाल्या त्याचे नाव, टेंडर निविदा घेतलेल्या ठेकेदारांची नांवे, वॉर्ड प्रमाणे कामाची नांवे व त्यांच्या अंदाजपत्रकाची नक्कल, काम पूर्ण झाले असल्यास क्वॉलिटी प्रमाणपत्राची नक्कल, ठेकेदाराला देण्यात आलेले धनादेश क्रमांक व दिनांक इत्यादी माहितीचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २८-०५-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी रुपये १००० इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस पुरविण्यात येणा-या पृष्ठांची संख्या व माहिती पुरविण्यासाठी प्रतिपृष्ठ दर याबाबत त्यांच्या या पत्रामध्ये कोणताही उल्लेख नाही. जन माहिती अधिकारी यांच्या या सुचनेनुसार अपिलार्थीने दिनांक ३१-०५-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात रुपये १००० इतके शुल्क भरले, तथापि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०६-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०४-०७-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक ०५-०७-२००७ रोजी पारित केले. या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचे आदेशित केले. तसेच जन माहिती

अधिकारी यांचे दिनांक २८-०५-२००७ रोजीचे पत्र रद्द केले आहे. या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०८-२००७ रोजी व्दितीय अपिल केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्यानंतरही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना देण्यात येणा-या माहितीची पृष्ठ संख्या व प्रतिपृष्ठ दर त्यांना कळविला नाही असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे, मात्र त्यांच्याकडून रुपये १००० इतके शुल्क वसूल करुन घेऊन, त्यांना एकूण १८९ पृष्ठांची माहिती दिली. (अपिलार्थीने त्यांना माहिती प्राप्त झाल्याची तारीख अंदाजे १०-०७-२००७ अशी असल्याचे सांगितले)

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांच्याकडून अवाजवी शुल्क आकारुन त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अर्धवट माहिती पुरविली. अपिलार्थीचा हा युक्तिवाद जन माहिती अधिकारी यांनी आज सुनावणीमध्ये मान्य केला. अपिलार्थीस अर्धवट माहिती का देण्यात आली असे जन माहिती अधिकारी यांना विचारले असता, त्यांना संबंधीत सेक्शनने अपिलार्थीने मागणी केलेली माहिती पुरविण्यासंदर्भात आज देतो उद्या देतो अशी उत्तरे प्राप्त झाल्याने त्यांना अपिलार्थीस संपूर्ण माहिती पुरविता आली नसल्याचे त्यांनी सागितले.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ३ शी संबंधीत माहिती, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अर्धवट पुरविली आहे. मराठवाडा पॅकेज अंतर्गत सन २००६ ते २००८ मध्ये पैठण नगरपरिषदेकडून एकूण १७ कामे घेण्यात आली. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्या १७ कामांच्या अंदाजपत्रकांच्या नकला, त्यांच्या मूळ अर्जाप्रमाणे देणे त्यांना भाग असतांना, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस फक्त १३ कामांच्या अंदाजत्रकांच्या नकला पुरवून, ४ कामांच्या अंदाजपत्रकांच्या नकला अपिलार्थीस पुरविल्या नाहीत तसेच मुद्दा क्रमांक ४ शी संबंधित नगरपरिषदेच्या पूर्ण कामाच्या क्वॉलिटी

प्रमाणपत्राच्या नकलाही त्यांनी अपिलार्थीस पुरविल्याचे, आयोगास पुरविण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांना १८९ पृष्ठांच्या माहितीकरिता त्यांनी १००० रुपये इतके अवाजवी शुल्क आकारले असल्याचा, अपिलार्थी त्यांचा हा मुद्दा येथे सिध्द होत आहे. अपिलार्थीस १८९ पृष्ठांची माहिती प्राप्त झाल्याने अपिलार्थीकडून घेतलेले रुपये १००० इतक्या शुल्कामधून त्यांना दिलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ३७८ इतके वजा करुन उर्वरित रक्कम जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्वरीत परत करणे भाग होते, तथापि अशा प्रकारची कार्यवाही संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी केलेली नाही.

सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ३ मधील उर्वरित माहिती व मुद्दा क्रमांक ४ ची संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी, तसेच अपिलार्थी यांना देण्यात येणा-या माहितीपोटी त्यांच्याकडून घेतलेले जादा शुल्क रुपये ६२२ इतके हे, हे आदेश निर्गमीत होताच त्यांना २४ तासाच्या आत परत करावे. उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून अवाजवी शुल्क घेऊन त्यांना अर्धवट माहिती पुरविल्याने त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस अर्धवट माहिती दिल्याचे सिध्द झाल्याने व याव्दारे त्यांनी आपल्या कार्यशैलतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केल्याने, संचालक नगरपालिका प्रशासन, मुंबई यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत करुन तदनंतर आपला अनुपालन अहवाल आयोगास १ महिन्याच्या आत सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

# आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे घेतलेले अतिरिक्त शुल्क रुपये ६२२ /- त्यांना, हे आदेश निर्गमित होताच २४ तासांच्या आत परत करावे.

४. संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई यांनी, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत करुन तदनंतर आपला अनुपालन अहवाल आयोगास १ महिन्याच्या आत सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक ०९-०७-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सोमेश्वर जनार्धन आहेर, मु. पो. स्वयंभू निवास, जैनपुरा पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त तथा संचालक, नगर परिषद संचालनालय, शासकीय परिवहन सेवा इमारत, ३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, सी-फेस, वरळी, मुंबई– ४०० ०३० यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३११

निर्णय दिनांक ०९-०७-२००८

श्री. अशोक आनंतराव हावळे, : अपिलार्थी
कबाड गल्ली, बोरा किराना दुकानाच्या
पाठीमागे, सिमेंट कॉर्नर मोहन सिरसाट
यांचा वाडा, मु. पो. ता. जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो),
जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा जिल्हाधिकारी, बीड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०७-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. शिवराज संगप्पा स्वामी, कार्यकारी अभियंता ग्राभूरोहका जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. अशोक आनंतराव हावळे व जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी, बीड हे गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले दिनांक ३१-०८-२००७ रोजीचे व्दितीय अपील विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, जन माहिती अधिकारी यांनी, त्यांच्या दिनांक ०८-०६-२००७ रोजीच्या अर्जास अनुसरुन दिनांक १३-०६-२००७ रोजी माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क भरुन घेतले, मात्र सदर माहिती त्यांनी ११-०७-२००७ पर्यत त्यांना न देऊन त्यांना २९ दिवस इतकी प्रतिक्षा करणे भाग पाडल्याने त्यांच्यावर शास्तीची कारवाई करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांनी जाणुनबुजून माहिती देण्यास टाळाटाळ करुन चुकीची व असत्य माहिती देऊन माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींचा भंग केल्याने, सदर जन माहिती अधिकारी शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र असल्याचे आपले अभिप्राय या अपील अर्जामध्ये त्यांनी नोंदविले आहेत व त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी देण्यासंदर्भात त्यांना आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे. अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०८-०६-२००७ रोजीच्या प्रथम अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे ६/२००४ ते ६/२००७ या कालावधीतील सदर योजनेवरील हजेरी सहाय्यक या प्रवर्गातील उमेदवारांची ज्येष्ठतासूची व त्यांच्या नियमित सेवेमध्ये समावेशासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली होती. सदर अर्जानुसार अपिलार्थीस दिनांक ०५-०६-२००४ अखेर हजेरी सहाय्यक वर्ग - क मध्ये सामावून घेण्यासाठी शिल्लक राहिलेल्या हजेरी सहाय्यकांची ज्येष्ठतासूची, या ज्येष्ठता यादीतील दिनांक ०५-०६-२००४ अखेर समावेशन झालेल्या हजेरी सहाय्यकांची यादी, त्यांची नांवे, जातीचा प्रवर्ग प्रथम नियुक्ती दिनांक, समावेशन नियुक्ती दिनांक समावेशनाचे नियुक्ती पदनाम, संबंधीत कार्यालयाचे नांव या मुद्दयांचा समावेश होतो. अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत, दिनांक ११-०६-२००७ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ३० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे त्यांना सूचित केले. तदनंतर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये दिनांक १३-०६-२००७ रोजी सदर शुल्क भरल्यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ११-०७-२००७ अन्वये त्यांना अपेक्षित माहिती दिली, तथापि सदर माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने दिनांक २१-०७-२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १०-०९-२००७ रोजी त्यांच्या नस्तीवर निर्णय घेऊन, अपिलार्थीस हवी असलेली माहिती कोणती आहे हे स्पष्ट होत नसल्याने त्यांना लेखी उत्तर देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी प्रथम अर्जामध्ये अपेक्षिलेली माहिती दिनांक १०-१०-२००७ रोजी त्यांना पुरविली, तथापि अपिलार्थीस ही माहिती प्राप्त होण्यापूर्वी त्यांनी दिनांक ३१-०८-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये हजेरी सहाय्यकांची ज्येष्ठतासूची अपिलार्थीने मागणी केलेल्या, “दिनांक ०५-०६-२००४ अखेरपर्यत”, अशा स्वरुपात तयार नव्हती, मात्र त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या दिनांक २६-०५-१९९३ या कालावधीतील कामावर हजर असलेल्या हजेरी सहाय्यकांची ज्येष्ठतासूची अपिलार्थीस त्यांनी पुरविली. अपिलार्थीने, मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या स्वरुपात कोणतीही माहिती त्यांच्याकडे ठेवलेली नव्हती त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जात नमूद केल्याप्रमाणे त्यांनी त्यांच्याकडील उपलब्ध अभिलेख्यावरुन माहिती तयार करुन ती अपिलार्थीस दिनांक १०-१०-२००७ रोजी पुरविली आहे. थोडक्यात अपिलार्थीस दिनांक ११-०७-२००७ व दिनांक १०-१०-२००७ रोजी अशी दोन वेळेस जन

माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविल्याचे दिसून येत आहे.  दिनांक ११-०७-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेल्या नमुन्यामध्ये माहिती पुरविली तर दिनांक १०-१०-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या विविध अभिलेख्यावरुन अपिलार्थीने ज्या स्वरुपात माहिती मागितली आहे त्याच स्वरुपात संकलीत करुन अंतिमतः ती अपिलार्थीस दिनांक १०-१०-२००७ रोजी पुरविली आहे.  जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १०-१०-२००७ रोजी पुरविलेली माहिती पाहता ती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडून विलंब झाल्याचे या प्रकरणी जरी सिध्द होत असले तरी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, त्यांच्याकडे अपिलार्थीस अपेक्षित स्वरुपात ती सहजरित्या उपलब्ध नव्हती.  अपिलाथीने मागणी केलेल्या स्वरुपात अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना सदर माहिती त्यांच्या कार्यालयातील विविध अभिलेख्यावरुन तयार करुन घेऊन, ती संकलीत करुन अपिलार्थीस पुरवावी लागली आहे, हे पाहता अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी टाळाटाळ केल्याचे अथवा कोणत्याही असद्हेतूने विलंब लावल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर कोणतीही कारवाई करण्याचे आदेश आयोग देत नाही.

प्रसंगावशात जन अपिलीय अधिकारी यांच्या अनुपस्थितीची आयोगाने सखेद नोंद घेतली असून, यापुढे आयोगाच्या सुनावणीस त्यांनी व्यक्तिशः उपस्थित राहण्याची खबरदारी घ्यावी, असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.  या सुचनेची जिल्हाधिकारी, बीड यांनी नोंद घ्यावी.

अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त झाली आहे व जन माहिती अधिकारी यांच्यावर कोणतीही कार्यवाही वर नमूद केलेल्या कारणास्तव करण्याचे आदेशित न केल्याने या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत

आहेत.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )
दिनांक ०९-०७-२००८ राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अशोक आनंतराव हावळे, कबाड गल्ली, बोरा किराना दुकानाच्या पाठीमागे, सिमेंट कॉर्नर मोहन सिरसाट यांचा वाडा, मु. पो. ता. जि. बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३१३

निर्णय दिनांक ०९-०७-२००८

श्री. सुरेश किष्टन्ना इरपनवार, : अपिलार्थी
रा. पो. सरस्वती विद्या मंदिर परिसर,
हनुमान मंदीर जवळ, किनवट, तालुका
किनवट, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका
कृषि अधिकारी कार्यालय, किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका
कृषि अधिकारी कार्यालय, किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्ष | जन माहिती अधिकारी | : | तांत्रिक कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, किनवट, जिल्हा नांदेड |
| | जन अपिलीय अधिकारी | : | तालुका कृषि अधिकारी, किनवट, जिल्हा नांदेड |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०७-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. सुरेश किष्टन्ना इरपनवार (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. गुणवंत किशनराव टारपे, जन माहिती अधिकारी तथा तांत्रिक कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, किनवट (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. नंदकिशोर वसंतराव नाईनवाड, जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, किनवट (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक ३०-०५-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत सन २००४ ते २००७ या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> " वरिल प्रमाणे मागणी नुसार आपल्या कार्यालया अंतर्गत झालेल्या कामाची सुची व त्यावर झालेल्या खर्चाची सुची इत्यादी बाबत छायाकिंत प्रतीत माहिती मिळणे बाबत."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिश: अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांच्याकडील दिनांक २६-०६-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती संकलीत करण्याकरिता, सदर माहितीची व्याप्ती व स्वरुप मोठ्या प्रमाणात असल्याने वेळ लागेल असे अपिलार्थीस कळविले व तदनंतर दिनांक १२-०७-२००७ रोजीच्या पत्राने अपिलार्थीस हव्या असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ६२२० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले असून सदर पत्राच्या मूळ प्रतीवर अपिलार्थीची सही आहे.

तथापि मध्यंतरीच्या काळात अपिलार्थीस अपेक्षित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील

कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १४-०८-२००७ रोजी सुनावणी घेऊन त्याच दिवशी आपले आदेश पारित केले आहे. सदर आदेशामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य देण्याचे सूचित केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या निर्णयानुसार जन माहिती अधिकारी यांनी माहिती तयार करुन ठेवली, तथापि अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी त्यांच्याकडे व्यक्तिशः हजर न राहिल्यामुळे ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून आदेश प्राप्त होऊनही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०८-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये, त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असल्याचे दिसून येत आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी, अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून आता ते अपिलार्थीस ती विनामूल्य देण्यास तयार आहेत. या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी कोठल्याही प्रकारे टाळाटाळ केली नाही, परंतु अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने माहिती तयार

करुन ते अपिलार्थी सदर माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयात हजर होतील या अपेक्षेने त्यांची वाट पाहता राहिले.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी जन माहिती अधिकारी यांना विनामूल्य देण्याचे त्यांच्या दिनांक १४-०८-२००७ रोजीच्या आदेशामध्ये सूचित केले होते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देण्याकरिता तयार ठेवलेली माहिती त्यांनी तपासली असता ती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील कामाशी संबंधीत असून त्यामध्ये गावनिहाय कामाची यादी व त्यावर झालेला खर्च इतपतच मर्यादित होती. सर्व शासकीय प्राधिकरणे आपल्याकडील लेख्यांचे व कामाचे लेखा अहवाल महालेखापालाकडे दरमहा पाठवीत असतात व प्रत्येक वर्षाच्या मार्च महिन्याच्या अखेरीस अशा सर्व कामावर झालेला खर्च या प्राधिकरणाकडे कामाच्या यादी सह उपलब्ध असतो व हे अभिलेख महालेखापालाकडे दरमहा २० तारखेच्या आत नियमीतपणे जात असतात. त्यामुळे अपिलार्थीने मागितलेली माहिती संकलीत करणे अथवा ती नव्याने तयार करुन देणे अशातली कोणतीही बाब येथे उद्‌भवत नाही. अपिलार्थीने मागितलेली माहिती ३ वर्षाची होती. माहितीचे स्वरुप सरळ आणि सोपे होते, शासकीय प्राधिकरणाकडे ठेवल्या जाणा-या आणि महालेखापाल कार्यालयाकडे पाठविण्यात येणा-या अभिलेखासंदर्भात प्रचलीत कारवाई पाहता ही माहिती अपिलार्थीस देणे हे जन माहिती अधिकारी यांना फार क्लिष्ट स्वरुपाचे काम होते असे आयोगास वाटत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथम प्रतिसाद अधिनियमाव्दारे विहित मुदतीत दिला असला तरी त्यांच्या दिनांक २६-०६-२००७ रोजीच्या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस सदर माहिती संकलीत करण्यात येत असल्याचे व त्यांना माहिती

देण्यासाठी जादा कालावधी लागण्याचे अवगत केले आहे. जन माहिती अधिकारी यांची ही कृती अवैध आहे कारण अपिलार्थीने मागणी केलेल्या या माहितीचा कालावधी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देण्यासाठी प्रस्तावित करण्यात आलेल्या माहितीच्या पृष्ठांची संख्या, माहिती पुरविण्याचे दर व एकूण रक्कम इत्यादी तपशील अपिलार्थीस कळवावयाचा असतो, तथापि अशा प्रकारची कारवाई त्यांनी दिनांक १२-०७-२००७ रोजीच्या पत्रामध्ये केल्याचे दिसून येत नाही. सर्वसाधारण परिस्थितीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून जी कारवाई दिनांक २९-०६-२००७ रोजी अगर तत्पूर्वी अधिनियमातील कलम ७ प्रमाणे होणे अभिप्रेत होते, तथापि ती कारवाई अधिनियमातील विहित मुदत टळून गेल्यानंतर दिनांक १२-०७-२००७ रोजी केली. त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांनी अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग केल्याचे दिसून येते, एकदा विहित मुदत टळून गेल्यानंतर कलम ७ (६) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य देणे भाग आहे व त्याप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांनी देखील जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित केले आहे. त्यांच्या अपील निर्णयामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यसाठी विशिष्ट अशी मुदत घालून दिल्याचे दिसत नाही, मात्र सदर माहिती अपिलार्थीस व्यक्तिशः उपलब्ध करुन देण्यासाठी सूचित केले आहे. यावरुन जन अपिलीय अधिकारी यांना अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात त्यांनी मूळ अर्जात नमूद केलेली माहिती घेण्यासाठी व्यक्तिशः हजर होतील व माहिती प्राप्त करुन घेतील असे गृहीत धरुन हा निर्णय दिल्याचे दिसून येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती तयार करुन ठेवली आहे व ती अपिलार्थीस विनामूल्य पुरविण्यात यावी असे आदेशित करण्यात येत आहे. तसेच त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थी

यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहून व्यक्तिशः माहिती हस्तगत करुन घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना ३ दिवसाच्या आत, अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयात व्यक्तिशः उपस्थित झाल्यास ती विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद
दिनांक ०९-०७-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुरेश किष्टन्ना इरपनवार, रा. पो. सरस्वती विद्या मंदिर परिसर, हनुमान मंदीर जवळ, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा तांत्रिक कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३१४

निर्णय दिनांक ०९-०७-२००८

श्री. राजाराम श्रीधरराव भोंडे, : अपिलार्थी
बालाजी मंदिरामागे दुर्गावाडी, पैठण,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उप विभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग,
शेवगांव, जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता, रोजगार हमी
योजना (कार्य.) विभाग, अहमदनगर,
जिल्हा अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०७-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. राजाराम श्रीधरराव भोंडे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. बाबुराव केरबा आदमाने, जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, शेवगांव (यापुढे

त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. सुरेश गोपाळराव देशपांडे, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, रोजगार हमी योजना (कार्य.) विभाग, अहमदनगर हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक २४-०४-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०१-२००६ ते २७-०४-२००७ पर्यंतच्या कालावधीशी संबंधीत शेवगांव, जिल्हा अहमदनगर ते पैठण, जिल्हा औरंगाबाद या रस्त्यावर चालू असलेल्या मजबुतीकरण व डांबरीकरणासंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"१. शेवगांव ता. शेवगांव जिल्हा अहमदनगर ते पैठण ता. पैठण जिल्हा औरंगाबाद या चालू आसलेल्या मजबुतीबाबत डांबरीकरणा करण कामाचे आंदाजपत्रक ट्रेडरची प्रती मिळणेबाबत.

२. या रस्त्याचे आता पर्यंत काम झालेल्या प्रती दिनांकसह.

३. या कामाच्या आता पर्यंत दिलेल्या बिलाच्या प्रतीच्या नकला मिळणेबाबत."

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २३-०५-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ८५१२ इतके त्यांच्या कार्यालयात जमा करण्याचे सूचित केले. या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (३) प्रमाणे आवश्यक असलेला या शुल्काचा हिशोबासह तपशील पुरविला नाही. सदर पत्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस साध्या पोस्टाने पाठविल्याचे दिसून येत आहे. त्यांच्या म्हणण्यापृष्ट्यर्थ त्यांनी त्यांच्या कार्यालयातील जावक नोंदवहीची झेरॉक्स प्रत आयोगास सादर केली असून, यावरुन त्यांनी दिनांक २३-०५-२००७ रोजी त्यांच्या कार्यालयातील ४०९ या

क्रमांकाचे पत्र अपिलार्थीस पाठविल्याचे दिसून येत आहे. या प्रतीची पाहणी केली असता ४०९ या क्रमांकापुढे अपिलार्थीचे नाव व पत्ता लिहून संबंधीत विषय या सदराखाली "माहिती आधी माहीती मिळणेबाबत" असे त्यांच्या कार्यालयाने नमूद केले असून, हे हस्ताक्षर व सदरील प्रतीवरील उर्वरित हस्ताक्षर पूर्णत: भिन्न असल्याने, अपिलार्थीस सदर पत्र जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने पाठविल्याबाबत आयोग साशंक आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास, अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०६-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०९-०८-२००७ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश त्याच दिवशी पारित केले. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीचे अपील मान्य करुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले. याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १८-०८-२००७ रोजी विनामूल्य माहिती दिल्याचे दिसून येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०८-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. अपिलार्थीस जरी जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली असली तरी अपिलार्थीस ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी संबंधीत कंत्राटदार व अधिकारी यांच्याकडून त्रास दिला गेला असे अपिलार्थीचे म्हणणे आहे व यासंदर्भात त्यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकाकडे दिनांक २३-०७-२००७ रोजी अर्ज केला असून, या प्रकरणाचा संपूर्ण तपशील मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांच्याकडे दिनांक २१-०८-२००७ रोजी तसेच मुख्य सचिव व सचिव सार्वजनिक

बांधकाम यांना देखील याप्रमाणे दिनांक २३-०८-२००७ रोजी फॅक्सव्दारे हा संपूर्ण प्रकार कळविल्याचे नमूद केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी, अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विलंबाने माहिती प्राप्त झाल्याबद्दल, त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी व त्यांना या प्रकरणी माहिती प्राप्त करुन घेण्याकामी झालेल्या मारहाणीची दखल घेऊन संबंधितांवर कारवाई करण्याचे आदेशित करावे अशी त्यांनी आयोगास विनंती केली.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते या पदावर दिनांक १६-०६-२००७ रोजी रुजू झाले असून, ते रुजू झाल्यानंतर अपिलार्थीच्या दिनांक १८-०६-२००७ रोजीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०९-०८-२००७ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती पुरविण्यासाठी सूचित केले आहे. त्यांच्या मूळ अर्जाव्दारे अपेक्षिलेली माहिती त्यांना दिनांक १८-०८-२००७ रोजी विनामूल्य दिलेली आहे. अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांच्याकडून अपिलार्थीस कोणताही त्रास दिला गेला नाही किंवा अपिलार्थीवर अन्याय झालेला नाही. अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यासाठी त्यांना कोणताही अडथळा आणला नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक १८-०६-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक ०५-०७-२००७ रोजी व दिनांक १९-०७-२००७ रोजी सुनावणी आयोजित केली होती, तथापि सदर सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर राहिल्याने त्यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर दिनांक ०९-०८-२००७ रोजी अंतिम सुनावणी घेऊन आपले आदेश त्याच दिवशी पारित केले. या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप सरळ व सोपे होते, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २४-०४-२००७ रोजीच्या अर्जास दिनांक २३-०५-२००७ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस हव्या असलेल्या माहितीचे शुल्क रुपये ८५१२ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे त्यांच्याकडील पत्राव्दारे सूचित केले. या पत्रामध्ये अपिलार्थीस पुरविण्यात येणा-या माहितीच्या पृष्ठांची संभाव्य संख्या व माहिती पुरविण्याचा प्रतिपृष्ठ दर आणि इतर तपशील कळविल्याचे दिसून येत नाही, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील कलम ७ (३) चा भंग झाल्याचे दिसून येत आहे व परिणामी अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी विनामूल्य देणे भाग पडत आहे. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १८-०८-२००७ रोजी विनामूल्य माहिती पुरविली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २३-०५-२००७ रोजी रुपये ८५१२ इतक्या रकमेचा भरणा त्यांच्या कार्यालयात करण्याचे सांगितले, यावरुन त्यावेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने मागितलेली माहिती तयार असावी, असे अनुमान काढण्यात येत आहे. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर असे सांगितले की, दिनांक १९-०७-२००७ रोजी अपिलार्थीने, त्यांनी त्यांना सदर माहितीची आवश्यकता नाही, असे जन माहिती अधिकारी यांना लेखी दिले आहे. यावर अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी अपिलार्थीकडून बळजबरी करुन त्यांच्याकडून अशा

प्रकारचा मजकूर लिहून घेतला आहे. हा सर्व घटनाक्रम पाहता या प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने माहिती प्राप्त होण्यासाठी कोण जबाबदार आहे, याची सखोल चौकशी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांनी करावी असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे. तसेच माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती मागविणे, हा अपिलार्थीचा अधिनियमातील कलम ३ प्रमाणे हक्क आहे व या हक्कापासून त्यांना कोणीही वंचित ठेऊ शकत नाही, त्यामुळे अपिलार्थीस या प्रकरणामध्ये संबंधितांकडून झालेली मारहाण, त्यांना माहिती प्राप्त करुन घेण्याच्या प्रक्रियेमध्ये त्यांच्या मार्गात आणलेले अडथळे हे निश्चितपणे महत्वाचे विषय होऊ शकतात. सबब जिल्हा पोलीस अधीक्षक, अहमदनगर यांनी त्यांच्याकडे केलेल्या अपिलार्थीच्या दिनांक २३-०७-२००७ रोजीच्या तक्रारीची गांभीर्याने दखल घेऊन, या प्रकरणात हे आदेश निर्गमीत होताच अपिलार्थीच्या सदर प्रकरणात चौकशी करुन आपला अहवाल आयोगास सादर करावा व संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन आवश्यक ती कार्यवाही करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांनी अपिलार्थीच्या विषयाधन अर्जाप्रकरणी सखोल चौकशी करुन अपिलार्थीस विलंबाने माहिती प्राप्त झाल्या प्रकरणी जबाबदारी निश्चित करुन याबाबतचा अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याच्या आत सादर करावा.

३. जिल्हा पोलीस अधीक्षक अहमदनगर यांनी हे आदेश निर्गमीत होताच अपिलार्थीच्या दिनांक २३-०७-२००७ च्या तक्रार अर्जावर सखोल चौकशी करावी व संबंधितांवर

आवश्यक ती कार्यवाही करुन या प्रकरणातील आपला अहवाल आयोगास हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याचे आत सादर करावा.

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | | ( वि. बा. बोरगे ) |
| दिनांक | ०९-०७-२००८ | राज्य माहिती आयुक्त, |
| | | खंडपीठ औरंगाबाद |

प्रत,

१ श्री. राजाराम श्रीधरराव भोंडे, बालाजी मंदिरामागे दुर्गावाडी, पैठण, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, शेवगांव, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, रोजगार हमी योजना (कार्य.) विभाग, अहमदनगर, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ पोलीस अधीक्षक, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३१५

निर्णय दिनांक ०९-०७-२००८

श्री. राजेंद्रकुमार शिवप्रसादजी मुंदडा, : अपिलार्थी
"त्रिमुर्ती", ब. नं. ३३, न्यू आदर्श कॉलनी,
पूर्णा (जं.), तालुका पूर्णा जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा कार्यकारी अभियंता, पूर्णा
पाटबंधारे विभाग, वसमतनगर,
तालुका वसमतनगर, जिल्हा हिंगोली

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता, नांदेड
पाटबंधारे मंडळ, नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०७-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. राजेंद्रकुमार शिवप्रसादजी मुंदडा (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. गणेश वसंतराव व्यवहारे, जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पूर्णा पाटबंधारे विभाग, वसमतनगर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. हाशमी सय्यद सिकंदर, सहाय्यक अधीक्षक अभियंता, जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड

यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक २८-०२-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या अधिपत्याखालील रोखपाल / लिपीक या पदावर कार्यरत असलेले श्री. भगवान लक्ष्मण भायेकर यांच्या संदर्भात एकूण ३१ मुद्दयांवर माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास, जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद दिला नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०४-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी, कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही, मात्र अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भात ते जन माहिती अधिकारी व अपिलार्थी यांच्याशी वेगवेगळा पत्रव्यवहार एकाच वेळी करत राहिले.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता विशेषतः अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाची माहिती विचारल्याने, या प्रकरणी अधिनियमातील कलम ११ च्या वापरासह जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय घेणे उचित राहील असे या टप्प्यावर आयोगास वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक १८-०४-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर हे आदेश निर्गमीत होताच २१ दिवसाच्या आत सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपला निर्णय पारित करावा. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने समाधान न झाल्यास अपिलार्थी हे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या दिनांक १८-०४-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर हे आदेश निर्गमीत होताच २१ दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय तात्काळ पारित करावा.

औरंगाबाद
दिनांक ०९-०७-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. राजेंद्रकुमार शिवप्रसादजी मुंदडा, “त्रिमुर्ती”, ब. नं. ३३, न्यू आदर्श कॉलनी, पूर्णा (जं.), तालुका पूर्णा जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पूर्णा पाटबंधारे विभाग, वसमतनगर, तालुका वसमतनगर, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३१९

निर्णय दिनांक : १०.०७.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. माधव यादवराव धोतरे,<br>रा. जालना. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, जालना | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, जालना | : | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०.०७.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. माधव यादवराव धोतरे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. नारायण बालाजी चांडोले, जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. हेमंत शरच्चंद्र वसेकर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.जालना, जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांच्याकडील दि.०३.०१.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालय, जालना या शाळेसंदर्भात एकूण दोन मुद्यांवर खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालय, जालना या शाळेवर प्रशासक बसविण्याची कारण मिमांसाची माहिती

(सन १९७६-१९८१)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालय, जालना या शाळेची मान्यता काढण्याची कारणे व परत ज्या अटीवर मान्यता दिली त्याची माहिती व (छायांकित प्रती) (१९९०-१९९३)"

अपिलार्थीने या अर्जाद्वारे अपेक्षिलेल्या माहितीसाठी टपालाने/व्यक्तिशः अथवा तत्सम पर्यायाचा उल्लेख त्यांच्या मूळ अर्जात केलेला नाही.

सदर माहितीतील मुद्दा क्र.१ सन १९७६ ते १९८१ या कालावधीशी संबंधित आहे, तर मुद्दा क्र. २ चा संबंधित कालावधी १९९० ते १९९३ असा आहे.अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १२.१.२००७ च्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन त्यांनी मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १ शी संबंधित कागदपत्रे जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडील माध्यमिक शिक्षण विभागाच्या कार्यालयातून व मुद्दा क्र. २ ची माहिती शिक्षण संचालक, औरंगाबाद यांच्याकडून प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले आहे. अपिलार्थीस हे पत्र देऊन त्यांनी अपिलार्थीचा अर्ज निकाली काढल्याचे कळविले आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशाप्रकारच्या उत्तराने समाधान न झाल्याचे अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२२.०१.२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात दि. २०.२.२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि सदर सुनावणीस अपिलार्थी हे अनुपस्थित असल्याने अपिलार्थीच्या अपिलावर दि. १३.३.२००७ रोजी आदेश पारित केले. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थी हे सुनावणीस गैरहजर राहिल्याने त्यांचे अपील फेटाळल्याचे अपिलार्थीस कळविले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार

अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.०२.२००७ रोजी द्वितीय अपील सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे नमूद करुन त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडे सुनावणी ठेवल्याबाबतचे पत्र अपिलार्थीस सुनावणीच्या पूर्वी किमान एक आठवडा आधी पाठविणे आवश्यक असतांना त्यांनी तसे पत्र अपिलार्थीस पाठविले नाही. त्यांना मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या मूळ अर्जास त्यांनी त्यांच्याकडील दि. १२.१.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याने अपिलार्थीस मुद्दा क्र.१ शी संबंधित माहिती शिक्षण विभाग (माध्यमिक) जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडून प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले. व मुद्दा क्र.२ शी संबंधित माहिती शिक्षण उपसंचालक,औरंगाबाद यांच्याकडून प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले. अपिलार्थीने मुद्दा क्र. १ ची माहिती ज्या कालावधीमधील मागितली आहे त्या कालावधीमध्ये, जालना जिल्हा परिषद अस्तित्त्वात आली नसल्यामुळे व जालना जिल्हा हा सन १९७६ ते १९८१ या कालावधीमध्ये औरंगाबाद जिल्हयाचा भाग असल्याने या कालावधीतील माहिती औरंगाबाद जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागाकडून प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालय, जालना या शाळेवर प्रशासक बसविण्याची/ नेमण्याची कारणमिमांसा व या शाळेस पुनर्मान्यता देण्याची कारणमिमांसा हे दोन मुद्दे उपस्थित केले

आहेत. अपिलार्थीने मागितलेली माहिती अधिनियमातील तरतुदीनुसार नसल्याने ती अपिलार्थीस देय नाही, असे त्यांनी आपल्या युक्तीवादामध्ये स्पष्ट केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तीवाद केला की, अपिलार्थीच्या दि. २२.१.२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर त्यांनी दि. २०.२.२००७ रोजी सुनावणी ठेवल्याचे अपिलार्थीस उद्देशून लिहिलेले पत्र दि. १५.२.२००७ रोजी पाठविले होते. या संदर्भात त्यांनी आपल्या कार्यालयाच्या जावक नोंदवहीतील त्यासंदर्भातील नोंदीची झेरॉक्स प्रत पुरावा म्हणून आज सुनावणीमध्ये आयोगास सादर केली. त्यांना, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये त्यांच्याकडील दिनांक १२.१.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद दिल्याने, सदर प्रतिसाद योग्य वाटल्याने आणि अपिलार्थी हे गैरहजर असल्याने, त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळून लावले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या त्यांच्या दि. ३.१.२००७ रोजीच्या माहितीच्या अर्जामध्ये, मुद्दा क्र.१ द्वारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालय,जालना या शाळेवर प्रशासक नेमण्याची कारणमिमांसेची माहिती मागितली होती तर, मुद्दा क्र.२ द्वारे याच शाळेची मान्यता काढणे व परत ज्या अटींवर मान्यता देणे, याबाबतची माहिती मागितली होती. यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना संबंधित विद्यालयाची शिक्षण खात्याने काढून घेतलेली मान्यता व त्या शाळेवर प्रशासक नेमण्याची कार्यवाही यासंदर्भात माहिती हवी आहे. अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीची मागणी मुद्दा क्र.१ मध्ये व्यवस्थितपणे केलेली नाही. तथापि अपिलार्थीस त्यांना या मुद्यांशी संबंधित माहिती देण्याच्या दृष्टीने, त्यांना या शाळेवर शिक्षण विभागाने प्रशासक बसविण्याच्या/नेमण्याच्या विषयावरील नस्तीमधील पत्रव्यवहार, टिपणी व आदेश इ.

कागदपत्रांच्या प्रती अपिलार्थीस दिल्यास त्यांना आवश्यक ती माहिती प्राप्त होऊ शकेल, असे आयोगास वाटते. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मुद्दा क्र. २ द्वारे या शाळेची मान्यता काढण्याच्या व परत पुनर्स्थापित करण्याची माहिती मागितली आहे. या मुद्यावरील माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्यावी लागेल. या मुद्याद्वारे देखील अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे शाळेची मान्यता काढण्याची कारणे विचारली आहेत. शाळेची मान्यता काढण्याच्या आदेशामध्ये या कारणांचा उल्लेख सर्वसाधारण परिस्थितीत असावयास हवा. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी शाळेची मान्यता काढण्याच्या आदेशाच्या प्रती देऊन मान्यता काढण्याचा व ती पुनर्स्थापित करण्याचा निर्णय ज्या शिक्षण विभागाच्या सक्षम प्राधिकरणाने घेतला आहे, त्यांच्याकडून संबंधित नस्ती प्राप्त करुन घेऊन त्यातील आवश्यक तो भाग अपिलार्थीस पुरविल्यास अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती मिळू शकेल, असे आयोगास वाटते. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, अपिलार्थीने ज्या कालावधीमधील माहिती मागितली आहे. त्या कालावधीमध्ये जालना जिल्हा परिषद अस्तित्त्वात नव्हती, तर अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ शी संबंधित माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नव्हती. माहिती अधिकार अधिनियमामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे जी माहिती उपलब्ध आहे, तिच माहिती अपिलार्थीस देणे योग्य आहे, हा जन माहिती अधिकारी यांचा युक्तीवाद जरी वस्तुस्थितीवर आधारीत असला तरी, जर एखाद्या प्राधिकरणाकडे अर्जदाराने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसेल तर जन माहिती अधिकारी यांनी काय कार्यवाही करावयाची याचे सुस्पष्ट विवेचन माहिती अधिकार अधिनियमातील कलम ६ मध्येय केलेले आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अर्जाच्या झेरॉक्स प्रती काढून त्यातील एक प्रत माध्यमिक शिक्षण विभाग औरंगाबाद यांच्याकडे व दुसरी प्रत विभागीय शिक्षण उपसंचालक,औरंगाबाद यांच्याकडे पाठविणे, अधिनियमातील कलम

६(३) (एक) अन्वये आवश्यक होते, तथापि जन माहिती अधिकारी यांनी अशाप्रकारची कोणतीही कृती केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे अर्जदारास त्यांच्या निर्णयासंदर्भातील कोणतेही कारणे विचारणे, अभिप्राय नसल्याचे निर्देशित केल्याची माहिती जरी योग्य असली तरी सर्वसाधारणपणे शाळेची मान्यता काढणे व ती पुनर्स्थापित करणे या आदेशामध्ये अशाप्रकारची कारणमिमांसा देणे सर्वसाधारण प्रचलित संकेताप्रमाणे अभिप्रेत आहे, त्यामुळे या दोन्ही आदेशाच्या प्रती अपिलार्थीस दिल्यास अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना प्राप्त होऊ शकेल, सबब जिल्हा परिषद, औरंगाबाद विभाग, जिल्हा परिषद, जालना विभाग व विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद हे एकाच प्राधिकरणाचे वेगवेगळे भाग असल्याने जन माहिती अधिकारी यांनी अशाप्रकारची कृती करणे गरजेचे होते. अपिलार्थीने मूळ अर्ज केल्यापासून आता सुमारे दीड वर्षाचा कालावधी लोटला असल्याने या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी जबाबदारी स्वीकारावी, असे आयोगातर्फे त्यांना सूचित करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याकरिता संबंधित संस्थेकडे विचारणा केली असता व आज रोजी आयोगासमोर संबंधित संस्थेचे मुख्याध्यापक श्री. विक्रम रावण सरवदे यांच्याकडे विचारणा केली असता, त्यांनी सदर कागदपत्रे चोरीस गेल्याचे आयोगास सांगितले. त्यांच्या कार्यालयात झालेल्या कथित चोरी प्रकरणी त्यांनी पोलीस विभागाकडे तक्रार दाखल केली होती काय, याची विचारणा केली असता, त्यांनी त्यावर होकार दिला, तथापि या संदर्भातील कोणतेही कागदपत्रे आयोगासमोर दाखविण्यास त्यांनी असमर्थता व्यक्त केली. जर संबंधित शिक्षण संस्था माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींचे पालन योग्य तऱ्हेने करित नसेल, त्यांच्याकडील अभिलेख्यांचे व्यवस्थित जतन करुन ठेवत नसेल तर. त्या संस्थेवर शिक्षण

विभागातील सक्षम प्राधिकरणाने त्यांच्याकडील प्रचलित नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करणे गरजेचे आहे, असे आयोगास वाटते कारण, शाळेची मान्यता, प्रशासक नेमण्याविषयीचा पत्रव्यवहार इत्यादी महत्त्वाची कागदपत्रे 'अ' प्रवर्गातील असून त्याचे कायमस्वरुपी जतन करुन ठेवणे या संस्थेचे व संबंधित शिक्षण विभागाचे आहे, असे आयोग मानते. जर अशाप्रकारची कर्तव्ये शिक्षण संस्था अपेक्षेप्रमाणे पार पाडत नसेल तर काय कार्यवाही करावी, याचा विचार विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद यांनी करावा. वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती वरील प्रमाणे संबंधित शिक्षण विभागाकडून संकलीत करुन अपिलार्थीस तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद जिल्हा परिषद, शिक्षण (माध्यमिक) विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद व यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना देण्यासाठी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, जालना यांना आवश्यक ते संपूर्ण सहाय्य या प्रकरणी करावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**२.** जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : १०.०७.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. माधव यादवराव धोतरे, द्वारा नवाबची बिल्डींग, डॉ. साजीदच्यासमोर, मोदीखाना,जालना

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३२०

निर्णय दिनांक : १०.०७.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. नंदकिशोर भाऊसाहेब पा.जाधव,<br>रा. पालखेड ता.वैजापूर जि.औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा कनिष्ठ अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>परसोडा ता.वैजापूर जि.औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपअभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>वैजापूर जि.औरंगाबाद | : | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०.०७.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. नंदकिशोर भाऊसाहेब पा.जाधव (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल),श्री. अनिल केशवराव कुलकर्णी, जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,परसोडा ता.वैजापूर जि.औरंगाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर जन अपिलीय अधिकारी तथा उपअभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,वैजापूर जि.औरंगाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांच्याकडील दि.२०.०३.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित दि. १.१.१९९० ते १९.३.२००७ या कालावधीशी संबंधित खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" १) परसोडा यूनिट मधील डी.पी.ला बसविण्यात आलेल्या कॅपीसटर चालू व बंद असलेल्याची संख्या व सविस्तर माहिती (झेरॉक्स प्रत)

२) पालखेड गावातील शेतकऱ्यांना जोडणी केलेले विद्युत कनेक्शनची एकूण संख्या व यादी झेरॉक्स प्रत.

३) शेतकऱ्यांसाठी (शेतीपंपासाठी असलेले विद्युत कंपनीच्या सवलतीची माहिती."

अपिलार्थीने सदर माहिती टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.०५.०६.२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे अथवा या संदर्भात अपिलार्थीस कोणताही पत्रव्यवहार केल्याचे आयोगास सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.०८.२००७ रोजी द्वितीय अपील सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी त्यांना आवश्यक ती माहिती न मिळाल्याने त्यांनी हे द्वितीय अपील आयोगाकडे केले असल्याचे म्हटले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की,या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे कर्तव्य योग्य तऱ्हेने पार पाडले नाही, त्यांना दिनांक ५.६.२००७ रोजी विनामूल्य प्राप्त झाली आहे.जन

माहिती अधिकारी यांनी त्यांच्या अपिलावर सुनावणी घेणेसंदर्भात व तसेच त्यांच्याशी पत्रव्यवहार करण्याचे हेतुपूर्वक टाळले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना दि. ५.६.२००७ त्यांना व्यक्तीशः पुरविली आहे.त्यांनी अपिलार्थीस दि. ५.६.२००७ रोजी पुरविलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, या माहितीमध्ये अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.३ शी संबंधित माहितीचा समावेश नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप हे सरळ व सोपे होते. त्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयाची साधनसामुग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागत होती, अशातील कोणतीही बाब येथे संभवत नाही. अपिलार्थीने दि. २०.३.२००७ रोजी मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस सर्वसाधारणपणे दि. १९.४.२००७ पूर्वी देणे भाग होते, तथापि या प्रकरणी असे आढळून आले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जावर जी कार्यवाही अधिनियमातील कलम ७ व ७(१),(३) प्रमाणे अपेक्षित होते,अशी कोणतीही कार्यवाही केलेली नाही. मात्र अपिलार्थीने दि. ५.६.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर अपिलार्थीने मागणी केलेली तीन मुद्यांपैकी दुसऱ्या मुद्यावरील माहिती त्यांना अपिलार्थीस पुरविली आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली नाही, असे येथे सप्रमाण सिध्द होत आहे. ही माहिती अपिलार्थीस आता सात दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी आश्वासित केले आहे. तथापि उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती

देण्यासाठी लावलेला विलंब ही वस्तुस्थिती वास्तवात उरत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय दीर्घकाळापासून वंचित ठेवून आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब कार्यकारी अभियंता (सं. व सु.),महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, कन्नड विभाग, जि. औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा त्यांच्यावर प्रचलित सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याच्या आत पूर्ण करुन आपला अनुपालन अहवाल तद्नंतर एक महिन्याच्या आत आयोगास सादर करावा.

अपिलार्थीस माहिती देण्याच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली मुद्दा क्र. ३ शी संबंधित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी अपिलार्थीचा मूळ आक्षेप जन अपिलीय अधिकारी यांच्या वर्तनाबाबत असल्याचे दिसून येते. अपिलार्थीस दि. ५.६.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे अधिनियमाद्वारे विहित केलेल्या कालावधीमध्ये निर्णय न देऊन अधिनियमातील कलम १९(६) चा भंग केल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. त्यांनी आपल्या कृतीद्वारे आपल्या कार्यशैलीतील बेपर्वाई व बेजबाबदारपणा सिध्द केला आहे, असे आयोगाचे मत आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या कार्यशैलीतील यथायोग्य नोंद व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई यांनी घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येते. अपिलार्थीच्या आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये हे अपील करतेवेळी माहिती

मिळाली नसल्याचे नमूद केले आहे, परंतु सदर अपील करण्याचा त्यांचा उद्देश जन अपिलीय अधिकारी यांच्या या प्रकरणातील वर्तन आयोगाचे नजरेस आणून देणे, हा होता. जन अपिलीय अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या वर्तनाची नोंद आयोगाने घेऊन आपले अभिप्राय वरीलप्रमाणे कळविले आहेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ३ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच  दिवसांचे आत सशुल्क/विनामूल्य पुरवावी.

३. कार्यकारी अभियंता (सं व सु) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, मर्यादित कन्नड विभाग, जि.औरंगाबाद यांनी उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याच्या आत पूर्ण करुन आपला अनुपालन अहवाल तद्नंतर एक महिन्याच्या आत आयोगास सादर करावा.

४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या उपरोक्त प्रकरणी त्यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीची यथायोग्य नोंद त्यांच्याकडे घ्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : १०.०७.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. नंदकिशोर भाऊसाहेब पा.जाधव, मु.पो.पालखेड ता.वैजापूर,जि. औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, महाराष्ट्र राज्य वितरण कंपनी मर्यादित कार्यालय,परसोडा ता.वैजापूर जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, वैजापूर जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ कार्यकारी अभियंता (सं. व सु), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,विभाग कन्नड जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, ‘प्रकाशगड’, मुख्य कार्यालय प्लॉट क्र.जी-९, ६ वा मजला, महावितरण, प्रा.अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व) मुंबई-४०० ०५१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३२१

निर्णय दिनांक : १०.०७.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. जगनराव बाबुराव चोरगे,<br>रा. वाळुज औरंगाबाद जि.औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ<br>जि.औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी,<br>महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,<br>अंधेरी (पूर्व),मुंबई-९३ | : | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०.०७.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. अशोक नानाजी चौधरी, जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ जि.औरंगाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. उदय आनंदराव जाधव, जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,मुंबई (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर अपिलार्थी श्री. जगनराव बाबूराव चोरगे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांची सुनावणीसाठी कुठलीही तयारी नसल्यामुळे, सदर प्रकरणातील आयोगाकडील आजची सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन पुढील तारीख दिनांक ०७.१०.२००८ रोजी सकाळी ठीक १०.३० वाजता आयोगाच्या औरंगाबाद स्थित कार्यालयात निश्चित करण्यात आली आहे.

जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी सदर अपीलाच्या दिनांक ०७.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या सुनावणीच्या पूर्वी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील समाविष्ट सर्व मुद्दे, या माहितीवर जन माहिती अधिकारी यांनी अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाप्रमाणे सुधारीत करुन दिलेली माहिती, अपिलार्थीने आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपील अर्जातील मुद्दे व जन माहिती अधिकारी यांचे या मुद्यांवरील स्वयंस्पष्ट अभिप्रायासह (अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे किंवा कसे, असल्यास ती कधी करुन देण्यात येईल व नसल्यास त्याबाबतची कारणे) माहिती शपथपत्राद्वारे आयोगाकडे सादर करावी.

सदर सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही गैरहजर राहिले तर त्यांच्या गैरहजेरीत सदर प्रकरणी निर्णय घेण्यात येईल व तो दोन्ही पक्षास बंधनकारक राहील.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : १०.०७.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. जगनराव बाबूराव चोरगे, प्लॉट नं.सी-९९, एम.आय.डी.सी.वाळूज, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, उद्योग-सारथी, महाकाली गुफा रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०० ०९३ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३२२

निर्णय दिनांक : १०.०७.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. दत्ता दामोधर शेटे,<br>रा. ता.लोहा जि.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा उपविभागीय अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम उपविभाग, लोहा<br>जि. नांदेड | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग,<br>नांदेड | : | |

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड

जन अपिलीय अधिकारीः अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड.

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०.०७.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. यशवंत भगवानराव गुटे, सहायक जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लोहा जि.नांदेड, श्री. अविनाश त्रिंबकराव धोंडगे, जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. सुनिल अण्णासाहेब

वांढेकर,जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर अपिलार्थी श्री. दत्ता दामोधर शेटे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांच्याकडील दि.२२.११.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाकडील जुने चर रोलर विकल्या संदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> " सा.बांधकाम १९८० पुर्वीचे बैलगाडीने ओढण्याचे चार रोलर होते ते भंगारात विकले आहे त्याची किंमत व वजण किती आहे."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.५.०३.२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १३.०३.२००७ रोजी सुनावणी ठेवली होती, तथापि सुनावणीस अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे हजर न राहिल्यामुळे सदर सुनावणी त्यांनी घेतली नाही वा या संदर्भातील कोणताही निर्णय पारित केला नाही. अपिलार्थीस सुनावणीस हजर राहण्यासाठी जन अपिलीय अधिकारी यांचे त्यांच्याकडील दि. ७.३.२००७ रोजीच्या पत्रान्वये कळविले असून सदर पत्र अपिलार्थीस अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगने पाठविले आहे. त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ त्यांनी सदर पत्र पाठविल्याची त्यांच्या कार्यालयातील पोस्टाची पावती सादर केली. जन अपिलीय

अधिकारी यांच्याकडे अपील दाखल करुनही कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.०५.२००७ रोजी द्वितीय अपील सादर केले आहे. या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून सदर रोलर अवैध, विनापरवानगी भंगारात विकले आहे, असे जास्तीचे अभिप्राय या अपील अर्जात लिहून दिले आहेत.

आज रोजी झालेल्या युक्तीवादाचे वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्याने राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेल्या द्वितीय अपीलातील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तीवाद समजून अपिलाची सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे ज्या रोलरविषयी माहिती मागविली आहे, ते रोलर जलसंपदा विभागाच्या मालकीचे होते. सदर रोलरची चार चाके सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माळेगाव व लोहा येथील विश्रामगृहात आवारात जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी ठेवून दिली होती. या रोलरची नोंद सार्वजनिक बांधकाम खात्याच्या कोणत्याही अभिलेख्यावर नव्हती. अपिलार्थीने माहितीची मागणी करतेवेळी रोलरची चार चाके या विश्रामगृहाच्या आवारात नव्हती. या चाकांची मालकी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे नसल्याने या चाकांचे पुढे काय झाले याची त्यांना माहिती नाही. ही माहिती अपिलार्थीस देण्याकरिता त्यांच्याकडे तयार होती, तथापि अपिलार्थीने व्यक्तीशः माहितीची मागणी करुनही अपिलार्थी हे माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कधीही हजर झाले नाहीत. त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती प्राप्त होऊ शकली नाही. अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता त्यांनी त्यांच्या कार्यालयातील श्री. महाबळे नावाच्या चौकीदारामार्फत त्यांनी निरोप पाठविला होता. तथापि निरोप मिळूनही अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात उपस्थित झाले नाहीत. आज रोजी अपिलार्थीने मागणी

केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून ते ती अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तीवाद केला की, अपिलार्थीच्या दि. ५.३.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी दि. १३.३.२००७ रोजी सुनावणी ठेवली होती, सुनावणीस हजर राहण्यासाठी अपिलार्थीस पूर्वसूचना त्यांच्या दि. ७.३.२००७ च्या पत्राद्वारे दिली होती. तथापि अपिलार्थी हे सदर सुनावणीस कधीही उपस्थित झाले नाहीत. त्यामुळे त्यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणताही निर्णय दिला नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळात सदर अर्ज प्रथमतः उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, लोहा यांच्याकडे केले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या परिपत्रकानुसार सार्वजनिक बांधकाम विभागात माहिती अधिकारी -कार्यकारी अभियंता तर अपिलीय अधिकारी-अधीक्षक अभियंता हे आहेत. उपविभागीय अभियंता यांना माहिती अधिकारी म्हणून नेमले गेले नसल्याने या प्रकरणी त्यांनी अधिनियमातील कलम ६(३)(एक) मधील तरतुदीनुसार कार्यवाही करणे अपेक्षित होते. तथापि या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीचा अर्ज कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेडकडे न पाठविता ते तसेच स्वतःकडे ठेवून घेतला व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी ते अपिलार्थीची वाट पाहत राहिले. सहायक जन माहिती अधिकारी यांची ही कृती चुकीची असून त्यांनी अशाप्रकारच्या कृतीद्वारे अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीचा भंग केला असल्याचे येथे दिसून येते. तीच पुनरावृत्ती अपिलार्थीने केलेल्या त्यांच्या दिनांक ५.३.२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर झाल्याचे दिसून येते. कार्यकारी अभियंता हे अपिलीय अधिकारी नसल्याने त्यांना अपिलार्थीच्या या अपिलावर सुनावणीसाठी आमंत्रित

करण्याची कोणतेही प्रयोजन नव्हते. अपिलार्थीने ज्या रोलरविषयी माहिती मागितली आहे, त्याची पूर्वपिठीका तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता यांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये स्पष्ट केली आहे व सध्या कार्यरत असलेल्या जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता हे अपिलार्थीस आता त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली विनामूल्य देण्यास तयार आहेत, हे पाहता, अपिलार्थीने मूळ मागणी केलेली माहिती तयार ठेवून सदर आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सदर माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी. सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः अपेक्षिली असल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहण्याकरिता व माहिती हस्तगत करण्यासाठी पुरेसा कालावधी उपलब्ध व्हावा या हेतूने या दीर्घ कालावधीचा उल्लेख येथे करण्यात आला आहे.

मूळात अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुन ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात अथवा अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कधीही व्यक्तिशः उपस्थित झाले नसल्याचे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या युक्तीवादाचे खंडण करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीस जन माहिती व अपिलीय अधिकारी व राज्य माहिती आयोग यांच्याकडे सतत अनुपस्थित राहण्याच्या प्रवृत्तीमुळे खरोखरीच माहिती हवी आहे किंवा कसे याबाबत आयोगाच्या मनात संदेह निर्माण होत आहे. कोणत्याही अर्जदाराने व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यास, ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून प्राप्त करुन घेण्यासाठी अर्जदाराने त्या कार्यालयात स्वतः होऊन आपली उपस्थिती नोंदवून व ही माहिती प्राप्त करुन घेणे, 'व्यक्तिशः' या शब्दामध्ये अभिप्रेत आहे. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने अशाप्रकारची कोणतीही कृती न केल्याने त्यांना आवश्यक ती माहिती प्राप्त न होण्यास अपिलार्थी हे जबाबदार असल्याचा निष्कर्ष आयोग काढत आहे. अपिलार्थीस जर आताही त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असेल तर

त्यांनी हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीस दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित राहून ही माहिती हस्तगत करुन घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.उपरोक्त प्रकरणी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडे माहिती तयार असतानाही अपिलार्थी यांनी ती स्वतः होऊन उपलब्ध करुन घेतली नाही, हे निःसंशयपणे सिध्द झाल्याने, अपिलार्थीस आयोगाकडे केलेले द्वितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

२. अपिलार्थी यांनी, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत स्वतः उपस्थित राहून त्यांनी त्यांच्या दिनांक २२.११.२००६ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती कार्यकारी अभियंता यांच्याकडून हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी,असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. विहित मुदत संपल्यानंतर अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन घेण्याचा हक्क राहणार नाही.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : १०.०७.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. दत्ता दामोधर शेटे,शिवाजी चौक, साई हिरोहोंडा सर्व्हिस सेंटर मागे, लोहा, ता. लोहा, जि.नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३२३

निर्णय दिनांक : १०.०७.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. बलभीम (बप्पा) जगन्नाथ जाधव,<br>रा. दारफळ, ता.जि. उस्मानाबाद. | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत दारफळ,<br>ता.जि.उस्मानाबाद | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, उस्मानाबाद,<br>जि. उस्मानाबाद. | | |

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०.०७.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. बलभीम (बप्पा) जगन्नाथ जाधव, (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल),श्री. गिरीष रमाकांतराव कुलकर्णी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत दारफळ, ता.जि.उस्मानाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. अर्जुन निवृत्ती नागरगोजे, जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उस्मानाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.११.५.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" दारफळ येथील मारुती मंदीराशेजारील ग्राम पंचायतच्या गाळेचे बांधकाम कोणत्या साली पुर्ण झाले आणि आजपर्यंतच्या त्या दुकानाच्या भाडे वसूलीच्या पावत्या व जमाखर्चाची माहिती मिळणेबाबत."

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ५.७.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागितलेली माहिती ग्रामपंचायत रेकॉर्डला आढळून येत नसल्याचे अपिलार्थीस कळविले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि.०७.०७.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३०.०७.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. ३१.७.२००७ रोजीच्या पत्रान्वये पारित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपिलावर कोणताही निर्णय दिल्याचे दिसून येत नाही. तथापि या पत्रासोबत या अपिलाच्या सुनावणीसंदर्भात, जन अपिलीय अधिकारी यांनी बैठकीच्या कार्यवृत्तांताच्या स्वरुपातील तपशील लिहून ठेवलेला दिसून येत आहे. या तपशीलावरुन त्यांना, ग्रामसेवक श्री. कुलकर्णी व श्री. खोचरे यांनी अनुक्रमे २ ते ५ दिवसात माहिती देण्याचे कबूल केल्याचे दिसून येत आहे. सुनावणीच्या वेळी माहिती देण्याचे कबूल करुनही संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार

अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.०९.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील प्रथम अपिलावरील सुनावणीच्या निर्णयानंतरही माहिती प्राप्त न झाल्याचे म्हटले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, मौजे दारफळ, ता. जि.उस्मानाबाद येथे ग्रामपंचायतीच्या क्षेत्रामध्ये मारुती मंदिराशेजारी या गावाचे उपसरपंच श्री. बाळासाहेब केशव घुटे यांनी काही गाळयांचे बांधकाम करुन सदर गाळे भाडयाने दिले आहेत. सदर गाळयांचे बांधकाम त्यांनी आमदार निधीतून या गावामध्ये बांधण्यात आलेल्या सांस्कृतिक भवनाच्या बांधकामातील साहित्य वापरुन केलेले आहे. ग्रामपंचायत हद्दीतील प्रत्येक बांधकामाची नोंद ग्रामसेवक यांच्याकडील ग्रामपंचायतीतील मिळकत अभिलेख्यामध्ये नमुना नं.८ या प्रपत्रामध्ये ठेवलेली असते. या प्रपत्रामध्ये बांधकामाचा तपशील दिलेला असतो. अपिलार्थी यांच्या मते, या बांधकामासंदर्भात ग्रामपंचायतीकडे कोणतीही माहिती नसेल तर सदर बांधकाम अनधिकृत समजून, ते बांधकाम ग्रामपंचायतीने पाडावयास हवे होते. परंतु या संदर्भात या बांधकामासाठी ग्रामपंचायत कोणताही कर आकारत नाही व सदर बांधकाम अनधिकृत म्हणून पाडतही नाही. सदर कार्यवाही तत्परतेने होण्याकरिता त्यांना या माहितीची आजही आवश्यकता आहे. अधिनियमातील विहित मुदतीत संबंधित जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांच्यावर जास्तीत जास्त शास्तीची कारवाई करण्यात यावी, अशी त्यांनी शेवटी आयोगास विनंती केली.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थी यांनी ज्या बांधकामासंदर्भात त्यांच्या प्रथम अर्जाद्वारे माहिती मागितली आहे, ते बांधकाम ग्रामपंचायतीच्या मालकीचे नाही किंवा या बांधकामाची नोंद ग्रामपंचायतीकडील मिळकत अभिलेख्यामध्ये कोणत्याही प्रकारे घेतलेली नाही. त्यामुळे सध्या या बांधकामाची मालकी

कोणाची आहे, हे त्यांना सांगता येणार नाही. या जागेवरील गाळयांचे बांधकाम, दुकानाची भाडेवसूली व जमाखर्च यांची त्यांना अद्यापही कोणतीही कल्पना नाही. कारण ही बांधकामे ग्रामपंचायतीच्या खर्चाने केली गेलेली नव्हती. अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या पूर्वी कार्यरत असलेल्या ग्रामसेवकाकडून प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले व त्या दीर्घ प्रयत्नामुळेच त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विहित मुदतीपेक्षा विलंब लागला.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने ज्या बांधकामाच्या संदर्भाने माहिती मागविली आहे, ते बांधकाम ग्रामपंचायतीच्या नमुना नं. ८ अथवा २५ या स्वरुपामध्ये उपलब्ध नाही. त्यांनी सुनावणी घेतेवेळी संबंधित ग्रामसेवक यांनी अपिलार्थीस २ ते ५ दिवसांच्या आत माहिती देण्याचे त्यांना कबूल केले होते व त्याप्रमाणे सुनावणीच्या इतिवृत्तांतामध्ये तशी नोंद घेतली आहे. अपिलार्थीच्या दि. ७.७.२००७ रोजीच्या अपील अर्जावर दिनांक ३०.७.२००७ रोजी सुनावणी घेऊन दि. ३१.७.२००७ रोजी या संदर्भातील आपले आदेश पारित केले आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, मौजे दारफळ येथील मारुती मंदिराशेजारी झालेल्या बांधकामाची नोंद ग्रामपंचायतने त्यांच्या अभिलेख्यावर घेतली नाही. सदर बांधकाम कोणाच्या मालकीचे आहे,ग्रामपंचायतीचे असल्यास कोणत्या निधीतून ते झालेले आहे, या बांधकामातील दुकानाच्या गाळयाचे भाडे कोणास प्राप्त होत आहे, याची नोंद ग्रामपंचायत कार्यालयाकडे नाही. अपिलार्थी यांनी म्हटल्याप्रमाणे जर अशाप्रकारचे कोणाचेही मालकीहक्क नसलेले बांधकाम ग्रामपंचायत क्षेत्रात असेल तर या बांधकामाचा संबंधित ग्रामपंचायतीने त्वरेने ताबा घेऊन त्यावर प्रचलित नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करणे सर्वसाधारण परिस्थितीत अभिप्रेत आहे. तथापि या प्रकरणामध्ये या बांधकामासंबंधी ग्रामसेवक व गट विकास अधिकारी यांना कोणत्याही प्रकारची कल्पना नसावी किंवा बांधकामाची नोंद ग्रामपंचायतीच्या रेकॉर्डला नसावी, यासारखी शोचनीय बाब दुसरी कोणती असेल, असे

आयोगास वाटत नाही. ग्रामसेवक व गट विकास अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या अकार्यक्षम कार्यशैलीमुळे ग्राम पंचायत क्षेत्रात अनधिकृत बांधकामे होत असतात व त्याचा ग्रामपंचायतीच्या पायाभूत सोयींवर अनावश्यक ताण पडत असतो. उपरोक्त प्रकरणी संबंधित ग्रामसेवकास अशाप्रकारच्या बांधकामाची माहिती नसावी, हे त्या ग्रामपंचायतीचे दुर्दैव आहे, असे म्हटल्यावाचून आयोगास राहवत नाही. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद उस्मानाबाद यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी मौजे दारफळ, ता.जि.उस्मानाबाद येथील ग्रामपंचायत हद्दीतील अपिलार्थीच्या या अर्जामधील संदर्भिय अनधिकृत बांधकामाबाबत वैयक्तिक लक्ष घालून सदर बांधकामावर प्रचलित नियमाप्रमाणे योग्य ती कार्यवाही हे आदेश निर्गमित होताच तीन महिन्याचे आत करावी, असे त्यांना आयोगातर्फे सूचविण्यात येत आहे.

**उपरोक्त प्रकरणी सर्वसाधारण परिस्थितीत अपिलार्थीस त्यांच्या दि. ११.५.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना दि. १०.६.२००७ रोजी अथवा तत्पूर्वी प्राप्त होणे अभिप्रेत होते. तथापि उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस नकारात्मक प्रतिसाद देण्यास देखील जन माहिती अधिकारी यांनी एकूण २४ दिवस इतका विलंब लावल्याचे दिसून येत आहे. संबंधित ग्रामसेवकाचे मुख्यालय या ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात असूनही त्यांना अपिलार्थीने विचारलेल्या बांधकामासंदर्भात काहीही माहिती नसल्याचे अपिलार्थीस कळवून त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट तर केलाच आहे पण अपिलार्थीस माहिती देण्यास २४ दिवस इतका विलंब लावून अधिनियमातील कलम ७(१)** चा निःसंशयपणे भंग देखिल केला आहे. यामुळे ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस निःसंशयपणे पात्र ठरत आहेत, असा आयोगाचा निष्कर्ष आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती पुरविण्याप्रित्यर्थ एकूण २४ दिवसांसाठी लावलेल्या असमर्थनीय विलंबाबद्दल त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २०(१) च्या तरतुदीअन्वये विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/-प्रमाणे (२४

दिवसांसाठी) एकूण रु.६०००/- (अक्षरी रुपये सहा हजार) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी सदर शास्तीची रक्कम शासकीय कोषागारात पुढील लेखाशीर्षाखाली जास्तीत जास्त पाच हप्त्यात भरावी.

लेखाशीर्ष- **"००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) "**

सदर शास्तीची रक्कम संबंधित जन माहिती अधिकारी हे नियमितपणे शासकीय कोषागारात भरतील, असे गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उस्मानाबाद यांनी पहावे व या संदर्भातील आपला अनुपालन अहवाल ऑगस्ट, २००८ पासून दरमहा, शास्तीची संपूर्ण रक्कम शासकीय कोषागारात भरुन होईपर्यंत आयोगास सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ५.७.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीच्या मूळ अर्जानुसार त्यांना आवश्यक असलेली माहिती दिली असल्याने, अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती पुरविण्याप्रित्यर्थ एकूण २४ दिवसांसाठी लावलेल्या असमर्थनीय विलंबाबद्दल त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २०(१) च्या तरतुदीअन्वये विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे (२४ दिवसांसाठी) एकूण रु.६०००/- (अक्षरी रुपये सहा हजार)

इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे करावा.

३. संबंधित जन माहिती अधिकारी हे वरील अ.क्र.२ मधील शास्तीची रक्कम नियमितपणे शासकीय कोषागारात भरतील याची गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उस्मानाबाद यांनी खात्री करावी व आपला अनुपालन अहवाल ऑगस्ट २००८ पासून दरमहा, शास्तीच्या रकमेचा शासकीय कोषागारात पूर्णपणे भरणा होईपर्यंत, आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : १०.०७.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बलभीम (बप्पा) जगन्नाथ जाधव,मु.पो.रा. दारफळ, ता.जि. उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, मौ.दारफळ, ता.जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जिल्हा कोषागार अधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४६६

निर्णय दिनांक : १०.०७.२००८

१ श्री. शेख हबीब पाशा गुलाम रसूल, औरंगाबाद : अपीलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद. : प्रतिवादी

२ जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (प्रशासन), महानगरपालिका, औरंगाबाद.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०.०७.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. शेख हबीब पाशा गुलाम रसुल, (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल),श्रीमती लतिका गिरिधर धेनक, जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. मारोती यादवराव कांबळे, जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (प्रशासन), महानगरपालिका, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.३०.०६.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" **Copies of the A.W.P.& B. Annual Work Plan & Budget forwarded to the State Government in the implementation of the Sarva Shikshan Abhiyan.**

**1. The documents of the file/propsal forwarded for the approval for 2007-2008, including the any remark, file noting, and suggestions & objections endorsed by the Municipal Commissioner, Deputy Municipal Commissioner, Chief Accounts Officer and any authority who has the powers in sanction.**

**2) Any Commission appointed for decision the name of Committee.**

**3) The byelaws relating to the programme & the opinion/remark of chief Accounts Officers.**"

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ६.७.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ५००/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या या पत्रामध्ये अपिलार्थीस देण्यासाठी प्रस्तावित केलेल्या माहितीच्या पृष्ठांची संख्या व माहितीचा प्रतिपृष्ठ दर यांचा उल्लेख केला आहे. परंतु यामध्ये यांनी स्पाइरल बाईंडिंगचा खर्च व प्रशासकीय खर्च या खर्चांचा देखील उल्लेख केला आहे. सदर उल्लेख, या खर्चाची वसूली अपिलार्थी यांच्याकडून अधिनियमातील तरतुदीनुसार अपेक्षित नसल्याने, अनावश्यक आहे.जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या सूचनांप्रमाणे अपिलार्थी यांनी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ५००/- चा भरणा त्यांच्या कार्यालयात करुनही अपूर्ण माहिती मिळाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १८.०७.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडून वसूल केलेली स्पाइरल बाईंडिंग व प्रशासकीय शुल्काची रक्कम अमान्य करण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती करुन त्यांनी आवश्यक ते शुल्क भरुनही त्यांना प्राप्त झालेली माहिती अपूर्ण असल्याचे म्हटले आहे व त्यांच्याकडून माहिती पोटीचे जादा भरुन घेतलेले शुल्क त्यांना

परत करण्याचे जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केलेली आहे. अपिलार्थीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १०.८.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. १७.८.२००७ रोजी पारित केले आहेत. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आठ दिवसांच्या आत यांना पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित करुन अपिलार्थीस आकारलेले जादा शुल्क त्यांना परत करण्याचे सूचित केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित करुनही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १७.१०.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून त्यांच्याकडून जादा आकारले गेलेले शुल्क रु.२४८/- इतके त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याचे नमूद केले आहे. तसेच त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करुन त्यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) व (२) प्रमाणे कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना जादा आकारले गेलेले शुल्क रु. २४८/- इतके विहित मुदतीत परत मिळाले नाही. मात्र त्यांनी आयोगाकडे दि. १७.१०.२००७ रोजी द्वितीय अपील केल्यानंतर, २००८ साली त्यांना हे शुल्क जन माहिती अधिकारी यांच्याकडून परत मिळाले आहे. त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना आजही आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि. ३०.६.२००७ च्या अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद देऊन अधिनियमातील कलम ७(१) प्रमाणे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्याचे त्यांनी सूचित केले आहे. अपिलार्थीने सदर शुल्क त्यांच्या कार्यालयात भरल्यानंतर अपिलार्थीस दि. १७.७.२००७ रोजी

त्यांनी आवश्यक ती माहिती देऊन, दि. २७.९.२००७ रोजी अपिलार्थीस त्यांच्याकडून घेतले गेलेले जादाचे शुल्क रु. २४८/- इतके परत केले आहे. अपिलार्थीने सर्व शिक्षा अभियानाच्या शासनाकडे सन २००७-२००८ च्या औरंगाबाद शहरासाठी तयार करण्यात आलेल्या प्रस्तावासंदर्भात सादर केलेल्या अभिलेख्यावर महानगरपालिका आयुक्त,उपआयुक्त, मुख्य लेखाधिकारी यांनी दिलेल्या अभिप्रायाची प्रत मागितली होती. तथापि अशाप्रकारे कोणत्याही अभिलेख्यांवर अभिप्रायांद्वारे माहिती तयार करुन व महानगरपालिका आयुक्तांची मान्यता घेऊन प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याची पध्दत त्यांच्याकडे सध्या रुढ नाही, त्यामुळे अपिलार्थीने मागितलेल्या मुद्दा क्र. १ ची माहिती अपिलार्थीस त्यांनी दिली नाही. शासनाकडून मान्यता घेण्यासाठीचा प्रस्ताव हा सर्व कर्मचारी/अधिकारी एकत्र बसून, सर्वांनी मिळून केलेला एकच प्रस्ताव असतो. हा प्रस्ताव वेगवेगळया टप्प्यावर वेगवेगळया खात्यामार्फत तपासला जात नाही व या संदर्भात कोणतेही विशिष्ट असे अभिलेखे ठेवले जात नाहीत. तथापि या संदर्भात त्यांनी सदर अधिकाऱ्यांशी केलेल्या पत्रव्यवहारांच्या प्रती त्या अपिलार्थीस देण्यासाठी तयार आहेत. या पत्रव्यवहाराच्या प्रती त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या सुनावणीच्या वेळी तयार ठेवल्या होत्या. या प्रतींच्या पृष्ठांची संख्या एकूण ९४७ इतकी आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या निर्णयामध्ये सदर प्रती अपिलार्थीस सशुल्क अथवा विनामूल्य पुरवाव्यात, याचा उल्लेख केला नाही. तसेच या पत्रव्यवहाराच्या संपूर्ण प्रती अपिलार्थीस त्यांनी दाखविल्या असून त्यांतील आवश्यक ती कागदपत्रे अपिलार्थीने त्यांच्याकडून विनामूल्य हस्तगत करुन घेतली आहेत व त्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्याकडे दि. ४.९.२००७ रोजी त्यांची पोचपावती देखील दिलेली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अपील अर्जामध्ये विनंती केल्याप्रमाणे, त्यांनी अपिलार्थीकडून जादा घेतलेले शुल्क रु. २४८/- हे त्यांच्याकडील दि. २७.९.२००७ रोजीच्या पत्रान्वये धनादेशाद्वारे परत केले आहे. तसेच अपिलार्थीस सर्व माहिती दाखवून त्यातील आवश्यक ती माहिती अपिलार्थी

यांनी हस्तगत करुन घेतली आहे. अपिलार्थीच्या दि. १८.७.२००७ रोजीच्या अपील अर्जावर दि.१०.८.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. १७.८.२००७ रोजी पारित केले आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. ३०.६.२००७ रोजीच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून एकूण तीन मुद्यांवर माहिती मागविली होती. त्यापैकी मुद्दा क्र. १ मध्ये त्यांनी अभिलेख्यावरील अभिप्राय (फाईल नोटींग), टिपणीच्या प्रती, मनपा आयुक्त/उपआयुक्त/मुख्य लेखा अधिकारी यांनी केलेल्या सूचना व उपस्थित केलेले मुद्दे या संदर्भातील माहिती अपिलार्थीस हवी होती. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना शासनाकडे पाठविण्यात आलेली ऋ्ह्रज़.ध : ए याची अंतीम प्रत अपिलार्थीस दिली आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ मध्ये सदर प्रस्तावासाठी एखादा आयोग/समिती महानगरपालिकेने नेमली आहे किंवा कसे या संदर्भात जन माहिती

अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली होती. तथापि अशाप्रकारची कोणतीही समिती या विषयासंदर्भात महानगरपालिकेतर्फे नेमली गेली नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे स्पष्ट केले. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ द्वारे त्यांनी सर्व शिक्षा अभियान या योजनेच्या अंमलबजावणी संदर्भात नियम/उपनियमांची मागणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केली आहे. तथापि या माहिती संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन व आज रोजी झालेल्या युक्तीवादामध्ये स्पष्ट झाल्यावरुन मनपाच्या शिक्षण विभागाकडे अशाप्रकारचा प्रस्ताव तयार करतांना अपिलार्थीस अभिप्रेत असलेली पध्दत वापरली जात नसून सर्व अधिकारी एकत्रित मिळून हा प्रस्ताव तयार करीत असतात, तथापि या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी सदर अधिकाऱ्यांशी केलेल्या पत्रव्यवहारांच्या प्रती अपिलार्थीस उपलब्ध करुन दिल्यास, त्यावरुन अपिलार्थीस महानगरपालिकेचे आयुक्त, उपआयुक्त, मुख्य लेखाधिकारी इत्यादींचे अभिप्राय/शेरे प्राप्त होऊ शकतील. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्याकडील या संदर्भात विविध अधिकाऱ्यांशी केलेल्या पत्रव्यवहारांच्या प्रती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवाव्यात. अपिलार्थीच्या मुद्दा क्र. २ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये नकारार्थी स्वरुपात दिलेली आहे. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. ३ च्या संदर्भात त्यांनी शासनाकडून व त्यांच्या वरिष्ठांकडून या योजनेच्या अंमलबजावणी संदर्भात त्यांना प्राप्त झालेल्या मार्गदर्शक सूचनांच्या प्रती अपिलार्थीस विनामूल्य उपलब्ध करुन दिल्यास अपिलार्थीस या मुद्यावरील माहिती प्राप्त होऊ शकेल. सदर माहिती जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीकडून जादा घेतलेले शुल्क जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २७.९.२००७ रोजीच्या पत्राने परत केले असल्याने व या संपूर्ण घटनाक्रमाकडे पाहिले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणत्याही टप्प्यावर माहिती देण्याचे असद्हेतूने टाळल्याचे आयोगाच्या निदर्शनास न आल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम (२०) प्रमाणे कोणतीही कारवाई करण्याचे आदेश नाहीत. मात्र येथून पुढे माहितीचा अधिकार अधिनियमाद्वारे त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जावर त्यांनी अधिक सतर्कतेने अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित

करण्यात येत आहे. अपिलार्थीकडून जादा घेतलेले शुल्क रु. २४८/- इतके त्यांनी त्यांना परत केले असल्याने या संदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन, खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली मुद्देनिहाय माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. सदर माहिती अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत व्यक्तीशः उपस्थित राहून जन माहिती अधिकारी यांच्याकडून उपलब्ध करुन घ्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १०.०७.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शेख हबीब पाशा गुलाम रसुल, घर नं. १-१६-३२, जुनाबाजार, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (प्रशासन), महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३४६

निर्णय दिनांक ११-०७-२००८

श्री. अजय सतिषकुमार जैस्वाल, : अपिलार्थी
रा. ओहर ब्रिजजवळ, शिवाजीनगर,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख,
नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक, भूमी अभिलेख,
नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०७-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. अजय सतिषकुमार जैस्वाल (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व श्रीमती सुरेखा पूनमचंद सेठीया, जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, नांदेड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे

संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, नांदेड हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक २१-०६-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सर्व्हे नंबर ५० भूमापन क्रमांक ४३३१, शिवाजीनगरस्थित वाडीयातील सनदेच्यासंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" सर्वे नंबर ५० भुमापन क्र. ४३३१ शिवाजीनगर, नांदेड येथील इमारतीचा जागासाठी सनदेचा नमुनाची माहीती देणे अथवा नकला देणे."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिश: अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १९-०७-२००६ रोजीच्या पत्राने प्रथम प्रतिसाद देऊन नगर भूमापन क्रमांक ४३३१ च्या सनदेची मूळ प्रत यापुर्वीच हितसंबंधित व्यक्तिस दिलेली आहे. व्दितीय प्रत इकडील कार्यालयात शोध घेऊन सापडत नाही त्यामुळे ती आपल्याला देता येत नाही, असे कळविले.

जन माहिती अधिकारी यांच्या या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०८-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही, परंतु त्यांच्याकडील दिनांक ३०-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये त्यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जासंदर्भात त्यांना आवश्यक असलेली माहिती तयार करुन देण्याबाबत जन माहिती अधिकारी यांना सूचना दिली असल्याचे व त्यांच्याकडून सदर नकाशाची प्रत प्राप्त करुन घेण्याचे अपिलार्थीस सूचित करुन अपिलार्थीचे अपील निकाली काढले.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून सूचना प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या सर्व्हे नंबर ५० भूमापन क्रमांक ४३३१ ची व त्याच्या नकाशाची प्रत त्यांना व्यक्तिश: हस्तांतरीत केली. सदर प्रत त्यांना प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्याच दिवशी पोच दिलेली आहे.

तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-१०-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये, त्यांनी त्यांना जाणूनबुजून दिशाभूल करणारी, चुकीची माहिती दिली असल्याने त्यांनी हे अपील आयोगाकडे केल्याचे नमूद केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी, अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिलेली सनद चुकीची असून या नकाशामध्ये त्यांनी भूमापन क्रमांक ४३३१ च्या पश्चिमेला भूमापन क्रमांक ४३४० असा दर्शविला आहे. तथापि सदर जागा ही भूमापन क्रमांक ४३४० नसून ती ४३३१ चाच एक भाग आहे. जन माहिती अधिकारी यांनी नगर भू आलेखावरुन नगर भूमापन क्रमांक ४३३१ च्या सनदेची प्रत दिली आहे. मूळ नगर भूमापन आलेख व त्यांना देण्यात आलेल्या सनदेची नक्कल यामध्ये फरक असल्याने जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे त्यांना वाटत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, कोणत्याही जागेच्या क्षेत्राचे भूमूल्यमापन करण्यापूर्वी शासनाकडून सर्व्हे नंबरच्या यादीसह एक अधिसूचना जारी केली जाते. या अधिसूचनेनुसार त्यांचा सर्व्हे होऊन सदर क्षेत्राची प्रत्यक्ष मोजणी केली जाते. या नकाशाला नगर भूमापन आलेख असे म्हणतात. सदर नकाशा काढल्यानंतर प्रत्येक मालमत्ता कोणाची आहे त्याची त्यांच्या कार्यालयामार्फत चौकशी केली जाते व नंतर त्या मालमत्तेचा हिस्सा व मालकी हिस्सा ठरवून त्याप्रमाणे त्यांच्या कार्यालयात

मालकीची नोंद केली जाते. या माहितीवरुन संबंधीत मालमत्तेची सनद तयार केली जाते व अर्जदार ज्याप्रमाणे या सदनेची मागणी करील त्याप्रमाणे ती प्रथमतः मूळ प्रतीत त्यांना दिली जाते. अपिलार्थीस दिलेल्या सनदेची कार्यालयीन प्रत त्यांच्या कार्यालयाकडे अभिलेखाकडे ठेवली जाते. या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या सनदेची व्दितीय प्रत गहाळ झालेली आहे. अपिलार्थीने ज्या सनदेची मागणी केली आहे ती सनद १९७५ साली मोजणी केलेल्या नकाशावरुन केलेली आहे. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०८-२००६ रोजी प्रथम अपील केल्यानंतर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या सुचनेप्रमाणे त्यांनी संबंधीत मूळ नकाशावरुन अपिलार्थीस नवीन सनदेची प्रत तयार करुन ती त्यांना दिनांक १६-०९-२००६ रोजी पुरविली आहे. अपिलार्थीस देण्यात आलेली सनद ही मूळ नकाशावरुनच दिली असल्याने ती सत्य आहे. अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केलेल्या जमिनीचा भाग हा भूमापन क्रमांक ४३४० चाच एक भाग आहे त्यामुळे अपिलार्थीस त्यांनी दिशाभूल करणारी माहिती दिली नाही. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या विधानापृष्ट्यर्थ अपिलार्थीस ज्या नकाशावरुन ही सनद तयार करुन दिली आहे त्या नकाशाची झेरॉक्स प्रत आयोगास दाखविली.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील संदर्भीय मूळ प्रतीची जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात असलेली कार्यालयीन नक्कल त्यांच्या कार्यालयाकडून गहाळ झालेली आहे, त्यामुळे अपिलार्थीस त्यांनी, जन अपिलीय अधिकारी यांनी वरीलप्रमाणे उचित आदेश दिल्यानंतर, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या मूळ नकाशावरुन नवीन तयार करुन पुरविली आहे. कोणत्याही मालमत्तेच्या नकाशाची नक्कल करण्याकरिता जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या वरिष्ठ कार्यालयाकडून आदेश प्राप्त करुन घ्यावे लागतात. त्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी

वरीलप्रमाणे निर्णय दिल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस मूळ माहितीची त्यांच्याकडील उपलब्ध अभिलेखावरुन पुनर्बांधणी करुन माहिती पुरविल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपिलामध्ये त्यांच्या मालकीच्या भूमापन क्रमांक ४३३१ चा भाग ज्या सनदेमध्ये चुकीचा दाखविला आहे असे त्यांचे म्हणणे आहे (भूमापन क्रमांक ४३४० लगतचा भूमापन प्रकटन करणारा काही भाग). परंतु या सनदेमध्ये त्यांचा समावेश नाही त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती दिशाभूल करणारी आहे असे वाटते. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या नकाशाच्या मूळ प्रतीवरुन अपिलार्थीस जशीच्या तशी त्याच्या नकाशाची प्रत पुरविली आहे. अपिलार्थीचा, त्यांच्या शेजारील भूखंडाच्या मालकी हक्काबाबत काही वाद असेल तर त्यांना याकरिता महसूल विभागाच्या अथवा न्यायालयातील योग्य त्या प्राधिकरणाकडे अर्ज करुन त्यावर दाद मागता येईल. त्यांच्या भूखंड मालकी हक्कामध्ये अथवा जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या नकाशामध्ये सुधारणा करण्याचे आदेश देण्याची अधिकारिता आयोगास नसल्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस या आधी उल्लेख केल्याप्रमाणे योग्य त्या प्राधिकरणाकडे अर्ज करुन आपल्या गा-हाण्याचा निपटारा करावा लागेल, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणत्याही असद्‌हेतूने चुकीची अथवा काही माहिती देण्यास टाळल्याचे आयोगास आढळून न आल्याने त्यांच्यावर कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत, मात्र माहिती अधिकार अधिनियमाव्दारे प्राप्त झालेल्या अर्जावर त्यांनी अपिलार्थीस दिनांक २०-०७-२००६ रोजी अगर तत्पूर्वी त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना देण्याच्या दृष्टीने अधिक सकारात्मक प्रयत्न करणे, या प्रसंगी उचित ठरले असते, एवढेच त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे. त्याचबरोबर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून भूमापन क्रमांक ४३३१ च्या मूळ सनदेची कार्यालयीन प्रत गहाळ होणे ही बाब आयोगास गंभीर वाटते, त्यामुळे या प्रकरणी हे अभिलेखे जतन

करण्यासाठी त्यांच्या कार्यालयातील जे कर्मचारी जबाबदार आहेत व ज्यांच्या हातून हे अभिलेखे गहाळ झाले आहेत त्यांच्यावर उप संचालक, भूमी अभिलेख औरंगाबाद यांनी, संबंधित कर्मचा-यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. उप संचालक भूमी अभिलेख, औरंगाबाद यांनी, या प्रकरणी हे अभिलेखे जतन करण्यासाठी त्यांच्या कार्यालयातील जे कर्मचारी जबाबदार आहेत व ज्यांच्या हातून हे अभिलेखे गहाळ झाले आहेत त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक ११-०७-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अजय सतिषकुमार जैस्वाल, रा. ओहर ब्रिजजवळ, शिवाजीनगर, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, शिवाजीनगर, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, कार्यालय विसावानगर, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ उप संचालक, भूमी अभिलेख, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३४७

निर्णय दिनांक   ११-०७-२००८

श्री. शेख नईम शेख लाल, : अपिलार्थी
जिल्हाध्यक्ष, समाजवादी पार्टी, हिंगोली
(महाराष्ट्र), नवीन पाण्याच्या टाकीजवळ,
पलटन, जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा कक्ष अधिकारी, महसूल व वन
विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सचिव, महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई – ३२

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : कक्ष अधिकारी (ई-१, कार्यासन), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२

प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारी : उप सचिव (आस्थापना), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०७-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. संजय रघुनाथ बनकर, जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (ई-१, कार्यासन), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. राधाकृष्ण विठ्ठलराव गमे, जन अपिलीय अधिकारी तथा उप सचिव (आस्थापना), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व त्रयस्थ पक्ष श्री. प्रकाश मोतीराम पिरतवाड हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. शेख नईम शेख लाल, हिंगोली हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक ०९-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. प्रकाश मोतीराम पिरतवाड तत्कालीन उपविभागीय अधिकारी (महसूल), हिंगोली यांच्या जात प्रमाणपत्र पडताळणी प्रकरणी खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> “ श्री. पिरतवाड प्रकाश मोतीराम उपविभागीय अधिकारी हिंगोली यांचे या अनुसुचित जमातीचे जात प्रमाणपत्र मा. उप आयुक्त तथा उपाध्यक्ष (संशोधन) अनुसुचित जमाती जात पडताळणी समिती, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांनी त्यांचे आदेश क्र. डी. डी./टी. सी. एस. ई./ए. बी. डी./एन.ए.एन./आय.एन. एस.ई.आर/३०३/०६/३९०३/०७ दिनांक २१/५/२००७ अन्वये श्री प्रकाश मोतीराम पिरतवाड यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरवून रद्द केलेले आहे. त्या आदेशानुसार मा. जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी याबाबत आपला वस्तुस्थितीचा अहवाल आपले पत्र क्र. २००७/अ-२/आस्था-१/कावि/८९६/दि.२/६/०७ व्दारा मा. प्रधान सचिव, महसूल व वन विभाग मंत्रालय मुंबई-३२ यांना सादर करुन कार्यवाही करण्याची विनंती केलेली आहे. व तसेच मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांनी आपले

प. क्र. २००७/मशाका-१/आस्था-२८/प्र.क्र.६१/दि. २१/७/२००७ व्दारा मा. अप्पर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग मंत्रालय मुंबई-३२ यांना पाठवून कार्यवाही करण्याची विनंती केलेली आहे. या सर्व प्रकरणास दोन महिण्याचा कालावधी लोटला आहे. याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली. त्या कार्यवाहीचा अहवाल व त्या आदेशांची सत्यप्रत दयावी. आणि या प्रकरणाबाबत वरिष्ठांना सादर केलेल्या सर्व कार्यालयीन टिपनीची सत्यप्रती देण्यात यावी. ही विनंती. ”

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २४-०७-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती ज्या नस्तीवर उपलब्ध आहे ती नस्ती सामान्य प्रशासन विभागाकडे सादर करण्यात आली असल्याचे कळवून, अपिलार्थीने विनंती केलेल्या कागदपत्राच्या प्रती व माहिती उपलब्ध नसल्याचे त्यांना कळविले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०-०८-२००७ रोजी सुनावणी घेऊन या अपील अर्जासंदर्भातील आपले आदेश दिनांक ०५-०९-२००७ रोजी पारित केले. या आदेशान्वये त्यांनी अपिलार्थीचे अपील फेटाळण्याचा निर्णय दिला.

जन अपिलीय अधिकारी यांनी या अपील निर्णयामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेले उत्तर योग्य असल्याचे नमूद करुन निर्णयापृष्ठ्यर्थ आपले अभिप्राय असे नोंदविले :

“ एखादे प्रकरण अभिप्रायासाठी इतर विभागाकडे सादर करण्यात आले असल्यास त्याच प्रकरणात माहितीच्या अधिकार अधिनियमान्वये एखाद्या व्यक्तीने माहिती मागितल्यास सदर प्रकरण फक्त या कारणास्तव परत बोलावून माहिती देणे योग्य होणार नाही. कारण असे झाल्यास संबंधित प्रकरणावर निर्णय होण्यामध्ये कालापव्यय होऊ शकतो व ते कार्यालयीन कार्यपध्दतीस अनुसरुनही नाही.”

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०९-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. सदर अपील त्यांनी त्यांना जन अपिलीय अधिकारी यांचा दिनांक ०५-०९-२००७ रोजीचा निर्णय प्राप्त होण्यापुर्वीच केल्याचे दिसून येत आहे. (अपिलार्थीच्या व्दितीय अपील अर्जावर दिनांक ०१-०९-२००७ अशी तारीख टंकलिखीत केली असून सदर अपिलाची राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक ०६-०९-२००७ रोजी नोंद झाली आहे) या अपील अर्जामध्ये, त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेल्या दिनांक ०९-०७-२००७ रोजीच्या अर्जावर त्यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत दिनांक २४-०७-२००७ रोजी प्रतिसाद दिला असून, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या नस्तीमध्ये उपलब्ध आहे, सदर नस्ती त्यांच्याकडे त्यावेळी उपलब्ध नसल्याने त्यांनी अपिलार्थीस याबाबतची वस्तुस्थिती कळवून अपिलार्थीस

माहिती देण्याचे नाकारले, तथापि सदर विभागाकडून आवश्यक ते अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस दिनांक १४-०९-२००७ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचे प्रथम अपील त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (६) मधील तरतूदीनुसार ४५ दिवसाच्या आत लेखी कारणे नमूद करुन यासंदर्भात आपले निर्णय पारित केले आहेत.

त्रयस्थ पक्षातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते उपविभागीय अधिकारी या पदावर कार्यरत असताना हिंगोली शहरामधील अतिक्रमणे काढण्यासंदर्भात एका प्रकरणी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला होता त्यावेळी त्यांनी नगरपरिषदेस, त्यांच्या वरिष्ठांकडून प्राप्त झालेल्या सुचनेनुसार, अनधिकृत अतिक्रमणे काढण्यासाठी मदत केली होती. त्यांच्या अनधिकृत अतिक्रमणे काढण्याच्या प्रक्रियेमध्ये अपिलार्थीने केलेले अनधिकृत बांधकाम स्वत: होऊन काढून घेतले व याचा राग मनात धरुन अपिलार्थी हे त्यांच्या विषयी वारंवार माहिती मागवित असतात. माहिती अधिकार अधिनियमाव्दारे त्यांना प्राप्त झालेल्या माहितीचा ते वृत्तपत्राच्या वाचकांची दिशाभूल करणा-या बातम्या प्रसिध्द करण्यासाठी वापर करत असतात. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या अशा प्रकारच्या कार्यपध्दतीमुळे संबंधित अधिका-यांची विनाकारण मानहानी होऊन त्यांच्या मानसिक स्थैर्याला धक्का पोहचतो. आता या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पूर्ण माहिती दिली असल्याने या संदर्भात त्यांचे कोणतेही म्हणणे नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळात त्यांच्या दिनांक ०९-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्या दिनांक ०२-

०६-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रधान सचिव, महसूल व वन विभाग यांना उद्देशून दिलेल्या पत्रावर तसेच विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग यांना दिनांक २१-०७-२००७ रोजी सादर केलेल्या पत्रावर शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली होती त्या आदेशाची व यासंदर्भात वरिष्ठांना सादर केलेल्या सर्व कार्यालयीन टिपणीच्या सत्यप्रतीची मागणी केली होती. अपिलार्थीने अर्ज करतेवेळी अपिलार्थीने मागितलेली माहिती ज्या नस्तीमध्ये आहे ती नस्ती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नव्हती. सदर नस्ती त्यांनी अभिप्रायासाठी त्यावेळी सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविली होती. या कारणास्तव त्यांनी अपिलार्थीस प्रथमतः त्यांच्या दिनांक २४-०७-२००७ रोजीच्या पत्रान्वये माहिती देण्यासाठी नाकारले. संबंधित नस्ती इतर विभागाकडे गेली असल्याच्या कारणावरुन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती नाकारण्याची त्यांची कृती चुकीची आहे, असे आयोगाचे मत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या या कृतीचे समर्थन जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जासंदर्भात दिलेल्या दिनांक ०५-०९-२००७ च्या निर्णयामध्ये केले आहे. त्यामध्ये त्यांनी फक्त माहिती अधिकार अधिनियमाव्दारे माहिती मागितली एवढ्या कारणाने संबंधित नस्ती परत बोलावून अपिलार्थीस ती माहिती देणे योग्य होणार नाही, कारण असे झाल्यास संबंधित प्रकरणावर निर्णय होण्यास कालापव्यय होऊ शकतो व ते कार्यालयीन पध्दतीस अनुसरुन नाही, असा अभिप्राय दिला आहे. सदर अभिप्राय आयोगास मान्य नाही कारण अशा प्रकारची कोणत्याही अर्जदाराने विचारलेली माहिती देतांना अपिलार्थीस फक्त त्यांनी संबंधित नस्तीमधून अपिलार्थीने मागितलेल्या माहितीच्या प्रती काढून त्या अपिलार्थीस पुरविणे एवढेच जन माहिती अधिकारी यांचे काम असते. त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती देण्यासंदर्भात एकदा जन माहिती अधिकारी यांनी निश्चित निर्णय घेतला तर संबंधीत नस्ती इतर विभागाकडून तात्काळ मागावून घेऊन आवश्यक त्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती काढून घेऊन नंतर ती नस्ती त्या विभागाला पाठविणे या प्रक्रियेमध्ये फार कालापव्यय होईल व त्यायोगे निर्णय प्रक्रिया लांबेल

असे आयोगास वाटत नाही. माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम ७ मध्ये अपिलार्थी यांनी मूळ अर्जाव्दारे माहिती मागितल्यानंतर ३० दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यासंदर्भात कार्यवाही करणे अभिप्रेत आहे. अधिनियमामध्ये हा कालावधी प्रचलीत कार्यालयीन पध्दती, सुट्‌टीचा कालावधी इ. तपशील विचारात घेऊनच ठरविला आहे, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, येथून पुढे त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या प्रकरणावर निर्णय देतांना त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जास्तीत जास्त ३० दिवसाच्या आत (अधिक ५ दिवस त्रयस्थ पक्षासंदर्भातील माहिती करिता) अपिलार्थीस माहिती पुरविण्यासंदर्भात निर्णय घ्यावा व कोणत्याही अर्जदारास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती त्यांना कशी प्राप्त होईल अशा प्रकारचा सकारात्मक दृष्टीकोन त्यांनी आपल्या कार्यशैलीत बाळगावा.

या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून निर्णय प्राप्त होण्याची वाट न पाहता राज्य माहिती आयोगाकडे अपरिपक्व अपील केलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक ती माहिती त्यांच्याकडील दिनांक १४-०९-२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेली आहे. सदर माहितीचे अवलोकन करता, ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे आढळून येत आहे. हे पाहता, अपिलार्थीची विनंती यापुर्वीच जन माहिती अधिकारी यांनी मान्य केली असल्याने, या अपिलावर आता कोणताही निर्णय देणे बाकी नाही असे दिसून आल्याने अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येऊन खालील

प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ११-०७-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शेख नईम शेख लाल, जिल्हाध्यक्ष, समाजवादी पार्टी, हिंगोली महाराष्ट्र), नवीन पाण्याच्या टाकीजवळ, पलटन, जिल्हा हिंगोली.

२ जन माहिती अधिकारी कक्ष अधिकारी (ई-१, कार्यासन), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप सचिव (आस्थापना), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३४८

निर्णय दिनांक ११-०७-२००८

श्री. नवनाथ दशरथ उपळेकर, : अपिलार्थी
मु. पो. उपळा (मा.)
तालुका जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उपविभागीय अभियंता,
लघुपाटबंधारे (स्था.स्तर), सर्वे
उपविभाग, उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे
(स्था.स्तर), सर्वे, उस्मानाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०७-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. सय्यद फखरुल्ला हाशमी, जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर), सर्वे उपविभाग, उस्मानाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. नवनाथ

दशरथ उपळेकर व जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर), सर्वे, उस्मानाबाद हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-०५-२००७ रोजी सादर केलेले व्दितीय अपील विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी श्री. हाशमी, उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे उपविभाग, उस्मानाबाद यांच्याकडे उस्मानाबाद तालुक्यातील सुंभा येथील पूर्ण झालेल्या शेततळ्याची माहिती त्यांच्याकडे दिनांक २६-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये मागितली होती. सदर माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, कार्यकारी अभियंता तथा जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०२-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दिनांक ०७-०२-२००७ व २७-०२-२००७ रोजी सुनावणी ठेवली होती, तथापि जन माहिती अधिकारी यांच्या अनुपस्थितीमुळे अपिलार्थी यांच्या अपील अर्जावर कोणताही निर्णय झाला नाही व परिणामी अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहावे लागले, त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-०५-२००७ रोजी व्दितीय अपील केले असून त्यामध्ये संबंधीत अधिका-यांनी त्यांना जाणुनबुजून माहिती दिली नसल्याचे नमूद केले आहे. या कामचुकार ऑफिसरवर दंडाची कारवाई का करु नये, असे अभिप्राय त्यामध्ये नोंदविले आहेत.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने दिनांक २१-०६-२००७ रोजी त्यांना उद्देशून लिहिलेले पत्र सादर केले आहे. या पत्रामध्ये, अपिलार्थीने त्यांनी माहिती अधिकार अधिनियमाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना समाधानकारक मिळाली असल्याचे नमूद करुन त्याबद्दल त्यांची

कोणतीही तक्रार नसल्याने सदर प्रकरण निकाली काढावे असे नमूद केले आहे. या पत्रावरुन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असून सदर माहितीने त्यांचे समाधान झाल्याचे दिसून येत आहे. आज रोजीच्या सुनावणीमध्ये अपिलार्थी यांच्या अनुपस्थितीमुळे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता माहिती प्राप्त होण्यामध्ये कोणतेही स्वारस्य असल्याचे दिसून येत नाही, मात्र या प्रकरणी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात या संपूर्ण घटनाक्रमाच्या कोणत्याही टप्प्यावर सकारात्मक कार्यवाही केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २६-१२-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस सर्वसाधारण परिस्थितीत दिनांक २५-०१-२००७ रोजी अगर तत्पूर्वी मिळणे अभिप्रेत होते, तथापि सदर माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून ५ महिने इतक्या विलंबाने प्राप्त झाल्याचे येथे दिसून येत आहे. या विलंबाचे समर्थन उपस्थित जन माहिती अधिकारी आयोगापुढे करु शकले नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, ही माहिती अपिलार्थीस विहित मुदतीत देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना कोणतीही अडचण असण्याचे कारण दिसून येत नाही. अपिलार्थीने त्यांच्याकडे काही कामांच्या मस्टर्सच्या झेरॉक्स प्रतीची मागणी केली होती, ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमातील विहित मुदतीत न देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब सचिव (जलसंपदा) यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर

करावा. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली असल्याने त्यांना माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. सचिव (जलसंपदा) यांनी, जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमा-प्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक ११-०७-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. नवनाथ दशरथ उपळेकर, मु. पो. उपळा (मा.) तालुका जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर), सर्वे उपविभाग, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर), सर्वे, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३४९

निर्णय दिनांक ११-०७-२००८

श्री. सुनिल विनायकराव मगर, : अपिलार्थी
राजमाता जिजाऊ चौक, ढोकी रोड,
कळंब, तालुका कळंब,
जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, :
तथा न्याय सहाय्यक वैज्ञानिक
प्रयोगशाळा संचालनालय, गृह विभाग,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी
तथा न्याय सहाय्यक वैज्ञानिक
प्रयोगशाळा संचालनालय, गृह विभाग,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : सहाय्यक रासायनिक विश्लेषक, न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, गृहविभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई

जन अपिलीय अधिकारी : उप संचालक, न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, गृहविभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०७-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. राजेंद्र रामचंद्र मावळे, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक रासायनिक विश्लेषक, न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, गृहविभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. मंचक विष्णू गरड, जन अपिलीय अधिकारी तथा उप संचालक, न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, गृहविभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. विजय शामराव पांडव, सहसंचालक तथा तत्कालीन जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. सुनिल विनायकराव मगर हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक २५-०६-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००६ ते २००७ या कालावधीशी संबंधीत त्यांच्या कार्यालयाने वैज्ञानिक सहाय्यक पदाच्या केलेल्या भरतीबाबत खालीलप्रमाणे एकूण ८ मुद्दयावर माहिती मागितली होती.

“ १. वैज्ञानिक सहाय्यक पदासाठी जुलै २००६ मध्ये औरंगाबादला मुलाखती घेतल्या होत्या त्या किती जागेसाठी होत्या.

२. त्यामध्ये आरक्षण कोणत्या वर्गातील किती जागेवर होते व ओपन साठी किती जागा होत्या.

३. या जागेची भरती झाली आहे का ? झाली असल्यास किती जागेवर भरती झाली आहे.

४. वैज्ञानिक सहाय्यक पदासाठी ज्यांना ऑर्डर दिली आहे त्यांचे नावे व त्यांचे शिक्षण त्यांना B.S.C.व M.S.C. ला मिळालेली गुण किती आहेत ते कोणत्या

प्रवर्गातील आहेत व त्यांना मुलाखतीमध्ये किती गुण दिले व त्याचा या कामाचा अनुभव बघीतला का किंवा कशा पध्दतीने निवड केली.

५. आपले पत्र मु. का. वै. स./७१५/२८११/६९५८/२००६ दि. ३१/५/२००६ ने किरण विनायकराव मगर यांना मुलाखतीला बोलविले होते. त्यांना B.S.C. ला किती गुण होते व मुलाखतीमध्ये किती गुण दिले व त्याचा अनुभव पाहिला होता का ? व त्यांची निवड न करण्यासाठी कोणता निकश वापरला त्याची प्रत किंवा कारण.

६. वरील पदासाठी भरतीमध्ये व मुलाखतीमध्ये शासनाने ठरवुन दिलेल्या ज्या नियमाचा किंवा शासन निर्णयांचा आधार घेतला त्याची प्रत द्यावी.

७. सध्या आपल्याकडे या पदाच्या किती जागा शिल्लक आहेत व त्या कोणत्या प्रवर्गातील आहेत व त्याची भरती साधारणता कधी करण्यात येणार आहे.

८. जुलै २००६ मधील मुलाखतीतील एखाद्या प्रवर्गातील भरती करण्यात आली नसल्यास ती का करण्यात आली नाही व ती कधी करण्यात येणार आहे व त्यासाठी कोणती प्रक्रिया अवलंबविण्यात येणार आहे. ”

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०३-०७-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली, तथापि सदर माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे.

अपिलार्थीच्या सदर अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून

येत नाही.  तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २७-०८-२००७ च्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जामध्ये त्यांनी मागितलेली माहिती अधिक स्पष्टपणे दिली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-०९-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे.  या अपील अर्जामध्ये, त्यांनी त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून चुकीची, अपुरी व दिशाभूल करणारी माहिती दिल्याबद्दल त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) व (२) प्रमाणे कारवाई करण्याचे आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.  या अपील अर्जामध्ये त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांना प्राप्त झालेली माहिती चुकीची, अपूर्ण व दिशाभूल करणारी का वाटते याचे विवेचन केलेले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या दिनांक २७-०८-२००७ रोजीच्या पत्राच्या अखेरीस निवड झालेल्या उमेदवारांचे गुण व अन्य माहिती प्राप्त होण्याची कार्यवाही चालू आहे.  याबाबत कार्यालयाकडून कार्यवाही झाल्यावर योग्य ती पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे वाक्य लिहिले आहे.  या वाक्यावर अपिलार्थीने व्दितीय अपील अर्जाध्ये युक्तिवाद केलेला आहे.  अपिलार्थीच्या मते जर निवड प्रक्रिया पूर्ण झाली नसेल तर त्यांना ८ मुद्दयांची माहिती जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी दिलीच कशी, म्हणून सदर माहिती चुकीची आहे.  त्यांच्या मुद्दा क्रमांक ४ व्दारे त्यांनी उमेदवारांची निवड कशा पध्दतीने केली व त्यांना B.S.C. व M.S.C.ला किती गुण होते व त्यांना मुलाखतीत किती गुण दिले याची माहिती मागितली होती.  यापैकी त्यांना B.S.C. व M.S.C. ला किती गुण होते व मुलाखतीत किती गुण दिले याची

माहिती दिली नसल्याने ही माहिती अपूर्ण असल्याचे अनुमान काढले आहे तर मुद्दा क्रमांक ५ मध्ये श्री. किरण मगर यांना मुलाखतीत किती गुण दिले याची माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिली नसल्याचे नमूद केले आहे. तसेच त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ८ मध्ये भरती न झालेल्या प्रवर्गातील भरती का झाली नाही व ती कधी करण्यात येणार आहे व यासाठी कोणती प्रक्रिया अवलंबविण्यात येणार आहे याची माहिती त्यांनी दिली नसल्याने व तसेच जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या उत्तरामध्ये संपूर्ण भरती झाल्याचे नमूद केले आहे तर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना एक जागा भरण्याचे राहिले असल्याचे कळविले आहे त्यामुळे ही माहिती दिशाभूल करणारी आहे, असे नमूद केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस माहिती दिल्याने त्रयस्थ पक्षाच्या खाजगी बाबतीत आगंतूक हस्तक्षेप होईल असे वाटल्याने त्यांनी अधिनियमातील कलम ८ (I) ते (J) व ११ मधील तरतुदीनुसार अपिलार्थीस माहिती नाकारली. अपिलार्थीच्या दिनांक २५-०६-२००७ रोजीच्या अर्जास त्यांनी अधिनियमातील विहित मुदतीत दिनांक ०३-०७-२००७ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस जेवढी माहिती देता येणे शक्य होते तेवढी माहिती त्यांनी पुरविली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक २४-०७-२००७ रोजीच्या अपील अर्जावर त्यांनी सुनावणी घेतली नाही, तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीपेक्षा जास्त सुस्पष्ट अशी माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक २७-०८-२००७ रोजी दिली आहे. त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस जी माहिती द्यावयाची राहिली होती ती अधिक सुस्पष्टपणे पुरविली आहे. त्यांनी सुनावणी न घेता अपिलार्थीस माहिती पाठविण्याचे कारण आयोगास असे

सांगितले की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आधी दिलेली माहिती त्यांनी विचारलेल्या प्रश्नांना अनुसरुन दिल्याचे त्यांना आढळले. आधी दिलेल्या माहितीला पूरक व माहितीचा विस्तृत तपशील अपिलार्थीस पुरविणे व अपिलार्थीने विचारलेल्या सर्व प्रश्नांना उत्तरे देणे त्यांना सुनावणी घेण्यापेक्षा जास्त संयुक्तीक वाटल्याने त्यांनी अशा प्रकारची कार्यवाही केल्याचे त्यांनी आयोगास स्पष्ट केले. जर माहिती अधिका-याने माहिती देण्यास टाळाटाळ केली असती तर सुनावणी घेण्याची कार्यवाही त्यांनी निश्चितपणे केली असती असेही त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये पुढे स्पष्ट केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांनी त्यांना जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेली माहिती अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचे विवेचन केले आहे. आयोगाकडील अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना जुलै २००६ मध्ये भरतीची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असल्याचे कळविले आहे तर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना उर्वरित एका पदाबाबत योग्य ती कार्यालयीन कार्यवाही करण्यात येत असल्याचे कळविले आहे. यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी असा खुलासा केला की, वैज्ञानिक सहाय्यकाच्या ३८ पदापैकी ३७ पदे भरण्याची प्रक्रिया चालू होती. उरलेले एक पद विशेष मागास प्रवर्गातील असल्यामुळे, व त्याचवेळी त्यांच्या कार्यालयातील एका कर्मचा-याच्या अनुसूचित जमातीचे दावा प्रमाणपत्र अवैध ठरल्याने व सदर कर्मचारी विशेष मागास प्रवर्गामध्ये समाविष्ट होत असल्याने त्या कार्यालयीन कर्मचा-या साठी सदर पद राखून ठेवून ते विहित पध्दतीने भरणे ही कार्यवाही त्यांच्याकडे चालू होती, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याकडून

अपिलार्थीस प्राप्त झालेल्या माहितीमध्ये विसंगती असल्याचे त्यांना वाटत नाही. या खुलाशाचे अवलोकन करता, अपिलार्थीला वाटत असलेल्या विसंगतीचे निराकरण होऊ शकेल. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ मध्ये विचारलेली माहिती स्पष्टपणे मिळाली नसल्याचे अपिलार्थीने नमूद केले आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ मध्ये श्री. किरण मगर यांनी यांना बी. एस्सी. ला किती गुण होते व मुलाखतीला किती गुण दिले, त्यांचा अनुभव पाहिला होता का, व त्यांची निवड न करण्यास कोणते निकष वापरले त्याची प्रत किंवा त्याचे कारण अशी माहिती विचारली आहे. अपिलार्थीच्या या मुद्यासंदर्भात श्री. किरण मगर यांना बी. एस्सी. ला किती गुण होते व मुलाखतीला किती गुण दिले या हद्दीपर्यंत, त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती देय ठरते, मात्र त्यांच्या अनुभवासंदर्भात, निवड न करण्यासंदर्भात कोणते निकष वापरले याची कारणे या मुद्याव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना विचारली आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये "माहिती" या शब्दाची व्याख्या खालीलप्रमाणे स्पष्ट केली आहे.

**<u>कलम २ (च)</u>**

" "माहिती" याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दिपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो. "

या व्याख्येचे अवलोकन करता, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास माहिती देणे या प्रक्रियेमध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी

विचारलेल्या माहितीसंदर्भात, त्या माहितीमधील निर्णय, आदेश परिपत्रके यासंदर्भात कोणतीही कारणे त्यांना देणे अभिप्रेत नाही, त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ ची माहिती अपिलार्थीस फक्त किरण मगर यांना प्राप्त झालेले गुण या हद्दीपर्यंत देय ठरत असलेली माहिती वगळता इतर माहिती देय होत नाही. तसेच अपिलार्थीने त्यांच्या मुद्दा क्रमांक ८ व्दारे भरती न झालेल्या प्रवर्गातील भरती का झाली नाही, ती कधी करण्यात येणार आहे, व त्यासाठी कोणत्या प्रक्रियेचा अवलंब करण्यात येणार आहे अशा प्रकारची माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिली नाही असे आयोगाकडे केलेल्या अपील अर्जामध्ये म्हटले आहे. या मुद्दयावर देखील मुद्दा क्रमांक ५ संदर्भात केलेला युक्तिवाद लागू होत असून अपिलार्थीने या मुद्दयाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसलेली व भविष्यकाळातील माहिती मागितली आहे, अशा प्रकारची माहिती वर म्हटल्याप्रमाणे माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी पूर्णपणे विसंगत असल्याने या मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस देय ठरत नाही.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जातील मागणीचे वरीलप्रमाणे केलेले पृथक्करण पाहता, अपिलार्थीने त्यांच्या मुद्दा क्रमांक ५ व्दारे श्री. किरण मगर यांना लेखी व तोंडी परीक्षेत दिलेले गुण, निवड झालेल्या उमेदवारांचे गुण यांची माहिती हे मुद्दे आयोग विचारात घेत आहे. उपस्थित जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असे प्रतिपादन करण्यात आले की, आता परीक्षेची प्रक्रिया पूर्ण झाली आहे, तथापि त्यांनी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ८ (I) ते (J) व कलम ११ नुसार माहिती दिली नाही. जन माहिती अधिकारी यांची ही धारणा चुकीची आहे. आता अपिलार्थीने मागितलेली माहिती, निवड प्रक्रिया पूर्ण झाली असल्याने, निवड झालेल्या उमेदवारांच्या खाजगी बाबतीत आगंतूक हस्तक्षेप करील, असे आयोगास वाटत नाही कारण निवड झालेल्या उमेदवारांना दिलेले गुण हे संबंधित परीक्षकांनी त्यांचे केलेले वैयक्तीक व निश्चित स्वरुपाचे

असे मुल्यमापन असते. जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती अपिलार्थीस दिल्यास त्यांच्या कामकाजामध्ये अधिक पारदर्शकता त्यांना आणता येईल व त्याचबरोबर संबंधितांना आपले आत्मपरिक्षण करण्याची संधी प्राप्त होईल व त्यांच्या स्वतःच्या कामगिरीमध्ये पुढील काळात सुधारणा आवश्यक असल्यास त्या करता येतील.

सबब संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या मूळ अर्जातील त्यांना अद्यापपर्यंत न पुरविलेली उर्वरित वरील परिच्छेदात स्पष्ट केलेली सर्व देय माहिती हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी हेतूपुरस्सर टाळाटाळ केल्याचे किंवा असद्‌हेतूने ती दडविल्याचे आयोगाच्या निदर्शनास न आल्याने त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत कोणतेही आदेश नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, अपिलार्थीचा अपील अर्ज त्यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी जन माहिती अधिकारी व अपिलार्थी या दोघांनाही एकत्र बोलावून, त्यांचे म्हणणे ऐकून, ते नोंदवून, त्यावर त्यांचा निर्णय देणे हे "अपील ठरविणे" या प्रक्रियेमध्ये अभिप्रेत आहे, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करुन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या मूळ अर्जातील अद्यापपर्यंत त्यांना न पुरविलेली उर्वरित सर्व देय माहिती हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या

आत त्यांना विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )
दिनांक ११-०७-२००८ राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुनिल विनायकराव मगर, राजमाता जिजाऊ चौक, ढोकी रोड, कळंब, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक रासायनिक विश्लेषक, न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, गृहविभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप संचालक, न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, गृहविभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३५०

निर्णय दिनांक ११-०७-२००८

| | | |
|---|---|---|
| श्री. सदाविजय आर्य,<br>माजी प्राचार्य, मा. दीनानाथ मंगेशकर<br>महाविद्यालय, (औराद शहा),<br>आंतरभारतीय संकुल, साने गुरुजी मार्ग,<br>औराद शहाजानी, तालुका निलंगा, जिल्हा<br>लातूर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा प्राचार्य, मा. दीनानाथ मंगेशकर<br>महाविद्यालय, (औराद शहा), तालुका<br>निलंगा, जिल्हा लातूर | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा प्राचार्य, मा. दीनानाथ मंगेशकर<br>महाविद्यालय, (औराद शहा), तालुका<br>निलंगा, जिल्हा लातूर | : | प्रतिवादी |

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : प्राध्यापक (अर्थशास्त्र), मा. दीनानाथ मंगेशकर महाविद्यालय, (औराद शहा), तालुका निलंगा, जिल्हा लातूर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०७-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. सदाविजय आर्य (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व श्री. रामलिंग अप्पाराव कवठाळे, जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, मा. दीनानाथ मंगेशकर महाविद्यालय, (औराद शहा) (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा प्राध्यापक (अर्थशास्त्र), मा. दीनानाथ मंगेशकर महाविद्यालय, (औराद शहा) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक १०-०७-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या सेवानिवृत्तीसंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"१. कॉलेज नी माझ्या संबंधी सर्विस वेरीफिकेशन केला आहे का ? केला असेल तर केंव्हा ? त्याची नकल मला द्यावी.

२. मूळ सेवा पुस्तिका शिवाय पेंशन फार्म भरणे शक्य आहे काय ?

३. पी. एफ. व ग्रेच्युटी ची कार्यवाही पेंशन कार्यवाही सोबतच करावी लागते. हे कोणत्या नियमाच्या आधीन ते कळवावे.

४. मी स्वतःहून पेंशन वर गेलो नाही मात्र संस्थे कडून मला पेंशनवर पाठविण्यात आले आहे. म्हणून पेंशन मिळवून देण्याची जवाबदारी संस्थेची नव्हे काय ?

५. जेवढ्या कालावधी ची सेवा दर्शवून मला अनिवार्य सेवा निवृत्ती दिली तेवढ्या सेवेचे वेरीफिकेशन करुन त्या साठी ची पूर्ण कागदपत्र दाखवून कार्यवाही करण्याची जवाबदारी संस्थेची नाही का ?

६. संस्थेची पेंशन मिळूवन देण्याची जवाबदारी टाळण्यासाठी "प्रत्यक्षात मूळ व दुय्यम सेवा पुस्तिका माझ्या ताब्यात होत्या" हा आरोप माझ्यावर करीत

आहात असे का समझू नये.  मूळ सेवा पुस्तिका माझ्याकडे असल्याचा काय लेखी पुरावा आपल्या कडे आहे, त्याची नकल (प्रमाणित) मला द्यावी. ''

अपिलार्थीने सदर अर्ज को-या कागदावर टंकलिखीत करुन दिला आहे.  सदर अर्ज माहिती अधिकार अधिनियमासंदर्भात सामान्य प्रशासन विभागाने दिनांक ११-१०-२००५ रोजी काढलेल्या अधिसुचनेतील प्रपत्रानुसार नाही व या अर्जावर त्यांनी दहा रुपये इतक्या विहित शुल्काच्या किंमतीचे कोर्ट फी स्टॅम्प चिकटविले नाहीत.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०७-०८-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती दिल्याचे दिसून येते. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०८-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे.

अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे पाठविलेला अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांनी स्वीकृत केला नाही व सदर पाकीट अपिलार्थीस विना तामीली दिनांक २१-०८-२००७ रोजी परत आले.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०९-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे.  या अपील अर्जामध्ये, त्यांनी त्यांचे अपील अपिलीय अधिकारी यांनी स्वीकारले नाही, अपिलीय अधिकारी आपले कर्तव्य कायद्यानुसार बजावत नाहीत व त्यांनी व्दितीय अपील कोठे करावयाचे त्या अधिका-याचे नाव व पत्ता कळविला नाही अशी कारणे नमूद करुन त्यांचे अपील मंजूर करण्यात यावे, मूळ अर्जातील माहिती देण्यासाठी निर्देश देण्यात यावेत व कर्तव्य पालनात कसूर केल्याबद्दल योग्य ते आदेश देण्यात यावेत अशी आयोगास विनंती केली आहे,

व त्याचबरोबर या प्रकरणामध्ये त्यांना झालेला खर्च व नुकसानभरपाई देण्याची देखील आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी, अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांच्या सर्व्हिस बुकाची नक्कल त्यांना महाविद्यालयाने दिली नाही, शिक्षण संचालनालयाकडून जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या सेवा पुस्तिकेचे व्हेरिफिकेशन करुन घेतले नाही, महाविद्यालयाने केलेल्या सर्व्हिस व्हेरिफिकेशनची नक्कल त्यांच्या दिनांक ०७-०८-२००७ रोजीच्या पत्रासोबत जोडली आहे. सदर माहिती त्यांना अभिप्रेत नव्हती, त्यांना सह संचालक शिक्षण, नांदेड यांच्याकडून त्यांच्या सेवापुस्तिकेची तपासणी पडताळणी करुन हवी होती त्यामुळे या मुद्द्यावर त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर चुकीचे आहे, तसेच त्यांनी मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिशाभूल करणारी माहिती त्यांना प्राप्त झाली. संस्थेने त्यांना सेवेतून सक्तीने सेवानिवृत्त केले असल्यामुळे अपिलार्थीस सेवानिवृत्ती वेतन प्राप्त करुन देण्याची जबाबदारी संस्थेची आहे, तथापि संस्था ही जबाबदारी टाळत आहे असे त्यांचे म्हणणे आहे. संस्थेने त्यांची सेवापुस्तिका पूर्ण करुन सेवापुस्तिकेची प्रत त्यांना द्यावी असे त्यांचे म्हणणे आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीची सेवापुस्तिका तयार असून या सेवापुस्तिकेची पडताळणी शिक्षण सह संचालकाकडून करुन घेऊन अपिलार्थीस सेवानिवृत्ती मिळण्यासाठी ते तातडीने कार्यवाही करण्यास तयार आहेत. सेवानिवृत्ती वेतनासाठी आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता तातडीने करणे गरजेचे असताना अपिलार्थीने त्यांच्या सेवानिवृत्ती वेतनासंदर्भात प्रथम फार्म देखिल भरला नाही. सेवानिवृत्ती वेतन प्रस्तावाच्या पुर्ततेसाठी आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता अपिलार्थीने न केल्यामुळे अपिलार्थीच्या सेवानिवृत्ती वेतनासंदर्भात प्रश्न प्रलंबीत राहिला आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, प्रथमतः अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागवितांना व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील करताना ते सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ११-१०-२००५ च्या अधिसूचनेमध्ये विहित केलेल्या प्रपत्रात केले नाही. अपिलार्थीने केवळ विहित नमुन्यात अर्ज व अपील दाखल केले नाही तर त्यांनी या अर्जावर, विहित शुल्काचे अनुक्रमे दहा व वीस रुपयांचे कोर्ट फी स्टॅम्प चिकटविले नाहीत, ही बाब येथे विशेष करुन लक्षात घेण्यात येत आहे. मात्र त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जावर वीस रुपये किंमतीचे कोर्ट फी स्टॅम्प चिकटविल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे या अपिलावर आयोगातर्फे सुनावणी घेण्यात येत आहे. अपिलार्थीच्या दिनांक १०-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ६ मुद्दयावर माहिती मागविली होती. त्यापैकी मुद्दा क्रमांक १ मधील त्यांनी मागितलेली सर्व्हिस बुकची नक्कल, मुद्दा क्रमांक ३ व्दारे विचारलेली माहिती व मुद्दा क्रमांक ६ मधील जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेला लेखी पुरावा हे मुद्दे वगळता उर्वरित माहिती अपिलार्थीस देय नाही कारण उर्वरित संपूर्ण माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी पूर्णपणे विसंगत आहे. या माहितीव्दारे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून वैयक्तीक अभिप्राय व निर्णय याबाबत त्यांना कारणे व खुलासे अभिप्रेत असल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियमाव्दारे अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांना प्रश्न अथवा खुलासे विचारणे व त्याची उत्तरे / खुलासे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना देणे मुळात अभिप्रेत नाही हे अधिनियमातील कलम २ (च) मध्ये "माहिती" या शब्दाच्या दिलेल्या व्याख्येवरुन दिसून येईल. अपिलार्थी यांना संबंधित शिक्षण संस्थेने १९९२ साली सक्तीने सेवानिवृत्त केले असून,

सन १९९२ पासून अपिलार्थीच्या सेवानिवृत्ती वेतनासंबंधीचा प्रश्न अनिर्णयीत आहे, असे सुनावणीमध्ये आढळून आले. सदर दीर्घकाळ प्रलंबिततेचे कारण जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे दिले की, अपिलार्थी यांनी सेवानिवृत्ती वेतनाकरिता आवश्यक असणा-या कागदपत्रांची पुर्तता आजपर्यंत केलेली नाही. आता ते अपिलार्थीचे सेवानिवृत्ती वेतन प्रकरण सह संचालक शिक्षण यांच्याकडे एक महिन्याच्या आत पाठवून देण्यास तयार आहेत. तसेच अपिलार्थीच्या सेवापुस्तिकेची त्यांच्याकडे उपलब्ध असलेली व्दितीय झेराक्स प्रत ते अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत. हे पाहता, अपिलार्थीचा सेवानिवृत्ती वेतनाचा प्रश्न त्वरेने सुटण्यास हरकत नसावी. जन माहिती अधिकारी यांनी सह संचालक शिक्षण यांच्या कार्यालयाकडून महालेखापाल यांच्याकडे किती दिवसात प्रस्ताव पाठविला जाईल याबाबतीत भाष्य करण्यास असमर्थता व्यक्त केली. तेव्हा सह संचालक शिक्षण, नांदेड यांना या प्रकरणी असे सूचित करण्यात येते की, अपिलार्थीच्या सेवानिवृत्ती वेतनाचा प्रस्ताव संबंधित शिक्षण संस्थेकडून त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी सदर प्रस्तावाची तपासणी करुन, काही आक्षेप असल्यास त्याची पुर्तता संबंधित संस्थेकडून करुन घेऊन, परिपूर्ण प्रस्ताव महालेखापाल यांच्याकडे, सदर प्रस्ताव त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून एक महिन्याच्या आत पाठवावा, जेणेकरुन अपिलार्थीचा दीर्घ काळ प्रलंबीत राहिलेला सेवानिवृत्ती वेतनाचा प्रश्न सुटण्यास मदत होईल.

अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये या प्रकरणातील जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यपध्दतीबद्दल त्यांचे आक्षेप नोंदविलेले आहेत, तसेच त्यांना खर्च व नुकसानभरपाई देण्याचे आदेश देण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे. उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांचा मूळ अर्ज अवैध असताना देखील त्यांना अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत, त्यांना त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे, हे पाहता जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाईचे कोणतेही आदेश आयोग देत नाही, तसेच अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या

अर्जावर विहित शुल्काचे दहा रुपये किंमतीचे कोर्ट फी स्टॅम्प चिकटविले नसल्याने त्यांना कोणतीही नुकसानभरपाई जन माहिती अधिकारी अथवा संबंधित संस्थेकडून देय होत नाही. उपरोक्त प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज ज्या पाकिटात आहे ते पाकीट स्वीकारण्यास त्यांनी नकार दिला असे अपिलार्थीचे म्हणणे आहे, जन अपिलीय अधिकारी यांची ही कृती बरोबर नाही. यापुढे त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणारे प्रथम अपील अर्ज स्वीकारण्यास टाळाटाळ करु नये अन्यथा अधिनियमातील तरतुदीनुसार आयोगास त्यासंदर्भात योग्य ती कारवाई करणे भाग पडेल, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली त्यांची सेवापुस्तिका पूर्ण करुन त्याची झेरॉक्स प्रत त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत उपलब्ध करुन द्यावी.

३. सह संचालक, शिक्षण, नांदेड यांनी, अपिलार्थीच्या सेवानिवृत्ती वेतनाचा प्रस्ताव संबंधित शिक्षण संस्थेकडून त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर, त्याची तपासणी करुन, काही आक्षेप असल्यास त्याची पुर्तता संबंधित संस्थेकडून करुन घेऊन, परिपूर्ण प्रस्ताव महालेखापाल यांच्याकडे, एक महिन्याच्या आत पाठवावा.

औरंगाबाद
दिनांक ११-०७-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सदाविजय आर्य, माजी प्राचार्य, मा. दीनानाथ मंगेशकर महाविद्यालय, (औराद शहा), आंतरभारतीय संकुल, साने गुरुजी मार्ग, औराद शहाजानी, तालुका निलंगा, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा प्राध्यापक (अर्थशास्त्र), मा. दीनानाथ मंगेशकर महाविद्यालय, (औराद शहा), तालुका निलंगा, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, मा. दीनानाथ मंगेशकर महाविद्यालय, (औराद शहा), तालुका निलंगा, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सह संचालक शिक्षण, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३१२

निर्णय दिनांक : १५.०७.२००८

| | | |
|---|---|---|
| १ सौ. कोमल सुग्रीव विटेकर,<br>औरंगाबाद | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा तालुका कृषी अधिकारी,<br>लातूर.<br>२ जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपविभागीय कृषी अधिकारी,<br>लातूर | : | प्रतिवादी |

| | |
|---|---|
| प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : | कृषी अधिकारी,<br>तालुका कृषी अधिकारी कार्यालय,<br>लातूर |
| जन अपिलीय अधिकारी : | तालुका कृषी अधिकारी,<br>लातूर |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०७.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी सौ. कोमल सुग्रीव विटेकर, (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल),श्री. चंडीदास दिगंबरराव मंडलीक, जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय,लातूर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), श्री. दत्तात्रय भिमराव सुतार, जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, लातूर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे

संबोधण्यात येईल) तसेच श्री. मोहन श्रीरंगराव भिसे, उपविभागीय कृषी अधिकारी, लातूर हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.०२.०४.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १.१.२००७ ते १५.३.२००७ या कालावधीशी संबंधित त्यांच्या कार्यालयातील कामाची खालीलप्रमाणे माहिती मागविली होती.

" आपल्या अधिकाराखालील रो.ह.यो. या योजनेअंतर्गत झालेल्या कामांवरील (१) मिरगणहळी ग.क्र.२/२१ मानाबा (२) मिरगणहळी ग.क्र.२/२२ मानाबा (३) सिराढोण ग.क्र.१/२ सपाबा (४) कासार सिरसी ग.क्र.१/६ सपाबा (५) नेलवाडी ग.क्र.१/२३ मानाबा (६) हडगा ग.क्र.१/१५ मानाबा (७) सिंदखेड (ईनामवाडी) ग.क्र.२/१ सि.सि.टी. (८) सिंदखेड (ईनामवाडी) ग.क्र.२/२ सि.सि.टी. (९) बालकुंदा ग.क्र.१/८ स.स.चर. (१०) निटूर ग.क्र.१/१५ मानाबा. (११) कासार बालकुंदा ग.क्र.१/८ स.स.चर. (१२) सिंदखेड ग.क्र.१/१ सि.सि.टी. (१३) सिंदखेड ग.क्र.२/१ सपाबा (१४) मनंतपूर ग.क्र.१/१ सपाबा (१५) हाडगा ग.क्र.१/१३ मानाबा (१६) आंबेवाडी ग.क्र.१/१ सपाबा (१७) लांबोटा ग.क्र.४/१ सपाबा. (१८) वालापूर ग.क्र.१/७ सपाबा (१९) कोनुळगाव ग.क्र.१/२ सपाबा (२०) ------

या वरील तालुक्यातील गावांत झालेल्या कामावरील वरीष्ठांनी पाया पाहणी केलेल्या अहवालाच्या तसेच मजुरांची नावे लिहिलेले हजेरीपट आणि मोजमाप पुस्तिका या सर्व मुद्यांचा छायांकित प्रति मिळणेबाबत."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २६.४.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहितीचे संकलन करण्याचे काम २-३ दिवसात पूर्ण होईल, असा अंदाज व्यक्त करुन सदर माहितीसाठी लागणारे शुल्क भरुन माहिती घेऊन जाण्याचे अपिलार्थीस सूचित

केले. सदर पत्र अपिलार्थीस पाठविल्यापृष्ठयर्थ जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील जावक नोंदवहीच्या संबंधित पृष्ठाची झेरॉक्स प्रत आयोगास सादर केली आहे. यावरुन त्यांनी ४०५ या क्रमांकाची दोन पत्रे दि. २६.४.२००७ व २७.४.२००७ ला पाठविल्याचे दिसते, त्यापैकी एक पत्र अपिलार्थीस पाठविले आहे. तथापि या नोंदीमध्ये संबंधित लिपीकाच्या हस्ताक्षरात व प्रतीवरील उर्वरित हस्ताक्षरात फरक असल्याचे दिसून येते व एकाच क्रमांकाच्या दोन पत्रांच्या नोंदीचा विचार करता, आज जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सादर केलेला हा पुरावा अग्राहय धरण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २३.०५.२००७ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील अर्ज त्यांनी उपविभागीय कृषी अधिकारी, विभाग लातूर यांना उद्देशून केला आहे. तथापि कृषी विभागाचे तालुका पातळीवरील अपिलीय अधिकारी हे तालुका कृषी अधिकारी असल्याने सदर अर्ज त्यांच्याकडील दि. ८.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये संबंधित तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे पाठवून दिले व त्याची प्रत अपिलार्थीस दिली. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतली नाही अथवा या संदर्भात त्यांनी कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार अपिलार्थीशी केला नाही. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ३०.०८.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी माहितीसाठी दिलेल्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी

यांच्याकडून कोणताही प्रतिसाद त्यांना प्राप्त झाला नाही, तसेच त्यांनी केलेल्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही अथवा त्यांनी या संदर्भात त्यांच्याशी कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केलेला नाही. त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता असून ती त्यांना विनामूल्य प्राप्त व्हावी व मुदतीत माहिती न दिल्यामुळे संबंधितांवर योग्य ती कारवाई व्हावी, अशी त्यांनी आयोगास विनंती केली.

अपिलार्थी यांना, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व्यक्तिशः माहितीची मागणी करुन माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कधी व किती वेळा गेल्या, याची विचारणा केली असता, त्यांनी त्या जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात गेल्या होत्या, एवढेच तोंडी सांगितले, तथापि या संबंधाने त्यांनी कोणताही ठोस पुरावा आयोगास उपलब्ध करुन दिला नाही.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थी यांनी व्यक्तिशः माहितीची मागणी करुन त्या त्यांच्या कार्यालयात माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कधीही उपस्थित राहिल्या नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे आजही तयार असून ते अपिलार्थीस ती माहिती देण्यास तयार आहेत. त्यांनी पुढे असाही युक्तीवाद केला की, अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात त्यांच्या हातून कोणतीही चूक झाली नाही, तथापि माहिती तयार करण्यासाठी त्यांना थोडा विलंब लागला.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थी यांचा मूळ अर्ज त्यांना प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही.

वरील घटनाक्रम,दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन

माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप मोठे आहे. तसेच अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केलेली आहे. कोणत्याही अर्जदाराने व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यास, सदर माहिती प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी संबंधित अर्जदाराची असते. 'व्यक्तिशः' माहिती मागणे याचा अर्थ अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः (या कामासाठी कोणताही अधिकृत प्रतिनिधी न पाठविता) हजर राहून त्यांच्याकडून माहिती हस्तगत करुन घेणे असा आहे. तथापि या प्रकरणी अपिलार्थी या जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित झाल्याचा, कोणताही ठोस पुरावा त्या आयोगासमोर सादर करु शकल्या नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २६.४.२००७ रोजी लिहिलेल्या पत्राचे अवलोकन करता असे दिसून येते की, या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस माहिती दोन-तीन दिवसात पूर्ण होईल, तरी आपण या कार्यालयात येऊन काही शुल्क भरुन माहिती घेऊन जावे, असे मोघम स्वरुपाचे पत्र दिले आहे.यामध्ये निश्चितपणे त्यांच्याकडे माहिती कधी उपलब्ध होऊ शकेल, याचा उल्लेख नाही. तसेच अपिलार्थीस द्यावयाच्या माहितीच्या पृष्ठांची संख्या व प्रतिपृष्ठ दर याचाही उल्लेख त्यांनी केल्याचे आयोगास आढळून आले नाही. त्यांनी आजच्या सुनावणीमध्ये अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तयार करण्यासाठी त्यांना विलंब लागला, असे मान्य केले आहे.या संदर्भात त्यांनी त्यांच्या कार्यालयाचे दि. १.७.२००८ रोजीचे एक पत्र अपिलार्थीस पाठविले, या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस आवश्यक त्या माहितीसाठी रु. १३०८/- इतके शुल्क भरण्याचे सूचित केले आहे. आज रोजी अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार असून ते ती अपिलार्थीस देण्यास तयार असल्याचे सांगत आहेत. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले, तथापि ते चुकीच्या प्राधिकरणाकडे केले, म्हणून संबंधिताने अपिलार्थीचा अर्ज तालुका कृषी

अधिकारी, जे या प्रकरणी प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमले गेले आहेत, त्यांच्याकडे पाठविला, परंतु त्यांनीही कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेऊन एकप्रकारे अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याचे दिसून येते. केवळ जन अपिलीय अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या कार्यशैलीमुळे अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यापासून विनाकारण वंचित राहावे लागले, यामध्ये अपिलार्थीचा काहीही दोष आढळून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर वेळेवर सुनावणी घेतली असती तर, अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यासाठी आवश्यक तो निर्णय पारित होऊ शकला असता, केवळ जन अपिलीय अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या वर्तनाने अपिलार्थीस दीर्घकाळ आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहावे लागल्याने, त्या आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून निःशुल्क माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी पात्र आहेत, असे आयोगाचे मत आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थी यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीपासून जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही असद्हेतूने माहिती दडविल्याचे अथवा ती देण्यास टाळाटाळ केल्याचे निःसंशयपणे सिध्द न झाल्याने त्यांच्यावर कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत, तथापि त्यांनी येथून पुढे माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जावर अधिक सतर्कतेने कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या कार्यशैलीतील दर्शविलेल्या कर्तव्य परायणतेच्या अभावाची व बेपर्वाईची नोंद कृषी आयुक्त, पुणे यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

**१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.**

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : १५.०७.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. कोमल सुग्रीव विटेकर, सरचिटणीस, अखिल भारतीय असंघटीत रोजंदारी कामगार संघटना, प्लॉट नं. बी.३५/६ साईनगर, सिडको, वाळुज महानगर, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त(कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर,पुणे-०५ यांना या निकाल-पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३१८

निर्णय दिनांक : १५.०७.२००८

१ श्री. वाघमारे राजेश गणपतराव, : अपीलार्थी
रा. ता.जि.नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क,
नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी
तथा जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय,
नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०७.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. राजेश गणपतराव वाघमारे, (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी, अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, नांदेड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी जिल्हाधिकारी, नांदेड ( यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.२१.०५.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे अनुज्ञप्ती क्र. सी.एल.-३-१४४/९/७४-७५ शी संबंधित एकूण २१ मुद्यांवर खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये "अनुज्ञप्तीचे स्वरुप, अनुज्ञप्ती कोणाच्या नावावर देण्यात आली, नुतनीकरणासोबत दाखल केलेली भाडेपट्टीची प्रत, देशी दारु विक्री सुरु करण्याकरिता आवश्यक जागा व सुविधायाबद्दलची माहिती, १९९२ ते २००७ पर्यंत निरीक्षकांनी केलेल्या तपासणी अहवालाची सत्यप्रत, नुतनीकरणासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे, अनुज्ञप्तीधारकाने सन २००६-०७ ते २००७-०८ नुतनीकरण अर्जासोबत दिलेली सर्व कागदपत्रांच्या सत्यप्रती, वारसांची नावे, मूळ अनुज्ञप्तीधारक मयत झाल्यानंतर वारसाच्या नावे अनुज्ञप्ती नुतनीकरण करतेवेळेस दिलेल्या कागदपत्रांच्या सत्यप्रती, पोषाबाई मारोती गाडगे मयत असल्याचे केव्हा कळाले?, नुतनीकरण कशाच्या आधारे केले, मुख्यात्यारनाम्याची रजिस्टरला नोंद केली आहे का, मुख्यत्यारनाम्याची सत्यप्रत, अनुज्ञप्ती रजिस्टरची १९७४ पासूनची सत्यप्रत." इत्यादी माहितीचा समावेश आहे

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २०.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या मुद्यां विषयी काही (१४ व २१) माहिती निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, नांदेड यांच्याकडून मागविलेली आहे. सदर माहिती प्राप्त होताच आपणास तात्काळ अवगत करण्यात येईल, असे कळविले व तदनंतर दिनांक २३.७.२००७ रोजी अपिलार्थीस आवश्यक माहिती दिली आहे. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी, नांदेड यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ०७.०७.२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची

सुनावणी घेतल्याचे अथवा त्यसांच्याशी पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याने व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना विलंबाने, अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याचे अपिलार्थीस वाटल्यावरुन व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) खाली अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २१.०८.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.या अपील अर्जासोबत त्यांनी एक अपील मेमो जोडला असून त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमानुसार योग्य ती कारवाई करुन त्यांना पूर्ण स्वरुपाची माहिती उपलब्ध करुन देण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी सुनावणीचे वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही हजर नाहीत, त्यामुळे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीच्या अपील अर्जावर निर्णय घेण्यात येत आहे.

अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता, असे दिसून येते की, अपिलार्थीचे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मोठे स्वरुप असलेल्या एका विशेष अनुज्ञप्तीसंदर्भात मोठया स्वरुपाची व मोठी व्याप्ती असलेली माहिती मागविली आहे. अपिलार्थीने ज्या २१ मुद्यांवर जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागविली आहे. त्यातील मुद्दा क्र. ११ व १३ द्वारे मागितलेली माहिती अपिलार्थीने प्रश्नार्थक स्वरुपात, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचा खुलासा अपेक्षित करणारी, अशी मागितली आहे. अशाप्रकारची माहिती, ही माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्याने, ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय ठरत नाही. अपिलार्थीच्या मुद्दा क्र.१५ मधील अनुज्ञप्ती रजिस्टरच्या संबंधाने मागितलेल्या माहिती संदर्भात "अभिलेख उपलब्ध नाही," अशा प्रकारची माहिती जन माहिती

अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविली आहे. तथापि अनुज्ञप्ती रजिस्टर हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात ठेवले जाते किंवा कसे, हे आयोगास कळावयास मार्ग नाही आणि जर ते ठेवले जात असेल तर हे महत्त्वाचे अभिलेखे उपलब्ध नाहीत, हे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आयोगास मान्य नाही. त्यांना ही माहिती अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीस निश्चितपणे उपलब्ध करुन द्यावी लागेल. जर त्यांच्याकडे १९७४ पासूनची माहिती उपलब्ध नसेल किंवा सदर अभिलेखे, त्यांचा जतन करण्याचा कालावधी संपुष्टात आल्याने, नष्ट केले असतील तर त्यांना त्याबाबत योग्य तो पुरावा अपिलार्थीस द्यावा लागेल. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२० द्वारे 'अनुज्ञप्तीच्या नोकरनाम्याची माहिती' अशा मोघम स्वरुपात माहिती विचारली आहे, या मुद्यासंबंधाने जन माहिती अधिकारी यांना सदर नोकरनाम्याच्या प्रती अपिलार्थीस पुरविणे आवश्यक आहे. हे अपवाद वगळता इतर मुद्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सर्वसाधारणपणे सुसंगत माहिती दिल्याचे दिसून येते.

अपिलार्थीने त्यांचे द्वितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून विलंबाने माहिती प्राप्त झाल्याचे नमुद करुन प्राप्त झालेली माहिती चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचे नमुद केले आहे. सर्वसाधारण परिस्थितीत अपिलार्थीस दि. २१.५.२००७ रोजीच्या अर्जामध्ये मागणी केलेली माहिती त्यांना दि. २०.६.२००७ रोजी उपलब्ध व्हावयास हवी, तथापि या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस एकूण ३५ दिवस विलंबाने माहिती दिल्याचे दिसून येते. तसेच त्यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती अपूर्ण असल्याचेही वर विवेचन केल्याप्रमाणे सिध्द होत आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत संपूर्ण माहिती देण्याचे अभिप्रेत असल्याने अपिलार्थी यांचा प्राप्त माहितीबाबतचा वरील दावा सिध्द होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात

येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या दि. २१.५.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विलंबाने व अपूर्ण माहिती देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. परिणामी ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस निःसंशयपणे पात्र ठरत आहेत. सबब आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबाबत त्यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याच्या आत पूर्ण करुन आपला अनुपालन अहवाल तद्नंतर एक महिन्याच्या आत आयोगास सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण सत्य माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल, त्यांच्यावर प्रचलित सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याचे आत

पूर्ण करुन आपला अनुपालन अहवाल तद्नंतर एक महिन्याच्या आत आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : १५.०७.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. राजेश गणपतराव वाघमारे,१३४-अ, गणेशनगर, नांदेड-४३१६०२

२ जन माहिती अधिकारी अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, २ रा माळा,ओल्ड कस्टम हाऊस, फोर्ट, मुंबई ४०००२३ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३२८

निर्णय दिनांक : १५.०७.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. गौतम सुर्यभान सोनवणे,<br>रा. उस्मानाबाद | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्याध्यापक,<br>गुलशन-ए-अतफाल, उर्दू प्राथमिक शाळा,<br>उस्मानाबाद. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा सचिव,<br>शम्स एज्युकेशन सोसायटी,<br>उस्मानाबाद. | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०७.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. गौतम सुर्यभान सोनवणे , (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल),श्री. सय्यद जहिरोद्दीन कादरी, जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, गुलशन-ए-अतफाल, उर्दू प्राथमिक शाळा, उस्मानाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. महंमद अली खॉ, जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, शम्स एज्युकेशन सोसायटी, उस्मानाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.२१.०६.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे शैक्षणिक वर्ष १९९३ ते २००७ या कालावधीतील त्यांच्या शाळेशी संबंधित खालीलप्रमाणे माहितीची मागणी केली आहे.

" १) मुख्याध्यापक, गुलशन-ए-अतफाल उर्दू प्राथमिक शाळा उस्मानाबाद यांना सन १९९३ ते २००६ पर्यंत दरमहा, दरवर्षी वेतनवाढी सह कोणत्या व कोणाच्या आदेशानुसार वेतन अदा करण्यात आले त्या आदेशाच्या १९९३ ते २००६ पर्यंतच्या सत्यप्रती देण्यात याव्यात.

२) उस्मानाबाद जिल्हयातील खाजगी प्राथमिक शाळे मध्ये इ.१ लीच्या वर्गात जन्मतारखेशिवाय प्रवेश देण्याची परवानगी शासनाने कोणकोणत्या शाळांना दिलेली आहे ? त्यासंबंधीचे शासन आदेश, परिपत्रकाच्या सत्यप्रती मिळाव्यात. तसेच गुलशन-ए-अतफाल उर्दू प्राथमिक शाळा उस्मानाबाद या शाळेस शासनाने परवानगी देताना ती शाळा झोपडपट्टी विभागात असल्याबाबतचे दिलेल्या प्रमाणपत्राची सत्यप्रत मिळावी.

३) शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी गुलशन-ए-अतफाल उर्दू प्राथमिक शाळा उस्मानाबाद येथील कर्मचाऱ्याने शैक्षणिक वर्ष २००५-०६ मध्ये उचलेल्या रजा प्रवास (महाराष्ट्र दर्शन) अंतर्गत उचलेल्या वेतनदेयकाच्या सत्यप्रती मिळाव्यात. तसेच संबंधीताच्या अर्जाची सत्यप्रत मुख्याध्यापक यांचा मंजुरी आदेश, कटूंबाचा तपशील, पती पत्नी सेवचे प्रमाणपत्र, संबंधीत कार्यालयाचे प्रमाणपत्र इत्यादी सह माहिती देण्यात यावी."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २३.७.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ११४/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले

आहे. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस माहितीच्या एकूण पृष्ठांची संख्या व प्रतिपृष्ठ दर यांचा तपशील दिल्याचे दिसून येते. तथापि सदर शुल्क अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात न भरता, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २१.०७.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवून, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कोणतीही माहिती दिली नसल्याने त्यांनी हे अपील जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केल्याचे म्हटले आहे. सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २६.७.२००७ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते. अपिलार्थीने सदर अपील सचिव, शम्स एज्युकेशन सोसायटी,उस्मानाबाद यांच्याकडे केले आहे. तथापि या शिक्षण संस्थेमध्ये, संस्थेचे अध्यक्ष यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक झाली असल्याने संबंधित सचिव, यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही. मात्र त्यांनी त्यांच्याकडील दि. २४.८.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांच्या संस्थेमध्ये अध्यक्षांची नेमणूक जन अपिलीय अधिकारी म्हणून झाली असल्याने त्यांच्याकडे अपील करावे, अशा अर्थाच्या सूचना अपिलार्थीस दिल्याचे दिसून येते. तथापि अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील अर्ज न करता माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ३१.०८.२००७ रोजी थेट द्वितीय अपील दाखल केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांना जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून माहितीपोटीचे शुल्क भरण्याचे अथवा अध्यक्ष, शम्स एज्युकेशन सोसायटी यांच्याकडे अपील करण्यासंबंधीच्या सूचना असलेले कोणतेही पत्र, यापैकी कोणतेही पत्र त्यांना प्राप्त झाले नाही. त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, शम्स एज्युकेशन सोसायटी,उस्मानाबाद यांनी त्यांचा प्रथम अपील अर्ज स्वीकृत न करता, सदर टपाल त्यांना विनास्वीकृत परत पाठविले.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून सदर माहिती ते अपिलार्थीस देण्यासाठी तयार आहेत. अपिलार्थीचा दि. २१.६.२००७ रोजीचा अर्ज त्यांच्याकडे दि. २६.६.२००७ रोजी प्राप्त झाला. त्यानंतर त्यांनी दि. २३.७.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस हव्या असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ११४/- भरण्याचे त्यांना सूचविले. सदर पत्र त्यांनी अपिलार्थीस अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगने पाठविले आहे. अपिलार्थी यांनी व्यक्तिशः माहितीची मागणी करुन, ते माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयात कधीही हजर झाले नाहीत. मात्र त्यांच्या शाळेशी संबंधित माहिती इतर वेगवेगळया अर्जांद्वारे वारंवार मागत राहिले.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थी यांनी दि. २१.७.२००७ रोजी केलेला अर्ज त्यांच्याकडे दि. २६.७.२००७ रोजी प्राप्त झाले. अपिलार्थीकडून प्राप्त झालेल्या दि. २१.७.२००७ रोजीच्या मूळ अपील अर्जाची प्रत त्यांनी आयोगास दाखविली, यावरुन जन अपिलीय अधिकारी यांनी

अपिलार्थीचा अपील अर्ज स्वीकृत केला नाही, हे अपिलार्थीचे विधान असत्य ठरते. प्रत्यक्षात ते जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमले गेले नसल्याने, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्याकडील दि. २४.८.२००७ रोजीच्या पत्रान्वये अध्यक्ष, शम्स एज्युकेशन सोसायटी, उस्मानाबाद यांच्याकडे प्रथम अपील करण्याचे सूचित केले, तथापि सदर सूचनाबरहुकूम अपिलार्थीने कार्यवाही केली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत आहे. मात्र १ ल्या मुद्यावरील माहिती ही १३ वर्षांच्या कालावधीतील असल्याने ही माहिती अपिलार्थीस देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांना विशेष परिश्रम घ्यावे लागणार होते, परंतु एवढे जरी असले तरी अपिलार्थीचा प्रथम अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २६.६.२००७ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये अपिलार्थीस त्यांच्या दि. २३.७.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ११४/- इतके भरण्याचे सूचित केले. सदर पत्र अपिलार्थीस अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगने पाठविल्याचा पुरावा त्यांनी आयोगासमोर सादर केला. सदर पुरावा आयोग ग्राहय धरत असून, अपिलार्थीच्या माहितीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे, या प्रकरणी सिध्द होत असल्याचे दिसून येत आहे. तसेच अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केल्याने, त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेण्याची पूर्ण

जबाबदारी ही अपिलार्थीवर येऊन पडते. 'व्यक्तिशः' माहितीची मागणी करणे याचा अर्थ, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे स्वतः जातीने उपस्थित राहून त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हस्तगत करुन घेणे, असा आहे. सदर माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांना त्यांचे प्रतिनिधी जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविणे येथे अभिप्रेत नाही या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी करुन, ते ती प्राप्त करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित झाले नाहीत. त्यामुळे माहिती प्राप्त न होण्यासाठी अपिलार्थी हे स्वतःच जबाबदार असल्याचे सिध्द होत असल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये, अपिलार्थीने त्यांच्याकडे मागितलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून, ते ती अपिलार्थीस देण्यास तयार असल्याचे स्पष्ट केले आहे. अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना माहितीपोटीचे शुल्क रु.११४/-जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरुन सदर माहिती त्यांना व्यक्तिशः हस्तगत करुन घेणे आता भाग आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, त्यांच्याकडून सदर माहितीसाठीचे आवश्यक ते शुल्क रु.११४/- इतके प्राप्त करुन घेऊन, त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस मूळ अर्जाद्वारे मागणी

केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत सशुल्क उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : १५.०७.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. जी. एस. सोनवणे, 'योगेश निवास', बी.फॉर्मसी कॉलेजजवळ, बार्शी रोड, उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, गुलशन-ए-अतफाल, उर्दू प्राथमिक शाळा, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, शम्स एज्युकेशन सोसायटी, हयात कॉम्प्लेक्स, काळामारोतीजवळ, मेनरोड उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३२९

निर्णय दिनांक : १५.०७.२००८

१ श्री. हनुमंत वसंतराव देशमुख, : अपीलार्थी
रा. ता.परळी वैजनाथ जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय,
परळी वैजनाथ, जि.बीड

२ जन अपिलीय अधिकारी
तथा प्राचार्य कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला
महाविद्यालय, परळी वैजनाथ, जि.बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०७.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. हनुमंत वसंतराव देशमुख, (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत. तर जन माहिती अधिकारी, कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय, परळी वैजनाथ, जि.बीड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय, परळी वैजनाथ ( यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी वरील सुनावणीसंदर्भात अपिलीय अधिकारी, कै.लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय, परळी वैजनाथ, जि.बीड यांच्यातर्फे त्यांच्याकडील दि. ५.७.२००८ रोजीचे एक अर्ज आयोगास प्राप्त झाला असून, या अर्जाद्वारे त्यांनी

मराठवाडा पदवीधर मतदारसंघाच्या निवडणूकीमुळे सुनावणीकरिता पुढील तारीख देण्याची आयोगास विनंती केली आहे. आयोग ती मान्य करीत आहे. त्यामुळे सदर प्रकरणातील आयोगाकडील आजची सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन सुनावणीची पुढील तारीख दिनांक १३.१०.२००८ रोजी दुपारी ठीक ०३.०० वाजता आयोगाच्या औरंगाबाद स्थित कार्यालयात निश्चित करण्यात आली आहे.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी सदर अपीलाच्या दिनांक १३.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या सुनावणीपूर्वी अपिलार्थीच्या आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जातील समाविष्ट सर्व (अपिलार्थीने आयोगाकडील द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांनी चुकीची, खोटी व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे म्हटले आहे.) आक्षेपांवर आपला युक्तीवाद लिखित स्वरुपात सादर करावा.

सदर सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही गैरहजर राहिले तर त्यांच्या गैरहजेरीत सदर प्रकरणी निर्णय घेण्यात येईल व तो दोन्ही पक्षास बंधनकारक राहील.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : १५.०७.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. हनुमंत वसंतराव देशमुख द्वारा कनकदंडे निवास, सरकारवाडा, अंबावेस, परळीवैजनाथ, ता.परळी वैजिनाथ जि.बीड

२ जन माहिती अधिकारी कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय, परळी वैजनाथ, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय, परळी वैजनाथ, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३१६

निर्णय दिनांक १६-०७-२००८

श्री. गोविंद मारोतराव कराळे, : अपिलार्थी
मु. पो. शिराढोण, तालुका कंधार
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा शिक्षणाधिकारी (मा.),
जिल्हा परिषद, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षण उप संचालक, लातूर
विभाग, लातूर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०७-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. रोकडोबा बाबुराव शिंदे, अधीक्षक, जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, नांदेड यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. राम नरसिंगराव गारकर, शिक्षण उपनिरीक्षक, जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उप संचालक, लातूर विभाग, लातूर यांचे

प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. गोविंद मारोतराव कराळे हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक २३-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-१०-९६ ते ०५-१२-२००६ या कालावधीतील श्री. भिमाशंकर विद्यालय, शिराढोण, तालुका कंधार ही शाळा स्वतःच्या मालकीच्या जागेत आहे किंवा किराया भाडे तत्तवावर आहे या संबंधात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" शाळेकरिता इमारत भाड्याची किंवा स्वतःच्या जागेवर तपशिलासाठी."
अपिलार्थीने सदर माहिती शीघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ११-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती मुख्याध्यापक श्री. भिमाशंकर विद्यालय, शिराढोण, तालुका कंधार, जिल्हा नांदेड यांच्याकडून प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांना सूचित केले. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती शाळेच्या मुख्याध्याकाकडे उपलब्ध असल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्याप्रमाणे कळविल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-१२-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या सदर अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे किंवा अपिलार्थीशी यासंदर्भात कोणताही पत्रव्यवहार केल्याचे

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. याचे कारण उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांना विचारले असता, त्यांनी अपिलार्थीचा अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नसल्याचे आयोगास सांगितले.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०७-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये, त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नसल्याने त्यांच्यावर दंडात्मक व प्रशासकीय कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना देण्यासाठी त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ११-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकास आदेशित केले होते, तदनंतर दिनांक १७-६-२००८ रोजी त्यांनी संबंधितांना स्मरणपत्र देखिल पाठविले होते, तथापि संबंधितांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली नसल्याचे अपिलार्थीने त्यांना दिनांक २१-०६-२००८ रोजीच्या त्यांच्या पत्राने कळविले त्यावरुन याबाबत अपिलार्थीस अद्यापही माहिती प्राप्त झाली नसावी असे ते अनुमान काढत आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती अत्यंत साधी व सरळ अशी होती. कोणत्याही अर्जदाराने एखादी माहिती मागितल्यास ती माहिती संबंधिताकडे उपलब्ध नसल्यास

त्यावर कशा प्रकारे कारवाई करावयाची याचे स्पष्ट विवेचन अधिनियमातील कलम ६ (३) मध्ये केलेले आहे. या प्रकरणी या कलमातील तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर तो त्यांनी ५ दिवसाच्या आत शाळेच्या मुख्याध्यापकाकडे पाठवून त्या पत्राची प्रत अपिलार्थीस देणे अपेक्षित होते, तथापि जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अशा प्रकारची कोणतीही कारवाई केली नाही. जन माहिती अधिकारी यांनी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाकडून अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना दिनांक ११-१२-२००६ व १७-०६-२००८ रोजीच्या पत्राप्रमाणे सूचना देऊनही संबंधित शाळेच्या मुख्याध्याकाने अपिलार्थीस माहिती दिलेली नाही. वास्तविक पाहता, जन माहिती अधिकारी यांच्याकडून संबंधित शाळेला जे वार्षिक अनुदान उपलब्ध करुन दिले जाते, या अनुदानामध्ये शाळेच्या भाड्याच्या रकमेचा समावेश असतो, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातील सदर माहिती देण्यासाठी थोडा जरी प्रयत्न केला असता तरी त्यांना अपिलार्थीस ही माहिती सहजरित्या देता आली असती, तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही सकारात्मक कारवाई या संपूर्ण घटनाक्रमाच्या कोणत्याही टप्प्यावर केल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीने ज्या शाळेसंबंधी ही माहिती मागविली आहे त्या शाळेवर शिक्षणाधिकारी यांचे पूर्ण नियंत्रण आहे. शिक्षणाधिकारी यांच्याकडून दिल्या गेलेल्या अनुदानाचा हिशोब संबंधित शाळेने शिक्षणाधिका-यांना देणे भाग असते, त्यामुळे शिक्षणाधिका-यानी सूचना देऊनही संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाने माहिती न देणे ही बाब निश्चितच आक्षेपार्ह व अविश्वासनीय आहे, असे आयोगास वाटते. यापुढे संबंधित शाळेस अनुदान वितरण करण्यापूर्वी अपिलार्थीने मागणी केलेल्या शाळेच्या भाड्यासंबंधीची माहिती अपिलार्थीस मिळेल याची जन माहिती अधिकारी यांनी दक्षता घेणे गरजेचे आहे. अपिलार्थीने त्यांचे प्रथम अपील करतांना, एका वेळी दोन शाळेला किरायाने इमारत दिली असल्याबाबतची शहानिशा करण्यासाठी त्यांना ही माहिती हवी आहे असे प्रथम अपिलात नमूद केले आहे. अपिलार्थीने उपस्थित केलेल्या या शंकेचे निरसन, त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना

दिल्याने होणार आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

प्रसंगावशात शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना असे सूचित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अपील अर्जात म्हटल्याप्रमाणे एकाच शाळेच्या इमारतीचे दोन वेळा स्वतंत्र भाडे ती शिक्षण संस्था जर आकारत असेल व सदर बाब नियमबाह्य असेल तर या प्रकरणी त्यांनी संबंधीत संस्थेवर प्रचलीत नियमाप्रमाणे यथायोग्य कारवाई करावी. उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अर्जाची प्रत संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाकडे ५ दिवसाच्या आत न पाठवून, सदर अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून तसाच आपल्याकडे विनाकारवाई ठेऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. त्यांच्या कार्यशैलीतील अशा प्रकारच्या कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे. इत:पर त्यांनी त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमाव्दारे प्राप्त होणा-या माहितीसाठीच्या अर्जांवर, अपील अर्जांवर, अधिनियमातील तरतुदीप्रमाणे विहित मुदतीत त्यांनी कारवाई करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य

उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक १६-०७-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गोविंद मारोतराव कराळे, मु. पो. शिराढोण, तालुका कंधार, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उप संचालक, लातूर विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३६८

निर्णय दिनांक १६-०७-२००८

श्री. अविनाश आसाराम कव्हळे, : अपिलार्थी
दैनिक जालना दर्शन, साई कॉम्प्लेक्स
लक्कडकोट, बसस्टॅण्ड जवळ,
जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा तालुका कृषि अधिकारी, जाफ्राबाद,
तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपविभागीय कृषि अधिकारी,
जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०७-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. अविनाश आसाराम कव्हळे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. रमेश रुपसिंग शिरा, मंडळ कृषि अधिकारी, जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जाफ्राबाद यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. अशोक रामराव काळे, जन अपिलीय

अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, जालना (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक १५-०५-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०१-२००७ ते १०-०५-२००७ या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" रो. ह. यो. अंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त झालेला निधी ज्या मजूरांना वाटप करण्यात आला त्या मजूरांचे कामनिहाय हजरी पट (मस्टर रोल)."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिश: अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १९-०६-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना देण्यासाठी मोठ्या प्रमाणात साधानसामुग्री व वेळ लागणार आहे, त्यांच्या कार्यालयातील कर्मचा-यांची अपुरी संख्या पाहता त्यांनी मागितलेली माहिती पुरविणे शक्य होणार नाही व सदरची माहिती त्यांना तपासणीसाठी दाखविता येईल असे कळवून त्यांचा मूळ अर्ज निकाली काढला.

जन माहिती अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०७-२००७ रोजी प्रथम अपील करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

अपिलार्थीच्या सदर अपील अर्जाची जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३१-०७-२००७ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांचा निर्णय ग्राह्य धरुन व

अपिलार्थीने माहिती अधिकारी यांना माहिती तपासणीसाठी येणार असल्याचे कळवून त्याप्रमाणे माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीला दिनांक व वेळ ठरवून द्यावा असा निर्णय दिनांक १४-०८-२००७ रोजी दिला.

जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील निर्णयामध्ये जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती तपासणीसाठी उपलब्ध करुन देण्यासाठी अपिलार्थीला दिनांक व वेळ ठरवून द्यावा असे सूचित केले होते, त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०५-०९-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांच्या सोयीचा दिनांक व वेळ त्यांना कळविण्याचे सूचित केले. सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नसल्याचे अपिलार्थीने आज सुनावणीमध्ये सांगितले. सदर पत्र अपिलार्थीस पाठविल्यापृष्ठ्यर्थ जन माहिती अधिकारी आयोगास, आयोगाने सुनावणीच्या नोटिशीमध्ये पूर्वसूचना देऊनही त्यांच्याकडील जावक नोंदवहीची प्रत सादर करु शकले नाहीत. यावरुन सदर पत्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविले हा जन माहिती अधिकारी यांचा दावा अग्राह्य धरण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०९-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये, त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

सदर व्दितीय अपीलामध्ये त्यांनी त्यांना माहिती देता येत नाही असे जन माहिती अधिकारी यांनी लेखी कळविल्याने ते हे व्दितीय अपील करीत असल्याचे नमूद केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद

करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती घेण्याकरिता ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दोन वेळा कार्यालयीन कामकाजाचे दिवशी गेले होते, तथापि जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कोणीही जबाबदार कर्मचारी उपलब्ध नसल्याने, त्यांनी माहितीसाठीचा मूळ अर्ज करुन आजमितीला एक वर्षाहून अधिक काळ लोटला असूनही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाली नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधित मजुरांना दिलेल्या मजूरी संबंधीची असून त्यांनी मागितलेल्या माहितीच्या एकूण पृष्ठांची संख्या किती आहे याची देखील जन माहिती अधिकारी यांना माहिती नाही हे शासनाचे दुर्दैव म्हटले पाहिजे. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते या पदावर दिनांक १५-०७-२००८ पासून कार्यरत असून अपिलार्थीने ज्यावेळी माहिती मागितली त्यावेळी श्री. बोईनवाड एम. एस. (सध्या रजेवर) यांच्याकडे या पदाचा पदभार होता. अपिलार्थीने मागितलेली माहिती अपिलार्थीस ते आता १० दिवसात देऊ शकतील.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी उपस्थित राहिल्याबद्दल त्यांनी त्यांच्याशी कधीही पत्रव्यवहार केला नाही तसेच त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थी यांच्या सोयीची वेळ कळविण्याचे सुनावणीच्या वेळा तोंडी सूचित केले होते, अपिलार्थीच्या अपील अर्जावर त्यांनी दिनांक १४-०८-२००७ रोजी आपला निर्णय पारित केला आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, मूळात येथे अपिलार्थीने व्यक्तिश: माहितीची अपेक्षा केली होती, तथापि अपिलार्थीने ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी व्यक्तिश: उपस्थित राहिल्याबाबतचा कोणताही ठोस

पुरावा आयोगासमोर सादर केला नाही. अपिलार्थीच्या दिनांक १५-०५-२००७ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक १९-०६-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप विस्तृत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आणले होते. जन माहिती अधिकारी यांच्या या उत्तराशी सहमत नसल्याने अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देतांना जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती तपासणीसाठी दिनांक व वेळ ठरवून देण्यासाठी सूचित केले होते. तथापि अपिलार्थी आणि जन माहिती अधिकारी यांच्यात कोठल्याही प्रकारे असा पत्रव्यवहार झाल्याचे दिसून येत नाही. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०५-०९-२००७ रोजी पत्र पाठविल्याचे त्यांनी सुनावणीमध्ये सांगितले. परंतु या संदर्भातील कोणताही ठोस पुरावा ते आयोगासमोर सादर करु शकले नाहीत.

वरील वस्तुस्थिती, अपिलार्थीने केलेल्या मूळ अर्जाचा दिनांक व आज सुनावणीपर्यंत व्यपगत झालेला कालावधी मागणी केलेल्या माहितीची मर्यादित व्याप्ती पाहता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आता विनामूल्य माहिती देणे त्यांना भाग आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीने सदर माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून व्यक्तिशः हस्तगत करावी.

जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीप्रमाणे विहित केलेल्या मुदतीमध्ये अपिलार्थीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद न दिल्याने त्यांना अपिलार्थीस ही माहिती आता विनामूल्य द्यावी लागेल.

या संपूर्ण घटनाक्रमामध्ये जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी

सुरुवातीपासून अपिलार्थीने मागणी केलेली माहिती लेखी स्वरुपात त्यांना देणे शक्य नसल्याची भूमिका घेतली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता तिची व्याप्ती मोठ्या प्रमाणात असल्याचा जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद मान्य केला तरी संबंधित मजुरांच्या केवळ ४ महिने इतक्या कालावधीतील हजेरीपत्रकाच्या झेरॉक्स प्रती अपिलार्थीस देणे ही बाब अशक्य असल्याचे आयोगास वाटत नाही. याबाबत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सदर माहिती पुरविण्यापोटी आदमासे पृष्ठांची संख्या त्यांचे अंदाजे शुल्क कळविण्याची तसदी देखील येथे घेतली नसल्याचे दिसून येते. फक्त माहिती देता येणे शक्य नाही याच त्यांच्या भूमिकेचा घोष त्यांनी या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कायम ठेवला आहे. सदर माहिती अपिलार्थीस देणे अशक्य असल्याचे आयोग मानत नाही. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी घेतलेल्या अशा प्रकारच्या काहीशा नकारात्मक भूमिकेमुळे अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून प्रदीर्घ काळ वंचित रहावे लागले. अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या कूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य

उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद

दिनांक १६-०७-२००८

( वि. बा. बोरगे )

राज्य माहिती आयुक्त,

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अविनाश आसाराम कव्हळे, दैनिक जालना दर्शन, साई कॉम्प्लेक्स लक्कडकोट, बसस्टॅण्ड जवळ, जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जाफ्राबाद, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३६९

निर्णय दिनांक १६-०७-२००८

श्री. माणिकराव माधवराव मुलगीर, : अपिलार्थी
सी-२८, भाग्य नगर, कारेगाव रोड,
परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा समाजकल्याण अधिकारी (गट-अ),
जिल्हा परिषद, परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी
अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०७-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. माणिकराव माधवराव मुलगीर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. पठाण मझहर अहमद, जन माहिती अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी (गट-अ), जिल्हा परिषद, परभणी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. तानाजी रंगनाथ गुरव जन अपिलीय अधिकारी तथा

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक १८-०५-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"१. कु. संजीवनी मुलगीर विद्यार्थीनी महाराष्ट्र मतिमंद विद्यालय परभणीच्या संदर्भात आपल्या कार्यालयास वेळोवेळी शाळेनी पाठविलेल्या अहवालाच्या सत्यप्रती मिळणेबाबत.

२. शासन निर्णयाप्रमाणे परभणी जिल्ह्यातील विमुक्त जाती भटक्या जमाती मुलींना इयत्ता ५ वी ते ७ वी दरमहा ६० रुपये प्रमाणे सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती वाटप केली जाते काय ? सदर योजना लागु झाल्यापासुन एकुण शाळा प्रस्ताव किती ? शिष्यवृत्ती वाटप झालेल्या शाळा किती ? शिल्लक किती शाळा राहिल्या ? कारणे काय ? यावर काय कार्यवाही केली बाबत माहिती.

३. शासन निर्णयाप्रमाणे परभणी जिल्ह्यातील विमुक्त जाती भटक्या जमाती मुला / मुलींना इयत्ता १० वी परिक्षा शुल्क परतावा योजना लागु झाल्यापासून आज पर्यंत पूर्ण वाटप झालेले आहेत काय ? एकुण शाळा संख्या किती ? सदरील योजनेनुसार विमुक्त जाती भटक्या जमाती मुला / मुलींना परिक्षा शुल्क परतावा मिळालेला आहे काय ? किती शाळातील विमुक्तजाती भटक्या जमाती मुला / मुलींना परिक्षा शुल्क परतावा मिळालेला नाही ? कारणे काय ? यावर काय कार्यवाही केली बाबत माहिती."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३०-०५-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात दिनांक ०५-०६-२००७ ते ०८-०६-२००७ या कालावधीमध्ये स्वत: येऊन त्यांना आवश्यक असलेल्या पत्रांच्या छायांकीत प्रती करुन घेऊन जाण्याचे अपिलार्थीस सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहिले असता, संबंधित कार्यालयीन कर्मचा-याने अपिलार्थीस स्वत: या प्रती झेरॉक्स करुन आणण्यासाठी सूचित केले, तथापि सरकारी कागद असल्याने अपिलार्थीने अशा प्रकारची कोणतीही कृती केली नाही असे अपिलार्थीने आज सुनावणीमध्ये सांगितले.

जन माहिती अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०६-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २३-०७-२००७ रोजी प्रथम व दिनांक २१-०८-२००७ रोजी व्दितीय अशा एकूण दोन स्वतंत्र सुनावण्या घेऊन अपिलार्थीस २ दिवसात माहिती देण्याचे या सुनावण्यामध्ये सूचित केले.

जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-०९-२००७ रोजी व्दितीय अपील केले असून त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना मुदतीत न देता प्रथम अपिलानंतर दिली व सदर माहिती अर्धवट व चुकीची असल्यामुळे त्यांनी हे व्दितीय अपील आयोगाकडे केले असल्याचे म्हटले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत कोणतीही माहिती पुरविली

नाही, मात्र जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सुनावणी झाल्यानंतर प्रथमतः दिनांक २३-०७-२००७ रोजी मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती दिली व त्यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दुस-यांदा सुनावणी घेऊन आदेशित केल्यानंतर दिनांक २३-०८-२००७ रोजी मुद्दा क्रमांक २ व ३ शी संबंधित "सदर माहिती उपलब्ध नाही" अशी माहिती त्यांना पुरविली, मात्र सदर कथित माहितीमध्ये त्यांनी मागितलेली माहिती संकलीत स्वरुपात त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याचे त्यांना कळविले व त्यांच्या प्रथम अर्जातील मुद्दा क्रमांक २ व ३ ची माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून उपलब्ध होऊ शकली नाही. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. त्यांना सदर माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेण्यासाठी फारच त्रास सहन करावा लागला व त्रास सहन करुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मुद्दा क्रमांक २ व ३ शी संबंधित माहिती प्राप्त झालेली नाही. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती न पुरविल्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील तरतुदीनुसार शास्तीची कारवाई करावी, अशी त्यांनी आयोगास विनंती केली.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी उपस्थित राहिले होते, तथापि त्यावेळी अपिलार्थीकडे सदर माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी आवश्यक ते शुल्क नसल्याने त्यांना अपिलार्थीस माहिती पुरविता आली नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली उर्वरित माहिती आता ते अपिलार्थीस देण्यास तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक १८-०६-२००७ रोजीच्या अपील अर्जावर त्यांनी दिनांक २३-०७-२००७ व दिनांक २१-०८-२००७ रोजी दोन स्वतंत्र सुनावण्या घेतल्या. जन माहिती अधिकारी यांनी

अपिलार्थीस प्रथम सुनावणीच्या निर्णयानंतर संपूर्ण माहिती दिली नाही त्यामुळे त्यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर दिनांक २१-०८-२००७ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस दोन दिवसाच्या आत माहिती देण्याचे त्यांना सूचित केले होते.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ३ मुद्दयावर माहिती मागितली होती. त्यापैकी पहिला मुद्दा वगळता मुद्दा क्रमांक २ व ३ व्दारे त्यांनी मागितलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपात असून त्यामध्ये शिष्यवृत्ती वाटप करण्यासाठी शिल्लक राहिलेल्या शाळा व परीक्षेचे शुल्क परतावा योजनेअंतर्गत अद्याप शिष्यवृत्ती वा परतावा मिळाला नसल्यास त्याची कारणे याच्या माहितीची विचारणा केली आहे. माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम २ (च) मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे ''माहिती'' या शब्दाच्या व्याख्येचे अवलोकन करता, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, या व्याख्येशी अंशतः विसंगत असल्याचे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमामध्ये जन माहिती अधिकारी यांची भूमिका ही एका विश्वस्ताची असून त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीचे जतन करुन ठेवणे व माहिती अधिकार अधिनियमाव्दारे त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या अर्जासंदर्भात संबंधितांना या माहितीतील आवश्यक ती माहिती पुरविणे हे त्यांचे कर्तव्य आहे. त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीवर त्यांनी अभिप्राय व्यक्त करणे किंवा त्यांच्या कोणत्याही निर्णयाबद्दल त्यांना अपिलार्थीस कारणे देणे, त्यांना खुलासा करणे हे अधिनियमामध्ये अभिप्रेत नाही आणि अपिलार्थीने नेमकी अशाच प्रकारची मागणी जन माहिती अधिकारी यांचेकडे केली आहे. त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या अर्जाव्दारे त्यांनी मागणी केलेल्या माहितीची कारणे काय हा भाग वगळता उर्वरित माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस देणे भाग आहे, असे आयोगाचे मत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांच्याकडे

संकलीत स्वरुपात उपलब्ध नसल्याचे कारण सांगून अपिलार्थीस माहिती पुरविण्याचे नाकारले आहे. जन माहिती अधिकारी यांची ही कृती बरोबर नसून शासनाचा प्रत्येक विभाग दरवर्षी त्यांचे परफॉर्मन्स बजेट विधी मंडळास सादर करत असतो, त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे अथवा त्यांच्या वरीष्ठांकडे असण्याची शक्यता आहे. तसेच शासनाकडून प्राप्त झालेला निधी त्यांच्या विभागातील ज्या शाळांना वितरित केला जातो त्यांचे रजिस्टर त्यांच्या कार्यालयात सदर बाब आर्थिक व्यवहाराशी निगडीत असल्याने ठेवणे आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारचे रजिस्टर त्यांच्या कार्यालयात ठेवले असल्याचे मान्य केले आहे. एवढे सर्व मार्ग अपिलार्थीस माहिती देण्यासाठी उपलब्ध असतांना जन माहिती अधिकारी यांनी सदर माहिती संकलीत स्वरुपात नसल्याने ती अपिलार्थीस उपलब्ध करुन दिली नाही हे त्यांचे वर्तन निश्चितपणे आक्षेपार्ह आहे, असे आयोग मानते. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली मुद्दा क्रमांक २ व ३ प्रमाणे कारणे व शिष्यवृत्ती वाटप केली जाते का, पूर्ण वाटप झाले आहे काय ही माहिती वगळता उर्वरित सर्व माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना दुस-या अपील निर्णयामध्ये २ दिवसाच्या आत अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केल्यानंतरही माहिती देण्यासदंर्भात त्यांनी कोणत्याही टप्प्यावर गांभीर्याने व सकारात्मक विचार केल्याचे दिसून येत नाही. उलट त्यांच्या अशा प्रकारच्या उत्तराने त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी टाळाटाळ करण्याचा मार्ग अवलंबिला आहे, अशी आयोगाची खात्री झाली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विलंबाने माहिती पुरविली आहे व माहिती उपलब्ध नाही अशा प्रकारची उत्तरे अपिलार्थीस देऊन अपिलार्थीस माहिती दिल्याचा अहवाल वरिष्ठांना सादर केला आहे. त्यांची ही कृती त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट करते. सबब संचालक, समाजकल्याण, पुणे यांना असे आदेशित

करण्यात येते की, त्यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत झाल्यापासून दोन महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जतील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित सर्व माहिती जन माहिती अधिकारी यांनी पुरविली असल्यामुळे ही माहिती अपिलार्थीस देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली मुद्दा क्रमांक २ व ३ ची उर्वरित सर्व माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. संचालक, समाजकल्याण, पुणे यांनी, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत झाल्यापासून दोन महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक १६-०७-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. माणिकराव माधवराव मुलगीर, सी-२८, भाग्य नगर, कारेगाव रोड, परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी (गट-अ), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ संचालक समाजकल्याण, समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, ३ चर्च रोड, पुणे – ४११ ००१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.